UNIVERSAL LIBRARY
OU_192788
UNIVERSAL LIBRARY

गोर्की-साहित्य : खंड २ रा :

# एका काळीं माणसें असलेले प्राणी

अनुवादक

स. ह. मोडक

Post Graduate Library
College of Arts & Commerce, O. U.

चित्रकार

चित्तप्रसाद

लो क - सा हि त्य
८७ शिवाजी पार्क, मुंबई २८

पहिली मराठी आवृत्ति : सप्टेंबर १९४८

किंमत दोन रुपये

# अ नु क्र म णि का

★

M2540

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| आमविक वाङ्मय | ३ |
| एका काळीं माणसें असलेले प्राणी | ९ |
| फेरीवाला आणि गांवगुंड | १०३ |

मुद्रक : जनार्दन गणेश जोशी, जनार्दन सदाशिव लि० चा प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २
प्रकाशक : शकुंतला मोडक, लोक-साहित्य, ८७ शिवाजी पार्क, मुंबई २८

# " जागतिक वाङ्मय "

ललित वाङ्मयाचा नीट लक्षपूर्वक अभ्यास करणें आवश्यक असतें, किंवा निदानपक्षीं ललित वाङ्मयाचें सागोपाग ज्ञान असणें आवश्यक असतें, हें मुद्दाम आग्रहपूर्वक सागण्याची मुळींच जरूर नाहीं.

ललित वाङ्मय म्हणजे जगाचें हृदय. सर्व प्रकारचे हर्ष-खेद, आशा-आकाक्षा, निराशा-उद्वेग, निसर्गसौन्दर्य पाहून माणसाच्या मनामध्यें जागृत होणाऱ्या एकूणएक कोमल भावना, निसर्गाच्या गूढ रहस्यामुळें माणसाला वाटणारी सर्व प्रकारची भीति—या सर्व भावनांच्या योगानें वाङ्मयाला प्रेरणा मिळत असते. आत्मसाक्षात्काराच्या इच्छेनें या जगाच्या हृदयाचें अखड अदम्य स्पदन चालू असतें; जणू काय सगळ्या वस्तुजातानें, निसर्गाच्या सगळ्या शक्तींनीं, अगोदर माणसाच्या अंगीं आपल्यातली गुतागुत व बुद्धिवादित्व सर्वोच्च स्वरूपात निर्माण करून ठेवलें आहे आणि मग या शक्ति या जगाच्या हृदयामध्यें आपल्या स्वतःच्या जीवनाचें आद्य-तत्व व उद्दिष्ट काय याचा शोध करीत आहेत.

ललित वाङ्मय म्हणजे जगाचा सर्वसाक्षी नेत्र असेंहि म्हणता येईल. मानवी मनाचीं अत्यत गूढ रहस्यें पाहण्याचें सामर्थ्य या नेत्राला असतें. पुस्तक म्हणजे साधीसुधी व नित्याच्या परिचयातली वस्तु. पण मूलगामी दृष्टीनें पाहता हें पुस्तक म्हणजे या भूतलावरील सर्वांत मोठा व सर्वांत जास्त रहस्यमय असा चमत्कार आहे. जो आपल्या ओळखीचा नाहीं, कधींकधीं ज्याची भाषाहि आपल्याला समजत नाहीं, कदाचित जो आपल्यापासून हजार मैल दूर आहे, अशा कुणा तरी माणसानें आपण ज्यांना "अक्षरें" म्हणतो त्या दोनचार डझन खुणाचे निरनिराळया प्रकारचे गट कागदावर रेखाटलेले असतात—आणि या पुस्तकाच्या निर्मात्यापासून खूप दूर असणारे आपण तिऱ्हाइत लोक या खुणाकडे पाहतों; त्यातल्या सगळ्या शब्दाचा, कल्पनांचा, भावनांचा व रूपकाचा अर्थ आपल्याला कळतो, त्यातलें निसर्गाचें वर्णन आपल्याला आवडतें; त्यातल्या शब्दसौंदर्यानें आपल्याला आल्हाद वाटतो; त्या पुस्तकातील शब्दाचें संगीत आपल्याला मोहिनी घालतें; कागदाचीं छापील पृष्ठें आपल्या डोळ्यात अश्रू आणतात, आपला त्वेष जागृत

करतात, आपल्याला स्वप्नसृष्टींत दंग व्हायला लावतात, अगर कधीं कधीं आपल्याला हसवितात, आणि आपल्या वृत्तीशीं संवादी अगर विसंवादी भावना आपल्या मनांत जागृत होतात---केवढा चमत्कार असतो हा! मानवजातीनें स्वत:साठीं सुख व सामर्थ्य संपादन करण्याच्या दिशेनें प्रगति करीत असताना जे अनेक अजब चमत्कार करून दाखविलेले आहेत, त्यांमध्यें पुस्तक हा बहुधा सर्वांत मोठा व सर्वांत जास्त गुंतागुंत असलेला असा चमत्कार आहे असें मला वाटतें.

अजून आपणा सर्व मानवाची एक भाषा झालेली नाहीं, म्हणून सर्वांचें संयुक्त असें जागतिक वाङ्मय अजून निर्माण झालेलें नाहीं; परंतु गद्यमय अगर पद्यमय अशा सगळ्याच वाङमयनिर्मितींत आपल्याला काय आढळतें? सर्व मानवाना समान अशा भावना, विचार, व कल्पना सर्व वाङ्मयांत एकाच स्वरूपात आढळतात, सुखासाठीं व आत्मिक स्वातंत्र्यासाठीं मानवानें चालविलेल्या पवित्र प्रयत्नाचें एकाच स्वरूपाचें चित्रण त्यात आढळतें, जीवनातील दु:खाबद्दलचा तिरस्कार; अधिक चांगल्या स्वरूपातील जीवनाविषयींची आकांक्षा, जें शब्द व विचार यांच्या कक्षेपलीकडे असतें, ज्याचें आकलन भावनानासुद्धा होणार नाहीं, ज्या रहस्यमय गोष्टीला आपण 'सौंदर्य' हें मिळमिळीत नाव दिलेलें असतें, आणि जें जगामध्यें व आपल्या हृदयामध्यें अधिकाधिक उज्वल स्वरूपात एकसारखें तेवत राहिलेलें असतें, अशा ज्या गूढ रहस्याचा ध्यास सर्व माणसांना लागलेला असतो---त्याचें वर्णन करण्याच्या बाबतींत सर्व वाङ्मयाची एकवाक्यताच आढळते.

वातावरणाच्या, व त्याच्याहि पलीकडील आवरणाच्या जोडीला आपल्या ग्रहाभोंवतीं आत्मिक निर्मितीचेंहि एक आवरण आहे; आपल्या शक्तीच्या बहुविध आविष्काराचें हें आवरण आहे; यातूनच आपण अमर सौंदर्याच्या वस्तु विणून तयार केलेल्या आहेत, तापवून ठोकून तयार केलेल्या आहेत, ओतून तयार केलेल्या आहेत; यांतूनच आपण उदात्त कल्पना निर्माण केलेल्या आहेत; यांतूनच आपण अजब गुंतागुंतीचीं यंत्रें तयार केलेलीं आहेत, अजब कारागिरीचीं मंदिरें बांधलेलीं आहेत, पर्वतांच्या अफाट पोटांतून आरपार बोगदे पाडलेले आहेत, पुस्तकें व कविता लिहिलेल्या आहेत, चित्रें काढलेलीं आहेत, लाखों टन पोलाद तयार केलेलें

आहे, व मोठमोठ्या नद्यांवर फुलाप्रमाणें झुलणाऱ्या पुलांच्या स्वरूपांत हें पोलाद उपयोगात आणलें आहे—आणि आपल्या जीवनाचें हें जें उदात्त, सुरेल, सामर्थ्यशाली व सुंदर काव्य आहे तें सगळें या आगरगांतूनच निर्माण झालेलें आहे.

आपण अज्ञाताच्या पोलादी भिंतीवर प्रहार करून तींतून अधिकाधिक तेजस्वी ठिणग्या निर्माण करीत असतों, आपल्या बुद्धिचातुर्यानें व दृढनिश्चयानें माणसाला निसर्गावर व आपल्या अंगच्या पशुत्वावर मात करण्याचें सामर्थ्य देणाऱ्या आशेच्याच या ठिणग्या असतात; ही करामत आपल्या अंगीं आहे म्हणूनच आपण मानवी प्राणी आपल्या वाङ्मयात व शास्त्रीय प्रगतींत इतक्या जोरदार व तेजस्वी स्वरूपात व्यक्त झालेल्या आपल्या आत्मिक शक्तीच्या महान् प्रयत्नाचे विश्वव्यापी महत्व यथोचित अभिमानानें सागू शकतों.

वाङ्मय आपल्या जाणिवेला सखोलता आणतें, जीवनाविषयींच्या आपल्या भावनेला व्यापक स्वरूप देतें, आणि आपल्या संवदेनाना योग्य वळण देतें, आणि सर्व कल्पना व सर्व कृती, सारें आत्मिक जग, हें मानवी प्राण्याच्या रक्तातून व जिवत संवदेनातूनच निर्माण झालें आहे याची आठवण आपल्याला करून देण्याचें कार्य वाङ्मय करीत असतें—वाङ्मयाचा हाच सर्वात मोठा गुण म्हटला पाहिजे.

चीनमधील हेन्-तोई हा स्पेनमधील डॉन जुआनप्रमाणेंच स्त्रियाच्या प्रेमात सापडून असंतुष्टपणें तममगत असतो; हबशी व फ्रेंच लोकांचीं प्रणयाच्या सुखदुःखाचीं गाणीं अगदीं सारख्याच स्वरूपाचीं असतात, एखादी जपानी गेशा ( वेश्या ) व फ्रेंच वेश्या या दोघींचें प्रेम सारखेंच हृदयद्रावक असतें, आणि आपल्या स्वतःच्या आत्म्याच्या अपूर्णतेला पूर्णता आणणारी स्त्री आपल्याला मिळावी हीच वासना सर्व देशातील व सर्व युगातील माणसाच्या हृदयात तेवत राहिलेली आहे व अजूनहि तेवत असते—या सगळ्या गोष्टी वाङ्मयच आपल्याला सागतें.

आशियातला खुनी माणूस हा युरोपातल्या खुनी माणसाइतकाच ओंगळ असतो; रशियन मारवाडी प्ल्यूदिकन हा त्याचा फ्रेंच भाऊबंद ग्रान्दे याच्या इतकाच तिरस्करणीय असतो; सर्व देशातले मवाली सारखेच

असतात; आणि सगळ्या ठिकाणचे मानवद्वेष्टे सारखेच नीच असतात. आपण कुठल्याहि देशातले असलों तरी डॉन क्विग्झोट या कल्पना-साम्राज्यातील शिलेदाराची चटका लावणारी मूर्ति आपल्याला सारख्याच प्रमाणात हृदयगम वाटते.

शेवटीं निष्कर्ष हाच निघतो कीं कोणत्याहि काळीं कोणत्याहि भाषेत सगळेच लोक एकाच विषयावर बोलत असतात—हा विषय म्हणजे आपण स्वत: आणि आपलें स्वत:चें भवितव्य. आपल्या रासवट प्रेरणानुसार चालणारे लोक सगळीकडे सारखेच असतात—बुद्धीच्या दुनियेंत मात्र अफाट विविधता असते.

हें असंख्य प्रकारचें साम्य व हे कधींहि न संपणारे भेद निर्विवाद, स्पष्ट व पटण्याजोग्या स्वरूपात वाङ्मयानेंच दाखविलेले असतात. वाङ्मय हा आपल्या जीवनाचा जिवत आरसा असतो. एखाद्या डिकन्सच्या खोडकर विनोदी पद्धतीनें अगर एखाद्या दस्तयेव्स्कीच्या भयकर उपरोधिक पद्धतीनें आपलें सुख दु:ख अगर आपला संताप या आरशात प्रतिबिंबित झालेला असतो. आपल्या आत्मिक जीवनातील सगळी गुतागुत, आपल्या वासनाचें सगळें क्षेत्र, आपल्या मूर्खपणाचें व हीनपणाचे अथाग अस्वस्थ जलाशय, भवितव्याला तोंड देताना आपल्याकडून प्रदर्शित होणारें शौर्य अगर भेकडपणा, प्रेमाचा निधडेपणा, द्वेषाचें सामर्थ्य, आपल्या ढोंगीपणाचा सारा कर्दम, खोटेपणाचें व फसवेगिरीचें भरपूर पीक, आपल्या विचाराची लाजिरवाणी विकृति, आपल्या मनाला लागलेल्या असख्य विवचना, आपल्या भेकड आकाक्षा व आपलीं उदात्त ध्येयें—या विश्वचक्राला गति देणारें जें जें काहीं असेल तें तें सगळें, मानवाच्या हृदयामध्यें स्पदन पावणारें सर्व काहीं—या आरशात प्रतिबिंबित झालेलें असतें. मानवजातीकडे कधीं हळव्या मित्राच्या नजरेनें पाहावें, कधीं कठोर न्यायाधीशाच्या नजरेनें तिचें निरीक्षण करावें, कधीं तिला सहानुभूति दर्शवावी, कधीं तिच्या समवेत हंसावें, कधी तिच्या धैर्याबद्दल आनंद प्रदर्शित करावा, कधीं तिच्या निरर्थक प्रयत्नाचा धिःकार करावा—अशा रीतीनें वाङ्मय हें जीवनाच्या वरच्या पातळीवर राहून, आणि विज्ञानाला आपल्याबरोबर घेऊन, मानवजातीच्या प्रगतीचा मार्ग उजळत असतें आणि मानवी स्वभावाची अधिक चागली घडण करावयास सहाय्य करीत असतें.

कधीं कधीं वाङ्मयावर विज्ञानाच्या सुदर निःपक्षपातीपणाची छाप असते व तें कसल्या तरी ठोकळेबाजीच्या तावडींत सापडतें. अशा काळात माणूस म्हणजे केवळ "आनददायक राक्षवटपणानें" निर्माण केलेलें "अन्न पचविणारें आतडें" आहे असें मानणारा एखादा एमिल झोला आपल्याला दिसू लागतो; किंवा गस्ताव फ्लॉबेरसारख्या थोर कलावताला देखील एखाद्या दूब्वा-रेमॉच्या निराशेची बाधा झालेली आपल्याला दिसू लागते.

परतु शब्दाच्या व कल्पनाच्या साधनावर उभारलेल्या या कलेचें खरें वैशिष्टय मानवी चुकाचें ज्ञान करून देणें हेंच आहे असें म्हणतां येणार नाहीं. मानवाला त्याच्या बाह्य जीवनाच्या परिस्थितींतून वरच्या पातळीवर नेण्याच्या प्रयत्न करणें, त्याला कमीपणा आणणाऱ्या वास्तव जगाच्या बंधनातून सोडवणें, आणि 'तू गुलाम नाहींस, तू वास्तव जगाचा धनी आहेस, तू जीवनाचा स्वतत्र निर्माता आहेस' असा साक्षात्कार मानवाला करून देणें—हें वाङ्मयाचें खरें वैशिष्टय आहे. या अर्थानें वाङ्मय हें सदैव क्रातिकारक असतें.

प्रतिभेच्या प्रचंड सामर्थ्याच्या जोरावर वाङ्मय हें वास्तव जगातील साऱ्या मामुली गोष्टींच्या वरच्या पातळीवर राहतें. मानवतावादाची भावना वाङ्मयाच्या रोमरोमांत भरलेली असते. वाङ्मयाला वाटणारी चीड देखील नितात प्रेमाच्या अतिरेकातूनच निर्माण झालेली असते. अशा प्रकारें वाङ्मय हा शाप नसून हें मानवजातीला मिळालेलें उदात्त वरदानच आहे. राष्ट्राराष्ट्रांमध्यें, वर्गावर्गामध्यें, व्यक्तींव्यक्तींमध्यें शत्रुत्व व द्वेषभाव निर्माण करणारे जीवनातील कठोर अंतर्विरोध, हे वाङ्मयाच्या दृष्टीनें पाहतां शतकानुशतकापासून चालत आलेले केवळ प्रमाद आहेत; वाङ्मयाची अशी ठाम श्रद्धा आहे कीं जनतेची उदात्त इच्छाशक्ति सर्व प्रमादांचा नायनाट करूं शकते आणि ती तो केल्याखेरीज राहणार नाहीं. जें जें काहीं मानवी आत्म्याच्या अनिर्बंध प्रगतीच्या आड येत असेल, जें जें कांहीं मानवाला पाशवी प्रेरणेच्या आहारीं जाऊ देत असेल, त्या त्या साऱ्याचा नायनाट केल्याखेरीज जनता स्वस्थ बसणार नाहीं अशी वाङ्मयाची ठाम श्रद्धा आहे.

रूपकांच्या व शब्दाच्या स्वरूपात नटलेल्या नवनवोन्मेषशाली प्रतिभेच्या

या प्रचंड प्रवाहाकडे जेव्हां आपण पाहतों तेव्हां आपली अशी खात्री पटते कीं या प्रवाहाचा महान् उद्देश सर्व प्रकारचे वर्णभेद, राष्ट्रभेद व वर्गभेद पार धुवून टाकणें हाच आहे. एकमेकाशीं झगडण्याच्या जड ओझ्याच्या तावडींतून माणसाची सुटका करून निसर्गाच्या रहस्यमय शक्तींशीं झुज देण्याच्या दिशेनें त्यांच्या सर्व प्रयत्नाना वळण देणें हाच या प्रवाहाचा महान उद्देश आहे.

. . . . . . .

वाङ्मय हा आपल्या पूर्वजाच्या चुकाचा, कर्तृत्वाचा, वैगुण्यांचा व विजयाचा जिवत इतिहास आहे. वाङ्मयाच्या अंगीं आपल्या विचाराना वळण देण्याचें, आपल्या हीन मनोवृत्तींना आळा घालण्याचें, आपल्या इच्छाशक्तीला प्रेरणा देण्याचें सामर्थ्य आहे. समान दुःखांच्या व समान आकाक्षांच्या दृढ बंधनानें सर्व राष्ट्रांना तें एकमेकाशीं निगडित करील; आणि सुदर, स्वतत्र व सुखी जीवन निर्माण करण्यासाठीं आपण सारेच एकमतानें प्रयत्न करीत आहोंत ही जाणीव तें करून देईल; आणि अशा रीतींनें सर्व राष्ट्राची आत्मिक एकजूट करण्याची आपली विश्वव्यापी कामगिरी पार पाडल्याखेरीज तें कदापि राहणार नाहीं.

. . . . . . .

माणसाचें ज्ञान जितके जास्त विस्तृत, तितकी त्याची परिपूर्णता अधिक; आपल्या शेजाऱ्यांविषयीं त्याची जिज्ञासा जितकी जास्त तीव्र, तितकी निर्मितिक्षम शक्तींना एकत्र आणून त्यांचा एकच जोरकस प्रवाह निर्माण करण्याची क्रिया जास्त शीघ्र; आणि तितक्याच जास्त शीघ्र गतीनें आपण परस्परांचीं अंतःकरणें समजून घेऊं, परस्पराविषयीं आदरभाव परिणत करूं, आणि सर्व माणसांना बंधुत्वाचा व स्वातंत्र्याचा लाभ करून देऊं.

[ लेखनकाल : १९१९ ] माक्सिम गोर्की



# एका काळीं माणसें असलेले प्राणि

गांवांत जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा एकमजली चद्रमौळी झोंपड्यांच्या दोन रांगा आहेत. त्यांच्या आकसलेल्या खिडक्या व वेड्यावाकड्या भिंती एकमेकींना खेटून उभ्या आहेत. या जुनाट वास्तूंच्या छपरांना जागोजाग भोंके पडलेलीं आहेत. अधून मधून रिपा घालून तीं बद केलेली असून त्यांच्यावर शेवाळ वाढलेलें आहे. अधून मधून उंच काठ्यांवर साळुंक्यांच्या घरट्यासाठी खोकीं अडकवलेली दिसत आहेत. त्यांच्यावर धुरळ्यानें पानें माखलेल्या एल्डर वृक्षांची व गाठाळ पाढऱ्या वाळुंजीच्या झाडाची सावली आहे. हे गरीब वस्तीच्या उपनगरातलें कगाल वनस्पतिवैभव.

खिडक्यांचीं फिकट हिरवीं व वापरानें डागळलेली तावदानें भेकड भामट्यांच्या नजरांनी एकमेकांकडे पाहात आहेत. रस्त्यातून एक नागमोडी वाट पावसामुळे पडलेल्या खोल नराड्यातून वळणें घेत घेत टेकडीकडे गेलेली आहे. जागोजाग गिट्टीचे व हर प्रकारच्या कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत. गावातून भर वेगात वाहून येणारें पावसाचें पाणी अडविण्यासाठीं इथल्या रहिवाशानीं पूर्वी उभारलेल्या अगर नवीन उभारू घातलेल्या अडथळ्यांचे हे अवशेष आहेत. अर्थात् या पाण्याच्या लोंढ्यापुढें त्यांचा टिकाव लागलेला

नाहीं. टेंकडीच्या माथ्यावर हिरव्यागार बाग बगीच्यांच्या गर्द पर्णसंभारात सुदर दगडी हवेल्या दडून राहिलेल्या आहेत. प्रार्थनामदिराचे घटामनोरे निळ्या आकाशाकडे अभिमानानें वर मान करून पाहात आहेत. आणि त्याच्यावरचे मढविलेले क्रूस सूर्यकिरणाच्या प्रभावानें झळाळत आहेत.

पावसाळ्याच्या दिवसात गाव आपला सारा चिखल या रस्त्यात आणून ओतत असतें. हवा कोरडी असली कीं हा रस्ता धुळीनें माखून राहतो. आणि हीं सारीं चद्रमौळी घरे देखील अशीं दिसतात कीं जणू काहीं तीं टेकडीच्या माथ्यावरून खाली भिरकावून दिलीं गेली असावींत आणि कुणाच्या तरी जबरदस्त हातानें कचऱ्यासारखी एकत्र गोळा करून ठेवलेली असावींत. भुईला नाके लागलेली हीं घरे टेकडीच्या उतारावर ठिपक्यासारखी दिसतात. या अर्धवट कुजलेल्या व रोगट दिसणाऱ्या घराना ऊन, धुरळा व पाऊस याच्या योगानें जुन्या लाकडाचा घाणेरडा करडा रग चढलेला आहे.

रस्त्याच्या टोकाला, गावातून जणू ढकलून बाहेर घालविल्यासारखे दिसणारे एक अस्ताव्यस्त दुमजली घर होते. हें घर पेत्यूनिकोव या व्यापाऱ्याच्या मालकीचें होते. झोंपड्याच्या रागेतलें हें शेवटचें घर. टेकडीच्या थेट पायथ्याशीं होते तें. त्याच्या मागच्या अंगाला एक खुलें वावर होतें. सुमारें अर्धा मैल अतरावर याच वावराचा खडा उतार थेट नदीपर्यंत गेलेला होता. तिथल्या साऱ्या घरामध्यें हें जुनाट मोठे घरच सगळ्यात जास्त उदास दिसे. तें एका बाजूला कललेलें होतें आणि त्याच्या खिडक्याच्या दोन रागापैकीं एकहि खिडकी धड राहिलेली नव्हती. खिडक्याच्या तुटक्या चौकटींतल्या फुटक्या काचाना दलदलीच्या पाण्यासारखी काळसर हिरवी चकाकी आलेली होती. खिडक्याच्या दरम्यान गिलावा केलेल्या भिंतीचे जागोजाग कळपे निघालेले होते व तिच्यावर काळे डाग पडलेले होते. काळानें जणू काय या जुन्या घराचा इतिहासच चित्रलिपींत या भिंतीवर लिहून ठेवलेला होता. घराच्या कोसळू घातलेल्या छपरानें त्याचें स्वरूप अधिकच केविलवाणें केलेलें होते. सारे घर जसें काहीं जमिनीला नमस्कार करीत होतें. आपल्याला सडक्या अवशेषाच्या बेढब ढिगाऱ्याचें रूप देणाऱ्या भवितव्याचा शेवटचा रट्टा केव्हा मिळतो याची तें लीनपणानें वाट पाहात असल्यासारखे दिसत होते.

फाटकाचीं दारें उघडींच होतीं. एक दार बिजागऱ्या निखळून वाटेवर

पडलें होतें. त्याच्या गजाच्या फटींतून गवत वाढलेले होते. साऱ्याच ओसाड ऐसपैस अंगणात जिकडे तिकडे गवत वाढलेलें होतें. या अंगणाच्या आतल्या अगाला पत्र्याचें छप्पर असलेली धुराने काळवडलेली एक बैठी इमारत होती. मोठ्या घरात कुणीच राहात नव्हतें. पण या पत्र्याच्या इमारतीत पूर्वी लोहाराचे दुकान होते आणि याचें रूपातर आता एका स्वस्त भाड्याच्या शयनगृहात करण्यात आलेलें होते. या शयनगृहाचा कारभार आरिस्तीद फोमिच कुवाल्डा हा पेन्शनर लष्करी कॅप्टन पाहात होता.

या शयनगृहाचा आतला भाग म्हणजे ४२ फूट लाब व २८ फूट रुद अशी एक लाबलचक भेसूर दिसणारी गुहावजा खोली होती. तिच्या एका अगाला उजेडासाठीं चार लहान चौकोनी खिडक्या व एक रुद दरवाजा होता. तिच्या गिलावा न केलेल्या विटाच्या भिती धुरानें काळपटलेल्या होत्या. तिचें छत तराफ्याच्या अवशेषातून तयार केलेलें असून तेहि धुरानें काळपटलेलें होतें. मधोमध एक मोठी भट्टी होती. ही भट्टी मुळात लोहाराच्या भट्टीवरच बाधलेली होती. तिच्या सभोंवतीं व भितींच्या कडेकडेनें रुद बाकडीं टाकलेली होतीं. त्याच्यावर लक्तराचे ढीग पडलेले होते. हे इथल्या भाडेकरूचे बिछाने होते. भिंतींना धुरकट वास येत होता. जमिनीला कुबट वास येत होता आणि बाकड्याना सडक्या लक्तराचा वास येत होता. मालकाची झोपावयाची जागा भट्टीच्या वरच्या अगाला होती. तिच्या भोंवताली माडलेल्या फळ्या म्हणजे मानाचीं आसनें होतीं. मालकाशीं दोस्ती असलेल्या लोकानाच त्यावर बसावयास मिळे.

कॅप्टननें स्वतःच्या बैठकीसाठीं शयनगृहाच्या दाराशीं विटाचें एक बाकडे बाधून घेतलेलें होतें. दिवसाचा बहुतेक वेळ स्वारी या बाकड्यावर बसलेली असे. नाहीं तर तो रस्त्यापलीकडे एगोर वाविलोवच्या खानावळीत असावयाचा. तिथेंच त्याचें जेवणखाण व वोडकापान होत असे.

हें शयनगृह भाड्यानें चालवायला घेण्यापूर्वी आरिस्तीद कुवाल्डानें गावातल्या नोकराची नोंद करावयाचें एक ऑफिस चालविलेलें होतें. त्याच्या आयुष्याचा याच्याहि मागचा इतिहास आपण पाहू लागलों तर एका काळीं तो एका छापखान्याचा मालक होता असें आढळून येईल. आणि त्याच्याहि पूर्वी, त्याच्याच शब्दात सागायचें म्हणजे, तो "नुसता जगत होता, अन्

अशा तशा नव्हे, चागला जोरात जगत होता; जगाव कसं हें माहीत असलेल्या माणसासारखा जगत होता!"

त्याचें वय असेल सुमारें पन्नास वर्षांचें. भरपूर उची, रुद खादे, तोंडावर देवीचे वण, दारू पिऊन झिंगल्यामुळें चेहरा सुजमटलेला, घामट पिवळया रगाची ऐसपैस दाढी—अशी ही स्वारी होती. त्याचे डोळे खूप मोठे व करडया रगाचे होते. त्याच्यामध्यें उर्मट आनद विलसत असे. तो खोल घोगऱ्या आवाजात बोले. त्याचा आवाज त्याच्या घशातून कुरकुरत येतोसा वाटे. चिनी मातीची वाकडया तोंडाची जर्मन चिलीम बहुधा हटकून त्याच्या दातातून पुढें आलेली दिसे. तो रागावला म्हणजे त्याच्या प्रचड लाल बाकदार नाकाच्या नाकपुडया तट्ट फुगत, त्याचे ओठ थरथरू लागत, आणि लाडग्याच्या दातासारख्या फारोळ्या पिवळ्याजरद दाताच्या दोन कवळ्या दिसू लागत. त्याचे हात लाब होते, पाय फेगडे होते. अंगात नेहमी लष्करी अधिकाऱ्याचा जुना ओव्हरकोट, डोक्यावर लाल फीतवाली घाणेरडी मेणचट बिनगोटाची टोपी, पायात केसाळ चामडयाचे, भोंके पडलेले, जवळजवळ गुडघ्यापर्यंत उच बूट, असा त्याचा पोशाख असे. सकाळच्या वेळेला नेहमींच त्याचें डोके मद्यपानाच्या परिणामामुळें जड होऊन दुखत असे. रात्रींच्या वेळीं तो थोडासा झिंगलेला असे. पण कितीहि दारू फस्त केलेली असली तरी तो खरोखरी झिंगलेला असा कधींच नसे, आणि त्याची आनंदी वृत्ति कधींहि ढळत नसे.

संध्याकाळच्या वेळीं तोंडात चिलीम धरून विटाच्या बाकड्यावर बसल्या बसल्या तो भाडेकरूंना आत घेई. "हा कसला माणूस आलाय आता आणीक?" त्याच्याकडे येत असलेल्या लक्तऱ्या उद्विग्न प्राण्याची तो विचारपूस करी. दारू पिऊन झिंगल्याबद्दल अगर याहूनहि कायदेशीर अशा दुसऱ्याच कसल्या तरी कारणाबद्दल गावातून हाकलून दिलेला प्राणी त्याच्याकडे येई. त्याला अशा माणसाकडून जबाब मिळाल्यानतर तो म्हणे: "तुझ्या थापाचा पाठपुरावा करणारी कायदेशीर कागदपत्र पाहू देत बर मला." असली कागदपत्रे काहीं असलींच तर तीं त्याला सादर केली जात असतच. हीं तो छातीलगत खुपसून ठेवीत असे. त्यात काय लिहिलें आहे याविषयीं त्याला आस्था अशी क्वचितच वाटे. मग तो सागे:

" ठीक. एका रात्रीच भाडं दोन कोपेक, आठवड्याचं दहा कोपेक अन् महिन्याच तीस कोपेक. आत जाऊन जागा शोधून घे. ती दुसऱ्या कुणाची नाहीं याबद्दल खात्री करून घे हं, नाहीं तर मार खाशील. माझे भाडोत्री कडक शिस्तीचे भोक्ते असतात. "

" चहा, रोटी, इतर खायचे पदार्थ विकत नाहीं तुम्ही ? "

" मी नुसता भिंतीचा व छपराचा व्यापार करतों. त्याबद्दल या खुराड्याच्या लफंग्या मालकाला मी महिन्याचे पाच रूबल देत असतों. त्या मालकाच नाव आहे जुडाज पेत्यूनिकोव. दुसऱ्या श्रेणीचा व्यापारी आहे तो. " कुवाल्डा व्यापारी थाटात हे सारें सागत असे. "ऐष-आरामाची सवय नसलेले लोकच तेवढे माझ्याकडे येतात......पण तुला जर रोजच्या रोज चरायची सवय असलीच तर समोरच्या बाजूला खानावळ आहे. पण मानवजातीचा चतकोर तू, असले चोचले तू न केलेलेच बरे. तू सभ्य माणूस तर नाहींसच. मग तू खाणार काय रे ? तू स्वतःलाच खायचस ! "

अशा तऱ्हेचे उद्गार व्यापाऱ्याचा कृत्रिम आव आणून तो भाडेकऱ्यांना ऐकवीत असे. पण हें बोलताना त्याचे डोळे हसत असत. भाडेकरूविषयीं तो आस्थाहि दाखवीत असे. या गुणामुळें गावातल्या कगालामध्यें कॅप्टन चागलाच लोकप्रिय झालेला होता. अनेकदा असा प्रकार होई कीं त्याची जागा सोडून गेलेला एखादा जुना भाडेकरू त्याला भेटावयास येई. हा भाडेकरू असाच फाटका व उदासलेला असे पण त्याच्या चेहऱ्यावरून तो पूर्वीपेक्षा जास्त प्रतिष्ठित व जास्त सुखी दिसे.

" नमस्ते सरदारजी. कसं काय, बर आहे ना ? "

" जिवत आहे, तब्बेत चागली आहे ! आणखी काय ? "

" मला ओळखल नाहीं तुम्ही ? "

" नाहीं. "

" गेल्या हिंवाळ्यात मी इथ जवळ जवळ महिनाभर राहिलों होतों, आठवत नाहीं तुम्हाला ?......पोलिस आले अन् त्यानीं तीन लोक पकडून नेले ? "

" अरे चल, माझ्या घरचं आगत स्वागत घ्यायला पोलिस कैकदां येतात. "

" पण तुम्ही जिल्हा पोलिस इन्स्पेक्टरला आगठा दाखवलात हें आठवत नाहीं तुम्हाला ? "

" आता या आठवणी पुरे कर ह. तुला काय हवय ते सरळ सागून टाक बर माझ्या सोन्या. "

" मी तुमची थोडीशी सरबराई करणार आहे ती तुम्ही घ्याल ना ? मी तुमच्याकडे राहायला होतों त्या वेळीं तुम्ही.. ... "

" दोस्त, कृतज्ञतेला उत्तेजन हें दिलच पाहिजे, कारण ती जगात फारच क्वचित आढळते. तूं भला माणूस असलाच पाहिजेस. अन् मला जरी तूं आठवत नसलास तरी मी तुझ्याबरोबर गुत्त्यात येतोंच. आयुष्यात तू जें यश मिळवल आहेस त्याबद्दल आपण दारू पिऊ या. मोठ्या आनदान येतों मी तुझ्याबरोबर. "

" तुमची वृत्ति आहे तशी आहे ह. एकसारखी थट्टा करायची. "

" तुझ्यासारख्या दुःखी लोकात राहायच, म्हणजे दुसर काय करतां येणार ? "

ते गुत्त्यात गेले. कधी कधीं या सरबराईनें अस्थिर व विमनस्क होऊन हा जुना भाडेकरू गुत्त्यातून शयनगृहात परत येई आणि दुसरे दिवशीं दोघे पुन्हा गुत्त्यात जाऊन एकमेकाची सरबराई करू लागत. असें होता होता असा एक दिवस उजाडे की आपले सारे पैसे खलास झाले हे या पाहुण्याच्या लक्षात येई.

" सरदारजी, बघा कसा घोंटाळा झाला तो. मी परत तुमच्या कपनींत आलों. आता काय करायच आपण ? "

" अशा प्रकाराला उत्तेजन देण बर नव्हे यात शकाच नाहीं. पण एकदा असा प्रसंग आला म्हणजे मग त्याबद्दल मनाला लावून घेऊ नये. " कॅप्टनचा युक्तिवाद चालू होई. "दोस्त, आपण कोणतीच गोष्ट मनावर घेऊ नये. तत्वज्ञानाच्या नादीं लागून आपण आपल्या आयुष्याच वाटोळ करून घेऊ नये. मनाला कसलेहि प्रश्न म्हणून विचारू नयेत. तत्वचिंतन म्हणजे मूर्खपणा असतो नुसता. दारू पिऊन झिंगून डोक दुखत असताना

तत्वचिंतन करायच म्हणजे या मूर्खपणाला तर सीमाच नाहीं. झिंगल्यामुळ डोक दुखायला लागल तर त्याच्यावर उपाय आणखी वोडका पिण हा असतो. आणखी पस्तावून अगर दात खाऊन तें बर नाहीं व्हायच...... दात संभाळून ठेवावेत; मार खावा लागला तर ते कामीं येतील. हे घे वीस कोपेक अन् वोडकाची एक बाटली विकत आण, पाच कोपेकची कलेजी अगर काहींतरी गरमागरम घे, रत्तलभर रोटी व दोन काकड्या घे. दारूनें चढलेलीं आपली डोकी उतरली म्हणजे मग आपण परिस्थितीबद्दल चर्चा करू."

ही परिस्थितीबद्दलची चर्चा दोन तीन दिवस तरी हमखास चाले. आणि हा कृतज्ञ पाहुणा आला त्या वेळेला कॅप्टनच्या खिशात जे काय काय दोनपाच रूबल शिल्लक असतील ते सगळे खलास झाले म्हणजे मगच ही चर्चा समाप्त होई.

मग तो सागे: "ठीक, आता आपण चागलेच पेचात सापडलों हं. ए मूर्खा, तुझ्या संगतींत आपण सारा पैसा दारूवर खर्च केला; आता आपण पुन्हा नीतीच्या व शुद्धीवर राहायच्या मार्गान जायचा प्रयत्न करूं या. पाप नाहीं तर पश्चात्ताप नाहीं, अन् पश्चात्ताप नाहीं तर मुक्ति नाहीं, अस जें म्हणतात तें योग्यच आहे. आपण यातली पहिली गोष्ट करून चुकलों अन् पश्चात्ताप करण निरर्थक असतं. आपण सरळ मोक्षाचा मार्गच गाठू या. नदीवर कामाला जा तू, अन् स्वतःच्या शहाणपणाचा तुला भरंवसा वाटत नसला तर तुझे पैसे ठेवून घ्यायला कत्राटदाराला साग, नाहीं तर ते माझ्याजवळ ठेवायला दे. आपल्याजवळ पुरेसं भाडवल जमल म्हणजे मी तुला एक विजार व इतर कपडे घेऊन देईन. नशिबाच्या फेऱ्यात सापडलेल्या कष्टाळू सभ्य गृहस्थासारखा दिसायला जरूर तेवढे कपडे घेऊ आपण. चागली सभ्य दिसणारी विजार घातलीस कीं पुन्हा तुला पुढची मजल मारता येईल. मग जा आता!"

मग हा पाहुणा नदीवर जाई व होडीवाला म्हणून कामावर लागे. कॅप्टनच्या भाषणाचा विचार मनात आला म्हणजे त्याला मौज वाटे. हीं भाषणें त्याला पुरतेपणीं कळलेलीं नसत, पण त्याची आठवण झाली कीं त्याच्या मनश्चक्षूसमोर दोन आनदी डोळे उभे राहात, कॅप्टनच्या उत्तेजनाचा

आपल्याला फायदा होतो याची त्याला जाणीव येई. गरजेच्या वेळीं आपल्याला नक्की मदत करणारा म्हणून या बोलाच्या कॅप्टनवर भार टाकावयास हरकत नाहीं हें तो जाणून असे.

आणि खरोखरीच महिनाभर खूप कष्ट केल्यावर कॅप्टनच्या कडक देखरेखीमुळे पाहुण्याला आपली स्थिती जराशी सुधारूनहि घेता येई. अर्थात् मुळात याची दुःस्थिति सुद्धा याच कॅप्टनच्या प्रेमळ सहकार्यापायीं झालेली असे ही गोष्ट वेगळी.

मग परत ताळ्यावर आलेल्या आपल्या या गिऱ्हाइकाला लक्षपूर्वक न्याहाळीत कॅप्टन सांगू लागे : "काय दोस्त ! आता आपल्याला एक कोट मिळाला, एक जाकिट मिळाल. या गोष्टी फारच महत्त्वाच्या आहेत. या बाबतींत माझा शब्द खरा धरून चाल तू माझ्याजवळ चांगली प्रतिष्ठित विजार होती तेव्हा मी प्रतिष्ठित माणसासारखा गावात राहात असे. पण ही विजार फाटायचा अवकाश कीं माझ्याबद्दल लोकमत वाईट झाल, अन् मला गाव सोडून इथ याव लागल. ए बावळटा, लोक साऱ्या गोष्टींची पारख बाहेरच्या देखाव्यावरून करतात. त्या गोष्टींचा खरा मतलब त्याच्या लक्षातच येत नाहीं; कारण ते जन्मतःच मूर्ख असतात. हें लक्षात ठेव अन् मला तू देण असलेल्या कर्जापैकीं निदान निम्म तरी देऊन टाक. मग शांत मनान जा, शोध कर म्हणजे तुला जें काय हवय तें सापडेल."

"मी तुमचं किती देण लागतों ?" तो जुना भाडेकरू गोंधळून विचारत असे.

"एक रूबल अन् सत्तर कोपेक......आत्तां मला एकच रूबल दे, नाहीं तर वाटल्यास सत्तर कोपेक दे, अन् बाकीच्या पैशासाठीं मी थांबेन. चोरी करून म्हणा, कष्ट करून म्हणा, तू आतां तुझ्याजवळ आहेत त्यापेक्षां जास्त पैसे मिळवलेस म्हणजे मग माझे राहिलेले पैसे दे."

"तुमच्या मेहेरबानीबद्दल मी तुमचे मनापासून आभार मानतों," पाहुणा त्याला कळवळून सांगत असे. "खरोखरीच तुम्ही दयाळू गृहस्थ आहात......जीवनान तुम्हाला अन्यायान छळलंय......तुम्हाला योग्य जागा मिळाली असती तर तुम्ही लाख माणूस झाले असता हं !"

कॅप्टनला वक्तृत्वपूर्ण भाषणें करण्याचें व्यसनच लागलेलें होतें. तो लगेच सागू लागे :

" मला ' योग्य जागा ' मिळायची म्हणजे काय व्हायच रे? आयुष्यात आपली योग्य जागा कोणती हें खरोखरी कुणालाच ठाऊक नसत. अन् आपल्यापैकीं प्रत्येक जण दुसऱ्याच जूं आपल्या खाद्यावर घेत असतो. आमचा घरमालक, तो व्यापारी जुडाज पेत्यूनिकोव, त्याची जागा खरोखर तुरुगात असायला पाहिजे होती, पण तो अजूनहि दिवसाढवळ्या हिंडतोय फिरतोय अन् एक कारखाना बाधायचा बेतहि करतोय. आपल्या मास्तराची जागा संसारात असायला पाहिजे होती—सुशील बायको, अर्धा डझन मुल, असं सार त्याच असायला पाहिजे होत. पण त्याच्याऐवजीं ते वाविलोवच्या गुत्त्यात लोळताहेत. अन् मग तुझच उदाहरण घे. तू कुठ तरी हॉटेलात बूटपुशा तर नाहीं वाढप्याची नोकरी शोधणार आहेस. पण तुझी खरी योग्यता सैनिक व्हायची आहे हे मला ठाऊक आहे, कारण तू काहीं मूर्ख नाहींस, तू समजस आहेस, तुला शिस्त कळते, म्हणजे पाहिलास हा कसा विपरीत प्रकार आहे तो! जीवन हे आपल्याला पत्त्याच्या डावाप्रमाणं पिसत असत, आणि केवळ योगायोगान, अन् तेंसुद्धा थोड्या वेळापुरतेंच आपण आपल्या योग्य जागीं असतों ! "

हे निरोप घेतानाचे संवाद कधीं कधीं पुढच्या दोस्तीची प्रस्तावना ठरत असत, आणि या नव्या दोस्तीच्या आरभाप्रीत्यर्थ पुन्हा यथास्थित मद्यपान होई. तें शेवटीं इतक्या थराला जाई कीं आपल्याजवळचे सारे पैसे खर्च झाले असे पाहुण्याला आढळून येई आणि तो आश्चर्यानें थक्क होई. मग कॅप्टन त्याला स्वतःची परतभेट म्हणून दारू प्यावयास देई आणि दोघे मिळून आपल्याजवळचे सारे पैसे गुत्त्यात खलास करत असत.

अशा गोष्टी पुन्हा पुन्हा घडल्या तरी त्याच्या स्नेहसंबधाला मुळींच बाध येत नसे.

कॅप्टननें आपल्या भाषणात ज्या मास्तराचें उदाहरण दिलें तोहि अशाच पाहुण्यापैकीं होता. या लोकाच्या वागण्यांत सुधारणा व्हावयाची ती त्याना पुन्हा पाप करावयास संधि मिळावी म्हणूनच व्हावयाची. हा मास्तर इतर कुणापेक्षाहि, विशेषतः शिक्षणाच्या बाबतींत, कॅप्टनला जास्त जवळचा

होता. आणि एकदा भाड्याच्या शयनगृहात राहण्याइतका अधःपात झाल्यावर पुन्हा त्याला यातून वर येता येत नव्हतें याचें कारण बहुधा हेंच असावें. आरिस्तीद कुवाल्डा आपलें तत्वचिंतनपर बोलणें फक्त त्याच्याशींच तेवढें करी, कारण त्यालाच तें समजेल अशी खात्री असे. कॅप्टन या गोष्टीचें महत्व जाणून होता. म्हणूनच मास्तर जरा नीट वागून थोडेसे पैसे मिळवल्यावर हें शयनगृह सोडून गावात कुठे तरी राहावयास जायच्या तयारीला लागला कीं कॅप्टनला फार वाईट वाटे. अशा वेळीं तो मित्रभावानें हज्जारदा त्याला न जाण्याविषयीं गळ घाली आणि य चा हमखास शेवट असा होई कीं दोघेहि दारू पिऊन झिंगत, आणि आपले सारे शिलकी पैसे खर्चून टाकत. मास्तराची कितीहि इच्छा असली तरी त्याला ते शयनगृह सोडताच येऊ नये असा बनाव कॅप्टन बहुधा मुद्दामच घडवून आणी. आणि कॅप्टन आरिस्तीद कुवाल्डा हा शिकलासवरलेला माणूस (या शिक्षणाचे अवशेष त्याच्या भाषणात अजूनहि अधून मधून चमकत असत), नशिबाच्या लहरींनीं त्याची विचारशक्ति जागृत ठेवलेली,—मग आपल्याशीं जास्त समानशील अशा माणसाचा सहवास आपल्याला लाभावा अशी इच्छा त्याला का होऊ नये बरें ! स्वतःबद्दल वाईट वाटून घेणें आपणां साऱ्यानाच ठाऊक असतें.

या मास्तराला एका काळीं वोल्गा नदीकाठच्या एका शहरातील शाळेंत नोकरी होती. पण त्या नोकरीवरून त्याची हकालपट्टी झालेली होती. यानतर तो एका टॅनरींत ( चामड्याच्या कारखान्यात ) कारकून होता, मग ग्रथपाल होता, आणि आणखी असेच इतर धदे केल्यावर शेवटीं त्यानें वकिलीची परीक्षा दिली व तो वकील झाला. मग त्याला दारूचें व्यसन लागलें आणि त्या व्यसनापायीं तो कॅप्टनच्या शयनगृहात येऊन दाखल झाला. तो उंच होता, त्याचे खांदे गोलसर होते, त्याचें नाक लांब व टोंकदार होतें आणि त्याच्या डोक्याला टक्कल होतें. त्याचा चेहरा हडकुळा व पिंवळसर होता. त्याची वाढलेली दाढी पाचरीच्या आकाराची दिसे. त्याचे सतेज डोळे अस्वस्थ, खोबणींत खोल गेलेले, असे असत आणि त्याच्या जिव्हर्गांचीं टोकें उदासपणें खालीं लोंबत असत. तो आपला चरितार्थ, किंवा खरें म्हटलें म्हणजे मद्यपान, स्थानिक वृत्तपत्राना बातम्या देण्याचें काम करून चालवीत असे.

कधींकधीं त्याची कमाई आठवड्याला १५ रूबल देखील होई. हे पैसे तो कॅप्टनजवळ देई आणि म्हणे:

" पुरे झाल हे सार. मी आता परत सस्कृतीच्या हृदयाशीं बिलगायला जातों. "

" फारच छान. फिलिप, तुझ्या या निर्णयाला माझी मनापासून सहानुभूति आहे. म्हणून मी तुला आणखी दारू देणार नाहीं. " कॅप्टननें त्याला कडक इशारा दिला.

" याबद्दल मी तुझा ऋणीच राहीन..."

त्याच्या आवाजात भीतभीत सवलत मागण्याचा सूर कॅप्टनला ऐकू आला, म्हणून त्यानें जास्तच कडक धोरण स्वीकारलें.

" तू खूप ओरडाआरडा करून मागशील, पण मी नाहीं देणार. "

" मर्जी तुझी. " मास्तर एक सुस्कारा सोडून बातम्या आणण्यासाठीं चालू लागे. पण एक दोन दिवस गेले कीं कुठल्या तरी कोंपऱ्यातून मास्तर भकास व तान्हेल्या नजरेनें कॅप्टनकडे टक लावून पाहू लागे, व आपल्या दोस्ताचें अंतःकरण केव्हा द्रवतें याची आतुरतेनें वाट बघत राही.

मग कॅप्टनचें कठोर उपरोधिक बोलणे चालू होई. काहीं लोकाच्या ठिकाणी लाजिरवाणें मनोदौर्बल्य कसे असतें, दारु पिऊन झिंगणें हा पाशवी आनद कसा असतो, या आणि अशाच इतर प्रसगानुकूल विषयावर तो बोलू लागे. लोकाना नीतिपाठ देऊन सरळ मार्गावर आणणाराची भूमिका कॅप्टनला मनापासून आवडत होती हें निःसशय. पण त्याच्या भाडेकरूचा यावर विश्वास बसत नसे. तो हे सद्वर्तनाचे धडे देऊ लागला कीं ते लक्षपूर्वक पाहात असत, ऐकत असत आणि मग एकमेकात कुजबुजू लागत :

" कोल्हा लेकाचा ! काय जीभ आहे बेट्याची ! सागतो कसा : ' अरे मी तुला आधींच सागितल नव्हत का ? पण तू माझ ऐकेनास. आता भोग आपल्या कर्मांचीं फळ ! ' "

" सरदारजी खरोखरीच चागला शिपाई गडी आहे ह. सदासर्वदा रांगेत पहिला, पण एक डोळा माघार घ्यायच्या वाटेकडे लागलेला. "

मग मास्तर आपल्या दोस्ताला अंधाऱ्या कोंपऱ्यात गाठत असे, घामट

कोट घट्ट धरून ठेवी. थरथर कापत कोरड्या ओठावर जीभ फिरवूं लागे आणि खोल, व्याकुळ नजरेनें त्याच्या चेहऱ्याकडे रोंखून पाहात राही.

"तुला अतःपर नाहीं सहन करवत?" कॅप्टन त्याला तिरसटपणें प्रश्न करी.

मास्तर मानेनें नकार दर्शवी.

"आणखी एक दिवस धीर धर....कदाचित झेपेल तुला." कॅप्टन त्याला सुचवी. मास्तर एक सुस्कारा सोडून पुन्हा एकदा निराशेनें मान हलवी.

दारूच्या विषाच्या तलफेमुळें आपल्या मित्राची किडकिडीत देहयष्टि थरथरत आहे हें पाहून कॅप्टन आपल्या खिशातून थोडेसे पैसे बाहेर काढी.

"बहुतेक बाबतींत नशिबाशीं झगडण अशक्यच असत" जणू काय कुणापुढे तरी आपण आपल्या वर्तनाचें समर्थन करण्याचा प्रयत्न करतों आहोत अशा थाटात कॅप्टन हें सागे. पण मास्तरहि हातीं आलेले सारे पैसे दारू पिण्यावर खर्च करीत नसे. त्यातले निम्मे तरी रस्त्यातल्या मुलावर खर्च होत असत. गरीब लोक पोराबाळाच्या बाबतींत नेहमींच श्रीमत असतात. आणि या रस्त्यावरील घाणीत व खाचाखळग्यात पोराची चिकार गर्दी असे. सकाळपासून रात्रींपर्यंत या भुकेकगाल, वस्त्रहीन व घामट पोराचा गोंगाट व धडपडाट चाललेला असे. मुलें म्हणजे भूतलावरचीं जिवत फुलें. पण हीं मुलें अकालीं सुकुन गेलेल्या फुलासारखीं दिसत असत. मास्तर कधीं कधीं आपल्या भोंवतीं त्याचा घोळका जमवीत असे, त्याना रोटी, अंडीं, सफरचद, सुका मेवा विकत घेऊन देई, आणि त्याना नदीकाठच्या वावरात घेऊन जाई. तिथें तीं बसल्याबरोबर अगोदर हें सगळें अधाशीपणानें खाऊन फस्त करीत असत आणि मग खेळ सुरू करीत. त्यांचा गोंगाट व हंशा आसपास एक मैलपर्यंत ऐकू जाई. या दारुड्या मास्तराची उच व हडकुळी आकृति या बालगोपालाच्या मेळाव्यांत आकसून लहान झाल्यासारखी दिसे. हीं मुलें त्याला आपल्या बरोबरीचा असल्यासारखाच वागवीत असत. तीं त्याला "फिलिप" म्हणत असत. फिलिपकाका अगर फिलिपमामा असें सुद्धा म्हणावयाच्या भानगडींत पडत नसत. चिमुकल्या भुतांप्रमाणें तीं त्याच्याभोंवतीं खेळता खेळतां त्याची ओढाताण करीत

असत, त्याच्या पाठीवर टुणकन उड्या मारून बसत असत, त्याच्या टक्कलावर थापट्या मारीत असत, त्याचें नाक धरून ओढीत असत. हें सारे त्याला आवडत असलें पाहिजे. कारण असल्या अवखळपणाबद्दल तो रागावत नसे. तो त्याच्याशीं फार थोडे बोलत असे. आणि जर बोललाच तर इतक्या सावधपणें व भीत भीत बोले कीं आपले उद्गार या मुलाना लागतील की काय, ते ऐकून तीं बिघडतील की काय, अशी त्याला जणू धास्तीच वाटत असावी. अशा प्रकारे त्याचा एक सोबती व त्याच्या हातातलें एक खेळण अशा दुहेरी भूमिकेत तो तासचे तास घालवी, आपल्या उदास नजरेनें त्याच्या आनदी मुद्राकडे टक लावून बघत राही. मग तिथून तो विचारमग्नपणें चालत चालत वाविलोवच्या गुत्त्यात जाई व बेशुद्ध होईपर्यंत मुकाट्यानें दारू पीत राही.

. . . . . . .

बातमीदाराचें काम आटोपल्यावर बहुतेक दररोजच मास्तर एक वर्तमानपत्र घेऊन येई, आणि मग, एका काळीं माणसें असलेल्या या साऱ्या प्राण्याना आपल्या भोंवतीं जमा करी. हे प्राणी दारूच्या धुदींत असत. अगर दारूमुळें याचीं डोकी चढलेली असत. हे लोक अस्ताव्यस्तपणाच्या निरनिराळ्या अवस्थामध्यें असले तरी साऱ्याची स्थिती सारखीच अनुकपनीय व ओंगळ असे. या मेळाव्यात अलेक्सी माक्सिमोविच सिम्त्सोव सामील असे. ही स्वारी दारूच्या पिपासारखी गलेलठ्ठ होती. एका काळीं हा जगलखात्यात नोकरीला होता, पण आता तो आगपेट्या, शाई व बूटपॉलिश विकण्याचा धदा करीत होता. साठ वर्षाचा म्हातारा होता तो. त्याच्या अंगात कॅनव्हासचा ओव्हरकोट व डोक्यावर रुद गोटाची हॅट असे. गुबगुबीत लाल चेहरा, विपुल पाढरीशुभ्र दाढी, बारीकसें लाल नाक रगेलपणानें आकाशाकडे बघत असलेलें आणि पाणावलेल्या डोळ्यामध्यें तुसडेपणाची चमक, असें त्याचे रगरूप होतें. त्याला "फिरता भोंवरा" हें टोपणनाव मिळालेलें होतें. त्याची गोलाकार अंगलट व त्याचें सू सू करीत बोलणें या गोष्टींना अनुरूप असेच हें नाव होतें. त्याच्या मागोमाग कुठल्या तरी कोंपऱ्यांतून "वाईट शेवट" पुढें येई—हा काळा, उग्र, घुम्या दारुडा होता. मग येई लुका आन्तोनोविच मार्त्यानोव—हा पूर्वी

तुरुगांत वॉर्डर होता, याचा चरितार्थ जुगारावर चाले, "पट्टे", "तीन पत्ते", "बॅक नोट"—हे आणि इतर अशाच प्रकारचे पोलिसांनीं आक्षेपार्ह ठरविलेले हातचलाखीचे जुगार तो खेळत असे. तो आला की आपलें टणक व अनेकदा फटके खाल्लेलें अंग मास्तराजवळ टाकून देई आणि आपले काळे डोळे चहूकडे गरगरा फिरवीत बाटलीकडे बोट दाखवून घोगऱ्या आवाजात विचारे: "घेऊ मी?"

मग येई मेकॅनिकल इंजिनियर पावेल सोल्न्त्सेव. याचें वय असेल तीस एक वर्षांचे. याला क्षय लागलेला होता. याच्या डाव्या बरगड्या एका भांडणात मोडलेल्या होत्या. आणि याच्या चलाख पिवळसर, कोल्ह्यासारख्या चेहऱ्यावर खोडसाळ स्मित असे. याच्या पातळ ओंठाआडून काळ्याकुट्ट, आजारानें किडलेल्या दाताच्या दोन कवळ्या डोकावत असत. याच्या निमुळत्या हडकुळ्या खांद्यावरून याचीं लक्तरें दांडीवर वाळत घातलेल्या कपड्याप्रमाणें मागेपुढे हेलावत असत. मंडळींनीं याचें नाव "हाडाचें पोतें" (हाडपोत्या) असे ठेवलेलें होतें. हा स्वतः तयार केलेले ब्रश व झाडू फेरी करून विकत असे. कपडे साफ करण्यासाठीं अतिशय उपयुक्त अशा एका विशिष्ट प्रकारच्या गवताचे हे जिन्नस केलेले असत.

मग येई एक उंच हडकुळा इसम. याच्या एकुलत्या एक टपोऱ्या उजव्या डोळ्यात घाबरटपणाचा भाव भरलेला दिसे. हा अबोल व भित्रा होता चोरीबद्दल याला तीन वेळा शिक्षा झालेली होती. याचें घरचें नाव होते किसेल्निकोव. पण याला "दीड तारास" असे टोपणनाव मिळालेलें होतें; कारण याचा जिवलग मित्र डीकन तारास याच्यापेक्षा हा जवळ जवळ दुप्पट उंच होता. या डीकन तारासला दारुडेपणा व अनैतिक वर्तनाबद्दल नोकरीवरून हाकलून दिलेलें होतें. डीकन हा खुजा, जाडगेला माणूस होता. त्याची छाती पैलवानासारखी, डोकें गोल, व केस कुरळे होते. तो नृत्य करण्यात कुशल होता आणि शिव्या देण्यात त्याहूनहि जास्त कुशल होता.

डीकन व दीड तारास हे नदीकाठी करवतीनें लाकडें कापावयाच्या कामावर असत. मधल्या वेळात डीकन आपल्या दोस्ताला अगर इतर जो कोणी ऐकावयास तयार असेल त्याला "मी स्वतः रचलेल्या गोष्टी" सांगत असे. या गोष्टींचे नायक म्हणजे साधू, राजे, पुरोहित अगर सेनापति हेच

हटकून असत. डीकन डोळे अर्धवट मिटून एकेक अशा उल्लू, बेशरम प्रकाराच्या कहाण्या सांगे कीं त्या ऐकून त्या शयनगृहातले भाडेकरू देखील शिसारी येऊन थुकत आणि त्याच्या कल्पनाशक्तीबद्दल आश्चर्य वाटून डोळे विस्फारीत असत. या माणसाची कल्पकता जबरदस्त होती, तिला खळ म्हणून पडत नसे. सारा दिवसभर, सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो नवनव्या गोष्टी एकामागून एक रचून सांगत राही, आणि तीच गोष्ट चुकूनसुद्धा पुन्हा सांगत नसे. त्याच्या ठिकाणी एखादा महाकवि सुप्तपणे अधिवास करीत असावा. तो नक्कीच मोठा कल्पक कथेकरी होता. आपल्या अश्लील पण जोरदार व परिणामकारक भाषेच्या योगानें दगडाना देखील जिवतपणा आणण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणी होतें.

या मंडळींत एक चक्रम् तरुणहि होता. त्याला कॅप्टननें "धूमकेतू" असे नाव दिलें होते. तो असाच एका रात्रीं या शयनगृहात झोंपावयाला म्हणून आला आणि तेव्हापासून तो या मंडळींत राहिला तो राहिलाच. त्याना याचें बरेच आश्चर्य वाटलें. पहिल्या पहिल्यादा त्यानीं त्याच्याकडे विशेष लक्षच दिलें नाहीं. दिवसा तो इथल्या इतर सर्व मंडळीप्रमाणें रोजगार शोधावयाला जात असे, पण रात्रीं तो या मित्रमंडळाभोवतीं एकसारखा घुटमळत राही. शेवटी कॅप्टनचें लक्ष त्याच्याकडे गेलें.

"ए पोऱ्या ! या भूतलावर तुझं काय आहे रे काम ?"

पोऱ्या धीटपणें व ठणठणीतपणें उत्तरला: "मी एक अनवाणी मवाली आहें.. ..."

कॅप्टननें त्याच्याकडे कसोशीनें निरखून पाहिलें. या पोऱ्याचे केंस लांब होते, चेहरा बालिश होता. गालाचीं हाडें वर आलेलीं होतीं व नाकाचा शेंडा वर होता. त्याच्या अंगात त्रिनपट्टयाचा निळा कुडता होता आणि डोक्यावर त्यानें गवती टोपीचा अवशेष घातलेला होता. त्याच्या पायात काहींच नव्हतें.

"तू मूर्ख आहेस !" कॅप्टननें त्याच्याबाबतींत निर्णय देऊन टाकला. "इथ कशाला रे रावखुळतोस ?......वोडका पितोस कीं नाहीं ?...नाहीं ! ......ठीक, मग, तुला चोरी करता येते का ? पुन्हा, नाहींच. चालता हो तू, माणूस व्हायला शीक, अन् मग परत ये आमच्याकडे......"

पोऱ्या गालातल्या गालात हंसला.

" नाहीं. मी तुमच्याचकडे राहणार. "

" का ? "

" उगीच आपल...... "

" ए, ए,..... धूमकेतू आहेस तू ! " कॅप्टन म्हणाला.

" याचे दात पाडतों मी, " मार्त्यानोव म्हणाला

" का म्हणून ? " पोऱ्यानें विचारलें.

" उगीच आपल . .. "

" अन् मी एक दगड घेऊन तुमच डोक फोडीन, " पोऱ्या आदर-भावानें उत्तरला.

कॅप्टननें जर मध्येंच तोंड घातलें नसतें तर मार्त्यानोवनें त्याचीं हाडें मोडली असतीं. कॅप्टन म्हणाला: " त्याला त्रास देऊ नकोस...आपण सारे एकाच माळेचे मणी आहोंत. त्याचे दात पाडायच तुला सबळ कारण काहींच नाहीं. आपल्या सहवासात राहायला मागतोय तो, पण त्यासाठीं त्याच्याजवळ जास्त चागली सबब नाहीं. ठीक आहे, जाऊ दे तो खड्डयात! .. आपण सारे या जगात जगतों ते कसल्याहि चागल्या सबबी-शिवायच जगतों. "

" पण ए पोऱ्या, तू इथून गेलास तर तें तुझ्याच फार फायद्याचं होईल बघ. " आपल्या उदास डोळयानीं त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहतां पाहता मास्तरनें त्याला उपदेश केला. पोऱ्यानें काहीं एक उत्तरच दिलें नाही. मात्र तो तिथेंच राहिला. लवकरच त्याच्या सहवासाला मडळी सरावली आणि त्याच्याकडे मुळीं लक्षच देईनाशी झाली. पण तो मात्र त्याच्या सगतींत तसाच राहिला आणि त्यानें साऱ्या गोष्टींवर लक्ष ठेवलें.

वर वर्णन केलेले सारे लोक हे कॅप्टनच्या युद्धमडळाचे प्रमुख सभासद होते. आणि त्याना तो प्रेमळ उपरोधानें " एका काळीं माणसें असलेले प्राणी " हें विशेषण लावत असे. त्याच्याशिवाय आणखी पाच सहा साधेसुधे मवाली या शयनगृहात असतच. त्याना आपली पूर्वचरित्रे या "प्राण्या"सारखींच आहेत असें अभिमानानें सागता येण्याजोगी स्थिति नसली तरी याच्यापेक्षा ते जास्त परिपूर्ण मानव होते, याच्यापेक्षा त्याचा

विस्कट कमी झालेला होता, मात्र त्यानींहि नशिबाच्या कैक कठोर लाथा खाल्लेल्या होत्या. ते बहुतेक जण पूर्वी शेतकरी होते. सुसंस्कृत वर्गातला प्रतिष्ठित इसम त्याच्या तोलाच्या शेतकऱ्याशीं तुलना करता वरचढ ठरत असेलहि. पण नादान हलकें जिणें जगणारा शहरी माणूस त्याच्याच तोलाच्या खेडुताशीं तुलना करता हमखास जास्त हीन ठरतो.

या खेडुत वर्गाचा सगळयात ठळक नमुना म्हणजे त्यापा. हा एक म्हातारा शेतकरी होता. उंच व हडकुळा, दिसायला ओंगळ, मान इतकी वाकडी कीं हनुवटी छातीला लागलेली—या व्यगामुळें त्याची छायाकृती विस्तव चाळवायच्या सळईसारखी दिसे. त्याचा चेहरा बाजूनें पाहिला तरच स्पष्ट दिसे. मगच त्याचें वाकडेंतिकडे नाक, लोंबता खालचा ओंठ व करड्या झुबकेदार भुवया दिसून येत.

हा त्यापा म्हणजे कॅप्टनचा पहिला भाडेकरू. यानें खूपसे पैसे एका गुप्त स्थळीं लपवून ठेवले आहेत अशी अफवा होती. या पैशापायीं एक दोन वर्षांपूर्वी कुणी तरी त्याचा गळा कापावयाचा प्रयत्न केला त्या दिवसापासूनच त्याची मान वाकडी झाली. आपल्याजवळ पैसे आहेत ही गोष्ट त्यानें साफ नाकबूल केली आणि सांगितलें: "या लोकानीं निव्वळ दुष्टाव्यान माझा गळा कापायचा प्रयत्न केला. आणि याच्या योगान माझ चिंध्या गोळा करायचं काम सोप झालय. नाहीं तरी मला या कामासाठीं भुईपर्यंत वाकाव लागत होतच." तो हातात काठी अगर पाठीवर थैली न घेता रस्त्यानें लटपटत जात असला की एखाद्या ध्यानमग्न माणसासारखा दिसे. अशा वेळीं कॅप्टन त्याच्याकडे बोट दाखवून म्हणे:

"अरे बघा रे. ही पहा आमच्या घरमालकाची पळपुटी विवेकबुद्धि कशी चाललीय ती. बघा किती अस्ताव्यस्त, घाणेरडी अन् हीन आहे ती."

त्यापाचा आवाज घोगरा होता. त्याचें बोलणें अस्पष्ट असे. आणि बहुधा याच कारणास्तव तो फारच क्वचित बोले आणि त्याला एकटेपणा आवडे. पण नडीमुळे नाइलाजानें गाव सोडून आलेला मनुष्यजातीचा एखादा नवा नमुना त्या शयनगृहात दिसला कीं त्यापा अस्वस्थ होई, रागावे आणि त्या दुर्दैवी माणसाला घालून पाडून बोलून हैराण करी. त्याचे हे उद्गार त्याच्या घशातून रागारागानें उसळी मारून बाहेर येत

असत. तो एक तर कुणा तरी नव्या भिकाऱ्याचा ससेमिरा त्याच्यामागे लावून देई, नाहीं तर स्वतःच त्याला हुसकावयाची व मारावयाची धमकी देई. तो बिचारा नवखा खेडुत घाबरून त्या शयनगृहातून अखेरीस निघून जाई. मग त्यापाचा राग पुन्हा शांत होई व तो एखाद्या कोंपऱ्यात आपल्या चिंध्या नीट करीत अगर बायबल वाचीत बसत असे. हें त्याचें बायबलहि त्याच्याइतकेंच घामट, जीर्णशीर्ण होतें. मास्तर वर्तमानपत्र आणून वाचूं लागला म्हणजे मग तेवढी ही स्वारी आपला कोंपरा सोडून पुन्हा पुढें येई. हे वाचन चालू असताना तो मुकाट्यानें ऐकत राही व दीर्घ निःश्वास सोडी, आणि कसलेहि प्रश्न विचारीत नसे. पण मास्तर वर्तमानपत्र वाचून झाल्यावर ते बाजूला ठेवू लागला की त्यापा आपला हडकुळा हात पुढें करून सांगे: "इकडे द्या तें मला....."

"तुला कशाला रे हवा तो?"

"द्या ना तो मला......कदाचित् त्यात आमच्याबद्दल काहीं तरी असेल..."

"कुणाबद्दल?"

"मुलखाबद्दल."

सारे त्याला हसत आणि त्याच्याकडे पेपर फेकून देत. तो पेपर घेऊन वाचू लागे: एका खेड्यातील उभीं पिके गाराच्या वर्षावाने नष्ट झाली, दुसऱ्या खेड्यात आगीमुळे तीस घरे भस्मसात झाली, तिसऱ्या खेड्यात बायकोने नवऱ्यावर विषप्रयोग केला—म्हणजे खेडोंपाडीं दुष्टपणा, दुःख आणि अज्ञानच असतें असे चित्र रंगविण्याची जी प्रथा आहे तिला साजेशा एकूण एक बातम्या त्या वर्तमानपत्रात असत. हें सारे त्यापा मनातल्या मनात वाचीत असे. वाचता वाचता तो डुरकत असे, या डुरकण्याच्या आवाजाबद्दल तो कदाचित सहानुभूति अगर आनंद प्रदर्शित करीत असावा.

रविवारचा दिवस तो बायबल-वाचनात घालवी. त्या दिवशीं तो कधींहि चिंध्या गोळा करण्यासाठीं बाहेर जात नसे. तो आपल्या छातीवर पुस्तक टेंकवून ठेवीत असे आणि कुणी जर त्याच्या वाचनात व्यत्यय आणला अगर त्याच्या बायबलाला हात लावला तर त्याला राग येई.

अशा वेळीं कॅप्टन त्याला म्हणे : "ए साला पुस्तकातला किडा! त्या सगळ्यातल काय काय कळत रे तुला?"

"अन् तुम्हाला तरी काय कळत?"

"मला काहीं एक कळत नाहीं. पण मी मुळीं पुस्तक वाचीतच नसतों..."

"अन् मी तीं वाचतों"

"म्हणूनच तू मूर्ख आहेस .." कॅप्टन निर्णयात्मक स्वरात म्हणाला. "अरे तुझ्या डोक्यात उवा शिरल्या तर किती तरी त्रास होतो त्याचा, पण त्याच्या जोडीला विचारहि तुझ्या डोक्यात जर शिरू लागले तर तू काय करणार रे, ए थेरड्या बेडका?"

"मला कुठ आता फार दिवस जगायचय!" त्यापाने थोडक्यात उत्तर दिलें.

एकदा मास्तरने त्याला विचारलें: "तू वाचायला कसा शिकलास?"

"तुरुगात," त्यापा थोडक्यात उत्तरला.

"अरेच्च्या, म्हणजे तू तुरुगात गेला होतास म्हणायचा, अं?"

"होय तर."

"कशासाठी रे?"

"मीच केलेल्या एका चुकीबद्दल ..पण तिथ मला बायबल मिळाल. एका बाईन दिल मला तें . तुरुगात जाण बर असत ह एकदरींत."

"अस! अन् का?"

"तिथ शिकायला मिळत...मी तिथ वाचायला शिकलों . मला हें पुस्तक पण मिळाल...अन् हें सार फुकटात."

मास्तर त्या शयनगृहात राहायला आला तेंव्हा त्याच्या अगोदरपासूनच त्यापा तिथ राहिलेला होता. तो मास्तराकडे लक्षपूर्वक पाहू लागला. कुणाच्याहि तोंडाकडे पाहावयाचे म्हणजे त्यापाला आपलें सारें अगच त्या बाजूला वळवावें लागे मास्तराचें संभाषण तो अधाशीपणानें ऐकत असे. एकदा तो मास्तराजवळ जाऊन बसला आणि म्हणाला:

"तुम्ही फारच विद्वान आहात अस दिसतय हो......तुम्ही बायबल वाचलय का?"

" वाचलय... "

" अस्सं, अस्सं ..तुम्हाला त्यांतलं सारं आठवतय ? "

" हो. .आठवतय ना... "

मग म्हातारा एका अंगाला रेलला आणि त्याच्या करड्या डोळ्याची संशयी नजर मास्तराकडे लागली.

" त्यात अमलेकाइट लोकाचा उल्लेख आहे, आठवतो तुम्हाला ? "

" मग ? "

" आता कुठ आहेत ते लोक ? "

" नष्ट झाले...त्यापा, . मरून गेले ते... "

म्हातारा स्तब्ध झाला, मग त्यानें पुन्हा विचारलें: " अन् त्यातले फिलिस्टाइन कुठ आहेत हो ? "

" ते सुद्धा .. "

" ते सुद्धा मरून गेले का ? "

" सारे... "

" अस्सं—अस्सं, म्हणजे आपणहि मरून जाणार तर ? "

" आपण सुद्धा मरून जाऊ अशी वेळ येईल केंव्हा तरी. " मास्तर शातपणें म्हणाला.

" अन् आपण इझराइलच्या कोणत्या जमातीपैकीं आहोंत ? "

मास्तरानें त्याच्याकडे पाहिलें, क्षणभर विचार केला, आणि मग त्याला शिथियन, स्लाव व सिम्मेरियन जमातींविषयीं माहिती सागावयास सुरवात केली.

म्हातारा आणखी खाली वाकला आणि भेदरलेल्या डोळ्यानीं मास्तराच्या चेहऱ्याकडे पाहात राहिला.

" सगळ खोट हें ! " मास्तराचें बोलणें पुरें झाल्यावर त्यापा तिरस्कारानें म्हणाला.

" म्हणजे ? " मास्तर आश्चर्यचकित होऊन उद्गारला.

" तुम्ही सागता त्या जमातींचा उल्लेख बायबलात नाहीं. "

तो उठला आणि रागारागानें स्वतःशींच पुटपुटत चालता झाला.

मास्तरानें त्याला हाक मारून खात्रीच्या स्वरात सागितलें: " त्यापा, तुला वेड लागणारसं दिसतय. "

मग म्हातारा पुन्हा परत आला आणि आपली वाकडीतिकडी घाणेरडी तर्जनी पुढें करून त्याला धाक दाखवू लागला.

" परमेश्वरान आदमला जन्म दिला—आदमन ज्यू जमातीला जन्म दिला, म्हणजे साऱ्या लोकाना ज्यू जमातीनच जन्म दिला...अन् आपल्याला सुद्धा. "

" असं ? "

" इस्माइलन तार्तारांना जन्म दिला, पण इस्माइल देखील जन्माला आला एका ज्यूच्याच पोटीं. "

" हें सार तू कशासाठीं सागतोयस ? "

" काहीं नाहीं, उगीच ! पण मी म्हणतों, खोट कशाला बोलावं ? "

आणि तो मास्तराला तसाच बुचकळ्यात राहू देऊन चालता झाला. पण आणखी दोन दिवसानी तो पुन्हा मास्तराजवळ येऊन बसला.

" तुम्ही विद्वान आहात....मग सागा बर, आपण कोण आहोंत ? "

" त्यापा, आपण स्लाव आहोत. " मास्तरानें सागितलें.

" मला बायबलातला आधार दाखवा. त्यांत असले लोक कुणीच नाहींत. आपण बाबिलोनियन आहोंत का ? "

मग मास्तरानें बायबलातल्या साऱ्या इतिहासाची चीरफाड सुरू केली. म्हाताऱ्यानें हें बराच वेळ ऐकून घेतलें आणि मग त्याचें बोलणें मध्येंच थांबविलें.

" थांबा हं....थाबा जरा ! म्हणजे याचा अर्थ असा होतो कीं देवाला ठाऊक असलेल्या लोकात रशियन नाहींत ? आपण देवाला ठाऊक नाहीं ! असंच ना ? बायबलांत ज्यांचा ज्याचा उल्लेख आहे ते सारे लोक देवाला ठाऊक आहेत.......त्यानं कत्तली व जाळपोळ करून त्याचा नाश केला. त्यान त्याचीं शहर उध्वस्त केलीं; पण त्यान त्याना शिक्षण द्यायला प्रेषितहि पाठविले. याचा अर्थ असा कीं त्याला त्याची दयाहि आली. त्यान ज्यू व तार्तार लोकाना देशोधडीला लावल, पण त्यान त्याच रक्षणहि केल......पण आमच काय ? आमच्यात प्रेषित का नाहींत ? "

" मला काहीं ठाऊक नाहीं बुवा ! " मास्तर उत्तरला. म्हाताऱ्याचें म्हणणें काय आहे हें समजून घेण्याचा तो प्रयत्न करीत होता. पण

म्हाताऱ्यानें मास्तराच्या खांद्यावर हात ठेवला आणि तो त्याला हळूहळू मागेपुढें रेटू लागला. त्याच्या घशातून गड्गड् असा घोगरा आवाज आला. तो जणूं कांहीं तरी गिळत आहे असे त्या आवाजावरून वाटलें.

"असंच आहे तें. तुम्हाला ठाऊक नाहीं. तुम्ही इतक बोलता कीं तुम्हाला जसं काहीं सार ठाऊक आहे अस वाटत. तुमच हें भारुड ऐकायचा वीट येतो मला. तुम्ही माझ्या आत्म्यात अंधार भरून ठेवता झाल. यापेक्षा तुम्ही गप्प बसलात तर फार बर होईल. आपण आहोंत कोण ? अं ! आमच्यात प्रेषित का नसावेत ! हाः हा ! येशू ख्रिस्त या जगात होता त्या वेळीं आपण कुठ होतों ? अ ! अन् तुम्ही खोटहि सांगता. सगळी जनता मरून जाण शक्यच नाहीं, ती मरणारच नाहीं. रशियन जनता मरून जाण शक्यच नाहीं ...तुमच सागण खोट आहे...... त्याचा उल्लेख बायबलमध्यें आहे, मात्र त्या वेळीं त्याना कोणत्या नावानं ओळखत होते हें आपल्याला माहीत नाहीं......ही जनता म्हणजे केवढा मोठा प्रचड समूह आहे हें तुम्हाला दिसत नाहीं का ? आमचीं किती तरी खेडीं आहेत ..अन् तिथ जनता राहते—खरीखुरी जनता, जबरदस्त व सामर्थ्यशाली जनता आहे ती, अन् तुम्ही सागता कीं ती मरून जाईल... एखादा माणूस मरेल—जनता नाहीं मरणार . ...देवाला जनतेची गरज लागते. जनताच तर धरित्रीची उभारणी करते......अमलेकाइट लोक मरून नाहीं गेले. आता त्याना जर्मन अगर फ्रेंच असं नाव मिळालय इतकच काय तें......अन् तुम्ही......आता सागा बर मला, परमेश्वरान आपल्याला सोडून का दिल ? त्याच्याकडून आपल्याला शिक्षा अगर प्रेषित का मिळालेले नाहींत ! आम्हाला शिकवायला कोण आहे !"

त्यापाचें भाषण खूप जोरदार वठलें—त्याच्या उद्गारामध्यें गाढ श्रद्धा, चीड व तिरस्कार जाणवत होता. तो मास्तराजवळ बराच वेळ बोलत राहिला. मास्तर नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें दारू पिऊन झिंगलेला असल्यामुळें त्याचें मन उदासलेलें होतें. त्याला मग त्यापाचें बोलणें सहन करवेना. एखाद्या लाकडी करवतीप्रमाणें त्यापाचे उद्गार जणू आपल्या अंगात शिरत आहेत असें त्याला वाटलें. तो या म्हाताऱ्याचें बोलणें ऐकत राहिला, त्याचा विद्रूप देह न्याहाळीत राहिला, त्याच्या उद्गारांचें विलक्षण

भेदक सामर्थ्य त्याला जाणवलें, आणि मग अकस्मात त्याला स्वतःविषयीं जबरदस्त अनुकपा वाटू लागली. त्यापाला उत्तरादाखल कांहीं तरी हमखास खात्री पटविणारें सागावेसें त्याला वाटले—असे कांहींतरी त्यापा सागावें कीं ज्याच्या योगानें त्याचें मनहि आपल्या बाजूला वळेल आणि तो आपल्याशीं अशा उपरोधिक व कठोर स्वरात न बोलता पित्याच्या प्रेमळ पणानें आपल्याला चार गोष्टी सागेल. अश्रूंनीं त्याचा कठ रुद्ध झाला.

" तुम्ही आहात तरी कशा प्रकारचे हो ? तुमच्या आत्म्याचे साफ तुकडे तुकडे झाले आहेत. तरी पण तुम्ही आपल्याला कांहीं तरी ठाऊक आहे अशा थाटात बोलत सुटता. तुम्ही गप्प बसलात तर फार बर होईल. "

" अहाहा, त्यापा, खर आहे तुझ म्हणण." मास्तर उदासपणे उत्तरला. " जनता.. बरोबर आहे तुझ .. . जनता अगणित असते .....पण मला तिचा परिचय नाहीं . अन् तिला माझा परिचय नाहीं.. दुःखाची गोष्ट काय आहे ती दिसली ना तुला ? पण तरी हरकत नाहीं ! मी असेच हाल सोशीत राहीन....अन् आपल्याकडे प्रेमित नाहीत, हे तुझ म्हणण बरोबर आहे. .. नाहींतच ते. तुझ म्हणण बरोबर आहे, मी फार बोलतों खराच . पण त्यानं कुणाचच भल होत नाहीं. मी आता गप्प राहीन......मात्र मला असं बोलत जाऊ नकोस तू .....अहाहा, दोस्ता, तुला ठाऊक नाहीं रे...... तुला ठाऊक नाहीं.. तुला नाहीं कळायच तें. "

आणि अखेरीस मास्तराला रडू कोसळलें. तो सहजासहजीं आणि मोकळेपणानें रडला, त्यानें चिकार अश्रू ढाळले आणि त्यामुळे त्याला लवकरच बरें वाटले.

" तुम्ही खेड्यात जाल तर बरं होईल...तिथ तुम्ही कारकुनी नाहीं तर मास्तरकी मिळवायची खटपट करा .. तिथ तुम्हाला खाणपिण चागल मिळेल अन् कांहीं तरी वेगळ बघायला मिळेल. इथ फुकट वेळ कशाला दवडता ? " त्यापानें कठोरपणानें विचारले.

पण मास्तर एकसारखा रडतच राहिला. अश्रू ढाळण्यातच त्याला आनद होत होता.

या दिवसापासून दोघाची दोस्ती झाली. आणि त्याना एकत्र पाहून " एका काळीं माणसें असलेले प्राणी " म्हणूं लागले, " मास्तरचं

त्यापाशीं चागल सूत जमलंय ह......त्याच त्याच्या पैशावर लक्ष दिसतय. कॅप्टननच त्याला ही कामगिरी नेमून दिली असली पाहिजे—पाळत ठेवून म्हाताऱ्याच गुप्त धन शोधून काढायसाठीं आहे ही लाडीगोडी .."

ते असे म्हणत असले तरी त्याना हें बहुधा खरें वाटत नसावे. या लोकाच्या बाबतींत एक गोष्ट मोठी विलक्षण होती—इतरापुढे ते स्वतःचें चित्र मुळातल्यापेक्षा जास्त वाईट रगवीत असत. जाहिरात करण्याजोगा कसलाच गुण स्वतःजवळ नसला म्हणजे माणसाला कधीं कधीं स्वतःच्या स्वभावाची वाईट बाजू उघड करून दाखवायला काहींच दिक्कत वाटत नाहीं.

. . . . . . . .

हे सारे लोक मास्तराभोंवतीं जमा झाले म्हणजे वर्तमानपत्राचें वाचन सुरू होई.

" मग वर्तमानपत्रात आज चर्चा कशाची आली आहे? चालू कादबरीच पान आहे का एखाद त्यात ? "

" नाहीं. " मास्तर त्याना सागे.

" तुमचा प्रकाशक चिक्कू मारवाडी दिसतोय...... अग्रलेख तरी असेल ना ? "

" आहे आज एक......गुलायेवन लिहिलेला आहे. "

" अह्हा ! वाचाच मग तो. साला छान लिहितो ह, बदमाश आहे केकाचा ! "

मास्तर वाचू लागतो—"स्थावर मालमत्तेवरील कर सुमारें १५ वर्षापूर्वी बसविण्यात आला. आणि आजपर्यंत शहराच्या उत्पन्नाची बाब म्हणून जे कर वसूल करण्यात येतात त्याचा आधार या नात्यानें हाच कर चालू राहिलेला आहे......"

कॅप्टन टीका करतो—" हें सारं अगदींच पोरकट आहे. म्हणे चालू राहिलेला आहे......हास्यास्पद आहे हें. हा चालू राहण शहरातल्या व्यापाऱ्याच्या फायद्याच आहे, म्हणूनच चालू राहिलाय हा. "

मास्तर सागतो—" वस्तुतः अग्रलेख याच विषयावर लिहिलेला आहे."

" असं ? चमत्कारिकच आहे हें. हा विषय गोष्ट लिहायला जास्त

सोईचा आहे....त्याच विवेचन करताना त्यात बरीचशी मिरपूड घातली पाहिजे. ”

मग थोडीशी चर्चा सुरू होते. आतापर्यंत वोडकाची अवघी एकच बाटली फस्त झालेली असल्यामुळें लोक लक्षपूर्वक ऐकत असतात.

अग्रलेखानतर स्थानिक बातम्याचें वाचन चालतें, मग कोर्टातील खटले; आणि त्यात जर प्रतिवादी अगर वादी हा व्यापारी असेल तर कॅप्टनला मनापासून आनद होतो. कुणी जर एखाद्या व्यापाऱ्याला लुबाडलें असेल तर तो म्हणतो, “चागल झाल. मला वाईट येवढच वाटत की त्यानीं त्याला फारच थोड लुबाडल.” त्याचे जर घोडे उधळले तर तें ऐकायला गोड वाटतें पण “तो अजूनहि जिवत आहे ही दुःखाचीच गोष्ट ह.” व्यापारी जर कोर्टात दावा हरला असेल तर “त्याला कोर्टखर्च मूळ रकमेच्या दुप्पट द्यावा लागला नाहीं, किती दुःखाची गोष्ट!”

“तस करण बेकायदेशीर ठरल असत”, मास्तर उद्गारतो.

“म्हणे बेकायदेशीर! अहो पण तो व्यापारी स्वतः तरी कायदेशीर असतो का?” कॅप्टन कटु स्वरात विचारतो. “व्यापारी म्हणजे कोण? आपण या असभ्य व मूर्ख प्राण्याच संशोधन करू या. पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येक व्यापारी हा शेतकरी असतो. तो खेड्यातून येतो अन् कालातरानं व्यापारी बनतो. व्यापारी व्हायच म्हणजे पैसा पाहिजेच. शेतकऱ्याला पैसा कुठून मिळणार? प्रामाणिकपणान कष्टाचीं काम करून त्याला तो मिळत नाहीं ही गोष्ट जगजाहीर आहे. म्हणजे याचा अर्थ असा कीं शेतकऱ्यानं केव्हा तरी कोणत्या तरी बाबतींत अप्रामाणिकपणा केला असणार. म्हणजे व्यापारी हा अप्रामाणिक शेतकरीच असतो.”

“छान!” श्रोतृगण उद्गारतो. वक्त्याचा निष्कर्ष त्याना पसंत पडतो. आणि हा सारा वेळ त्यापा आपली छाती खाजवीत डुरकत असतो दारूची धुंदी चढल्यानतर वोडकाचा पहिला ग्लास घेतला कीं दर वेळीं तो असाच डुरकतो. कॅप्टन ही शाबासकी ऐकून प्रसन्न होतो. मग मडळीं वाचकाचा पत्रव्यवहार वाचतात. हा विषय म्हणजे कॅप्टनला महापुराची पर्वणीच. व्यापारी लोक या जीवनाची उभारणी किती ओंगळ रीतीनें करतात, पूर्वीची एकूण एक गोष्ट ते काय काय हिकमती लढवून बिघडवून टाकतात, हें

त्याला जिकडे तिकडे दिसत असतें. तो व्यापाऱ्याविरुद्ध जोरदार भाषणें करून त्याचा नायनाट करतो. श्रोतृगण त्याचीं हीं भाषणें मोठ्या कौतुकानें ऐकून घेतो, कारण तो आपल्या भाषणात भलभलत्या शिव्या देतो. तो गर्जून सागतो : "मी जर वर्तमानपत्रात लिहिल तर या व्यापारी वर्गाच खर स्वरूप उघड करून दाखवीन .... हा माणूस नसून माणसाचीं काम तात्पुरतीं करणारा असा हा पशू आहे असं दाखवून देईन मी. हा व्यापारी म्हणजे नुसता अर्बुज असतो, याला जीवनाची खरी चवच नसते, देशाभिमानाचा याला अर्थच ठाऊक नसतो, अन् याला जी काय काळजी असते ती फक्त पाच कोपेकची तेवढी असते."

हाडपोत्याला कॅप्टनचे वर्म ठाऊक. आणि लोकाना चिडवावयाची त्याला भारी हौस. तो [illegible]नें सागतो :

"खर आहे. सरदार वर्ग उपाशी मरू लागल्यापासून जगातन माणसं नाहींशींच झालीं......"

"ए कोळ्या-बेडकाची भेसळ अवलाद, बरोबर आहे तुझ म्हणणं. सरदार वर्ग कोसळला त्या वेळेपासून माणसं कुणी राहिलेलीच नाहींत. फक्त व्यापारी तेवढे राहिलेले आहेत अन् त्याची मला चीड आहे."

"हें समजायला काहीं कठीण नाहीं हं. कारण तुम्हालासुद्धा त्यानींच खाली ओढल .."

"मला ? अरे मूर्खा, मी जीवनावर आसक्ति ठेवली म्हणून माझ वाटोळ झाल माझी जीवनावर आसक्ति होती, पण हा व्यापारी वर्ग जीवनाला सर्वस्वीं लुबाडत असतो अन् त्याच हें करण काहीं सहन होत नाहीं. येवढ्याचकरता मी या वर्गावर चिडतों, मी सरदार वर्गातला आहे म्हणून नव्हे. पण तुला खरी हकीकत सागू मी ? मी आता सरदार वर्गातला राहिलेलों नाहीं, पूर्वी मात्र असेन कधीं काळीं. आता मला कशाचीच अन् कुणाचीच पर्वा नाहीं...अन् वचनभग करणाऱ्या प्रियतमेशीं जसं वागायच तसं जीवनाशीं वागतों मी. या जीवनाबद्दल मला तिरस्कार वाटतो."

"खोट बोलतां तुम्ही!" हाडपोत्या म्हणतो.

"मी खोटं बोलतों ?" कॅप्टन रागानें जांभळा होऊन ओरडतो.

"कशाला उगाच ओरडाव ?" मार्त्यानोव थंडपणें उदास स्वरात

सागतो. "इतरांचा निर्णय कशाला करावा? व्यापारी लोक, सरदार लोक....आपल्याला काय करायचंय त्याच्याशीं?"

"आपण ना मास ना मासे .." डीकन तारास मध्येंच तोंड घालतो.

"गप्प बैस रे, हाडपोत्या," मास्तर खुल्या दिलानें सागतो. "जखमेत तरवार कशाला फिरवावी?"

त्याला चर्चा अगर ओरडाआरडा आवडत नाहीं. आणि त्याच्या भोंवतालीं भाडण सुरू झालें कीं त्याचे ओंठ मनाचा त्रास दर्शविण्यासाठीं वेडेवाकडे होतात. तो शातपणें व समजसपणे उभय पक्षाची दिलजमाई करण्याची खटपट करतो, आणि त्यात जर त्याला यश आलें नाहीं तर तो तिथून चालता होतो. मास्तराची ही वृत्ति ठाऊक असल्यामुळे कॅप्टन जर फारच झिंगलेला नसेल तर स्वतःवर ताबा ठेवतो, कारण मास्तरासारखा उत्कृष्ट श्रोता हातचा घालवावयाची त्याची तयारी नसते.

कॅप्टन पूर्वीपेक्षा शात स्वरात आलें बोलणें पुढें चालू करतो—"मी पुन्हा तेंच सागतों: जीवन वैऱ्याच्या हातात सापडलयस दिसत. हे वैरी केवळ सरदार वर्गाचेच वैरी आहेत इतकच नव्हे तर जगात जें जें काहीं चागल असेल त्या त्या साऱ्याचे ते वैरी आहेत. हे सचय करणारे वैरी आहेत. जीवनाला कोणत्याहि मार्गान शोभा आणायची याच्यात लायकीच नाहीं."

"पण तें काहींहि असल तरी व्यापाऱ्यानींहि जिनोआ, व्हेनिस, हॉलड निर्माण केलय. इग्लडच्या व्यापाऱ्यानीं हिंदुस्थान जिकलय, स्त्रोगानोव कपनीचे व्यापारी.. " मास्तर सागतो.

"याची पर्वा करायची मला काय जरूर? माझ्या मनात विचार चाललाय जुडाज पेत्यूनिकोव आणि कंपनीचा . .."

"अन् त्याची काय पर्वा करतोयस तू?" मास्तर शातपणें विचारतो.

"पण मी जिवत आहें कीं नाहीं? अहृहा! मी जिवत आहें, अन् म्हणूनच जीवनाचा ताबा घेऊन राहिलेल्या या रानटी लोकानीं जीवन भ्रष्ट करून टाकल्याबद्दल मला चीड आल्यावाचून राहात नाहीं."

"अन् कामावरून खालीं झालेल्या कॅप्टनच्या सात्विक संतापाला हसायची हिंमत करता?" हाडपोत्या त्याला डवचायसाठीं म्हणतो.

"ठीक आहे! हा मूर्खपणा आहे हें मला मान्य आहे. एका काळीं

माणूस असलेला प्राणी मी, अर्थात् एका काळीं माझ्या म्हणून ज्या भावना, जे विचार होते, त्या साऱ्या भावना, ते सारे विचार, मी मारले पाहिजेत, अंतःकरणातून काढूनच टाकले पाहिजेत. तुमचं म्हणणं कदाचित बरोबर असेलहि. पण तसं असेल तर मग या साऱ्या भावना नष्ट होऊं दिल्यावर आपणा सर्वांना स्वतःचा बचाव कसा करता येणार ?"

"हं, आता तू समजसपणानं बोलायला लागलास," मास्तर उत्तेजन देण्याच्या स्वरात सांगतो.

"आपल्याला जीवनाविषयीं इतर भावना हव्यात, इतर दृष्टिकोन हवेत.. ...आपल्याला काहीं तरी नवं हवंय, कारण खुद्द आपणच या जीवनातली एक नवी चीज आहोंत......"

"आपल्याला हवंय ते हेंच, याबद्दल शंकाच नाहीं." मास्तर म्हणतो.

"का ?" वाईट शेवटं विचारतो. "आपण काहींहि म्हणालों अगर कसलाहि विचार केला तरी सगळं सारखंच नाहीं का ? आपल्याला फारसं जगायचं नाहींच......मी आहें चाळीस वर्षांचा, तुम्ही आहात पन्नास वर्षांचे . ..,आपल्यात तीस वर्षांपेक्षा कमी वयाचा कुणीच नाहीं, अन् वीस वर्षांच्या वयालासुद्धां अशा प्रकारचं जीवन जगत राहणं फार दिवस नाहीं जमत."

"अन् आपण नवी चीज आहोंत म्हणजे काय आहोंत ?" हाडपोल्या उपहासाच्या स्वरात विचारतो. "भिकाऱ्याची प्रथा तर नेहमींच चालत आलेली आहे !"

"होय, अन् भिकारीच रोमचे संस्थापक होते," मास्तर सांगतो.

"होय तर, अर्थात्" कॅप्टन आनंदानें प्रफुल्ल होऊन सांगतो. "रोमचे संस्थापक म्हणजे रोम्यूलस अन् रीमस, अं ? आपली वेळ आली म्हणजे आपणहि करूं काहीं तरी...."

"सार्वजनिक सुव्यवस्थेंत अन् शांततेंत बिघाड आणूं," हाडपोल्या मध्येंच म्हणतो. तो उद्धटपणें हसतो. त्याचें हसूं दुष्ट, विघातक आहे. सिमसोव, डीकन, दीड तारास हेहि त्याच्याप्रमाणेंच हसतात. तरुण धूमकेतूचे बालिश डोळे हसूं लागतात, आणि त्याचे गाल लालेलाल होतात.

वाईट शेवट बोलू लागतो. तो जणू काय त्यांच्या डोक्यांत खिळे ठोकत आहे असे वाटू लागतें.

“ हे सारे आचरट भ्रम आहेत......नसत्या उठाठेवी ! ”

हे माणसातून उठलेले लोक, याच्या अगावर लक्तरें, वोडका, सताप, उपरोध, घाण, यात हे सदा लडबडलेले, आणि हे लोक अशा रीतीनें युक्तिवाद करीत असताना ऐकणाराला मोठें विलक्षण वाटे. असलीं सभाषणें म्हणजे कॅप्टनच्या अंत:करणाला मेजवानीच असे. अशा वेळीं त्याला इतरापेक्षा जास्त बोलण्याची सधि मिळे आणि म्हणून आपण इतरापेक्षां जास्त चागले आहोंत असे त्याला वाटे. आणि माणसाचा कितीहि अध:पात झालेला असला तरी आपल्या जोडीदारापेक्षा आपण जास्त हुषार, जास्त शक्तिमान अगर जास्त चागलें खातपीत आहोंत या भावनेचा आनद माणसाला काहीं केल्या सोडवत नाहीं. कॅप्टन या आनदाचा गैरवाजवी उपभोग घेई, हा आनद कितीहि मिळाला तरी त्याचें समाधानच होत नसे. असल्या बाबतीत हाडपोत्या, कुबार आणि इतर साऱ्या एका काळीं माणसे असलेल्या या प्राण्याचें विशेष लक्ष नसे, म्हणून त्याना कॅप्टनच्या या वृत्तीचा वीट येई.

मात्र राजकारण हा विषय सर्वांनाच जास्त आवडे. हिंदुस्थान जिंकण्याच्या अगर इंग्लडला काबूत आणण्याच्या आवश्यकतेवर वाटेल तितका वेळ चर्चा बिनहरकत चाले. पृथ्वीच्या पाठीवरून ज्यू जमातीचें उच्चाटन करण्यासाठीं काय काय कडक उपाययोजना कराव्यात याविषयींहि त्याचें तितक्याच उत्साहानें बोलणें चाले. या बाबतींत अनेक निर्दय उपाय सुचविण्यात हाडपोत्या नेहमींच सर्वांवर ताण करी. पण कॅप्टनला प्रत्येक वादात आपलीच सरशी हवी असे, म्हणून तो हा विषय चर्चेला येऊ देण्याची टाळटाळ करी. हे लोक बायकाविषयीं देखील हवे तेव्हा, हवें तितकें व हवें तें बोलत असत, पण मास्तर नेहमीं स्त्रियाची बाजू घेई आणि हे लोक सभ्यतेच्या मर्यादा सोडू लागले कीं त्याला भारी राग येई. साधारणपणें सारेच त्याच्या आज्ञेत राहात असत. कारण ते त्याच्याकडे अपवादात्मक व्यक्ति या नात्यानें पाहात असत. आणखीहि एक कारण होतें—दर शनिवारीं त्याचा आठवड्याचा पगार मिळे, तेव्हा त्याच्याकडून काहीं पैसे उसने

काढण्यासाठीं सारे जण टपलेले असत. मास्तराला तशा अनेक सवलती होत्या. उदाहरणार्थ, अनेकदा अशा वादाचा शेवट जोराच्या मारामारींत होई, त्या वेळी ते लोक मास्तराला कधींहि मारहाण करीत नसत. त्याचप्रमाणें त्याला या शयनगृहात बायका घेऊन येण्याचा हक्क होता. हा हक्क इतर कुणालाहि नसे. या बाबतींत कॅप्टननें सर्वांना पूर्वीच ताकीद देऊन ठेवलेली होती.

"माझ्या घरात बायका आणायच्या नाहींत ह," कॅप्टन सांगे. "बायका, व्यापारी, अन् तत्वज्ञ—माझ्या अधःपाताची हीं तीन कारण आहेत. कुणी जर बायका इथ आणल्या तर त्याला मी घोड्याच्या चाबकान झोडपून काढीन. अन् त्या बाईलाहि मी घोड्याच्या चाबकान झोडपून काढीन......अन् मला जर कुणी तत्वज्ञान सांगताना आढळला तर त्याच डोकच उडवीन मी." आणि इतका वयस्क असूनहि त्याला कुणाचेंहि डोके उडविता आलें असतें; कारण त्याच्या अंगी ताकतच तशी अजब होती. याशिवाय त्याला आणखी एक सोय होती ती अशी कीं तो जेव्हा मारामारी करी अगर भांडे तेव्हा मार्त्यानोव त्याला मदत करी. सर्व जण मारामारी करू लागले कीं मार्त्यानोव मुकाट्यानें व गंभीरपणे एखाद्या थडग्यावरच्या दगडाप्रमाणें कॅप्टनच्या पाठीला पाठ लावून उभा असे, आणि अशा वेळीं दोघे मिळून एक सर्व-संहारक अभेद्य अस्त्र होत असत. एकदा खिम्त्सोव झिंगलेला होता, आणि तो काहीं एक कारण नसता मास्तराच्या अंगावर धावला व त्यानें मास्तराचे मूठभर केसच उपटून घेतले. कॅप्टननें त्याच्या छातींत एक गुद्दा लगावून त्याला जवळ जवळ अर्धा तास बेशुद्ध पाडलें, आणि तो शुद्धीवर आल्यावर त्याला कॅप्टननें मास्तराचे ते केस खायला लावले. मरेमरेतों मार खाण्याऐवजीं त्यानें ही केस खाण्याची शिक्षा पतकरली व खरोखरीच ते केस खाल्ले

वर्तमानपत्राचे वाचन, मारामाऱ्या व सर्वसाधारण गप्पासप्पा याच्या जोडीला ही मंडळी पत्ते खेळून स्वतःची करमणूक करून घेत असे. हे लोक मार्त्यानोवला खेळावयाला घेत नसत. कारण त्याला प्रामाणिकपणें खेळता येत नसे. खोटा खेळ खेळल्याबद्दल अनेकदा पकडला गेल्यावर त्याने उघडपणें कबूलच केलें :

" फसवल्याखेरीज मला खेळताच येत नाहीं...... मला हें एक व्यसनच लागलय. "

" व्यसन काहीं केल्या सुटतच नाहींत, " डीकन तारासनें त्याला पुष्टि दिली. "मी दर रविवारीं प्रार्थनेनतर माझ्या बायकोला मारहाण करीत असे, अन् ती जेव्हा मेली तेव्हा रविवार मला इतका भकास वाटला कीं काहीं सागता सोय नाहीं. एक रविवार मी कसाबसा काढला, फारच वाईट गेला तो....दुसऱ्या रविवारींहि मी माझ्या मनावर ताबा ठेवला, तिसऱ्या रविवारीं मी माझ्या स्वयंपाकिणीला झोडपल....ती चिडली आणि मला पोलिसाच्या स्वाधीन करायच्या धमक्या देऊ लागली. तिन जर तसं केल असत तर काय झाल असत याची कल्पनाच करा तुम्ही ! चवथ्या रविवारीं मी तिला अस मारल कीं जशी काहीं ती माझीच बायको होती ! मग मी तिला दहा रूबल दिले आणि त्यानतर मी तिला नेमान मारहाण करीत राहिलों, तो पुन्हा लग्न करीपर्यंत. "

" ए, डीकन ! थापा मारतोस तू ! तुला दुसर लग्न कसं करता आल रे ? " हाडपोत्यानें मध्येंच तोंड घातलें.

" अरे, तसंच...ती माझ घर संभाळत होती.. . "

" तुला काहीं मुलबाळ झालीं का ? " मास्तरानें विचारलें.

" पाच मुल झाली मला....एक बुडून मेला ..सगळ्यात थोरला.... मोठा मजेशीर छोकरा होता तो ! दोन मुल घटसर्प होऊन मेली....राहिल्या दोन मुली, त्यापैकीं एकीन एका विद्यार्थ्याशीं लग्न केल अन् ती त्याच्या बरोबर सैबेरियाला गेली. दुसरीन अभ्यास करायच ठरवल अन् लोक सागतात कीं ती सेंट पीटर्सबर्ग शहरीं क्षयान मेली. हो–होय, पाच मुल होतीं मला... भिक्षुकाना मुल खूप होतात, तुम्हाला ठाऊक आहेच हें. " हें असे का असतें याचा तो खुलासा करू लागला आणि भ्रमिष्टासारखा हंसत सुटला. त्याचा हशा थाबल्यावर अलेक्सी माक्सिमोविच सिम्त्सोवला आठवण झाली—त्यालाहि एका काळीं एक मुलगी होती.

" तिच नाव होत लिदका....ती सणसणीत पोरगी होती. " यापेक्षां जास्त काहीं त्याला आठवत होतेंसें दिसलें नाहीं; कारण त्यानें सर्वांच्याकडे पाहिलें, गुन्हेगारासारखें स्मित केलें, आणि तो स्तब्धच राहिला.

हे लोक आपल्या पूर्वचरित्रांविषयीं एकमेकांशीं फारच थोडें बोलत असत, मागच्या आठवणी फारच क्वचित काढत असत. आणि काढल्या तरी त्या अगदींच मोघम स्वरूपात व कमी अधिक प्रमाणात कुत्सित स्वरातच काढत असत. हें बहुधा वाजवीच होतें, कारण अनेक लोकांच्या बाबतींत जुन्या आठवणी सध्याचा सारा उत्साह मारून टाकतात व भावि काळाविषयींची सारी आशा नष्ट करतात.

. . . . . . .

आणि पावसाळ्यात पावसाच्या दिवशीं गारठा पडून हवा कुद झालेली असताना हे "एका काळीं माणसे असलेले प्राणी" वाविलोवच्या खानावळींत जमा होत असत. तिथें त्याची चागलीच ख्याति झालेली होती. चोर व लफंगे म्हणून लोक त्याना जरा भीत असत. पट्टीचे पिणारे म्हणून लोक त्याना जरा तुच्छ लेखत असत. पण त्याच्या हुशारीबद्दल लोकाची खात्री असे, म्हणून त्याना मान मिळे व लोक त्याचें ऐकत असत.

वाविलोवची खानावळ म्हणजे त्या रस्त्यांतल्या रहिवाशांची बैठकीची जागा होती आणि "एका काळीं माणते असलेले प्राणी" हे त्या बैठकीतले बौद्धिक पुढारी होते. दर शनिवारी संध्याकाळीं व रविवारीं सकाळीं या खानावळींत खूप गर्दी जमत असें आणि अशा वेळीं "एका काळीं माणसें असलेले हे प्राणी" तिथें जात असत. त्याचें या ठिकाणीं सन्माननीय पाहुणे म्हणून स्वागत होई. तिथें त्या गल्लींतलेच रहिवासी जमत असत. हे लोक कॅप्टनच्या अड्डयातील लोकासारखेच पट्टीचे पिणारे असत, आणि त्याच्याचप्रमाणें गावांत थारा न मिळाल्यामुळें इकडे राहायला आलेले असत. दारिद्र्यानें व दुःखानें गाजलेल्या या जमावात हे पाहुणे आपल्याबरोबर आपल्या भोंवतालचें वातावरणहि घेऊन येत असत. जीवनकलाहाच्या धकाधकीत थकून भागून गेलेल्या या लोकाच्या जीवनाला ज्यामुळे उजळा येईल असें काहीं तरी नवीन हे पाहुणे आणीत असत. सर्व विषयावर बोलण्याची याची हातोटी, साऱ्या गोष्टींची टर उडविण्याची याची प्रवृत्ति, याचें निर्भय मतप्रदर्शन, याचा झणझणीत हजरजबाबीपणा, साऱ्या गल्लीला ज्या गोष्टींचा धाक त्याच बाबतींत याची बेडर वृत्ति, आणि

या लोकाची एकंदर धाडशी वागणूक पाहून इथल्या मंडळींना याचें कौतुक वाटल्यावाचून राहात नसे. त्यात पुन्हा या पाहुण्याना कायद्याची चागली माहिती होती; याना सल्ला देता येत असे, अर्ज लिहून देता येत असत आणि पकडले न जाता फसवाफसवी करण्याच्या कामात मदत करता येत असे. या साऱ्या कर्तृत्वाबद्दल याना वोडका दारूच्या स्वरूपात मोबदला मिळे आणि याच्या बुद्धिचातुर्याबद्दल याची मनमुराद स्तुतीहि होई.

या गल्लींतल्या रहिवाशाची विभागणी त्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें दोन गटामध्यें झालेली होती. त्यातला एक गट कॅप्टनचा पक्षपाती होता. कॅप्टन म्हणजे "खराखुरा लढवय्या, मास्तरापेक्षा किती तरी जास्त शूर," असें या गटाला वाटे. दुसऱ्या गटाची अशी खात्री होती कीं मास्तरच कॅप्टनपेक्षा सर्व बाबतींत "श्रेष्ठ" आहे; त्याच्या मतें मास्तरहि तसा मोठा निधड्या छातीचाच माणूस होता. प्रख्यात निर्ढावलेले दारुडे, चोर व लफंगे, भीकमागेपणा ते तुरुंग हा मार्ग ज्याच्या बाबतींत अपरिहार्य, अशा मंडळींत कॅप्टनचे भगतगण सापडत असत. मास्तराविषयीं आदर असलेले लोक याच्यापेक्षा जास्त सुस्थिर असत, त्याना अजून बरीच आशा वाटत असे; यापेक्षा चागली स्थिति आपल्याला लाभेल अशी उमेद त्याच्या ठिकाणीं अजूनहि शिल्लक असे; त्याची काहीं ना काहीं कारस्थानें सतत चाललेलीं असत; आणि ते सदा सर्वदा वखवखलेले असत.

मास्तर व कॅप्टन याचे या गल्लीशीं संबंध कशा प्रकारचे होते हें पुढील हकीकतीवरून कळून येण्यासारखें आहे:

म्युनिसिपल अधिकाऱ्यानी या गल्लीबाबत पास केलेल्या ठरावावर ही मंडळी एके दिवशीं या गुत्त्यात बसून चर्चा करीत होती. ठराव असा होताः इथल्या रहिवाशानीं इथले सारे खड्डे व चर भरून काढावयाचे; मात्र त्यासाठीं खत अगर सडलेल्या मासाचा उपयोग करावयाचा नाहीं; फक्त कचरा व घरजागेतल्या गिट्टीचा उपयोग करावयाचा.

"मी ही गिट्टी आणायची कुठून बुवा? उभ्या आयुष्यांत मी नाहीं म्हणायला एक साळुकीच घरटंच तेवढ बाधायच मनात आणल होतं, अन् तें सुद्धा मी अजूनहि बाधलेल नाहीं; मग घरबामेतली गिट्टी मी

आणूं कुठून ?" मोकी अनीसीमोवनें तक्रार केली. तो सफेत रोट्या विकत असे; त्याची बायकोच त्याला त्या भाजून देत असे.

या विषयावर एक घोषणा करण्याचे कॅप्टननें ठरविलें. लोकाचें लक्ष वेधून घेण्यासाठीं त्यानें टेबलावर मूठ आपटली.

"गिट्टी अन् कचरा कुठ मिळेल अशी पचाईत पडली आहे ना तुम्हाला ? मग असं करा. टाउन हॅालवर जा आणि तो पाडून टाका. तो इतका जुनाट झालेला आहे की त्याचा आता कुणालाच उपयोग होत नाहीं अन् तुम्ही जर तो पाडून टाकला तर शहराला शोभा आणायसाठी दोन चागल्या गोष्टी केल्यात असं होईल. पहिली गोष्ट म्हणजे आपला हा रस्ता दुरुस्त होईल. अन् दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही म्युनिसिपालिटीला नवा टाउन हॅाल बाधायला भाग पाडाल. या कामासाठीं तुम्हाला घोडे हवे असले तर ते मेयरकडून घ्या. अन् त्याच्या तीन पोरीहि घेऊन या. गाडीला जुंपायला अगदीं योग्य दिसतात त्या. नाहीं तर असं करा : आमचा घरमालक जुडाज पेत्यूनिकोव याच घर पाडा अन् त्याच लाकूड सामान रस्ता करायसाठीं वापरा. बर, पण काय रे मोकी, तुझ्या बायकोन आजच्या रोट्या भाजायला जळण कुठून आणल ठाऊक आहे ह मला. जुडाजच्या घराच्या तिसऱ्या खिडकीचीं झडप अन् ढेलजेच्या दोन पायऱ्या वापरल्या जळणासाठी तिन."

साऱ्या मडळींचें यावर यथास्थित हसून झाल्यावर गभीर वृत्तीचा माळी पावल्यूजिन यानें विचारलें :

"तें असो, पण सरदारजी, खरच आम्ही काय करायच हो ?...अं ? तुम्हाला काय वाटत ?"

"मुळींच हातपाय हालवू नका. वाटोळ होऊ दे रस्त्याच..."

"काहीं काहीं घर अगदीं जमीनदोस्त व्हायच्या बेताला आलीं आहेत..."

"पडू देत तीं. तुम्ही मुळींच मध्यें पडू नका. अन् तीं पडल्यावर शहराकडून मदत मागा. मदत नाहीं मिळाली तर कोर्टात दावा करा. पाणी कुठून येत ? शहरातूनच ना ? मग घराच्या पाडापाडीबद्दल शहरालाच जबाबदार धरल पाहिजे."

"अहो ते म्हणतील पाणी पावसामुळं येतं..."

"पाऊस शहरांतलीं घरं पाडतो का? अं? तुमच्याकडून ते कर घेतात पण तुम्हाला तुमच्या हक्काबद्दल एक शब्द बोलू देत नाहींत. तुमच्या आयुष्याच अन् मालमत्तेच वाटोळ त्यानीं करायच अन् तें दुरुस्त करायची सक्ती पुन्हा त्यानीं तुमच्यावरच करायची! हा काय न्याय झाला?"

कॅप्टनच्या या जहाल भाषणामुळें गल्लींतल्या निम्मे लोकाची खात्री पटली आणि त्यानी पावसाच्या पाण्यामुळें घरे वाहून जाईपर्यंत वाट पाहण्याचें ठरविलें. इतर जास्त समजस लोकानी मास्तराचें पुढारीपण पतकरलें आणि त्याच्यासाठीं त्यानें एक समर्पक रिपोर्ट लिहून काढून म्युनिसिपल अधिकाऱ्याकडे पाठविला. गल्लींतल्या रहिवाशानीं म्युनिसिपालिटीचा ठराव का अमान्य केला याचें या रिपोर्टात इतके छान समर्थन केलेलें होतें कीं म्युनिसिपल अधिकाऱ्यानीं तो प्रत्यक्ष मान्यच केला. गल्लींतल्या लोकाना बराकींची दुरुस्ती करून राहिलेला गाळसाळ वापरण्याची परवानगी मिळाली आणि तो वाहून आणण्यासाठीं फायर ब्रिगेडनें पांच घोडेहि दिले. आणखी विशेष गोष्ट म्हणजे या गल्लींतून ड्रेनेजचा नळ शक्य तितक्या लवकर घालून देण्याची आवश्यकताहि म्युनिसिपल अधिकाऱ्याना पटली. या आणि इतर अनेक गोष्टीमुळें मास्तराची लोकप्रियता खूपच वाढली. त्यानें या लोकासाठीं अर्ज लिहून दिले आणि वर्तमानपत्रातून तक्रारी प्रसिद्ध केल्या. उदाहरणार्थ वाविलोवच्या खानावळींतील हेरिंग मासे व इतर खाद्यपदार्थ चागले नाहींत हें एका प्रसंगीं गिऱ्हाइकाच्या लक्षात आलें, आणि यानतर एक दोन दिवसानीं वाविलोव हातात वर्तमानपत्र घेऊन उभा आहे व लोकाची जाहीर माफी मागत आहे असें दृश्य त्याना दिसलें.

"खरं आहे. मला कबूल केल पाहिजे. मी बुरसलेले अन् विशेष ताजे नसलेले हेरिंग मासे आणले खरेच, अन् कोबी.... ती पण जरा सडलेलीच होती. अहो प्रत्येकाला जितके पैसे खिशात घालता येतील तितके हवेच असतात हें तर जगजाहीरच आहे. अन् याचा परिणाम काय झाला! यात यश नाहीं लाभल. मी लोभीपणा केला, कबूल करतों मी; पण माझ्यापेक्षाहि हुशार माणसान माझा लोभीपणा उघडकीला आणला, म्हणून आमची फिटफाट झाली..."

या कबुलीजबाबाचा लोकावर फारच चागला परिणाम झाला. आणि

त्याच्या योगानें वाविलोवला हे हेरिंग मासे व कोबी संपवून टाकाक्याची संधि मिळाली; कारण लोकाच्यावर परिणाम इतका झाला कीं आपण काय खात आहोंत इकडे त्याचें लक्षच गेलें नाहीं.

ही घटना फारच अर्थपूर्ण ठरली, कारण तिच्यामुळें मास्तराची लोकप्रियता वाढली इतकेच नव्हे तर वर्तमानपत्री प्रचाराचा प्रभाव सामान्य लोकानाहि कळून आला.

कधीं कधीं मास्तर त्या खानावळींतच व्यावहारिक नीतिमत्तेवर व्याख्यानें देई.

" मी तुला पाहिला, " त्यानें घराना रग देणारा रगारी याश्का त्यूरिन याला सागितलें. " याकोव, तू आपल्या बायकोला मारहाण करीत असलेला पाहिला मी तुला. . "

वोडकाचे दोन ग्लास झोंकून झालेले असल्यामुळे याश्का बराच तर्र होता. आणि त्याची वृत्ति आता बेदरकार झालेली होती.

भोंवतालच्या मडळींनीं त्याच्याकडे पाहिलें. त्याना वाटलें हा आतां भाडण उकरून काढणार. आणि सारे जण गप्प बसले.

" तुम्ही पाहिलत मला ? अन् तुम्हाला तें कसं काय आवडलं ? " याश्कानें विचारलें.

यावर सारे जण दबलेल्या स्वरात हसले.

" मला तें आवडल नाहीं, " मास्तर उत्तरला. त्याच्या स्वरात इतकी कळकळ जाणवत होती कीं भोंवतालचे लोक गप्पच राहिले.

" माफ करा हं, मी माझ्याकडून शिकस्त करीत होतों, " मास्तर आपल्यावर बाजू उलटवणार असें वाटून याश्का उसनें अवसान आणून म्हणाला. " बायकोच समाधान झाल .....ती आज अजून उठलेली नाहीं.... . "

मास्तर संभ्रान्तपणें बोटानीं टेबलावर चित्रे काढीत होता आणि त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहात होता. हें करता करताच तो बोलू लागला : " याकोव, मला तें का आवडत नाहीं हें दिसत नाहीं का तुला ? .....आपण या प्रकरणाचा सागोपाग विचार करू या अन् तुझ्या हातून खरोखरी काय होतय अन् त्याचा तुझ्यावर काय परिणाम होणार आहे याचा छडा लावू या. तुझी बायको आहे गरोदर. काल रात्रीं तू तिच्या बगलावर अन् छातीवर ठोसे

लगावलेस. याचा अर्थ असा कीं तू तिला मारहाण केलीस इतकच नव्हे तर पोरालाहि मारहाण केलीस. तुझ्या या मारापायीं तें पोर मेल असत, अन् तुझी बायको मेली असती नाहीं तर चागलीच आजारी पडली असती. आजारी बाईच्या उस्तवाऱ्या करायचा त्रास म्हणजे सुखाची गोष्ट नव्हे. मोठी कष्टाची अन् खर्चाची गोष्ट असते ती, कारण आजारपणाला औषध लागतात अन् औषधाना लागतो पैसा. तुझ्या मारान जर तें पोर मेल नसेल तर तें पगू झाल असेल अन् तें कुरूप, वेडविद्र अगर कुबड जन्माला येईल. याचा अर्थ असा कीं त्याला काम नाहीं करता येणार, अन् हें पोर चागला कामगार झाल पाहिजे ही गोष्ट तुझ्या दृष्टीन फार महत्वाची आहे. हे पोर नुसत जन्मताच आजारी झाल तरीसुद्धा वाईटच, कारण त्याच्यापायीं त्याच्या आईला काम करायला मिळणार नाहीं, अन् त्याला औषधपाणी लागेल. म्हणजे तू स्वतःवर काय प्रसंग ओढवून घेतोयस हें पाहिलस ना तू ? कष्टाचीं काम करून पोट भरणाऱ्या माणसानीं धष्टपुष्ट अन् निरोगी राहिल पाहिजे, अन् त्याचीं मुलहि धष्टपुष्ट अन् निरोगी असायला पाहिजेत. बरोबर आहे ना हें ? ”

“ होय, ” श्रोत्यांनीं संमति दिली.

“ पण हें सारं होण शक्य नाहीं, ” याश्का म्हणाला. मास्तरानें त्याच्या समोर भावी काळाचें जें चित्र रगविलें तें पाहून तो जरासा घाबरला. “ ती चांगली जाडजूड अन् धट्टीकट्टी आहे; माझा मार पोरापर्यंत पोंचलाच नसेल. अहो ती राक्षशीण आहे नुसती ! मी सांगतों तुम्हाला ! ” तो रागारागानें ओरडून म्हणाला. “ ती माझा अगदीं पिट्टा पाडते बघा. गब कसा लोखडाचा पिट्टा पाडतो, तशीच. तिला संधि मिळायचा अवकाश, कीं तिन माझा पिट्टा पाडलाच. ”

“ समजलों मी, बरं का याकोव, तुला बायकोला मारहाण केल्यावांचून राहवत नाहीं हें दिसतयच मला, ” मास्तराचें उदास आणि विचारमग्न स्वरातलें बोलणें पुन्हा चालू झालें. “ तू असं करतोस याला बरींचशीं कारण आहेत.......तू तुझ्या बायकोला इतक्या हलगर्जीपणान मारतोस याला कारण तिचा स्वभाव नव्हे......याला कारण आहे तुझ स्वतःचंच अंधारमय अन् उदास जिण......”

“ बरोबर आहे तुमच म्हणण ! ” याकोव ओरडून म्हणाला. “ आम्ही

अंधारांतच आयुष्य काढतों. धुराडीं साफ करणाऱ्या शर्टासारख असतं आमच जिणं म्हणानात."

"तुला तुझ्या जिण्याचा राग आलेला असतो, पण तू हा राग काढतोस आपल्या बायकोवर, तुझ्या सगळ्यात जवळच्या माणसावर. अन् हें सारं तिला तू सोसायला लावतोस याच साध कारण म्हणजे तिच्यापेक्षा तुझ्या अगात शक्ति जास्त आहे हेंच. ती सदासर्वदा तुझ्या हाताशीं असतेच; अन् तिला तुझ्या तावडींतून निसटून जाता येत नाहीं. तू किती असमजस आहेस हे दिसत नाहीं का तुला ?"

"आहे खरा.. .. खड्डयात जाऊ दे तें सार ! पण मी तरी करायच काय ? काहीं झाल तरी मी पुरुषच नाहीं का ?"

"अगदीं बरोबर ! तू पुरुष आहेस.. ...पण मला येवढच सागायचय कीं तिला मारहाण केल्यावाचून तुला राहवतच नसल तर नीट काळजीपूर्वक मारहाण करावी, या मारापायीं तिची अगर मुलाची तब्बेत बिघडायचा संभव असतो हे नेहमीं लक्षात ठेवाव. गरोदर बायाना मारहाण करण बर नव्हे.. त्याच्या पोटावर अगर बगलावर व छातीवर मारू नये...... फार झाल तर तिच्या मानेवर ठोसे लगाव. ....नाहीं तर एक दाव घे अन् एखाद्या मऊ भागावर मार तिला......"

वक्त्यानें आपलें भाषण समाप्त केलें आणि खोल गेलेल्या काळ्या भोर डोळ्यानीं श्रोत्याना न्याहाळून घेतलें. कसल्या तरी अगम्य गुन्ह्याबद्दल तो जणू श्रोत्याची माफी मागत होतासे दिसलें.

त्याच्या भाषणामुळे त्याना उत्साह चढला. एका काळीं माणूस असलेल्या या प्राण्याचें नीतिशास्त्र त्यानीं समजून घेतलें. गुत्त्यातील जीवनाचें व बहुताशीं दुदैवी जिण्याचें नीतिशास्त्र होतें तें.

"मग काय, याश्का, समजल का तुला ? बघितलस हे सारं कसं खर आहे तें !"

याकोवला समजलें. बायकोला मारहाण कशी करावयाची या बाबतींत काळजी घ्यायला हवी, नाहींतर आपलेंच नुकसान होतें, हे समजलें त्याला. तो गप्पच बसतो. जोडीदारानीं केलेल्या थट्टेला उत्तरादाखल तो गोंधळून गालातल्या गालात हसत राहतो.

" त्यांत पुन्हा गंमत अशीः बायको म्हणजे तरी काय हो ?" बेकरीवाला मोकी अनीसीमोव तात्विक प्रश्न उपस्थित करतो. " बायको म्हणजे...त्या दृष्टीन पाहिल तर...एक दोस्त असतो. ती एक साखळी असते, तिच्याशीं आपण जन्मभर जखडलेलों असतों . अन् साखळीन जखडलेले गुलाम पूर्वी जहाज चालवायला असत, त्याच्याच सारखी अवस्था असते नवराबायकोची. बायकोच्या जोडीजोडीनच चालायची खटपट केली पाहिजे, नाहीं तर साखळीची ओढ बसणारच . ..."

" जरा थाब हृ," याकोव सागतो, " पण तूहि आपल्या बायकोला मारतोसच."

" मी मारत नाहीं अस म्हटलय का ? मी मारतोंच तिला.. दुसर काहींच हाताशीं नसत.. तुझ म्हणण काय, मला सगळ असह्य झाल्यावर मी भिंतीवर मुठींनीं ठोसे लगावत बसाव होय रे ?"

" मला पण तसंच वाटत बुवा .." याकोव सागतो.

" भाई हो ! कसल ओंगळ अन् संकुचित आहे आमच जिण ! आपल्याला कुठ इकडे तिकडे करायला काहीं वावच नाही !"

" बायकोला मारायच्या बाबतींत सुद्धा साली सावधगिरी घ्यावी लागते," कुणी तरी विनोदानें उद्गारतो. आणि अशा प्रकारें ते रात्रीं बऱ्याच उशीरपर्यंत अगर भाडण होईपर्यंत बोलत बसतात, कारण दारूची नशा अगर असल्या वादातून निर्माण झालेली चीड याचा परिणाम भाडणात व्हावयाचा असा इथला शिरस्ताच असतो.

पावसानें खिडक्यावर मारा चालविलेला आहे, आणि बाहेर गार गार वारा जोरात वाहात आहे. हॉटेलात तबाकूच्या धुराची दुर्गंधि भरलेली आहे, पण इथें आत उबारा आहे, बाहेर रस्त्यात गारठा, पाऊस आणि अंधार आहे. अधूनमधून वारा दमदाटी देत खिडक्यावर जोरानें मारा करीत आहे. तो जणू काय या लोकाना बाहेर या म्हणून दरडावीत आहे. तो जणू काय या लोकाना धुरळयाप्रमाणें धरणीतलावर विखरून जा असें फर्मावीत आहे. या वाऱ्याच्या सोसाट्यात मधूनच एक दबलेला व निराशलेला कण्हण्याचा सूर ऐकू येत आहे; मग पुन्हा हा स्वर वाऱ्याच्या गारगार, निष्ठुर हसहसाटात लुप्त होत आहे. वाऱ्याचें हें संगीत ऐकून आगामी

हिंवाळ्याच्या उदास विचारांची मनांत गर्दी होते. कंटाळवाणे बिनउन्हाचे लहान दिवस, संपतां संपत नाहींत अशा मोठमोठ्या रात्री, गरम कपड्यांची नड, भरपूर खाण्याची नड,—हे सारे विचार मनात गर्दी करून सोडतात. हिंवाळ्यातल्या मोठमोठ्या रात्री उपाशी पोटीं झोंपून काढावयाच्या म्हणजे मोठें कठीण काम असतें. हिंवाळा जवळ येत आहे. होय, जवळ येऊ लागला आहे तो. ...तो पार कसा पाडावयाचा ?

या उदास भवितव्याच्या विचारानें या गल्लींतल्या रहिवाशाना चैन पडेनासें होई. "एका काळीं माणसें असलेल्या प्राण्याचे" जड सुस्कारे या विचारानें वाढत्या प्रमाणात ऐकू येऊ लागत, त्याचबरोबर त्याच्या कपाळावरील सुरकुत्याहि वाढू लागत, त्याचे स्वर जड होऊ लागत आणि त्याचें एकमेकाशी वर्तन जास्त राकटपणाचें होऊ लागे. आणि त्याना अचानक भयकर सतापाची लहर येई कष्टमय जीवनामुळें टेकीला आलेल्या व छळाला सरावलेल्या या लोकाचा निष्ठुरपणा अशा वेळीं जागृत होई. ते एकमेकाना हवे तसें गुरासारखे मारू लागत, आणि मग दिलजमाई करून ते पुन्हा दारू पिऊ लागत. वाविलोव त्याच्याजवळून हवी ती वस्तु गहाण ठेवून घेण्यास तयार असे आणि गहाण ठेवावयाला त्याच्याजवळ आता काहींच शिल्लक राहिलें नाहीं अशी स्थिति येईपर्यंत ते एकसारखे दारू पीत बसत असत. अशा प्रकारें अंतःकरणाचा चोळामोळा करणाऱ्या अबोल संतापाच्या व दुःखाच्या भरांत त्याचे पावसाळ्याचे दिवस जात असत. या हीन जिण्यातून बाहेर पडण्यासाठीं मार्ग कसा काढावयाचा हें त्यांना कळत नसे. हिंवाळ्यांत तर यापेक्षाहि कठीण काळ येणार ही धास्ती त्यांना भेडसावत असे.

अशा प्रसंगीं कॅप्टन त्यांना आपल्या तत्वज्ञानानें धीर देई.

"भाई हो ! धीर सोडूं नका. प्रत्येक गोष्टीला शेवट हा असतोच; हाच तर जीवनाचा मुख्य गुण आहे. हिंवाळा निघून जाईल, पाठोपाठ उन्हाळा येईल......केवढा वैभवशाली मोसम असतो तो, त्यावेळीं चिमण्यांनासुद्धां धीर मिळते अशी म्हणच आहे मुळीं." पण त्याच्या भाषणाचा काहीं एक परिणाम झाला नाहीं—चुळकाभर ताज्यांतलें ताजें पाणी पिऊन भुकेल्या माणसाचें समाधान नाहीं होणार.

डीकन ताराशहि आपलीं गाणीं म्हणून व गोष्टी सागून मित्रमंडळींची करमणूक करावयाची खटपट करीत असे. त्याला जास्त यश येई. आणि कधीं कधीं तर त्याच्या या खटपटीच्या परिणामीं त्या हॉटेलात भयकर बेफाम हैदास माजून राही. हे लोक गाणीं काय म्हणत, हसत काय, नाचत काय, आणि तासचे तास निव्वळ वेडयासारखे वागत असत. हें वेड ओसल्यावर त्याना पुन्हा औदसीन्याचा व निराशेचा झटका येई. ते तसेच त्या गुत्त्यातल्या टेबलाशीं बसून राहात असत. दिव्याचा व तंबाकूचा काळपट धूर तिथे दाटलेला असे. हे लक्तरे लोक तिरसटलेले असत. आळसटपणें त्याचें एकमेकाशीं बोलणें चाले. वाऱ्याच्या पिसाट आरोळ्या ते ऐकत राहात. आपल्या सवेदना बधिर करण्यासाठीं पुरेशी दारू प्यायला कशी मिळेल या एकाच विचारात ते गढून गेलेले असत.

आणि प्रत्येकाला दुसऱ्याविषयीं पुरा वीट आलेला असे आणि साऱ्या दुनियेबद्दल असहाय चीड प्रत्येकाच्या मनात बाणून राहिलेली असे.

## – २ –

या जगांत साऱ्याच गोष्टी सापेक्ष असतात आणि माणसाची अवस्था किती जरी वाईट झालेली असली तरी ती याच्यापेक्षांहि जास्त वाईट होणारच नाहीं अशी खात्री देता येत नाहीं.

तो सप्टेंबरअखेरीचा सुमार होता. त्या दिवशीं उन्हें चागलीं पडलीं होतीं. कॅप्टन आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें शयनगृहाच्या दारालगत बाकडयावर बसलेला होता. वाविलोवच्या खानावळीलगत व्यापारी पेत्यूनिकोवनें दगडी इमारतीचें बाधकाम चालू केलेलें होतें, त्याच्याकडे तो पाहात होता. आणि तो कसल्या तरी विचारात गढून गेलेला होता. ही इमारत अजून बाधून पूर्ण व्हावयाचीच होती. तिच्यात एक साबणाचा कारखाना चालू होणार होता. बऱ्याच दिवसापासून ती कॅप्टनच्या डोळ्यात सलत होती. तिच्या खिडक्यांच्या लांबच लांब रागांमुळें तिच्यांत झालेल्या काळयाभोर उघडया फटी, तिच्या छपरापासून पायापर्यंत तिच्या भोंवतालीं उभारलेलें पराचीचें जाळें, हें सारेंच दृश्य कॅप्टनच्या डोळ्यांत सलत होतें.

तिला लाल रंग दिलेला होता. त्यामुळें ती जणू काय रक्तानें रंगविल्या-

सारखी दिसत होती. ती एखाद्या क्रूर यंत्रासारखी दिसत होती. तें यंत्र जरी अजून चालू झालें नसलें तरी त्यानें जशी कांहीं खोल, भुकेलेल्या आ वासलेल्या जबड्याची राग अगोदरच तयार ठेवलेली आहे व जें सापडेल तें खाऊन गट्ट करावयाचें असाच जणू त्याचा पवित्रा आहे असें वाटत होतें. या कारखान्याच्या इमारतीच्या भिंती विटाच्या होत्या. त्यापैकी एका भिंतीला बाविलोवच्या खानावळीचें करड्या रगाचें लाकडी घर टेंकून उभे होतें, त्याचें छप्पर वाकलेलें होतें, त्याच्यावर शेवाळ वाढलेलें होतें. तें घर त्या भिंतीला लटकलेल्या भल्या मोठ्या बाडगुळासारखे दिसत होतें. हे लोक लवकरच इथल्या जुन्या इमारतींच्या जागीं नवीं घरें बाधावयास सुरवात करतील हा विचार कॅप्टनच्या मनात चाललेला होता.

" हे लोक आमच शयनगृह देखील पाडून टाकतील, " तो आपल्या मनाशीं म्हणाला. " दुसर एखाद शयनगृह शोधावं लागणार. पण इतक स्वस्त अन् सोइस्कर घर मिळायच नाहीं. या घरात राहायची आपल्याला येवढी सवय झालेली, अन् ही जागा आपल्याला सोडावी लागणार म्हणजे केवढी दुःखाची गोष्ट! कारण काय, तर म्हणे कुणा तरी व्यापाऱ्याच्या डोक्यात मेणबत्त्या व साबण तयार करायचा विचार आला! अशा या वैऱ्याला थोडसं जरी दुःख आपल्याला देता आल तर काय बहार होईल! आपण किती खुषीन देऊ हें दुःख ! "

कालच इवान आन्द्रीयेविच पेत्यूनिकोव आपल्या मुलाला व एका इंजिनियरला घेऊन शयनगृहाच्या अंगणात आलेला होता. त्यानीं अंगणाची मोजणी केली आणि अधेमधे काहीं लाकडी खुंट्या ठोकून ठेवल्या. पेत्यूनिकोव निघून गेल्यावर कॅप्टनच्या आदेशानुसार धूमकेतूनें या खुंट्या उपटून फेंकून दिल्या.

त्या व्यापाऱ्याचें चित्र कॅप्टनच्या मनश्चक्षूसमोर अजूनहि दिसत होतें: चणीनें लहान; हडकुळा; अंगात फ्रॉक कोटासारखा एक लाब अंगरखा; डोक्याला मखमली टोपी, आणि पायात उच, चकचकीत पॉलिश केलेले बूट. चर्या हडाडलेली; गालाचीं हाडें वर आलेलीं; पाचरीच्या आकाराची व करड्या रंगाची झांक असलेली दाढी; आणि उच कपाळ व त्यावर

सुरकुत्याची शिवण; आणि त्या कपाळाखालून दोन आकुंचित, अर्धवट मिटलेले, सावध व शोधक करडे डोळे चमकत असलेले.. ...टोंकदार नाजुक नाक, अरुद जिव्हणी, पातळ ओंठ...त्याची एकदर चर्या लुटारू भाविकपणा व प्रतिष्ठित दुष्टपणा प्रदर्शित करीत होती.

"साला खोकड अन् डुकराची भेसळ अवलाद आहे!" कॅप्टननें दबलेल्या स्वरात शिवी हासडली. त्याला पेत्यूनिकोवच्या पहिल्या भेटीची आठवण झाली. हा व्यापारी गावच्या नगरसभेच्या एका सभासदाबरोबर हें घर विकत घ्यावयाला आला होता. आणि कॅप्टनला पाहून यानें या सभासदाला विचारलें:

"हा कचरा म्हणजेच तुमचा तो भाडेकरू का?"

आणि त्या दिवसापासून, म्हणजे दीड वर्षांपूर्वीपासून, कोण कुणाचा जास्तींत जास्त अपमान करतो अशी दोघामध्यें निकराची चढाओढ चाललेली होती. काल रात्रीं "गरमागरम शब्दाची लहानशी चकमक" झाली असे पेत्यूनिकोवशीं झालेल्या सभाषणाचें वर्णन कॅप्टननें केलें. इंजिनियरला निरोप देऊन पेत्यूनिकोव कॅप्टनजवळ आला.

"अजून इथच बसून राहिलेत?" त्यानें कॅप्टनला विचारलें. विचारताना त्यानें आपल्या टोपीला अशा रीतीनें हात लावला की तो टोपी नीट करण्यासाठीं लावला का नमस्कार करण्यासाठी लावला हें पाहणाराला नक्की सागता येऊ नये.

"अजून भटकतच राहिलेत?" कॅप्टननें हुबेहुब तशाच स्वरात विचारलें. हें विचारताना त्यानें आपल्या हनुवटीला हिसडा दिला, त्याच्यामुळें त्याची दाढी हलू लागली. नीट लक्षपूर्वक न पाहणाराला असे वाटलें असतें कीं त्यानें मान हलवली असावी किंवा तोंडातली पाइप जिव्हणीच्या एका कोंपऱ्यातून दुसऱ्या कोंपऱ्यात सरकावण्याची ही खटपट असावी.

"चाललच आहे, पैसा रग्गड आहे माझ्याजवळ, म्हणून मला जगात इव तिकड भटकता येतय. पैसा म्हणतो 'मला खर्चा,' म्हणून मी त्याला जरा मोकळा सोडतोंय." व्यापाऱ्यानें कॅप्टनकडे एक कावेबाज कटाक्ष फेकून टोमणा मारला.

" म्हणजे तुम्हीच पैशाची सेवा करतां तर, पैसा कांहीं तुमची सेवा नाहीं करत. " कॅप्टननें रोखठोक जबाब दिला. या व्यापाऱ्याच्या पोटावर एक ठोसा लगावावा अशी कॅप्टनला अनिवार इच्छा झाली पण ती त्यानें कशीबशी दाबली.

" म्हणजे दोन्ही गोष्टी सारख्याच नव्हेत का ? पैसा सारं कांहीं सरळ करतो. पण तो जर आपल्याजवळ नसेलच "..... आणि हें सांगताना व्यापाऱ्यानें कारुण्याचा उसना व उद्धट भाव आणून कॅप्टनकडे पाहिलें. कॅप्टनच्या वरच्या ओंठाला बाक आला आणि त्याचे लांडग्याच्या दातासारखे फारोळे दात बाहेर दिसू लागले.

" अक्कल अन् सदसद्विवेकबुद्धि असेल तर पैशाशिवाय जगता येत. पैसा माणसाकडे येताना नेहमींच नेमकी अशी वेळ साधतो कीं त्या वेळीं माणसाची सदसद्विवेकबुद्धि झडू लागलेली असते .....जितकी सदसद्विवेक-बुद्धि कमी, तितका पैसा अधिक ! "

" तसं का होईना, पण ज्याच्याजवळ पैसाहि नाहीं अगर सदसद्विवेक-बुद्धीहि नाहीं असेहि लोक असतात कीं. "

" तुम्ही तरुण होता तेव्हा असेच होता कीं काय ? " कॅप्टननें भाबडे-पणानें विचारलें. पेत्यूनिकोवच्या नाकपुड्या फुरफुरल्या. त्यानें एक निःश्वास सोडला, डोळे अर्धवट मिटले आणि सांगितलें :

" हे : ! मी तरुण होतों तेव्हा मला फार हालअपेष्टा काढाव्या लागल्या...... "

" असं समजायच मी...... "

" किती काम करीत होतों मी...... "

" अन् इतरांना अति काम करायला लावत होता ना ? "

" तुमच्यासारख्या लोकांना ना ? सरदारांना ? लावत होतों कीं ! त्यांच्यातले अनेक जण पायां पडत असत माझ्या. "

" तुम्ही नुसते दरोडेच घालायचा धंदा केलांत होय ? खून करायचा धंदा केला नसालच ? " कॅप्टन ठिसकारला. पेत्यूनिकोवचा चेहरा गोरामोरा झाला आणि त्यानें झटदिशीं विषयांतर केलें.

" तुम्ही अगदीं वाईट यजमान आहांत. तुमचा पाहुणा उभा आहे अन् तुम्ही आपले खुशाल बसून राहता. "

" पाहुण्याला बसायला बंदी कुणीच केलेली नाहीं. " कॅप्टन म्हणाला.

" पण मी बसायच कशावर ? "

" जमिनीवर......तिच्यावर काय हवा तो कचरा टाकला तरी तो झेपेल तिला...... "

"तुम्ही स्वतः याच प्रत्यतर आणून देता आहातच म्हणा," पेत्यूनिकोव शांतपणें म्हणाला. " मला वाटत आता तुमची अन् तुमच्या भाषेची रजा घ्यावी झालं, " आणि हे बोलताना त्याचे डोळे कठोर, विषारी कटाक्ष फेकत होते.

आणि तो निघून गेला. हा बनिया आपल्याला भ्याला ही सुखकर समजूत कॅप्टनच्या मनात जागृत करून ठेवून तो गेला. आपल्याला जर तो भ्याला नसता तर त्यानें आपल्याला केंव्हाच या शयनगृहातून काढून लावलें असतें. महिना पाच रूबल भाडे येतें येवढ्यासाठीं हा आपल्याला इथें राहू देत असेल हें शक्य दिसत नाहीं. या व्यापाऱ्यानें कारखान्या-भोंवताली फेरी कशी मारली, मग हा पराचीवरून चढून वर कसा गेला, खाली कसा आला, हे सारे कॅप्टननें पाहून घेतलें. हा वरून पडावा आणि याच्या साऱ्या हाडाचा चक्काचूर व्हावा असे कॅप्टनला अगदीं मनापासून वाटलें. कोळी जसा आपल्या जाळ्यात वावरतो तसा पेत्यूनिकोव त्या बाधकामावर इकडून तिकडे चढत होता. तो चालता चालता त्याच्या पायाखालची एक फळी बहुधा मोडली असावी अशा समजुतीनें कॅप्टननें खळबळलेल्या मनःस्थितींत बसल्या जागीं ताडदिशीं उडीसुद्धा मारली— पण तसें कांहींच झालेलें नव्हतें !

आणि आजहि कॅप्टनच्या नजरेसमोर त्या लाल इमारतीचें नेहमींचें दृश्य उभेच होतें. इमारत इतकी साधी, इतकी मजबूत, आणि जमिनीला इतकी घट्ट चिकटून बसलेली होती कीं ती जणू काय जमिनींतला सारा रस एव्हाच शोषून घेत होती. तिच्या आ वासलेल्या भिंतींनिशीं ती जणू कॅप्टनकडे पाहून कठोरपणें व दुष्टाव्यानें हसत होती. सूर्याचीं किरणें या

गल्लींतल्या इतर घाणेरड्या खुराड्यांबरोबरच या इमारतीच्या भिंतींवरहि मुक्त हस्तानें प्रकाशाची खैरात करीत होतीं.

" खड्ड्यात जाऊ दे साला ! " कारखान्याच्या भिंतींचें मोजमाप नजरेनें विचारपूर्वक घेत कॅप्टन उद्गारला. " येवढ जर...... " येवढ्यात मनात चटकन येऊन गेलेल्या विचारानें बेचैन होऊन सर्वांग थरथरत असतानाच कॅप्टन ताड्दिशीं उभा राहिला आणि तसाच तडक वाविलोवच्या खानावळीकडे धावत गेला. जाता जाता तो स्वतःशीच काहीं तरी पुटपुटत होता.

वाविलोव त्याला खानावळींतल्या गुत्त्यातच भेटला. त्यानें त्याचें मित्रभावानें स्वागत केलें.

" सरदारजी, कस काय, बर आहे ना ! " वाविलोव मध्यम उंचीचा माणूस होता त्याच्या डोक्याला मधोमध टक्कल पडलेलें होतें आणि भोंवतालीं करड्या केसाचा घेरा होता. आणि त्याच्या मिशा अगदीं आखूड व दात घासायच्या ब्रशासारख्या ताठ होत्या. त्याच्या अंगात चामड्याचा कोट होता. ताठ उभे राहण्याची ढब, नीटनेटके कपडे, त्याच्या प्रत्येक हालचालींत तो जुना सार्जंट असल्याचें दिसत होतें.

" इगोर्का ! तुझ्या घराच खरेदीपत्र अन् नकाशा आहे ना तुझ्याजवळ ? " कॅप्टननें उतावळेपणाने विचारलें.

" आहे ना. " वाविलोव सशयीपणानें वर मान करून आपल्या बारीक चोरट्या डोळ्यानीं कॅप्टनचा चेहरा बारकाईनें न्याहाळू लागला. कॅप्टनची चर्या नेहमींपेक्षा वेगळीच दिसत होती.

" ते कागद मला दाखव ! " कॅप्टननें गुत्त्याच्या कठड्यावर मूठ आपटली आणि जवळच्या स्टुलावर बसता बसता ओरडून सांगितलें.

"पण कशाला ते ?" वाविलोवनें विचारलें. कॅप्टन इतका अस्वस्थ झालेला असताना आपण आपलें डोके ठिकाणावर ठेवलेलें बरें, असें त्याला वाटलें.

" अरे मूर्खा ! ताबडतोब आण ते ! "

वाविलोवनें कपाळावर आठ्या आणल्या, आणि प्रश्नार्थक नजरेनें आढ्याकडे पाहिलें.

" कुठ आहेत बरं तीं माझीं कागदपत्र ? "

याचें उत्तर आढ्यावर सांपडणार नव्हतेंच. म्हणून या वृद्ध सार्जेटनें नजर खालीं करून आपल्या पोटाकडे पाहिलें, आणि त्रासलेली व विचारमग्न मुद्रा करून गुत्त्याच्या कठड्यावर बोटानीं ताल धरला.

" असं मूर्खांच सोंग आणण्यात काहीं फायदा नाहीं. " कॅप्टन ओरडून म्हणाला. त्याला त्याच्याविषयीं मोठासा आपलेपणा वाटत नव्हताच—त्याला असें वाटे कीं या माजी लष्करी शिपायाला दारूचा गुत्तेवाला होण्यापेक्षां चोर होणें जास्त शोभून दिसलें असते.

" अरे हो ! आत्ता आठवण झाली बघा सरदारजी ! मी या घराचा ताबा घेतला त्याच वेळीं हीं कागदपत्र कोर्टात राहिली बघा. "

" ए इगोर्का ! आचरटपणा पुरे झाला हं. तो नकाशा, तीं हक्कपत्रकं अन् तुझ्याजवळ यातल जें काय असेल तें सार मला ताबडतोब दाखवण्यात तुझाच फायदा आहे. याच्यावर तुला शेपाचशें रूबल मिळून जातील, काय समजलास ? "

वाविलोवला काहींच समजलें नाहीं. पण कॅप्टन इतक्या गंभीर आणि खात्रीच्या स्वरात बोलला कीं सार्जंटच्या डोळ्यात कुतूहल चमकू लागलें आणि "हे कागद माझ्या टेबलाच्या खणात असतील तर पाहतों हं" असें सांगून तो गुत्त्यामागच्या दरवाजातून बाहेर गेला. दोन मिनिटानीं तो हातात हीं कागदपत्रे घेऊन चेहऱ्यावर कमालीचें आश्चर्य दर्शवीत परत आला.

" हीं पहा, घरांतच होतीं बघा हीं साली हक्कपत्रक ! "

"ए: हे:! तूं......विदूषक आहेस नुसता ! अन् तू म्हणे पूर्वी शिपाईगिरी सुद्धा केलीस. "

त्याच्या हातातून कागदपत्राची निळी फाइल हिसकून घेताना कॅप्टनला त्याची तासडपट्टी काढल्यावाचून राहवलें नाहीं. मग ते कागद आपल्यासमोर पसरून त्यानें वाविलोवचें कुतूहल आणखीच जागृत केलें. तो ते कागद वाचू लागला, तपासू लागला आणि त्याचबरोबर तो भयसूचक रीतीनें डुरकूं लागला. शेवटीं तो काहीं तरी मनाशीं ठरवून उठला, आणि दरवाजाकडे गेला. जातां जातां त्यानें सारीं कागदपत्रें गुत्त्याच्या कठड्यावरच ठेवलीं आणि वाविलोवला सांगितलें:

" थांब ह ! तीं परत नेऊन ठेवू नकोस. "

वाविलोवनें तीं गोळा केली, गल्ल्याच्या पेटींत कोंबलीं, पेटीला कुलुप लावलें, आणि मग तें घट्ट लागलें आहे कीं नाहीं याची खात्री करून घेण्यासाठी ओढून पाहिलें. यानतर त्यानें विचारमग्नपणें आपलें टकल खाजवलें. मग तो बाहेर खानावळीच्या पडवींत गेला. तिथून त्याला कॅप्टन घराची पुढची बाजू मोजीत असलेला दिसला. तो त्याच्याकडे उत्सुकतेनें लक्षपूर्वक पाहात राहिला. कॅप्टननें टिचक्या वाजविल्या आणि तीच बाजू पुन्हा मोजावयास प्रारभ केला—त्याचा चेहरा विचारमग्न होता, पण आलेलें मोजमाप पाहून त्याला समाधान झालेलें दिसलें. वाविलोवचा चेहरा अगोदर ओढलेला दिसत होता, तो मग बुचकळयात पडल्यासारखा झाला, आणि शेवटीं त्याच्यावर प्रफुल्ल स्मित झळकू लागलें.

" सरदारजी, शक्य आहे हे ? " कॅप्टन त्याच्याकडे येत असताना त्याला त्यानें ओरडून विचारलें.

" अर्थात् शक्य आहे. नुसता पुढचा भागच एका आर्शिनपेक्षा जास्त कापला गेलाय. अन् खोली किती आहे तें आता इतक्यातच बघतों मी. "

" खोली......बत्तीस आर्शिन आहे ती. "

"अरेच्च्या ! तुझ्या लक्षात आलं म्हणायचं ! काय रे ए पोकळ मडक्या ? "

" अर्थात् ! पण सरदारजी, तुमची नजर काय भयकर तीक्ष्ण आहे हो ! तुम्हाला जमिनीच्या खालचं पाहता येत !" वाविलोव आनदानें उद्गारला.

आणखी काहीं मिनिटांनीं वाविलोवच्या बैठकीच्या खोलीत दोघे एकमेकासमोर बसले. आणि कॅप्टन एकसारखी बीर ढोसत या गुत्तेवाल्याला सागत होता :

" अशा रीतीन कारखान्याची एक भिंत तर तुझ्याच हद्दींत उभी आहे. आता लक्षात ठेव ह, बिलकुल दयामाया दाखवू नकोस ! मास्तर इतक्यातच इथं येईल अन् आपण त्याच्याकडून कोर्टात गुदरायचा अर्ज तयार करून घेऊ. नुकसानभरपाईची रक्कम तू अगदीं माफक माग, म्हणजे स्टापासाठीं व्यर्थ पैसे खर्च व्हायला नकोत, पण आपण कारखाना पाडून टाकायची मागणी करू. बघितलंस का, ए गाढवा, दुसऱ्याच्या मालमत्तेवर अतिक्रमण करण म्हणजे काय, तर हें असं असत. तुला फारच छान लाट लागली बघ.

ल्याव बत्ती! येवढं सगळं धूड पाडायचं अगर हलवायच म्हणजे त्याला चागलाच खर्च येणार. तो तडजोड करायला येईल. मग त्या बनियाला चागला दडपायचा ह. कारखाना पाडायला, विटा मोडायला, पाया उखडायला, एकदर खर्च किती येईल याचा तपशीलवार हिशेब आपण करू! वेळेचा सुद्धा हिशेब करू, मग सागू, बनियाजी, टाका दोन हजार रूबल!"

"येवढी रक्कम तो कधींच द्यायचा नाहीं!" वाविलोव उद्गारला. तो चिंतामग्नपणें डोळ्यांची उघडझाप करीत होता. त्याच्या [illegible] चमक दिसत होती.

"अरे हट्! देईल तो ..जरा मेंदूचा उपयोग कर तुझ्या......दुसरं काय करणार तो? इमारत पाडणार? पण हे बघ, इगोर्का, तू त्या लोकाच्या हातून बनवला जाऊ नकोस ह, तुला पैसे चारायची खटपट करतील ते. स्वस्तात विक्री करून घेऊ नकोस ह. ते लोक तुला धमक्या देतील, पण आमच्यावर भिस्त ठेव तू .."

कॅप्टनचे डोळे भयकर आनदानें चमकू लागले. मनाच्या खळबळीमुळें त्याचा चेहरा लाल होऊन अस्वस्थपणें थरथरू लागला. त्यानें वाविलोवच्या लोभीपणाला खूप उत्तेजन दिलें आणि या बाबतींत ताबडतोब इलाज करण्याचें महत्त्व त्याला समजावून सागून तो अत्यत विजयी व कृतकृत्य मनानें निघून गेला.

. . . . . . .

कॅप्टननें लावलेल्या शोधाची माहिती संध्याकाळीं प्रत्येकाला सागण्यात आली. मग सारे जण पेत्यूनिकोवची तारांबळ कशी होईल याची चर्चा करू लागले. कोर्टाचा शिपाई त्याच्यावर समन्स बजावील त्या दिवशीं तो कसा रागावेल, कसा चकित होईल, याचें चित्रण सारे जण उठावदार रंगांत करू लागले. कॅप्टनला आपण मोठे पराक्रमी पुरुष आहोंत असें वाटू लागलें. तो खुषींत होता आणि त्याचे सारे दोस्त कमालीचे खुषींत आले होते. त्या काळसर व लक्तऱ्या आकृतींची भली मोठी रास अंगणात पडलेली होती आणि आपल्या आनदाचें प्रदर्शन गोंगाट करून करीत होती. ते सारे जण त्या व्यापारी पेत्यूनिकोवला ओळखत होते. तो रोज त्याच्या वस्तीवरून जात असे. त्या वेळीं तो तिरस्कारानें डोळे अर्धवट

मिटून घेई आणि रस्त्यातल्या इतर कचऱ्याकडे तो जितकें लक्ष देई त्यापेक्षा अधिक लक्ष तो त्याच्याकडे मुळींच देत नसे. त्याच्या रोमरोमांत तृप्ती भरलेली दिसे आणि यामुळें तर त्याना त्याची जास्त चीड येई त्याच्या वरचढपणाची चकाकी त्याच्या बुटामध्यें सुद्धा दिसून येई, आणि आता त्याच्यापैकींच एकानें त्याच्या श्रीमतीला आणि दिमाखाला एक जोराचा टोला लगावला होता ! मग त्याना आनद होणें साहजिकच नव्हतें का ? त्या सर्वांनाच खाऊन पिऊन सुखी व चागले कपडे केलेल्या लोकाविषयीं एक प्रकारचा अबोध, मोघम पण तीव्र वैरभाव वाटत असे.

पुढें काय काय बनाव घडतात याची वाट पाहात त्या शयनगृहातील भाडेकरूनी पधरा दिवस काढले. पण त्या मुदतींत पेत्यूनिकोव त्या इमारतीकडे एकादाहि फिरकला नाहीं. तो गावात नसून अजून त्याला समन्स मिळालेंच नव्हतें अशी बातमी सगळीकडे पसरली. दिवाणी कोर्टाच्या या दिरगाईवर कॅप्टन खूप चिडला. या अनवाणी टोळीनें इतक्या एकाग्र उतावळीनें त्या व्यापाऱ्याची वाट पाहिली कीं तशी त्याची वाट कुणीहि कधींहि पाहिली नसेल.

" सखया रे ? यायचा विचार तुझ्या स्वप्नींहि नाहीं ना ! सखा रुसला मजवरी ! " डीकन तारास हातावर हनुवटी टेकून टेकडीकडे उपहासगर्भ दुःखी नजरेनें पाहात गाणें म्हणू लागे.

अखेर एका सध्याकाळीं पेत्यूनिकोवची स्वारी उगवली तो ऐटबाज टाग्यातून आला. टागा हाकावयाला त्याचा मुलगा बसलेला होता. मुलाचे गाल लाल होते; त्याच्या अंगात चेकचा लाब ओव्हरकोट होता; त्यानें काळा चष्मा घातलेला होता. बापलेकानी घोडा पराचीच्या एका खाबाला बाधला, मुलानें खिशातून टेप काढून बापाच्या हातीं दिली आणि ते जमिनीचें माप घेऊ लागले. दोघेहि स्तब्ध होते आणि आपल्या कामात गढून गेलेले दिसत होते.

" अहूहा ! " कॅप्टन रगात येऊन ओरडला.

त्या वेळेला त्या शयनगृहात हजर असलेले सारे भाडेकरू तो प्रकार पाहावयाला फाटकाशीं आले आणि या प्रकरणातलीं आपापलीं मतें मोठमोठ्यानें सागू लागले.

"चोरी करायची संवय विचित्र असते खरीच. चोरी करायचा हेतु नसताहि माणसाच्या हातून चोरी होते अन् अज्ञान तो मिळालेल्यापेक्षां जास्त घालवून बसतो." कॅप्टनच्या या उद्गारानीं त्याच्या परिवारात खूप हशा पिकला आणि संमति दर्शविण्यासाठीं अनेकानीं अनेक प्रकारचे आवाज काढले.

या कुचेष्टा ऐकून ऐकून अखेरीस पेत्यूनिकोव चिडला आणि कॅप्टनला ओरडून म्हणाला—"ए सैतान ! सभाळ ह. नाहीं तर तुझ्या या बोलण्या-बद्दल तुला पोलिस कोर्टात खेचीन मी !"

"साक्षीदाराशिवाय तुला काहीं एक करता यायच नाहीं...तुझ्या मुलाला तुझ्या बाजून साक्ष देता यायची नाहीं .." कॅप्टननें त्याला बजावलें.

"तरी पण नीट संभाळून रहा ह, ए बुड्ढा दळभद्या ! एखाद दिवशीं तुझी पण योग्य ती संभावना होईलच होईल." पेत्यूनिकोवनें मूठ वळून त्याला दाखविली. त्याचा मुलगा मात्र शातपणें गणित करण्यात गढून गेलेला होता. या कगालाच्या जमावाला पेत्यूनिकोवच्या फजीतींत भर घालताना येवढा आसुरी आनद होत होता, पण मुलानें तिकडे मुळीं लक्षच दिलें नाहीं. त्यानें त्या बाजूला एकदा सुद्धा पाहिलें नाहीं.

"या तरण्या कोळ्याचा स्वतःच्या मनावर चागलाच ताबा आहे हं", तरुण पेत्यूनिकोवची प्रत्येक हालचाल आणि कृती बारकाईनें पाहात हाडपोत्या म्हणाला.

आपल्याला हवीं होतीं तीं सारीं मापे घेतल्यावर पेत्यूनिकोवनें मुकाट्यानें कपाळाला आठ्या घातल्या, आणि टाग्यात बसून रस्ता सुधारला. त्याचा मुलगा रुबाबात चालत वाविलोवच्या गुत्त्यात गेला आणि दाराआड दिसेनासा झाला.

"हाः हाः ! अरे हा तर अट्टल जवान चोर दिसतोय !···...आतां पुढं काय प्रकार घडणार कोण जाणे......?" कॅप्टननें विचारलें.

"पुढ ? पेत्यूनिकोवचा हा पोरगा वाविलोवला पैसे चारून आपल्याकडे वळवून घेणार." हाडपोत्या म्हणाला. त्याच्या चलाख चेहऱ्यावर ठामपणाचा भाव दिसत होता. आणि त्यानें आपल्या ओठांची मचमच केली; ही कल्पना त्याला जशी कांहीं गोड लागली असावी.

"अन् याबद्दल तुला आनंद होतोय, होय ना?" कॅप्टननें त्याला गंभीरपणें विचारलें.

"माणसाचे बेत फिसकटलेले पाहून मला नेहमींच आनंद होतो," हाडपोत्या म्हणाला. त्यानें डोळे मिटले आणि आनंदानें हात चोळले.

कॅप्टन रागारागानें जमिनीवर थुंकला आणि स्तब्ध झाला. सारे जण त्या चंद्रमौळी घरासमोर उभे राहून गुत्त्याच्या दरवाजाकडे मुकाट्यानें पाहात होते. असा एक तासाहून जास्त वेळ गेला. मग दरवाजा उघडला आणि तरुण पेत्यूनिकोव जितक्या शांत वृत्तीनें आंत गेलेला होता तितक्याच शांत वृत्तीनें बाहेर आला तो एक क्षणभर थांबला, खोकला, त्यानें कोटाची कॉलर वर केली, त्याच्या साऱ्या हालचालींवर नजर ठेवून उभ्या असलेल्या त्या मंडळीकडे त्यानें पाहिलें, आणि मग तो गावाकडे जाणाऱ्या रस्त्यानें चालू लागला.

कॅप्टननें त्याच्याकडे एक क्षणभर पाहिलें आणि संतप्त चर्या करून हाडपोत्याला म्हटलें:

"ए, विंचू अन् गोमेची भेसळ अवलाद! तुझं म्हणणंच बरोबर दिसतंय हं एकंदरींत! तुला प्रत्येक वाईट गोष्टीचा आगाऊ वास येतो जणू! बरोबर आहे, त्या लफंग्या पोऱ्याला हवं तें मिळालं असणार हें त्याचा चेहराच सांगत होता . . याच्याकडून वाविलोवला किती मिळाले असतील कोण जाणे. त्यानं थोडेफार पैसे हे घेतले असणारच......तोहि त्याच्याच जातीचा लफंगा आहे लेकाचा......त्याची सारी व्यवस्था मी करून द्यायची अन् त्यानं हें असं करायचं! आपला मूर्खपणा आपल्या लक्षांत येणं कठीणच असतं एकंदरींत......खरं आहे, भाई हो, जीवनच आम्हा साऱ्या दुःखी लोकांवर उलटलंय बघा... ...आपल्या भाईबंदावर आपण थुंकायला जावं तर ती थुंकीसुद्धा उलटून आपल्याच तोंडावर उडते."

या विचारानें स्वतःचें समाधान करून घेऊन कॅप्टन महाशयांनीं आपल्या परिवारावर नजर टाकली. पेत्यूनिकोव व वाविलोव यांच्या दरम्यान कांहीं तरी तडजोड झाली असणार हें ठाऊक असल्यामुळें सारे जण निराश झालेले होते. आपण कुणाचें कांहीं भलें करावयाला गेलों आणि त्यांत आपल्याला अपेश आलें तर त्याच्या जाणिवेचें आपल्याला एक

प्रकारचें लांछन वाटतें. पण याहि पेक्षा जास्त लांछन कुणाचें कांहीं वाईट करण्यातील अपेशाच्या जाणिवेचें वाटतें, कारण कुणाचें काहीं वाईट करणें ही जास्त सहज करता येण्याजोगी व जास्त सोपी गोष्ट असते.

"ठीक, आता आपण इथ कशाला घुटमळतों आहोंत ? आता आपल्याला खोळबून राहण्याजोग काहींच राहिलेल नाहीं .. वाविलोवकडून बक्षिशी वसूल करायची तेवढी राहिली आहे . " गुत्त्याकडे उदासपणें पाहात कॅप्टन म्हणाला. "या व्यापाऱ्याच्या घरातल आमच निवात जीवन आता संपलच म्हणायचं. हा आतां आपल्याला हाकलून देणार .. माझ्यावर सोंपविलेल्या क्रातिकारकाना ही आगाऊ सूचना देतोंय मी."

'वाईट शेवट' म्लानपणें गालातल्या गालात हसला.

"ए जेलर, तू हसतोयस कशाकडे पाहून ?" कॅप्टननें विचारलें.

"मग मी कुठ जाणार ?"

"ए माझ्या सोन्या, याची काळजी तू नको करूस, नशीब लावील याचा काय निकाल लावायचा तो." कॅप्टन विचारमग्नपणें शयनगृहात जाताना म्हणाला. "एका काळीं माणसे असलेले ते प्राणी" आळसटपणें त्याच्या मागोमाग घरात गेले.

"आपल्याला आता आणीबाणीच्या क्षणाची वाट पाहात बसण्या-पलीकडे काहीं एक करता यायच नाहीं." या मडळींच्या घोळक्यात चालता चालता कॅप्टन म्हणाला. "यानी आपल्याला हाकलून दिल्यावर आपण एक नवा आसरा आपल्यासाठीं शोधून काढू. पण त्याचा विचार आता करून आपल्या जिवाची तारांबळ करून घेण्यात काहींच अर्थ नाहीं. ......अरिष्टाच्या प्रसंगीं माणसाला उत्साह येतो.. अन् जीवन हें सारच्या सारच अरिष्टमय असेल अन् त्यातल्या क्षणोंक्षणीं जर आपल्याला आपल्या जिवाचा थरकाप करून घेण भागच असेल तर . तर जीवन जास्तच मजेदार होईल अन् माणसं आता आहेत त्याच्यापेक्षा जास्त गमतीदार होतील !"

"म्हणजे माणसं एकमेकाचे गळे जास्त दुष्टपणान कापतील, असंच की नाहीं !" हाडपोत्यानें गालातल्या गालात हसत खुलासा केला.

" मग, त्यात काय झाल ? " कॅप्टन तावातावानें उद्गारला. आपल्या विचाराचा असा खुलासा केलेला ऐकून घेणे त्याला आवडलें नाहीं.

" ऊः ! काहीं नाहीं हो, बरोबर आहे तुमच म्हणण. आपल्याला कुठहि लवकर जायच असल म्हणजे आपण घोड्याना चाबकाचे फटके लगावतोंच, इजनातला विस्तव चाळवतोंच..."

" जाऊ दे, सार शक्य तितक्या लवकर खड्डयात जाऊ दे. धरणीचा जर एकदम स्फोट झाला, अगर ती जळून खाक झाली अगर तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या, अन् बाकी साऱ्याचा नाश बघायला मला एकटाच शेवटीं शिल्लक राहता आल, तर मला आनदच होईल..."

" राक्षसी प्राणी आहात तुम्ही ! " हाडपोत्या सस्मितपणे म्हणाला.

" मग, त्यात काय झाल ?...एका काळीं होतों मी माणूस......आता मी माणसातन उठलोंय.. याचा अर्थ असा कीं मला कसलींच बधन अगर कर्तव्य राहिलेलीं नाहींत. म्हणजे साऱ्या गोष्टींवर थुकायची मला मुभा आहे. माझ्या सध्याच्या जीवनाच स्वरूपच असं आहे कीं त्याच्यामुळ माझ्या पूर्वीच्या जीवनाला तिलाजलीच मिळते..... खाऊन पिऊन सुखी व नीटनेटके कपडे घालणाऱ्या लोकाशीं कसल्याहि प्रकारचा सबध ठेवण मी वर्ज्यच करायला पाहिजे, कारण खाण्यापिण्याच्या व कपड्यालत्त्याच्या बाबतींत मी याच्या तोलाचा नाहीं म्हणून हे लोक मला तुच्छ लेखतात. मी माझ्या ठिकाणीं कसली तरी नवी प्रवृत्ति निर्माण केली पाहिजे, समजल का तुला ? अशी प्रवृत्ति निर्माण केली पाहिजे कीं तिच्या योगान जुडाज पेत्यूनिकोवसारखे जे लोक जीवनाची व्यवस्था पाहण्यात दग झालेले असतात त्याच्या पोटात, माझी भव्य आकृति पाहून, गोळाच उठला पाहिजे. "

" काय बेफाट बोलता हो तुम्ही ! " हाडपोत्या चेष्टेच्या स्वरात म्हणाला.

" ए किड्या ! " आणि कुवाल्डानें त्याच्याकडे तिरस्कारानें पाहिलें. " तुला काय कळत रे ? तुला काय आहे माहिती ? तुला विचार तरी करतां येतो का ? मी विचार केलाय, वाचन केलय..... अशीं पुस्तक मी वाचलीं आहेत कीं तुला त्याच्यातला एक शब्द नाहीं कळायचा. "

" अर्थात ! आपल्या बुटात सूप भरून कसं खायचं हें मी शिकलेलों

नाहींच मुळीं......पण तुम्ही वाचन केलं अन् विचार केला आणि मी यांतलं काहींच केल नाहीं, तरी पण आपण दोघेहि जवळ जवळ एकाच अवस्थेत असलेले दिसतों, होय ना ?"

"खड्डयात जा रे तू!" कुवाल्डा ओरडून म्हणाला. हाडपोत्याशीं त्याचे जे वाद होत असत त्याचा शेवट हटकून अशाच प्रकारें होत असे. मास्तर गैरहजर असला म्हणजे आपलीं बोलणीं कुणी लक्ष देऊन ऐकत नाहीं, तीं कुणाला पसंत पडत नाहींत, त्याच्या योगानें वातावरण दूषित मात्र होतें, हें तो जाणून असे, पण तरीहि त्याला बोलल्यावाचून राहवतच नसे. आता या जोडीदाराशीं भाडण झालें, त्यामुळें आपण या मडळीपासून जरा अलग पडलों असें त्याला वाटू लागलें, पण त्याची गप्पा मारावयाची तळमळ कमी होता होईना, म्हणून त्याने सिम्त्सोवकडे वळून हा प्रश्न विचारलाः "अन् काय रे ए अलेक्सी माक्सिमोविच, तुझ करड टक्कुर घेऊन कुठ जाणार तू ?"

म्हाताऱ्यानें खुर्षीत येऊन स्मित केलें, नाकावर बोट घासलें आणि उत्तर दिलें: "कुणास ठाऊक !......बघेन मी. मला काहीं फारस लागतच नाहीं, अधूनमधून थोडीशी दारू मिळाली म्हणजे झाल."

"साधसुध पण मानाच जिण आहे ह तुझ !" कॅप्टन त्याला उत्तेजन द्यावयाच्या हेतूनें म्हणाला. थोडा वेळ थाबून सिम्त्सोवनें आणखी असें सागितलें: "तुमच्यापैकीं कुणापेक्षाहि मलाच जास्त लवकर चरितार्थाचं साधन सापडेल, कारण बायाना मी फारच हवाहवासा वाटतों." हें खरेंच होतें. या म्हाताऱ्याच्या ताब्यात दोन अगर तीन वेश्या हमखास असावयाच्याच. त्या आपल्या अत्यल्प मिळकतीवर त्याला कित्येक दिवस पोसत असत. त्या त्याला कितीदा तरीं मारहाण करीत असत पण तें तो स्थितप्रज्ञपणानें सहन करीत असे. का कुणास ठाऊक, पण त्या त्याला फार जोरात मारहाण कधींच करीत नसत. कदाचित् त्याना त्याची दया येत असावी. तो स्त्रियाचा फार मोठा भोक्ता होता, आणि आपल्या सगळ्या दुर्दैवाला स्त्रियाच कारण आहेत असें तो सागत असे. स्त्रियाशीं त्याची किती घनिष्ट सलगी असे व त्याची त्याच्याविषयीं वृत्ति काय असे, हें त्याच्या कपड्यावरून दिसून येत होतें; त्याच्या

जोडीदारांच्या कपड्यांपेक्षां त्याचे कपडे जास्त ठाकठीक व स्वच्छ असत; तसेंच तो अनेकदां आजारी पडे यावरूनहि हीच गोष्ट दिसून येत होती. आणि आता, शयनगृहाच्या दरवाज्यात बसल्या बसल्या, तो आपल्या दोस्ताना आपल्या बढाया सागत होता: " अरे, किती तरी दिवसापासून रादिश मला आपल्याकडे येऊन राहायचा आग्रह करत्ये आहे. पण मीच गेलों नाहीं तिच्याकडे राहायला. कारण मला तुम्हा दोस्ताची संगत सोडायला नकोय. " त्याचें हें बोलणें त्यानीं हेवेखोर उत्सुकतेनें ऐकून घेतलें. रादिश त्या सगळयाच्या ओळखीची होती. ती जवळच डोंगराच्या पायथ्याशीं राहात होती. अनेकदा चोऱ्या केल्याबद्दल काहीं महिने तुरुगात काढून ती नुकतीच सुटलेली होती. ती पूर्वी दाईचें काम करीत असे. ती उच, भरभक्कम शेतकरीण होती. तिच्या चेहऱ्यावर देवीचे वण होते. पण तिचे डोळे दारूच्या नशेमुळें सदा धुद असूनहि मोहक दिसत असत.

" बघा कसा थेरडा सैतान दिसतोय तो ! " हाडपोत्यानें सिम्त्सोवकडे पाहता पाहता शिवी हासडली. सिम्त्सोव आत्मसंतुष्टपणे गालातल्या गालात हंसत होता.

"अन् बाया माझ्यावर फिदा का असतात हें ठाऊक आहे का तुम्हांला ? अरे, त्याच्या आत्म्याना आनद कसा द्यायचा हें मला ठाऊक आहे. "

" हें ठाऊक आहे तुला ? " कुवाल्डानें विचारलें.

" अन् त्याना माझी कींव करायला लावता येत मला....अन् बाई माणूस दया करायला लागल म्हणजे या दयेपायीं ती तुम्हाला ठार मारायला कमी करायची नाहीं...तिच्याकडे जाव, रडाव अन् आपल्याला ठार मार म्हणून तिला सांगाव...ती तुमच्यावर दया करील—अन् तुम्हाला ठारहि करील. "

" मलाच वाटतय कीं कुणाचा तरी खून करावा, " उदासपणें हसत मार्त्योनोव उद्गारला.

" कुणाचा खून करणार तूं ? " हाडपोत्यानें त्याच्यापासून दूर सरकत विचारलें.

" मला सगळे सारखेच...पेत्यूनिकोवचा...इगोर्काचा... नाहीं तर तुझा सुद्धां खून करावासा वाटतोय मला ! "

" पण कां ? " कुवाल्डानें विचारलें.

" मला सैबेरियात हद्दपारीवर जायला हवंय...या नीच जीवनाचा वीट आलाय मला...तिथ निदान तुम्हाला जसं सागतील तसं राहण तरी भाग पडत. "

" होय. खर आहे. तिथ तुम्हाला अगदीं तपशीलवार सागतातच कसं राहायच तें. " कॅप्टननें उदासपणें त्याच्या म्हणण्याला मान्यता दिली.

आता त्यानीं पेत्यूनिकोवविषयीं अगर या भाड्याच्या शयनगृहातून कालातरानें आपली हकालपट्टी होणार याविषयीं बोलणेंच बद केलें. आपल्याला लवकरच इथून जावें लागणार हें सर्वाना कळून चुकलें होतें; म्हणून या बाबतीची चर्चा करणें त्याना निरर्थक वाटू लागलें. ते कोंडाळें करून गवतावर बैठक मारून बसले होते. ते आळसटपणानें विविध गोष्टींची चर्चा करीत होते. एका विषयावरून दुसऱ्या विषयाकडे वळावयाचें, चर्चा चालू ठेवण्यासाठीं अगदीं जरूर असेल तितकेंच लक्ष मतप्रदर्शनाकडे द्यावयाचें, असा त्यांचा खाक्या होता. स्तब्ध राहण्यानेंहि फारच कटाळा येत होता, नुसतें ऐकत बसण्यानेंहि फारच कटाळा येत होता. " एका काळीं माणसें असलेल्या प्राण्याच्या " या टोळीचा एक गुण फारच छान होता—आपण इतरापेक्षा जास्त चागले आहोंत हें सिद्ध करण्यासाठीं कुणी कसलाहि प्रयत्न करीत नव्हतें, आणि असला प्रयत्न करण्यासाठीं कुणी कुणाला आग्रहहि करीत नव्हता.

ऑगस्ट महिन्याच्या उन्हांत उघड्या पाठींनिशीं व केस विस्कटलेलीं डोकीं उघडीं ठेवून ते सारे जण बसलेले होते. या उन्हामुळें त्याच्या लक्तराना ऊब मिळत होती...वनस्पति सृष्टि, खनिज सृष्टि व प्राणि सृष्टि यांची विचित्र भेळ त्यांच्या ठिकाणीं झालेली होती. अंगणाच्या कोंपऱ्यात उच बरडॉक जातीचें व इतर प्रकारचें निरुपयोगी झाडझाडोर वाढलेलें होतें व या निरुपयोगी लोकांच्या गटाला त्याच्यापासूनच दृष्टिसुख लाभत होतें.

. . . . . . .

वाविलोवच्या हॉटेलांत पुढील प्रसंग घडला :

तरुण पेत्यूनिकोव कसलीहि घाई न करतां आंत गेला, त्यानें आरामांत आपली करड्या रंगाची टोपी काढून बैतली, तुच्छता दर्शविणाऱ्या नजरेनें

सभोंवार पाहिलें, आणि त्याचें स्वागत करण्यासाठीं लाचारपणें व स्मितमुखानें पुढें आलेल्या हॉटेल-मालकाला विचारलें :

" इगोर तेरेन्तियेविच वाविलोव ? तुम्हीच का ते ?"

" होय. तोच मी." सार्जंट उत्तरला. त्यानें दोन्ही हाताचा भार कठड्यावर अशा रीतीनें टाकलेला होता कीं तो जणू काय पलीकडे उडी मारावयाच्या तयारींतच आहे असें वाटत होतें.

" माझं तुमच्याशीं जरास काम आहे," पेत्यूनिकोव म्हणाला.

" आनदाची गोष्ट. या इकडून असे माझ्या नैठकीच्या खोलीत या ना."

दोघेजण आत गेले आणि बसले. पाहुणा गोल टेबलासमोरच्या मेणकापडी कोचावर बसला, आणि यजमान त्याच्या समोरच्या खुर्चीवर बसला. एका कोंपऱ्यात एका प्रचड देवमूर्तीसमोर एक दिवा जळत होता—त्याच्या आजूबाजूच्या भिंतीवर आणखी देवमूर्ति लटकावलेल्या होत्या. त्याच्या चादीच्या फ्रेमी उत्तम रीतीनें पॉलिश केलेल्या असून नव्यासारख्या चकचकत होत्या. खोलींत ट्रंकाची व जुन्या फालतू फर्निचरची खूपच गर्दी झालेली होती आणि तींत तबाखू, आंबलेली कोबी व ऑलिव्ह तेल याचा दर्प सुटलेला होता. पेत्यूनिकोवनें तोंड वेडेंवाकडें करून सभोंवार नजर टाकली. वाविलोवनें वर मान करून एक सुस्कारा सोडून देवमूर्तीकडे पाहिलें, आणि मग दोघानीं एकमेकाना निरखून पाहिलें, आणि दोघाचेंहि मत एकमेकाविषयीं अनुकूल झालेलें दिसलें. पेत्यूनिकोवला वाविलोवचे प्राजळ भामटेपणा दर्शविणारे डोळे आवडले, आणि वाविलोवला पेत्यूनिकोवचा खुला, निर्विकार, निश्चयी चेहरा व त्याच्या गालाचीं रुद हाडें व शुभ्र दात आवडले.

" मी तुम्हाला काय सागणार आहे याची तुम्हाला अटकळ असेल असं मी धरून चालतों," पेत्यूनिकोवनें सुरवात केली.

" फिर्याद ?...मी गृहीत धरतों ?" माजी सार्जंट आदरभावानें उद्गारला.

" अगदीं बरोबर ! तुम्ही आडवळणान न जाता सरळ माणसासारखे सरळ मुद्याशीं गांठ घालता आहात याचा मला आनद वाटतोय," पेत्यूनिकोव त्याला उत्तेजन देत म्हणाला.

" मी आहें शिपाईगडी," वाविलोव नम्रपणा दर्शवीत उत्तरला.

" तें तर उघडच दिसतय. अन् आपल्याला विशेष त्रास न होतां चटकन हें प्रकरण मिटवून टाकता येईल अशी मला खात्री वाटते. "

" बरोबर बोललात. "

" छान ! कायदा आहे तुमच्या बाजूला, आणि खटला अर्थात् तुम्हीच जिंकाल. मला हें तुम्हाला सुरवातीलाच सागून ठेवायचय. "

" याबद्दल आभारी आहें मी तुमचा, " आपल्या डोळ्यातलें हसू लपवावयासाठीं सार्जंट डोळे मिचमिचे करीत म्हणाला.

" पण मला तुम्ही हें सागा कीं तुमच्या भावी शेजाऱ्याची ओळख तुम्हाला अशा कठोर मार्गानं, कोर्टामार्फत, का करून घ्यावी लागली ? "

वाविलोवनें आपले खादे उडविले आणि उत्तरच दिलें नाहीं.

" यापेक्षा सरळ आमच्याकडे यायच आणि समजुतीनं हें प्रकरण मिटवून टाकायच, हें जास्त चागल नसत का झालं ? अं ! तुम्हाला काय वाटत ? "

" तें अर्थात् जास्त चागल झालच असत म्हणा, पण त्याच असं झाल, त्यात एक भानगड आहे.... . मी स्वतःच्या विचारान चाललों नव्हतों, इतराच्या सल्ल्यान चाललों होतों मी..... मागाहून मला कळून आल कीं मी जर .. ..तेंच जास्त बर झाल असत. पण मग वेळ निघून गेली होती. "

" अस्सं ! म्हणजे या बाबतींत कुणा वकिलान सल्ला दिला तुम्हाला ? "

" तशाच प्रकारच्या कुणा तरी माणसान. "

" अस्सं ! हें प्रकरण समजुतीन मिटवायची तुमची खरोखरीच इच्छा आहे का ? "

" अगदीं मनापासून ! " हा शिपाईगडी उद्गारला.

पेत्यूनिकोव क्षणभर स्तब्ध राहिला, मग त्यानें त्याच्याकडे पाहिलें, आणि एकदम निर्विकार व रुक्ष वृत्तीनें विचारलें :

" अन् अस तुम्हाला का करायला हवय ? "

असल्या प्रश्नाची अपेक्षा वाविलोवनें केलेली नव्हती, आणि म्हणून याचें उत्तर त्याच्याजवळ तयार नव्हतें. त्याच्या मतें हा प्रश्न त्या परिस्थितींत

अगदींच निरर्थक होता, म्हणून तरुण पेत्यूनिकोवकडे पाहून तो हसला, आपण याच्यापेक्षां चागलेच वरचढ आहोंत असे त्याला वाटलें.

" तें समजायला फारच सोप आहे. माणसानीं एकमेकाशीं गुण्यागोविंदानं राहायचा प्रयत्न करावा."

" छे छे !" पेत्यूनिकोवनें त्याला मध्येंच अडविलें, " हें याच नक्की कारण नव्हे. आमच्याशीं तुम्हाला मिळत घ्यावस का वाटत हें स्पष्ट रीतीन तुमच्या लक्ष्यात येत नाहीं अस मला तरी दिसतय ...मी सागतों तुम्हाला याच कारण."

त्या शिपाईगड्याला याचें जरा नवलच वाटलें. हा येवढासा पोऱ्या, याच्या अगात चेकचा सूट, त्यामुळें हा जरासा हास्यास्पदच दिसतो, आणि हा बोलतो मात्र असा कीं हा जणू काय इतिहासप्रसिद्ध कर्नल राक्षिनच आहे! या कर्नलची ख्याति अशी होती की ज्या ज्या वेळीं तो रागावे, त्या त्या प्रत्येक वेळीं तो सैनिकाचे तीन तीन दात पाडत असे.

" तुम्हाला आमच्याशीं मिळत घ्यावसं वाटत याच कारण असं कीं आम्ही तुमचे किती तरी उपयुक्त शेजारी होणार आहोंत.... कारण आमच्या कारखान्यात कमींत कमी दीडशें कामगार तरी कामावर असणार आणि कालातरान त्याची संख्या अर्थांतच आणखीहि वाढणार. यातलीं शभर माणसं जर आठवड्याचा पगार घेतल्यावर तुमच्या गुत्त्यात येऊन एकेक ग्लास पेय पिऊ लागली तर हल्लींपेक्षा तुमची विक्री दरमहा चारशें ग्लासानीं वाढेल. हा अर्थात् कमींत कमी अंदाज आहे. आणि शिवाय तुमची खानावळ आहेच. तुम्ही काहीं अननुभवी बावळट इसम नाहीं, आणि आमचा शेजार तुम्हाला किती फायदेशीर होईल हें तुमच तुम्हाला समजून घेता येत."

" खर आहे," वाविलोवनें मान डोलवली, " मी तें जाणून आहे "

" अच्छा. मग काय ?" या व्यापाऱ्यानें त्याला मोठ्यानें ओरडून विचारलें.

" काहीं नाहीं......आपण समेट करू या !"

" तुम्ही हें इतक्या लवकर ठरवलत हें बरंच झालं. हा पहा, माझ्या वडिलावर काढलेल समन्स रद्द करायसाठीं कोर्टांत दाखल करायचा अर्ज मी तयार करूनच आणलाय. हा वाचा, आणि याच्यावर सही करा."

वाविलोवनें पाहुण्याकडे आपल्या गोल गोल डोळ्यानीं पाहिलें, आणि तो दचकला; जणू काय त्याला कांहीं तरी भलताच संशय आला असावासें दिसलें.

" माफ करा ह......सही करायची ? ती कशी काय ? "

" अगदींच साध काम......नुसत तुमच स्वतःच नाव अन् आडनाव लिहा, जास्त काहींच नाहीं त्यात. " पेत्यूनिकोवनें सहीची जागा उपकार-बुद्धीनें बोटानें दर्शवीत खुलासा केला.

" अहो, तो प्रश्न नाहीं......माझ्या जमिनीसाठीं मला मिळायच्या नुकसानभरपाईबद्दल म्हणत होतों मी. "

" पण या जमिनीचा आम्हाला काहींच उपयोग नाहीं, " पेत्यूनिकोव शांतपणें म्हणाला.

" पण किती झाल तरी ती माझीच जमीन आहे ना ! " शिपाईगडी उद्गारला.

" अर्थात् ; अन् तिच्याबद्दल तुम्हाला रक्कम किती हवी ? "

" अहो, फिर्यादींत सांगितली आहे तेवढी तर खरी", वाविलोव अडखळत म्हणाला.

" सहाशें ! " आणि पेत्यूनिकोवनें ओझरतें स्मित केलें. " तुम्ही गमतीदार माणूस आहात ह ! "

" कायदा माझ्या बाजूचा आहे . मला दोन हजाराची सुद्धा मागणी करता येईल. तुम्ही इमारत पाडून टाकली पाहिजे असा आग्रह मला धरता येईल...आणि तशी मला सक्तीहि करता येइल. म्हणून तर माझी मागणी अल्पच म्हटली पाहिजे. तुम्ही ती इमारत पाडून टाकली पाहिजे असा माझा दावा आहे ! "

" ठीक आहे, करा तसा दावा. बहुधा आम्ही तसंच करू...तीन वर्षांनतर, तुम्हाला कोर्टकचेरीचा खूप भूर्दंड भरायला लावल्यावर मग आम्ही करू तें. आणि हें देण भागविल्यावर आम्हीच आमचा स्वतःचा गुत्ता इथ चालू करू, तुमच्यापेक्षा किती तरी जास्त चांगला चालवू आम्ही तो, आणि मग तुमच वाटोळ होईल.....पोल्तावाच्या लढाईत स्वीडिश फौजेचा जसा रशियनानीं धुव्वा उडविला, तसा आम्ही धुव्वा उडवूं

तुमचा. आम्हीं तुमचा धुव्वा उडवायचा पक्का बंदोबस्त करूं...त्याची आम्ही पक्की तरतूद करू, त्याबद्दल तुमची खात्री असूं द्या."

इगोर तेरेन्त्येविचनें दातओठ खात पाहुण्याकडे पाहिलें आणि आपलें नशीब याच्या हातात आहे हें त्याला जाणवलें. चेकचा सूट घातलेल्या या शात, निर्घृण व्यक्तीशीं आपली गाठ आहे हें पाहून वाविलोवला स्वत:चीच चीड आली.

" तुम्ही आमचे अगदीं जवळचे शेजारी. आमच्याशीं गोडीगुलाबीन राहून तुमचा बराच फायदा झाला असता, आणि आम्हीहि तुमच भल करायसाठीं प्रयत्नाची शिकस्त केली असती. उदाहरणार्थ, मी या घटकेलाच तुम्हाला सुचवतों की तुम्ही तबाखू, रोटी, आगपेट्या, फळ वगैरे विकायसाठीं एक लहानसं दुकान खोला .या साऱ्या गोष्टीना नक्कीच भरपूर मागणी आहे."

वाविलोव ऐकत राहिला आणि त्याची बुद्धी चलाख असल्यामुळें त्याला हें कळून चुकलें कीं शत्रूच्या औदार्यावर स्वत:चें भवितव्य सोंपवून देणें हाच या बाबतींत जास्त चागला मार्ग आहे. हें धोरण वास्तविक आपण सुरवातीपासूनच ठेवावयास पाहिजे होतें असेहि त्याला वाटू लागलें आता इतर कोणत्याहि मार्गानें सुटका होत नाहीं अशी खात्री झाल्यावर हा शिपाईगडी कुवाल्डाला शिव्या देऊ लागला.

" दारुड्या बदमाष लेकाचा! साल्याच तळपट होवो! सैतान तुझा नायनाट करो!"

" फिर्याद लिहून देणाऱ्या वकिलाबद्दल म्हणतांय होय तुम्ही हें?" पेत्यूनिकोवनें शातपणें विचारलें. आणि एक सुस्कारा सोडून त्यानें सागितलं:
" त्यान तुम्हाला चागलच गोत्यांत अडकवल असत याबद्दल मला तर मुळींच शका वाटत नाहीं. .आम्ही तुमच्यावर दया केली म्हणून बचावलात तुम्ही."

" अर्र्र!" आणि या त्रासलेल्या शिपाईगड्यानें आपला हात उच केला. " या भानगडींत दोघे लोक आहेत....एकान याचा पत्ता लावला अन् दुसऱ्यान फिर्याद लिहिली. पाजी रिपोर्टर लेकाचा!"

" रिपोर्टरला का हो शिव्या?"

" अहो तो वर्तमानपत्रातून लिहितो. ..तुमचा भाडेकरू आहे तो....

नीच कीटक आहेत लेकाचे....देवाच्यान् , त्याना हांकलून लावा इथून ! लुटारू ! रस्त्यातल्या प्रत्येक माणसाला भडकावीत असतात एकसारखे ! त्याच्या संगतींत राहायची सोयच नाहीं....सारे एकजात बेफाम आहेत लेकाचे......त्याच्यापासून सावधच राहाव लागत, नाहीं तर ते लुटायला अगर आग लावायला कमी नाहीं करायचे "

" अन् हा रिपोर्टर कोण आहे हो ? " पेत्यूनिकोवनें उत्सुकपणें विचारलें:

" तो ? आहे एक दारुडा. पूर्वी तो मास्तर होता, पण त्या धंद्यांतून त्याची हकालपट्टी झाली, दारू पिऊन पिऊन सत्यानाश करून घेतलाय त्यान ..आतां तो वर्तमानपत्रात लिहितो आणि लोकाना अर्ज तयार करून देतो. लफंगा आहे लेकाचा. "

" हं ! अन् त्यानच तुमची फिर्यादहि लिहून दिली ? अस्सं, अस्सं. इमारतींतले दोष त्यानच काढले म्हणायचे. पराच मजबूत नव्हती म्हणे, का आणखी काय बर लिहिल होत त्यान ? "

" त्यानच लिहिलय तें ! मला ठाऊक आहे पक्क ! कुत्रा लेकाचा. या इथच त्यान तो मोठ्यान वाचून दाखवला अन् वर अशी बढाई मारली: ' आता मात्र मी पेत्यूनिकोवला थोडा तरी त्रास दिलाय असं म्हणतां येईल. ' "

" हं—हं...अच्छा, म्हणजे आता तुम्हाला हें मिटवून टाकायला हवय तर ? "

" मिटवून टाकायच ? " शिपाईगडी खालीं मान घालून विचार करू लागला. " हें जीवन म्हणजे अंधार आहे सगळा ! " डोकें खाजवीत खाजवीत संत्रस्त स्वरात तो म्हणाला.

" माणसान ज्ञानाचा उजेड मिळवावा, " पेत्यूनिकोवनें सिगरेट शिलगावीत त्याला सल्ला दिला.

" ज्ञानाचा उजेड मिळवावा ? मी त्याबद्दल नव्हतों हो म्हणत. पण जीवनांत मुळीं स्वातंत्र्यच नाहीं हें नाहीं का तुम्हाला दिसत ? मी कसे दिवस काढतोंय हें तुम्हांला दिसत नाहीं का ? मला सतत घाबरत व भीत भीत काळ काढावा लागतो.... . कसलीहि हालचाल करायच स्वातंत्र्य असणं किती तरी इष्ट असत, पण त्यालाच मी पारखा झालोंय. आणि हें असं कां ?

कारण हा नीच मास्तरडा माझ्याबद्दल वर्तमानपत्रात लिहितो....सॅनिटरी इन्स्पेक्टराना घेऊन येतात...दंड भरावे लागतात...आणि तुमचे भाडेकरू या जागेला आग लावायला अगर मला लुटून ठार करायला केव्हाहि तयारच आहेत....माझ त्याच्यापुढ काहीं चालतच नाहीं. त्याना नाहीं पोलिसाच भय, उलट तुरुगात जाण त्याना विशेष आवडत, कारण तिथ त्याना फुकट अन्न मिळत ना."

"अच्छा—तुमच आमच जमल तर आम्ही त्याना हाकलून लावायची व्यवस्था करू."

"मग तुम्ही काय तोड सुचवता?" वाविलोवनें उदासपणें व तिरसटपणें विचारलें.

"तुमच्या अटी सागा ना."

"मग मी फिर्यादींत मागितली आहे तेवढी सहाशें रूबलांची रकम द्या मला."

"तुम्ही शभर रूबलावर मिटवून टाका ना!" या व्यापाऱ्यानें शातपणें, किंचित स्मित करीत, वाविलोवकडे रोंखून पाहात, विचारलें. "मी यापेक्षा एक रूबलहि जास्त देणार नाहीं......" त्यानें आणखी सागितलें.

येवढें बोलून झाल्यावर त्यानें आपला चष्मा काढला आणि त्याच्या काचा हातरुमालानें सावकाश पुसावयास सुरवात केली. वाविलोव त्याच्याकडे हताशपणे पण त्याचबरोबर आदरभावानेंहि पाहात राहिला. पेत्यूनिकोवचा प्रशात चेहरा, त्याचे टपोरे करडे डोळे, त्याच्या गालाचीं मोठीं हाडें, त्याच्या तगड्या देहाची प्रत्येक रेषान् रेषा आत्मविश्वास व मनाची समतोल वृत्ति दर्शवीत होती. पेत्यूनिकोवची सरळ व मित्रभावानें बोलण्याची ढब, आपल्याला जणू स्वतःच्या बरोबरीचा समजून, कसलीहि आढ्यता न दाखवता आपल्याशीं त्याचें वागणें, वाविलोवला आवडलें. मात्र आपण केवळ शिपाईगडी आहोंत, पेत्यूनिकोव आपल्यापेक्षा वरचढ आहे, हें वाविलोवला चागलेंच समजून चुकलें. त्याच्याकडे जवळ जवळ कौतुक करायच्या भावनेने पाहता पाहता वाविलोवच्या मनात एकदम कुतूहल जागृत झालें, आणि चालू विषयाचा क्षणभर विसरच पडल्यासारखे होऊन त्याने पेत्यूनिकोवला आदरानें विचारलें:

" तुम्ही शिकलात कुठ हो ? "

" टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयूटमध्यें. का ? " पेत्यूनिकोव गालांतल्या गालात हसत उत्तरला.

" काहीं नाहीं. उगीच आपल .. ..माफ करा ह मला ! " शिपाई-गड्यानें खालीं मान घातली, आणि मग इसाळयानें व आनदानें तो उद्गारला : " अहाहा ! शिक्षण ही किती छान गोष्ट असते ! विज्ञान म्हणजे उजेडच ! उलटपक्षीं आम्ही भिकारडे लोक म्हणजे उन्हात वावरणाऱ्या घुबडाची बरोबरी करणारे बावळट आहोंत......साहेब, आपण हें प्रकरण मिटवूनच टाकू या. "

काहीं तरी ठाम निश्चय केल्यासारखे दर्शवीत त्यानें आपला हात पेत्यूनिकोवच्या पुढे धरून सागितलें :

" अच्छा, पाचशें देता ? "

" इगोर तेरेन्त्येविच, शभर रूबलापेक्षा जास्त नाहीं परवडायचे. "

आपल्याला जास्त पैसे देता येणार नाहींत याबद्दल जणू खेद दर्शवायसाठीं पेत्यूनिकोवनें खादे उडविले आणि आपल्या प्रशस्त गोऱ्या तळहातात त्या शिपाईगड्याचा केसाळ हात धरून ठेवला. शिपाईगड्यानें एकदम माघार घेऊन पेत्यूनिकोवचें सगळें म्हणणें तिथल्या तिथें मान्य केल्यामुळे दोघानीं हें प्रकरण लवकरच निकालात काढलें. पेत्यूनिकोवनें आपला मुद्दा मुळींच सोडला नाहीं, आणि वाविलोवनें शभर रूबल घेतल्यानतर अर्जावर सही केली आणि टेबलावर टाक फेकून देऊन वैतागानें म्हटलें :

" आता ते मवाली माझी चागलीच कावड काढतील ! सैतान साले ! मला हसतील ते, अन् माझी छीः थूः करतील ! "

"मी तुमची सगळी मागणी पुरी केली असंच सागा ना तुम्ही त्याना !" पेत्यूनिकोवनें सूचना केली. तो शातपणें धुराचीं वेटोळीं सोडून तीं वर तरंगत जात असताना त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहात बसला होता.

" पण माझ म्हणण त्याना खरं वाटेल असं वाटत तुम्हाला ? तेहि जास्त नसले तरी निदान तितकेच चलाख लफगे आहेत . ..."

वाविलोवनें ही तुलना वेळींच आखडती घेतली, आणि त्या व्यापाऱ्याच्या मुलाकडे चिंताग्रस्त नजरेनें पाहिलें. पाहुण्याचें धूम्रपान

चालू होतें आणि त्यातच तो दंग झालेला दिसत होता. तो क्वचितच निघून गेला. त्या उघड्यावरच्या मवाल्याचा अड्डा हुडकून काढण्याचें अभिवचन तो जाताना देऊन गेला. तो पाठमोरा झाल्यावर वाविलोवची नजर त्याच्याकडे लागली. वाविलोवनें एक सुस्कारा सोडला. साचलेल्या डबक्यांनीं व कचऱ्याच्या ढिगानीं भरलेली रस्त्याची खडी चढण तो तरुण खंबीर पावलानीं चढत होता. त्याचा भयंकर अपमान करणारा काहीं तरी उद्गार काढून त्याच्यावर आपण मोठमोठ्यानें ओरडलों तर काय बहार होईल अशी चुटपुटच जणू त्या वेळीं वाविलोवला लागलेली होती.

संध्याकाळीं कॅप्टन गुत्त्यात उगवला. त्याच्या भुवया कठोरपणा दर्शविण्यासाठीं आकुंचित झालेल्या होत्या आणि त्यानें आपली उजवी मूठ घट्ट मिटलेली होती. वाविलोवनें त्याच्याकडे पाहून अपराधी वृत्तीनें स्मित केलें.

"काय रे ? जुडाज आणि केन याचा लायक वारसदार, सांग बर आम्हाला ....."

"ठरलय सगळ...." वाविलोव सुस्कारा सोडून खालीं पाहात म्हणाला.

"त्याबद्दल मला शंकाच नाहीं रे, चांदीचीं किती नाणीं मिळालीं रे तुला ?"

"चारशें रूबल..."

"खोटं बोलतो आहेस, अर्थात्.. पण मला बरच आहे हें. हें बघ, इगोर्का, आता एक शब्दहि जास्त न बोलता मला माझे दहा टक्के टाक मी शोध लावल्याबद्दल, फिर्याद लिहायची लिहिणावळ म्हणून मास्तराला दे २५ रूबल, आम्हा सगळ्यांना मिळून एक बकेट वोडका दारू दे आणि त्याचबरोबर सर्वांना फराळाच. आता पैसे दे मला आणि वोडका व फराळाचे जिन्नस आठ वाजेपर्यंत दिलेस तरी चालतील."

वाविलोव हिरवा निळा होऊन डोळे विस्फारून कुवाल्डाकडे टकमका बघतच राहिला.

"ही शुद्ध बनवाबनवी आहे ! दरवडेखोरी आहे ही ! मी यातलं काहीं एक करणार नाहीं. अहो आरिस्तीद फोमिच्, तुमचा बेत तरी काय आहे ? तुमची भूक पुढच्या मेजवानीसाठीं राखून ठेवा ! तेंच पसंत आहे मला ! आता मला तुमचं भय नाहीं राहिलेलं ! मी..."

कुवाल्डानें वडाळाकडे पाहिलें.

" इगोर्का, तुझ्या या बाष्कळ बडबडीसाठीं मी तुला दहा मिनिट देतों. तेवढ्या अवधींत तुझं हे मूर्ख व्याख्यान संपव, आणि मी काय मागतोंय तें देऊन टाक. तू जर तें दिलं नाहींस तर मी तुझा निकाल लावलाच म्हणून समज ! ' वाईट शेवटान ' तुला काहीं विकत दिलय का ? वासोवकडे झालेल्या चोरीची हकीकत पेपरात वाचलीस का ? समजल का तुला ? तुला कसलीहि लपवालपवी करायला आम्ही सवडच मिळू देणार नाहीं, त्याचा आम्ही बंदोबस्त करू . अन् आजच रात्रीं ... समजल तुला ? "

" आरिस्तीद फोमिच, असे कठोर होऊ नका हो ! " सार्जंट खालीं मान घालून हुदके देत म्हणाला.

" जास्त बडबड नको ! तुला समजल, का नाहीं समजल ? "

उंच, करड्या केसाचा, रुबाबदार, कठोर कुवाल्डा कुजबुजत्या स्वरात बोलत होता, आणि त्याचा घोगरा पसरट आवाज त्या रिकाम्या घरातून उग्र स्वरात निनादत होता वाविलोवला त्याची नेहमींच भीति वाटत असे— तो एक माजी सैनिक होता म्हणूनच नव्हे, तर गमावण्यासारखे जवळ काहींच नसलेला असा तो माणूस होता म्हणूनहि त्याची त्याला भीति बसलेली होती. पण या वेळीं कुवाल्डा त्याच्यासमोर नव्या भूमिकेत उभा होता. त्याचे बोलणें आज नेहमींसारखे ऐसपैस व विनोदी नव्हतें. आज तो हुकुमी आवाजात बोलत होता, आणि आपला हुकुम पाळला जाणार आहे ही खात्री त्याच्या आवाजात प्रत्ययाला येत होती. आणि त्याची धमकी पोकळ नव्हती. आणि कॅप्टनला आपलें वाटोळें करायचें सामर्थ्य आहे आणि तें तो अत्यंत आनंदानें करील असे वाविलोवला तर वाटतच होतें. या सामर्थ्यापुढें आपण वाकलेंच पाहिजे हें तो जाणून होता. तरीहि संतापानें जळफळत या शिपाईगड्यानें एक अखेरचा निर्वाणीचा प्रयत्न करायचें ठरविलेंच. त्यानें एक खोल निःश्वास सोडला, आणि वरकरणीं दीनता दर्शवीत बोलायला सुरवात केली.

" माणसाच्च पाप उघडकीला आल्याशिवाय राहात नाहीं असं म्हणतात तें योग्यच आहे . आरिस्तीद फोमिच, मी तुम्हाला खोटच सांगितल...

मी अंगच्या हुशारीपेक्षा जास्त हुशारी करायला गेलों...मला फक्त शभरच रूबल मिळाले."

"चालू दे तुझी टकळी!" कुवाल्डा म्हणाला.

"आणि मी तुम्हाला सागितले तितके चारशें रूबल मला मिळालेच नाहींत ..म्हणजे असं..."

"म्हणजे बिणजे काहीं एक नाहीं ह. तू आत्ता खोट सागतो आहेस का अगोदर खोट सागितलस हें मला काहींच ठाऊक नाहीं. तू माझे ६५ रूबल देणं लागतोस. ही रक्कम काहीं विशेष नाहीं, होय ना?"

"अरे देवा! आरिस्तीद फोमिच! मी तुमच्या इच्छेप्रमाण नेहमींच वागत आलों आहे हो सरदारजी! तुम्हाला खूष ठेवायची मी शिकस्त केली आहे ह."

"ए इगोर्का, जुडाजचा पणतू तू! बस्स कर तें सार पुराण!"

"ठीक आहे! देतों मी ती रक्कम तुम्हाला...याबद्दल परमेश्वर मात्र तुम्हाला चागलीच अद्दल घडवील..."

"चूप! ए धरणीच्या तोंडावरची पुळी!" कॅप्टन डोळे गरगरा फिरवीत भयकर चेहरा करून गरजला. "अरे तुझ्याशीं बोलायला भाग पाडून त्या परमेश्वरान मला अगोदरच पुरेशी अद्दल घडवली आहे ना..... तुझी भेट घ्यायला लावलय मला त्यान... माशी चिरडल्याप्रमाण इथल्या इथ मारून टाकीन मी तुला!"

त्यानें वाविलोवच्या चेहऱ्यासमोर मूठ उगारली आणि करकरा दात खाल्ले.

तो निघून गेल्यावर वाविलोव वेडींवाकडीं तोंडे करू लागला व घाबरटपणें मिचमिचे डोळे करू लागला. मग दोन टपोरे अश्रू त्याच्या गालावरून ओघळले.

त्या अश्रूचा रग करडा होता आणि ते त्याच्या मिशामध्यें दडून बसल्यावर आणखी दोन अश्रू त्याच्या पाठोपाठ ओघळले. मग वाविलोव आपल्या स्वतःच्या खोलींत गेला आणि देवमूर्तीच्या समोर उभा राहिला. तो प्रार्थना न करता, हालचाल न करता, तसाच उभा राहिला आणि त्यानें आपल्या सुरकुतलेल्या पिंगट गालावरून खारट अश्रू वाहू दिले.....

. . . . . . .

डीकन तारासचा आवडता व्यवसाय म्हणजे जगलातून व कुरणातून भटकणें. त्यानें " एका काळीं माणसें असलेल्या प्राण्याना " सुचविलें कीं रानावनात एका ओढ्याच्या काठीं जावें आणि तिथे निसर्गाच्या हृदयाला बिलगून वाविलोवचा वोडका प्यावा; पण कॅप्टननें व बाकीच्या सर्वानीं एकमतानें डीकनला व निसर्गाला दोघानाहि शिव्या हासडल्या आणि अगणातच वोडकापान करावयाचें ठरविलें.

" एक, दोन, तीन, " आरिस्तीद मोजू लागला. " आपण तेरा जण आहोंत, मास्तर इथ नाहीं . . पण बहुधा आणखी काहीं मवाली आपल्या बैठकींत सामील होतीलच. आपण वीस माणसाचा बेत धरू या, आणि एकेकाला अडीच काकड्या, एक रत्तल रोटी, एक रत्तल मास.. .. म्हणजे अगदीच काहीं वाईट बेत नाहीं ह ! एकेकाला एकेक बाटली वोडका, आणि शिवाय भरपूर आबट कोबी आहे, सफरचद आहेत आणि तीन कलिंगडीं आहेत. ए बदमाष दोस्तानो, तुम्हाला यापेक्षा आणखी काय हव असणार रे साल्यानो ? म्हणून आता आपण इगोर्का वाविलोवचा चट्टामट्टा करायच्या तयारीला लागू या, कारण हे सार साहित्य म्हणजे त्याच रक्तमासच आहे !"

त्यानीं जमिनीवर काहीं जुने कपडे आथरले, त्याच्यावर मेजवानीची पक्वान्ने व दारू ठेवली, आणि या भोजनसाहित्याभोंवतीं कोंडाळें करून सारे जण गभीरपणें व मुकाट्याने बसले. त्याच्या डोळ्यात दारूची तलफ चमकत होती, ती त्याना आवरता आवरत नव्हती.

संध्याकाळ होऊ लागली आणि तिच्या सावल्या त्या शयनगृहाच्या अंगणात सर्वभर पडलेल्या केरकचऱ्यावर पसरू लागल्या. सूर्याच्या मावळत्या किरणानीं त्या चद्रमौळी इमारतीच्या छपराला उजाळा दिला. हवा थड आणि सुखकर होती.

" भाई हो, आपण सुरवात करू या ! " कॅप्टनने हुकुम सोडला. " आपल्याजवळ पेले किती आहेत ? सहा...अन् आपण आहोंत एकदर तेरा जण ! अलेक्सी माक्सिमोविच, ओता ती दारू पेल्यामध्यें. झाली तयारी ? ह, आता पहिला टोस्ट चला, करा सुरवात ! "

त्यानीं मद्यपान केलें, मग ते डुरकले, आणि त्यानीं मेजवानीवर ताव मारायला सुरवात केली.

"मास्तर नाहीं रे इथ......मला तो तीन दिवसांत दिसला नाहीं. कोणाला दिसला का तो ?" कुबाल्डानें विचारलें.

"कुणालाच नाहीं दिसला."

"असा स्वभाव नाहीं त्याचा. अच्छा, तरी हरकत नाहीं. आपण दारू पिऊ या आतां, आपण आरिस्तीद कुबाल्डाला उदंड आयुष्य मिळाव म्हणून दारू पिऊ या. माझ्या आयुष्यातला एक क्षणभरहि जो मला कधीं सोडून गेला नाहीं असा तोच तेवढा एकुलता एक मित्र आहे माझा! तरी पण खड्डयांत जाऊ दे साला! त्यान मार्झा संगत निदान थोडा वेळ जरी सोडली असती तरी मी वरचढ झालों असतों."

"बराच विनोदी आहेस हं तू." हाडपोत्या म्हणाला, आणि खोकला.

कॅप्टननें आपल्या वरचढपणाची तीव्र जाणीव ठेवून इतरांकडे निरखून पाहिलें, पण त्यानें तोंडातून ब्र देखील काढला नाहीं, कारण तो खाण्यांत गुग झालेला होता.

मद्यपानाच्या दोन पाळ्या झाल्यानतर मडळी रगात येऊ लागली; खाणें तर भरपूर होतेच.

दीड तारासनें गोष्ट ऐकायची इच्छा भीतभीत दर्शविली. पण डीकननें त्याच्या विनतीकडे लक्षच दिलें नाहीं, कारण नारीक स्त्रिया लठ्ठ स्त्रियांपेक्षा जास्त चागल्या का असतात याविषयीं तो फिरत्या भोंवऱ्याबरोबर वाद घालीत होता. आपलें म्हणणेंच बरोबर आहे अशी पूर्ण खात्री असलेल्या माणसाच्या आवेशानें व कळकळीनें तो आपली या विषयासंबधातील मतें फिरत्या भोंवऱ्यासमोर माडत होता.

धूमकेतु जवळच पडल्या पडल्या हें ऐकत होता. त्याच्या बालिश चेहऱ्यावरील आनदी भाव पाहता त्याला डीकनच्या उत्तान भाषेची खूपच मौज वाटत होती असे दिसत होतें.

मार्त्यानोवनें काळीभोर लव असलेले आपले प्रचंड हात आपल्या गुडघ्यावर ठेवलेले होते. तो वोडकाच्या बाटलीकडे मुकाट्यानें व उदासपणें बघत होता. आपल्या जिभेनें आपली मिशी धरायची व ती आपल्या दाता-मध्यें रगडायची अशी त्याची खटपट चालू होती. इकडे हाडपोत्या त्यापाला चिडवीत होता.

“ ए देवकृष्ण, तुझे पैसे लपवून ठेवलेली जागा मी चोरून पाहून आलोंय. ”

“ नशीब तुझं, ” त्यापा गुरगुरला.

“ अरे बच्चमूखी, मी हात मारणार आहे त्या पैशावर हं. ”

“ ठीक आहे, तू खुशाल कर तें काम.…”

या लोकाच्या संगतीचा कुवाल्डाला कटाळा आला. त्याचें वक्तृत्व ऐकायची अगर तें समजायची पात्रता असलेला असा यांच्यात एकहि माणूस नव्हता.

“ मास्तर कुठ आहे बर ? ” त्यानें स्वतःलाच पण मोठ्यानें प्रश्न केला.

मार्त्यानोव त्याच्याकडे पाहून म्हणाला : “ तो येवढ्यातच येईल. ”

“ तो पायींच येणार, गाडींतून येणार नाहीं, याबद्दल मला खात्री वाटते. ए ! तू तुरुगांत जाणार ह, आणि तिथ तुझ आरोग्य नीट राहण्या-प्रीत्यर्थ आपण दारू पिऊ या. कुणाहि श्रीमत माणसाला जर तू ठार मारलस तर त्यात माझी अर्धी पाती ठेव ह. .....मग मी अमेरिकेला जाईन, बर का रे भाई. मी त्या तिकडे—काय म्हणतात रे त्याला ? लिंपास ? का पाम्पास ?—तिकडे जाईन मी, आणि मेहनत करून प्रगति करीत करीत अमेरिकेचा अध्यक्ष होईन, आणि मग मी सगळ्या युरोपखडाला युद्धाच आव्हान देईन, आणि सगळ युरोप उडवून लावीन ! मी एक फौज विकत घेईन...म्हणजे युरोपखडात ह ..मी फ्रेचांना, जर्मनाना, तुर्कांना, अशा अनेकाना बोलावण करीन, आणि त्याना त्याच्या स्वतःच्या नातेवाईकाना ठार मारायला लावीन...इल्या मोरोमेत्स यान तार्तांराना तार्तारांविरुद्ध लढायला बसं लावल तसं करीन मी. पैशाच्या जोरावर मला इल्या होता येईल, साऱ्या युरोपखडाचा नायनाट करता येईल, आणि जुडाज पेत्यूनिकोवला मी माझे बूट पुसायला नोकर म्हणून ठेवीन. तो करील तें काम ..दरमहा शभर रूबल द्या त्याला म्हणजे तो करील तें काम. पण तो चागला नोकर ठरणार नाहीं, कारण तो लवकरच चोऱ्या करायला लागेल .. ”

“ बारीक स्त्री लठ्ठ स्त्रीपेक्षा जास्त चांगली असं मी म्हणतों याचं आणखी एक कारण म्हणजे तिला खर्च कमी येतो, ” कीफ्ल खाली

पटवायच्या स्वरांत सांगत होता. " माझी पहिली डीकनीण आपल्या कपड्यासाठीं बारा आर्शिन कापड घेत असे, तर दुसरी फक्त दहाच आर्शिन घेत असे...आणि तोच प्रकार अन्नाच्याहि बाबतींत होत असे. "

तारास अपराधी मुद्रेनें हसला. त्यानें आपला चेहरा डीकनकडे वळविला. आणि आपला एक डोळा त्याच्यावर रोखून तो गोंधळलेल्या वृत्तीनें म्हणाला :

" मलाहि एका काळीं बायको होती ह. "

" अरे! तस कुणाच्याहि बाबतींत घडत असेल रे, पण तुझ्या थापा चालू ठेव तू! " कुवाल्डा उद्गारला.

" ती बारीक होती, पण तिला खायला खूप लागे, आणि ती मेली ती सुद्धा अति खाण्यापायींच मेली. "

" ए लगडोबा, तूच विष घातलस तिला! " हाडपोत्या आत्मविश्वासानें म्हणाला.

" नाहीं रे, देवाच्यान्! स्टर्जन मासा खाऊनच तिला मरण आल, " तारास म्हणाला.

" पण मी सागतों ना तुला, तूच तिला विष घातलस! " हाडपोत्यानें निक्षून सागितलें.

हाडपोत्याच्या बाबतींत अनेकदा असा प्रकार घडत असे कीं त्यानें एकदा जर का कसलें तरी अगदींच विक्षिप्त विधान केलेलें असलें, म्हणजे तो तेंच तें पुन्हा पुन्हा सागत राही, त्याच्या समर्थनार्थ कसलाहि युक्तिवाद न सागता तेंच तें विधान तो घोकत बसे; आरंभीं बालिश लहरी स्वरात त्याची ही टकळी सुरू होई, आणि हळूहळू आवाज चढवीत चढवीत पुढें पुढें तो पिसाटाप्रमाणें किंचाळू लागे.

डीकननें आपल्या मित्राची बाजू घेतली. " छे रे, त्यान तिला विष घातलं नाहीं. तस करायच त्याला काहीं कारणच नव्हत. "

" पण मी म्हणतों ना, त्यान तिला वीषच घातल! " हाडपोत्या शपथेवर म्हणाला.

" खामोष! " कॅप्टन धमकीच्या स्वरात ओरडून म्हणाला. त्याला कटाळा आलेला असल्यामुळें त्याचा सताप भलताच वाढला. त्यानें आपल्या

मित्र मंडळीकडे खाऊं कीं गिळूं अशा नजरेनें रोखून पाहिलें आणि त्याच्या अर्धवट झिंगलेल्या चेहऱ्यावर त्याला आणखी राग वाटण्याजोगें कांहीं न सापडल्यामुळें त्यानें खालीं मान घातली, तो क्षणभर स्तब्ध राहिला. आणि मग पडल्या पडल्या उताणा झाला. धूमकेतू दातांनीं काकड्या कुरतडत होता. कॅप्टननें आधळ्या हातानें एक काकडी घेतली, तिचा जवळ जवळ अर्धा भाग आपल्या तोंडात खुपसला आणि आपल्या पिंवळ्या दातानी तिचा चावा घेतला, त्याबरोबर रसाच्या चिळकांड्या सर्वभर उडाल्या आणि त्याच्या गालावर रस ओघळला. त्याला खाण्याची इच्छा होतीसें दिसलें नाहीं, पण या काकडी चावायच्या खेळाची त्याला मौज वाटली. मार्त्यानोव अगदीं पहिल्यादा बसला होता त्याच अवस्थेंत एखाद्या पुतळ्यासारखा निश्चळ बसून राहिलेला होता, आणि अगोदरच अर्ध्या रिकाम्या झालेल्या वोडका दारूच्या प्रचड बाटलीकडे चिडक्या नजरेनें रोखून पाहात होता. त्यापानें जमिनीकडे नजर लावलेली होती; म्हातारपणानें कमजोर झालेल्या दातानीं मासाचा एक टणक तुकडा चावायची खटपट तो करीत होता. हाडपोत्या पालथा पडून खोकत होता; त्याचें इवलेंसे कृश शरीर हादरत होतें. बाकीच्या काळ्या स्तब्ध आकृति कोंडाळें करून व वेगवेगळ्या अवस्थामध्यें बसलेल्या व पडलेल्या होत्या. अंगावरच्या लक्तरामुळें हे लोक जगली जनावरासारखे दिसत होते. कुणा विलक्षण ओंगळ व कल्पक शक्तीनें माणसाची विटबना करायसाठीं हे प्राणी निर्माण केले असावेत असें वाटत होतें.

सुझदाल गावीं होती एक बाई
तिच कुटुब काहीं दिसायला चागल न्हाई;
मोठी दुःखाची गोष्ट—तिला वाताचा झटका आला,
आणि त्याचा तिजला त्रासच अतिशय झाला.

डीकन् तारास हें गाणें पडल्या सुरात गात होता. त्यानें अलेक्सीं माक्सिमोविचच्या गळ्याला मिठी मारली. अलेक्सी त्याच्या तोंडाकडे पाहून प्रसन्न मुद्रेनें गालातल्या गालांत हसत राहिला.

दीड तारास उल्लू वृत्तीनें खुसखुसत होता.

रात्र पडूं लागलेली होती. आकाशांत उचावर तारे चमचमू लागले;

आणि डोंगरावर व गांवात दिवे चमचमूं लागले. कोठींच्या बोकाकुक शिळ्या नदीच्या बाजूकडून ऐकू येत होत्या. बाबिलोवच्या गुत्त्याचीं दारें कुर्रकुर्र आवाज करीत कांचाच्या खळखळाटानिशीं उघडलीं. दोन काळ्या आकृति अंगणात आल्या व त्यानीं तिथें मजा करीत पडलेल्या जमावाला गाठलें. त्याच्यापैकीं एकानें घोगऱ्या स्वरात कुजबुजत विचारलें :

"दारू पिताय होय ?"

आणि दुसरा इसम हेवेखोरपणानें पहिल्याला हळूच म्हणाला :

"पहा तर खरे ! सैतान लेकाचे !"

मग एक हात डीकनच्या डोक्यावरून पत्नीकडे गेला आणि त्या हातानें बाटली उचलून नेली. मग ग्लासांत थोडका दारू ओतली जात असतानाच नाजुक लाटेच्या उसळीसारखा विशिष्ट आवाज ऐकू आला. मग एक डुरकणी ऐकू आली.

"ए, हें काम अगदींच उदासवाण होतंय !" डीकन ओरडून म्हणाला. "तारास, आपण प्राचीन काळच्या आठवणी काढून 'बाबिलोनच्या नदी-किनारीं' हें गाणं म्हणू या रे."

"पण त्याला गातां येत का ?" सिम्त्सोवनें विचारलें.

"त्याला ? अरे तो तर उपाध्येबुवाच्या भजनी मंडळींतला गाणीं सांगणारा पुढारी होता. ह, तारास ! . . . 'न दी—कि ना री. . . . . .'" डीकनचा आवाज खूप मोठा व घोगरा होता. गाणें म्हणता म्हणतां तो फुटला. आणि त्याचा जोडीदार कर्कश सुरांत गात होता.

तें मेणचट घर अधारात जास्तच मोठें दिसत होतें आणि आपल्या सगळ्या सडलेल्या लांकडांचा भार घेऊन या गाणाऱ्या लोकांच्या जवळ जवळ येत असल्यासारखे दिसत होतें. गाणाऱ्यांच्या बेफाम किंकाळयाचे प्रतिध्वनि घराकडून येत होते. जडजड भरदार ढग आकाशातून त्यांच्या डोक्यावरून सावकाश तरगत चालले होते. या "एका काळीं माणसें असलेल्या प्राण्यापैकीं" एक जण घोरत होता; बाकीचे अजून पुरेसे झिंगलेले नव्हते; ते मुकाट्यानें खासपीत होते अगर मध्यें बराच वेळ स्तब्ध राहून एकमेकाशीं कुजबुजत्या स्वरात बोलत होते.

अशा भरदार मेजवानीच्या प्रसंगीं, जेव्हां भरपूर थोडका दारू असताना,

सर्वांचीं मनें इतकीं उदास राहणें, ही गोष्ट या लोकांच्या बाबतींत अगदींच अपूर्व होती. का कुणास ठाऊक, पण आज रात्रीं दारू पिण्यामुळें नेहमींचा उत्तेजक परिणाम घडत असलेला दिसत नव्हता.

" ए कुत्र्यानो ! बोंबाबोंब बंद करा रे ! " गाणाऱ्या जोडीला कॅप्टन म्हणाला. त्यानें कान देऊन ऐकायसाठीं पडल्या पडल्या मान वर केली. " कुणी तरी रस्त्यान चाल्लय . गाडींतून..."

इतक्या उशीरा रस्त्यानें गाडी चालली असली म्हणजे ती हटकून सगळ्यांचें लक्ष वेधून घेत असे. गावाकडून येणाऱ्या रस्त्यावरील नाले व खड्डे ओलांडायचा धोका अशा वेळीं पतकरणार कोण, आणि तो कशासाठीं ? सगळेच माना उचावून ऐकू लागले. रात्रींच्या शांत वेळीं टणक वाटेवर चाकांचा खडखडाट स्पष्टपणें ऐकू येत होता. हा आवाज आस्ते आस्ते जास्त जास्त जवळ येऊ लागला. कुणी तरी उमेट स्वरात प्रश्न विचारलेला ऐकू आला;

" अं, कुठ आहे तें ? "

कुणी तरी उत्तर दिलें, " तें त्या तिकुडच्यंच घर असलं पाहिजे. "

" याच्या पुढ जायचा नाहीं मी. "

" ते इकडेच येताहेत रे ! " कॅप्टन ओरडून म्हणाला.

" पोलीस ! " कुणी तरी भयंकर घाबरलेल्या स्वरात कुजबुजला.

" गाडींतून ! मूर्ख आहेस लेका ! " मार्त्यानोव हळूच म्हणाला.

कुवाल्डा उठला आणि आत यायच्या फाटकाकडे गेला.

" हें भाड्याच शयनगृह आहे का ?" कुणी तरी कापऱ्या स्वरात विचारलें.

" होय ! " कॅप्टन उद्दामपणें गुरकला.

" अरेच्या ! इथ तितोव म्हणून कोणी रिपोर्टर राहात होता का ? "

" अहहा ! तुम्ही आणलय त्याला ? "

" होय..."

" झिंगलाय ? "

" आजारी आहे. "

" म्हणजे भलताच झिंगलाय. ए, मास्तर ! अरे ऊठ बाबा ! "

" थांबा ह, मी तुम्हांला मदत करतों...तो फारच आजारी आहे . गेले

दोन दिवस तो माझ्याकडे होता..... हाताखालीं हात देऊन उचला हं त्याला...डॉक्टरान तपासलय त्याला. फारच कठीण आहे त्याची अवस्था."

त्यापा उठला आणि हळूहळू फाटकाकडे गेला. हाडपोत्या हसला आणि त्यानें आणखी एक ग्लास झोंकला.

"ए कोण आहे रे तिकडे, दिवा लाव जरा!" कॅप्टन ओरडून म्हणाला.

धूमकेतूनें घरात जाऊन दिवा लावला. मग उजेडाची एक मोठी तिरीप अंगणात आली; आणि कॅप्टन व एक लहानसर पाहुणा या दोघानीं मास्तराला कसेबसे शयनगृहात नेलें. त्याचें मस्तक छातीवर निर्जीवपणें लोंबत होतें, पाय जमीनीवरून फरफटत होते. आणि हात जणू काय मोडल्यासारखे लोंबत होते. त्यापाच्या मदतीनें त्यानीं त्याला एका फळीवर ठेवलें त्याचें सर्वांग लटलटा कापत होतें आणि फळीवर पाय लांब करताना तो विव्हळत होता.

"आम्ही दोघे एकाच वर्तमानपत्रात काम करीत होतों .... त्याला फारच त्रास होतोय ......मी म्हणालों, 'माझ्या घरीं राहा, मला तुझी अडचण व्हायची नाही.'...पण तो काकुळतीला येऊन आपल्याला 'घरीं' पोंचव म्हणून सागू लागला. त्यान या गोष्टीचा इतका ध्यास घेतला कीं त्याला अमळ बर वाटेल अशा समजुतीन त्याला मी इथ घेऊन आलों... घर! हेंच ना तें? होय ना?"

"त्याला दुसरीकडे कुठ घर असेल असं वाटतय तुम्हाला?" कुवाल्डानें मास्तराच्या दोस्ताकडे रोंखून पाहात रागडेपणानें विचारलें. "त्यापा, मला जरा गार पाणी आण रे."

"मला वाटत आता माझी तुम्हाला जरूर नसेल, नाहीं का?" पाहुणा जरासा गोंधळून म्हणाला. कॅप्टननें त्याच्याकडे निरखून पाहिलें. त्याचे कपडे जरा चकचकीत होते आणि हनुवटीपर्यंत त्यानें घट्ट बटनें घातलेलीं होतीं. त्याची विजार जीर्ण झालेली होती, त्याची टोपी जुनेपणानें जवळजवळ पिवळी झालेली होती आणि त्याच्या हाडाडलेल्या व बुभुक्षित चेहऱ्या-प्रमाणेंच चुरमटलेली होती.

"नाहीं, तुमची गरज नाहीं आता! तुमच्यासारखे पुष्कळ जण आहेत इथ आमच्याकडे," कॅप्टन मान फिरवून म्हणाला.

"मग, येतों तर मी, नमस्ते!" पाहुणा दरवाज्याकडे गेला आणि तिथून हळूच म्हणाला, "कांहीं कमजास्त झाल तर मला ऑफिसात कळवा ह.. माझ नाव आहे रायझोव. मी एखादा छोटासा मृत्युलेख लिहीन. काही झाल तरी तो एक पत्रकार होता ना."

"ह, मृत्युलेख म्हणता होय? चाळीस कोपेकला वीस ओळी का? नुसत कळवायपेक्षा जास्तहि करीन कीं मी. तो मेल्यावर मी त्याची एक तगडी कापून तुमच्याकडे पाठवून देईन. मृत्युलेखापेक्षा ती तुम्हाला जास्त फायद्यात पडेल. तुम्हाला तीन दिवस पुरवठ्याला येईल ती. त्याच्या तंगड्या चागल्या लठ्ठ आहेत. तो जिवत होता तेव्हा तुम्ही साऱ्यानीं त्याला खा खा खाल्लत. तो मेल्यावर तोच क्रम चालू ठेवा की तुम्ही.."

पाहुण्यानें तऱ्हेवाईक रीतीनें नाक मुरडलें आणि तोंड काळें केलें. कॅप्टननें मास्तराजवळच्या लाकडी माडणीवर बैठक मारली, मास्तराच्या कपाळाला, छातीला, हात लावला आणि हाक मारली, "फिलिप!"

शयनगृहाच्या घाणेरड्या भिंतींना ही हाक थडकून तिचा प्रतिध्वनि उमटला आणि मग तिचा आवाज विरून गेला.

"भय्या रे, हा प्रकार अगदीच हास्यास्पद आहे रे," मास्तराच्या घामट केसावरून प्रेमळपणानें हात फिरवीत कॅप्टन म्हणाला. मग त्यानें त्याचा जोरात व तुटकपणें चाललेला श्वास ऐकला, आणि त्याचा फिकट करडा चेहरा निरखून पाहिला. मग त्यानें एक सुस्कारा सोडला आणि भुवया आकुंचित करून भोंवतालीं नजर टाकली. दिव्याचा उजेड मद होता व तो लुकलुकत होता. त्याच्यामुळें शयनगृहात भिंतींवर काळ्याभोर सावल्या थरथरत होत्या.

कॅप्टननें आपली दाढी कुरवाळत या सावल्यांचें मूक नृत्य निरखून पाहिलें. त्यापा एक घागरभर पाणी घेऊन परत आला, आणि ती मास्तराच्या डोक्याशीं असलेल्या एका माडणीवर ठेवून त्यानें त्याचा हात उचलला—जणू आपल्या हातानें त्याचें वजनच करतोय अशा रीतीनें त्यानें त्याचा हात उचलला.

"पाण्याची कांहीं जरूर नाहीं," असें म्हणून कॅप्टननें नकारार्थी मान हालविली.

“ भटजी पाहिजे, या वेळेला तोच हवा,’ ’ चिध्या गोळा करणारा म्हातारा त्यापा म्हणाला.

“ नको ! काहींच नको, ” कॅप्टननें निर्णयक स्वरात सांगितलें.

दोघे मास्तराकडे पाहात मुकाट्यानें बसले.

“ ए बुड्ढा सै ।ान ! चल आपण बाहेर जाऊन दारू पिऊ या ! ”

“ अन् याच काय करायच ? ”

“ तुला याचं काहीं भल करता येईल का ? ”

त्यापानें मास्तराकडे पाठ फिरविली आणि दोघे आपल्या मडळींत सामील व्हायसाठीं बाहेर अगणात आले

“ काय आहे भानगड ? ” हाडपोत्यानें आपलें बाकदार नाक कॅप्टनकडे वळवून विचारलें.

“ विशेष काहींच नाहीं तों माणूस मरायला घातलाय ” कॅप्टननें थोडक्यात सांगितलें

“त्याला मार पडलाय का ? ” हाडपोत्यानें कुतूहलानें विचारलें. कॅप्टननें उत्तरच दिलें नाहीं. तो दारू पीत होता. “तो मेल्यानतर त्याच्या सन्मानार्थ काहीं तरी करायची सोय आम्ही केली आहे हें त्याला नक्कीच कळल असल पाहिजे !” हाडपोत्यानें सिगरेट शिलगावीत ट ळी चालविली. मग हास्यध्वनि ऐकू आला, नतर एक दीर्घ निःश्वास ऐकू आला. डीकन अचानक उठून ताठ बसला, त्याने ओठाची हालचाल केली, कपाळ चोळलें, आणि पिसाटपणें ओरड सुरू केली :

“ जिथें घेत विश्राति सत–ज–न ! ”

“ए !” हाडपोत्या फुसफुसला “त उगाच कशाला रे बोंब मारलोयस ? ”

“ त्याच्या थोबाडावर एक ठोसा लगाव !’ कॅप्टननें सल्ला दिला.

“ ए मूर्खा ! ” त्यापा घोगऱ्या आवाजात म्हणाला. “ माणूस मरत असला म्हणजे आपण स्तब्ध राहाव ..”

आजूबाजूला पुरेशी स्तब्धता होतीच. आकाश ढगाळलेलें होतें, पाऊस पडायचा रग होता, आकाश निःस्तब्ध होतें पावसाळी रात्रीच्या भयकर अधाराला गुरफटलेली धरणीहि निःस्तब्धच होती. झोपलेल्यांचें घोरणें, थोडका दारू ग्लासात ओततानाचा किण् किण् असा आवाज, खाणाऱ्यांचें

चर्वण, —हे आवाज ऐकूं येत होते.. डीकन कांहीं तरी पुटपुटत होता. ढग इतके खालपर्यंत तरंगत होते कीं ते जणूं त्या जुन्या घराच्या छपराला धडक मारून या टोळीच्या अंगावर तें कोसळवणार की काय असें वाटत होतें.

"अरेंरे ! एखादा दोस्त मरायला लागला म्हणजे फार वाईट वाटत," कॅप्टन चांचरत बोलला. त्यानें मान टाकली. त्याला कुणीच साथ दिली नाहीं.

"तुमच्यापैकीं तोच सर्वांत चांगला माणूस होता. सर्वांत हुशार, सर्वांत सज्जन...तो नसल्यामुळ आता मला चुकल्या चुकल्या सारख होईल"

"'संताच्या सागातीं घेउ दे विराम'. ...ए लगडा बदमाश, गा म्हणतों ना !" डीकन आपल्या पेंगू लागलेल्या मित्राला कोपरखळी देऊन गरजला.

"गप्प रहा रे !" हाडपोत्या संतापानें ताडदिशीं उठून उभा राहून ओरडला.

"मी त्याच्या टक्कुऱ्यावर देतों एक ठेवून," मार्त्यानोव मान वर करून म्हणाला.

"तू झोंपलेला नाहींस ?" आरिस्तीद फोमिचनें अनपेक्षित प्रेमळपणानें त्याला विचारलें. "आपल्या मास्तरबद्दल ऐकलस का तू ?"

मार्त्यानोव आळसटपणें आपलें जड शरीर सावरत उठून उभा राहिला, त्यानें शयनगृहातून येत असलेल्या उजेडाकडे नजर टाकली, मान हालवली आणि मुकाट्यानें कॅप्टनशेजारीं बैठक मारली.

"आपण मद्यपान करू या !" कुवाल्डानें हातांनीं चाचपडत ग्लास शोधता शोधतां सूचना केली.

"त्याला काहीं हव असल तर बघून येतों मी." त्याषा म्हणाला.

"त्याला शवपेटिका हवीय !" कॅप्टन वांकडें तोंड करून उद्गारला.

"असं नका हो बोलूं !" हाडपोत्यानें त्याला पडत्या आवाजांत विनविलें.

धूमकेतू उठला आणि त्याच्या पाठोपाठ गेला. डीकननें उठावयाचा प्रयत्न केला पण तो पुन्हां पडला आणि त्यानें मोठ्यानें एक शिवी हासडली.

त्याषा गेल्यावर कॅप्टननें मार्त्यानोवच्या खांद्याला स्पर्श करून पडत्या स्वरांत सांगितलें :

" ए मार्त्यानोव...इतरापेक्षां तुला जास्त वाईट वाटल पाहिजे. तूं... पण खड्डयांत जाऊ दे तें...फिलिपच्या मागं तुला चुकल्या चुकल्या सारख नाहीं का वाटणार ?"

" नाहीं," हा माजी जेलर क्षणभराच्या स्तब्धतेनंतर उत्तरला : " ए भय्या, मला असल्या गोष्टींच काहीं वाटतच नाहीं . माझी ती संवयच मोडलीय...मला या जीवनाचा वीट आलाय, खरोखरीच; मला कुणाचा तरी खून करायला हवाय असं मी म्हणतों तें खरोखरीच मनापासून असत."

"खर म्हणतोस ?" कॅप्टन मोघमपणें म्हणाला. "अच्छा...आपण आणखी एलेक ग्लास घेऊ या..."

" आपल काम असत येवढसंच. एक लहानसा ग्लास प्यायचा अन् मग आणखी एक .."

सिम्त्सोव जागा झाला आणि तद्री लागलेल्या स्वरात हेल काढून म्हणाला:

" मला म्हाताऱ्याला एका ग्लासात दारू ओतून द्यायला कुणी आहे का रे ?"

त्यानी एक ग्लास भरला आणि त्याला दिला. तो पिऊन गट्ट केल्यावर तो पुन्हा आडवा झाला आणि पडता पडता तो आणखी कुणावर तरी आदळला. यानतर दोन तीन मिनिटे सगळीकडे स्तब्धता झाली. पावसाळ्यातल्या रात्रीप्रमाणेंच काळीभोर व रहस्यमय अशीच ही स्तब्धता होती.

" तुझ काय म्हणण?" कुणी तरी विचारत असलेलें ऐकू आलें.

" माझ म्हणण अस कीं तो चागला माणूस होता....डोकेबाज आणि किती प्रेमळ," आणखी कुणी तरी कुजबुजला.

" होय ना, अन् त्याच्याजवळ पैसेहि असत... अन् त्यान दोस्ताला कधीं नाहीं म्हणून म्हटल नाहीं...." पुन्हा स्तब्धता झाली.

" त्याचा शक्तिपात फार लवकर होतोय," कॅप्टनच्या डोक्यामागें उभा राहून त्यापा घोगऱ्या आवाजात म्हणाला आरिस्तीद फोमिच उठला आणि गंबीरपणें पावलें टाकावयाचा उसना आव आणून तो शयनगृहांत गेला.

" जाऊ नका हो !" त्यापाने त्याला अडविलें. " नका जाऊ ! तुम्हीं

भिजलेले आहात! अशा अवस्थेंत त्राण बरोबर नाहीं." कॅप्टन थबकला आणि त्याने क्षणभर विचार केला.

"अन् या धरणीवर बरोबर काय असत रे? खड्ड्यात जा तू!" आणि त्यानें त्यापाला बाजूला ढकलून दिले.

शयनगृहाच्या भिंतींवर सावल्याचा जणू पाठशिवणीचा खेळ चालू होता. मास्तर फळीवर हातपाय ताणून पडलेला होता आणि त्याला घरघर लागलेली होती. त्याचे डोळे सताड उघडे होते, त्याची उघडी छाती जडपणें खालीवर होत होती, त्याच्या जिव्हणीच्या टोंकावर फेस आलेला होता, त्याच्या चेहऱ्यावर अत्यंत उत्सुक भाव दिसत होता. त्याला काहीं तरी गंभीर गोष्ट, फार महत्वाची गोष्ट, सांगायची आहे, पण ती सांगता येत नाहीं, आणि त्यामुळें फार त्रास होत आहे असेंच जणू त्याच्या चर्येवरून वाटत होतें. कॅप्टन पाठमोरे हात करून उभा होता. क्षणभर त्यानें त्याच्याकडे मुकाट्यानें पाहिलें. मग दुःखानें कपाळावर आठ्या आणून तो बोलूं लागला :

"फिलिप! माझ्याशी काहीं तरी बोल रे...तुझ्या दोस्ताला उद्देशून एक तरी सुखाचा शब्द बोल...भय्या रे, माझं तुझ्यावर प्रेम आहे रे! ..... सारीं माणसं पशु असतात....तूच तेवढा माझ्या लेखीं माणूस होतास.... तू दारुडा असलास म्हणून काय झालं? अहाहा! फिलिप, तू किती भयंकर पीत होतास! या पिण्यापायींच तुझं वाटोळं झालं! तू माझं ऐकायला पाहिजे होतस अन् आपलं मन आवरायला पाहिजे होतस......मी तुला सांगितलं नव्हतं का......?"

मृत्यु—गूढ आणि सर्वविध्वंसक मृत्यु. हा मृत्यु जीवनाशीं लढण्याच्या काळ्याकुट्ट आणि गंभीर कामगिरींत गुंतलेला होता. अशा प्रसंगीं या दारुड्यानें हजर राहणें ही गोष्ट जणू मृत्यूला उपमर्दकारक वाटली असावी. म्हणूनच त्यानें हें निर्घृण काम लवकर संपवायचा निर्धार केला. मास्तरानें एक दीर्घ निःश्वास सोडला, मग तो विव्हळला, मग त्याचें सर्वांग थरथरलें, मग त्यानें हातपाय लांब केले, आणि मग सगळें काहीं स्तब्धच झालें. कॅप्टन मुकाट्या खात उभा राहून त्याच्याशीं तसाच बोलत होता.

"तुला मी थोडीशी वोडका दारू आणून दिली तर चालेल का?

फिलिप, तूं जर दारू प्याला नाहींस तर अर्थात् जास्त चांगलं......जरा जोर कर ह. नाहीं तर तू आपला पीच कसा ! तेंच जास्त बरं ! एकदरींत विचार केला तर, आत्मसयमन कशाला करायच उगीच ? फिलिप, कोणत्या कारणासाठीं आत्मसयमन करायच रे ? कुणाप्रीत्यर्थ ? अं ? "

त्यानें त्याचे पाय धरले व त्याला आपल्या आणखी जवळ ओढलें.

"फिलिप, तुला पेग आलाय होय ? ठीक तर मग, झोंप तूं......येतों हं मी.. ...उद्या मी तुला सार काहीं समजावून सागेन. स्वतःचा कोणत्याहि बाबतींत कोंडमारा करून घ्यायची खरोखरी मुळींच गरज नसते हें मग तुझ तुलाच दिसेल......पण आता झोंपून रहा तू......तू मेला नसलास तर ह. "

कॅप्टन बाहेर आपल्या दोस्ताकडे गेला. जिकडे तिकडे प्रगाढ स्तब्धता पसरलेली होती. त्यानें दोस्ताना सागितलें :

"तो झोंपलाय अगर मेलाय, मला काहींच समजत नाहीं....मी जरासा झिंगलोंय. "

त्यापा नेहमींपेक्षा जास्त पुढें वाकला आणि त्यानें छातीवर क्रूसाची आकृति केली. मार्त्यानोव थरथरला, जमिनीवर आडवा झाला आणि तिथेंच स्तब्धपणें पडून राहिला. हाडपोत्या धुसफुसू लागला आणि पडत्या व भयकर स्वरात म्हणाला :

"तुम्ही सारेच जा खड्ड्यात ! मेला ? मग काय झाल त्यात ? मी पर्वा कां करावी ? मी त्याबद्दल का ऐकाव ? माझीहि वेळ येईलच कीं......मी इतरांपेक्षा कांहीं जास्त वाईट नाहीं. "

"बरोबर बोललास," कॅप्टन जमिनीवर कोसळून मोठ्यानें म्हणाला. "आपण सगळेच इतरांसारखे मरूं—अशी वेळ येईलच. हाः ! हाः ! आपण कसे जगतों रे ? पण त्यात काहींच अर्थ नाहीं. मात्र आपण मरणार नक्की इतर सगळ्यासारखेच ह, आणि हेंच तर जीवनाच एकदर ध्येय असत, मी खात्री देतों याबद्दल. माणूस केवळ मरायसाठींच जगतो, आणि तो मरतो..... आणि हें असंच जर असेल तर तो जगला कसा या गोष्टीला काय महत्व आहे ? तो कसा का जगेना ? काय रे मार्त्यानोव, मी

म्हणतों तें बरोबर आहे ना ! म्हणून आपण दारू पिऊ या......आपण अजून जिवत आहोंत तवर पिऊन घेऊ या ! ”

पाऊस पडायला लागला. दारूनें व झोपेनें धुंद झालेले हे लोक जमिनीवर विखुरलेले होते. घनदाट कोंदाटणाऱ्या काळोखानें याच्या आकृति झाकून टाकल्या. शयनगृहाच्या खिडक्यातील उजेड लुकलुकला, मंद झाला, आणि एकदम गेलाच. मग दिवा वाऱ्यानें तरी गेला असावा अगर तेल तरी सपलेलें असावे. पावसाचे थेंब शयनगृहाच्या पत्र्याच्या छपरावर भीत भीत व अडखळत टपटपत होते. डोंगराकडून गावावरून घटाचा मंद शोकाकुल निनाद ऐकू येत होता. गस्तवाले गस्त घालत होते. घटेच्या मनोऱ्यातून निघणारा धातुमय झण्कार अधारातून हळूच तरगत येऊन मंद मंद होत होत नाहींसा होत होता, पण त्याचा शेवटचा थरथरता सुस्कारा सावल्यामध्यें विरून गेला असेल नसेल येवढ्यात आणखी एक टोला बसून धातूच्या उदास सुस्काऱ्यानें रात्रीच्या शाततेचा पुन्हा भंग होत होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यापालाच पहिल्या प्रथम जाग आली. उताणा पडल्या पडल्या तो आकाशाकडे टक लावून पाहू लागला. त्याची मान ताठलेली असल्यामुळें त्याला डोक्यावरून जाणारे ढग पाहायचे असतील तर असेंच उताणें पडावें लागत होतें.

या सकाळीं आकाशाचा रग सर्रास करडा झालेला दिसत होता. पहाटेचें कुंद गार धुकें आकाशात जमून त्यानें सूर्याला झाकाळून टाकलें होतें, त्यानें आकाशाचा अनन्त नीलिमा आपल्या आड लपवून ठेवला होता, आणि तें पृथ्वीवर उदासीनता ओतत होतें. त्यापानें आपल्या छातीवर क्रूसाची आकृति केली, आणि कोपरावर भार टाकून, वोडका दारू कुठें शिल्लक आहे हें पाहायसाठीं सभोंवार नजर टाकली. बाटली रिकामीच होती. आपल्या दोस्ताच्या अंगावरून खुरडत खुरडत त्यानें त्याच्या ग्लासामध्यें डोकावून पाहिलें, त्यातला एक ग्लास त्याला जवळ जवळ भरलेला सांपडला, तो त्यानें गट्ट केला, अस्तनीनें ओंठ पुसले आणि मग तो कॅप्टनला हलवूं लागला.

कॅप्टननें मान वर केली आणि त्याच्याकडे निस्तेज नजरेनें पाहिलें.

" अहो, आपल्याला पोलिसात कळवलं पाहिजे......उठा ना!"

" कशाबद्दल?" कॅप्टननें झोंपाळूपणानें व रागारागानें विचारलें.

" अहो, तो मेलाय म्हणून......"

" कोण?"

" गुरुजी......"

" फिलिप? अं, होय होय!"

" इतक्या लवकर विसरलात?......अरे देवा रे!" त्यापा ठपका द्यायच्या स्वरात कोकटला. कॅप्टन उठून उभा राहिला, त्यानें मोठ्यानें जांभई दिली आणि असा जोरात आळस दिला कीं त्याचीं सगळीं हाडें कडकडलीं.

" ठीक आहे! जा आणि जबाब देऊन ये.... "

" मी नाहीं जाणार......मला पोलिस आवडत नाहींत," त्यापा दुर्मुखलेपणानें म्हणाला.

" ठीक आहे, मग डीकनला उठव. मी आत जाऊन त्याला बघून येतों."

कॅप्टन शयनगृहात गेला आणि मास्तराच्या पायथ्याशीं उभा राहिला. मास्तराचे शव हात पाय ताणून पडलेलें होतें. त्याचा डाव हात त्याच्या छातीवर होता, आणि उजवा हात जणू काय कुणावर तरी उगारल्यासारखा मागें खेंचलेला होता.

कॅप्टनच्या मनात विचार आला कीं मास्तर जर आत्ता उठून उभा राहिला तर त्याची उची तारासच्या बरोबरीनें भरेल. मग तो मृताच्या शेजारीं बसला. आपण दोघे गेलीं तीन वर्षे एकत्र राहिलों होतों याची आठवण होऊन त्यानें एक सुस्कारा सोडला. त्यापा आंत आला; दुश्शी द्यायच्या पवित्र्यात असलेल्या बोकडाप्रमाणें त्यानें आपलें डोकें धरलें होतें.

तो मृताच्या शेजारीं उलट बाजूला बसला. त्यानें मास्तराची काळवडलेली, ओंठ दाबून धरलेली, शात व गभीर चर्या पाहिली आणि विव्हळायला सुरुवात केली :

" एकूण...हा मेला...मी पण लवकरच मरेन..."

" तुझी वेळहि होऊन गेली आहे ह!" कॅप्टन उदासपणें म्हणाला.

“ होय तर, ” त्यापानें मान्यता दिली. “ तुम्हीहि मरायलाच हवं...
याच्यापेक्षा काहींहि जास्त चागल ..”

“ पण मरण कदाचित याच्याहून वाईट नसेल कशावरून? तुला
काय ठाऊक ? ”

“ तें वाईट असण शक्य नाहीं. आपण मरतों तेव्हा आपली देवाशीं
गाठ असते.. . पण इथ जिवतपणी आपली माणसाशीं गाठ असते...
आणि माणसं--काय किंमत असते त्याची ? ”

“ पुरे रे !...गप्प बैस ! ” कुवाल्डानें रागारागानें त्याला मध्येंच
अडविलें.

आणि शयनगृहातल्या अंधारात गभीर स्तब्धता पसरली. हे दोघे आपल्या
मृत दोस्ताच्या पायाशीं बराच वेळ विचारमग्न स्थितींत बसून राहिले, अधून
मधून त्याच्याकडे निरखून पाहात राहिले. मग त्यापानें विचारलें:

“ तुम्ही त्याचं दफन करणार ना ? ”

“ मी ? नाहीं बुवा, पोलिसच करू देत त्याच दफन ! ”

“ तुम्ही केलत तर जास्त बर . नाहीं तरी त्याच्या अर्जाचे पैसे
वाविलोवजवळून तुम्हीच घेतले आहेत.. आणि तुमच्याजवळ पुरेसे
नसले तर मी देईन तुम्हाला थोडेसे ..”

“ त्याचे पैसे माझ्याजवळ असले ..तरी मी त्याच दफन नाहींच
करणार. ”

“ हें वाजवी नव्हे ह. तुम्ही मेलेल्याला लुबाडता आहात. तुम्हाला
पैसे चोरायला हवेत म्हणून मी सान्याना सागून टाकीन. ” त्यापानें धमकी
दिली.

“ मूर्ख आहेस तू, ए बुड्ढा सैतान ! ” कुवाल्डा तिरस्कारानें म्हणाला.

“ मी नाहीं ह मूर्ख...पण तुमच हें करण वाजवी अगर मित्राला
शोभेसं नाहीं. ”

“ पुरे रे ! चालता हो इथून ! ”

“ किती पैसे आहेत ते ? ”

“ पचवीस रूबल...” कुवाल्डा भकासपणें म्हणाला.

“ अस्सं ! मला एक पाच रूबलची नोट देऊन टाका ना. ”

.. "तू बदमाश थेरडा आहेस..." आणि त्यापाच्या चेहऱ्याकडे भकास नजरेनें रोखून पाहात कॅप्टननें शिवी हासडली.

"मग काय? तुम्ही नाहीं देत?"

"खड्डयात जा तू!...मी हे पैसे त्याच स्मारक उभारायसाठीं खर्च करणार आहे."

"तें त्याला कशाला हवय?"

"मी एक दगड अन् एक नागर विकत घेईन. दगड ठेवीन समाधीवर अन् नागर त्याला एक साखळी लावून जोडून देईन. म्हणजे जडपणा येईल त्याला."

"का? हा काय तुमचा विनोद आणखी?"

"ए......तुला या गोष्टीची उठाठेव करायच काहींएक कारण नाहीं."

"संभाळा ह! मी सागेन..." त्यापानें पुन्हा धमकी दिली.

आरिस्तीद फोमिचनें त्याच्याकडे दुर्मुखलेपणानें पाहिलें आणि तो काहीं एक बोलला नाहीं.

"ऐका!...आले ह ते लोक!" त्यापा उठला आणि शयनगृहातून बाहेर गेला.

मग डॉक्टर, पोलिस इन्स्पेक्टर आणि कॉरोनर दाराशीं दिसले. तिघेहि आळीपाळीनें आत आले, त्यानीं मास्तराचें शव पाहिलें, आणि मग ते कुवाल्डाकडे संशयी नजरेनें बघत बघत बाहेर गेले. त्याच्याकडे अजिबात लक्ष न देतां तो तिथेंच बसलेला होता. शेवटीं पोलिस इन्स्पेक्टरनें त्याला विचारलें:

"हा कशामुळ मेला?"

"विचारा त्यालाच...मला वाटत तो संवईच्या अभावीं मेला असावा."

"काय म्हणालात?" कॉरोनरनें विचारलें.

"माझ म्हणण असं कीं ज्या रोगान त्याला पछाडल त्याची त्याला संवय नव्हती म्हणून तो मेला."

"ह. ह. असं का! तो बरेच दिवस आजारी होता का?"

"त्याला या इथं बाहेर आणा बरं, तिकडे आंत मला त्याला नीट पाहतां

येत नाहीं, " डॉक्टर कटाळा दर्शविणाऱ्या स्वरात म्हणाला. " त्याच्या अंगावर खाणाखुणा असतील कदाचित् .. "

" ए, त्याला बाहेर घेऊन जायला साग कुणाला तरी ! " पोलिस इन्स्पेक्टरनें कुवाल्डाला हुकूम सोडला.

" तूच जा अन् साग ऱ्याना ! इथ काहीं तो माझ्या आड आलेला नाहीं... " कॅप्टन बेपर्वाईनें उत्तरला.

" हेः ! ए ! " इन्स्पेक्टर भयकर चर्या करून ओरडला.

" थुत् ! " कुवाल्डा बसल्या जागेवरून न हालता मुग्ध संतापानें गुरगुरला.

" खड्डयात जाऊ दे ही भानगड ! " इन्स्पेक्टर ओरडून म्हणाला. तो रागानें इतका पिसाळला कीं त्याचें रक्त डोक्याकडे वाहू लागून त्याचा चेहरा लाल लाल झाला. " याबद्दल मी तुला अद्दल घडवीन ! मी... "

"नमस्ते, मडळी ! " व्यापारी पेत्यूनिकोव गोड स्मित करीत दरवाजाशीं येऊन म्हणाला.

त्यानें शोधक नजरेनें आजूबाजूला पाहिलें. त्याचें अंग शहारलें. त्यानें टोपी काढून घेतली आणि भाविकपणानें छातीवर क्रूसाची आकृति केली. मग त्याच्या चेहऱ्यावर विजयी दुष्ट स्मित दिसू लागलें. आणि कॅप्टनकडे रोखल्या नजरेनें पाहात त्यानें विचारलें :

" काय झालाय काय प्रकार ? इथ एखादा खून झालाय होय ? "

" होय. तसल्याच प्रकारच काहीं तरी. " कॉरोनर उत्तरला.

पेत्यूनिकोवनें एक दीर्घ सुस्कारा सोडला, पुन्हा छातीवर क्रूसाची आकृति केली आणि त्रासलेल्या स्वरात बोलणें चालू केलें.

" देवा रे देवा ! सर्वशक्तिमता ! मला जें होणार असं भय पडल होतं तेंच झाल नेमक. ज्या ज्या वेळीं मी इथ आत येऊन गेलों, त्या त्या प्रत्येक वेळीं जाताना माझ्या काळजात धडकीच भरत असे . अरे रे रे ! मी घरीं जाता जाता मनाशीं म्हणत असे : ' देवबाप्पा, आम्हां साऱ्याचं रक्षण कर रे बाबा ! ' त्या तिथ बसलेला माणूस इथल्या मवाल्याच्या टोळीचा सरसेनापति आहे ह ! त्याला हें घर भाड्यान द्यायच नाकाराव असं माझ्या मनांत असंख्य वेळां आल होत. पण मी भ्यालों. तुम्हांला

ठाऊकच आहे...हे लोक किती निरंकुश आहेत ते...मी मनाशीं विचार केला, दुर्जनं प्रथम वन्दे, नाहीं तर..."

त्यानें आपल्या हातानें कसली तरी मोघम खूण केली, मग तो हात तोंडावरून फिरविला, मग त्यानें आपली दाढी ओढली आणि पुन्हा एक सुस्कारा सोडला.

"हे लोक धोकेबाज आहेत हं, अन् हा इथ बसलेला माणूस यांचा पुढारी आहे...दरवडेखोराचा प्रमुखच म्हणानात खरोखरी."

"आम्ही त्याची करू नीट चौकशी हं!" इन्स्पेक्टरनें कॅप्टनकडे खुनशी नजरेनें पाहात अभिवचन दिलें. "मलाहि चागला ठाऊक आहे तो."

"होय होय! आपली मैत्री जुनीच आहे कीं..." कुवाल्डा सलगीच्या स्वरात म्हणाला. "मी तुला अन् तुझ्यासारख्याना गप्प बसवायसाठीं कितीदा तरी वाजवीपेक्षा जास्त पैसे दिलेत हं!"

"सद्गृहस्थ हो!" इन्स्पेक्टर ओरडून म्हणाला, "तुम्ही ऐकलत का हें! याबद्दल मी त्याला अद्दल घडवीन चागलीच. अरे दोस्ता! तू समजलास काय! तुला चागलीच याद राहील बघ! अह्हा, दोस्ता, मी तुझा निकालच लावतों, लक्षात ठेव!"

"बाजार भरायच्या अगोदरच उचल्यानीं कमरा बांधायच्या, असं नको करूस," आरिस्तीद फोमिच शातपणें म्हणाला.

डॉक्टर हा चष्मिष्ट तरुण होता, तो त्याच्याकडे कुतूहलानें पाहू लागला. कॉरोनर त्याच्याकडे ज्या प्रकारचें लक्ष देत होता त्यामुळें त्याचें भलें होण्याचें लक्षण काहीं दिसत नव्हतें. पेत्यूनिकोव त्याच्याकडे विजयी मुद्रेनें पाहात होता. आणि इन्स्पेक्टर त्याच्यावर ओरडत होता आणि मुठी उगारून त्याच्यावर जवळ जवळ हल्ला करायच्या बेतात होता.

मार्त्यानोवची काळीकभिन्न आकृति शयनगृहाच्या दाराशीं आली. तो मुकाट्यानें आंत आला आणि पेत्यूनिकोवच्या पाठीशीं उभा राहिला. त्याची हनुवटी पेत्यूनिकोवच्या डोक्याशीं समपातळींत आली. त्याच्या पाठीशीं डीकन आपले बारीक, सुजमटलेले लालेलाल डोळे वटारून उभा राहिला.

"सद्गृहस्थ हो, आपण काहीं तरी करायला लागूं या," डॉक्टरनें

सुचविलें. मार्त्यांनोवने तोंड भयकर वेडेंवांकडें केलें आणि तो पेत्यूनिकोवच्या डोक्यावर एकदम शिंकला. पेत्यूनिकोवने किंकाळीं फोडली, तो खालीं वाकला आणि त्याने घाईघाईने बाजूला उडी मारली. त्याची उडी इन्स्पेक्टरच्या अंगावर पडून तोहि कोसळायचाच, पण त्याने त्याला आपल्या पसरलेल्या हातानीं सावरले.

"हे बघितलेत," मार्त्यांनोवकडे बोट करून हा व्यापारी घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला. "हे लोक कशा प्रकारचे आहेत ते बघितलेत ना?"

कुवाल्डा खो खो हसू लागला. डॉक्टर व कॉरोनरहि गालातल्या गालात हंसले. आणि शयनगृहाच्या दाराशीं लोकाची गर्दी वाढू लागली...... झोंपाळलेले, चेहरे सुजमटलेले, डोळे तारवटलेले व लाल झालेले, आणि केंस पिस्कारलेले, अशा अवतारात हे लोक जमलेले होते आणि डॉक्टर, कॉरोनर व इन्स्पेक्टर याच्याकडे उर्मटपणें रोंखून पाहात होते.

"ए बाहेर थांबा रे!" दाराशीं पाहऱ्यावर असलेला पोलीस शिपाई त्याना इशारे देत होता. त्याचीं लक्तरें ओढून त्यांना बाजूला ढकलायचा प्रयत्न करीत होता. पण तो पडला एकटा आणि त्याला अनेक लोकाना तोंड द्यावें लागलें. आणि ते सारे जण त्याच्याकडे अजिबात दुर्लक्षच करून आत शिरले आणि तिथें स्तब्धपणें उभे राहिले. त्याच्या अगाला वोडका दारूची घाण येत होती. त्याच्या चर्या भयकर दिसत होत्या.

कुवाल्डानें या लोकाकडे पाहिलें आणि मग तिथें आलेल्या अधिकाऱ्याकडे पाहिलें. हे सगळे मवाली आत आलेले पाहून अधिकारी स्तमितच झाले. कुवाल्डा वाकडें तोंड करून गालातल्या गालात हसत हसत म्हणाला: "सद्-गृहस्थ हो! माझ्या भाडेकरूंची अन् दोस्ताची आपल्याला ओळख करून हवी असेल, नव्हे का? कांहीं का असेना, तुमची इच्छा असो वा नसो, तुमच कर्तव्य करीत असतानाच तुम्हाला त्याची पुढमाग ओळख ही करून घ्यावी लागणारच."

डॉक्टर गोंधळून गालातल्या गालात हसला. कॉरोनरनें ओंठ दाबून धरले, आणि इन्स्पेक्टरला आतां जायची वेळ झाली हें दिसून आलें. म्हणून तो ओरडून म्हणाला:

"सिदोरोव! शिटी वाजव! त्यांना एक खटारा इथ आणायला सांग."

" मी जातों आता," पेत्यूनिकोव एका कोपऱ्यांतून पुढें येऊन म्हणाला. " ए सद्गृहस्थानो, तुम्ही आजच हें घर खाली केलत तर बर होईल. मला ही छपरी पाडायची आहे. आजच्या आजच उरका हें काम, नाहीं तर मला पोलिसात अर्ज करावा लागेल ! "

पोलिसाच्या शिटीचा कर्कश प्रतिध्वनि अंगणापलीकडून निनादला. शयनगृहाच्या दाराशीं तिथले भाडेकरू जाभया देत व अंग खाजवीत गट करून उभे राहिले.

" म्हणजे तुम्ही ओळख करून घेऊ इच्छीत नाहीं तर, अं ? तुमच हें वागणं जरा उद्धटपणाचच आहे ह ! " आरिस्तीद फोमिच हंसून म्हणाला.

पेत्यूनिकोवनें खिशातून पैशाचें पाकीट काढलें, त्यात खसफस केली, त्यांतून पाच पाच कोपेकचीं दोन नाणीं बाहेर काढलीं, तीं मृताच्या पायां-पाशीं ठेवली, आणि आपल्या छातीवर क्रूसाची आकृति केली.

" परमेश्वरा, दया कर..... पापी घुरळ्याच्या दफनासाठीं ....."

" काय ! " कॅप्टन ओरडून म्हणाला, " तू हें दफनासाठीं देतोस ? ए बदमाश, उचल ते पैसे, उचल म्हणून सागतों ना ! प्रामाणिक माणसाच्या दफनासाठीं, हे चोरलेले कोपेक द्यायची तुला हिंमत तरी कशी होते ? तुझी शीरनूशीर फाडून काढीन मी ! "

" साहेब ! " तो व्यापारी गर्भगळित होऊन इन्स्पेक्टरच्या बाहीला धरून ओरडून म्हणाला. डॉक्टर व कॉरोनर घाईघाईनें बाहेर गेले. इन्स्पेक्टरनें ओरडून हाक मारली :

" सिदोरोव, इकडे ये ! "

" एका काळीं माणसे असलेले प्राणी " दाराशीं फळी धरून उभे राहिले. त्याना जें पाहायला व ऐकायला मिळत होते त्यामुळें त्यांचे उदास चेहरे उजळलेले दिसत होते.

कुवाल्डा आपली मूठ पेत्यूनिकोवच्या डोक्यावर उगारून मोठमोठ्यानें गर्जत होता आणि पिसाळलेल्या पशूप्रमाणें आपले तांबारलेले डोळे गरगरा फिरवीत होता.

" बदमाश आणि चोर ! घे परत तुझे पैसे ! घाणेरडा कीटक ! घे ते

परत, काय सांगतोंय मी......नाहीं तर मी कोंबलों ते तुझ्या घशात.... उचल तुझे पाच कोपेकचे तुकडे ! ”

पेत्यूनिकोवनें आपले पसडे उचलायसाठीं आपला एक थरथरता हात लांब केला आणि दुसऱ्या हातानें कुवाल्डाच्या गुद्यापासून स्वतःचें संरक्षण करीत करीत तो म्हणाला :

“ इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही साक्ष आहांत ह या गोष्टीला; आणि तुम्ही सारे सज्जन लोक देखील आहात ह माझे साक्षीदार ! ”

“ ए व्यापाऱ्या, आम्ही सज्जन लोक नाहीं ह ! ” हाडपोत्यानें आपल्या कांपऱ्या आवाजात सांगितलें.

इन्स्पेक्टर उतावळेपणानें शीट वाजवीत राहिला; त्यानें आपले गाल फुग्यासारखे फुगवले; त्याचा दुसरा हात पेत्यूनिकोवच्या संरक्षणार्थ लांब केलेला होता. पेत्यूनिकोव त्याच्या जणू काय पोटात दडून बसायचा प्रयत्न करीत असल्यासारखा त्याच्यासमोर अंग चोरून उभा होता.

“ ए घाणेरडा बेडूक ! तुला मी मृताच्या पायाच चुंबन घ्यायला लावू का ? तुला कसं काय आवडेल तें ? ” आणि पेत्यूनिकोवच्या बकोटीला धरून कुवाल्डानें त्याला दरवाज्यावर इतक्या सहज लीलेनें आदळलें कीं तो जणू काय केवळ मांजराचें पिल्लूच असावा.

“ एका काळीं माणसें असलेले प्राणी ” त्या व्यापाऱ्याला जमिनीवर पडायसाठीं पुरेशी जागा मिळावी म्हणून चट्दिशीं बाजूला झाले. आणि तो त्याच्या पायाशीं धाडदिशीं आदळला आणि भयंकर घाबरून ओरडू लागला :

“ खून ! धावा ! धावा ! खून ! ”

मार्त्यानोवनें हलकेच आपला पाय उंच केला आणि त्या व्यापाऱ्याच्या डोक्यावर लाथ मारण्यासाठीं नेम धरला. हाडपोत्या उल्लूपणानें हंसत त्याच्या तोंडावर थुंकला. व्यापाऱ्यानें आपल्या अंगाचा चेंडू करून हातांपायांवर रांगत अंगण गाठलें. त्याची ही अवस्था पाहून सगळेच लोक हसले. पण येवढ्यांत दोन पोलीस शिपाई आले होते; आणि कुवाल्डाकडे बोट करून इन्स्पेक्टर ओरडून म्हणाला:

“ पकडा त्याला, आणि त्याचे हातपाय बांधून ठेवा ! ”

" बांधून ठेवा हो त्याला, " पेत्यूनिकोव काकुळतीनें म्हणाला.

" तुमची हिंमत नाहीं व्हायची मला बांधून ठेवायची !....मी पळून नाहीं जाणार....मी माझ्या पायानीं चालत जाईन, " अंगावर धावून आलेल्या पोलिसाच्या कचाटींतून आपली सुटका करून घेऊन कुवाल्डा म्हणाला.

" एका काळीं माणसें असलेले प्राणी " एकामागून एक निघून गेले. एक खटारा अंगणात आला. काहीं लक्तऱ्या मवाल्यानीं मृताचें शव बाहेर आणलें.

" मी चागलाच धडा शिकवीन तुला ! तूं जरा दम धर ! " कुवाल्डावर इन्स्पेक्टर डाफरला.

"आता कसं काय हो, दरवडेखोराचे पुढारी?" पेत्यूनिकोवनें खोडसाळपणानें विचारलें. आपला बैरी पोलिसाच्या ताब्यात गेलेला पाहून त्याचा आनद गगनात मावेना. "सापडलास कीं नाहीं ? अं ? तू जरा दम धर...."

पण कुवाल्डा आता शात झालेला होता. तो त्या दोन पोलिसाच्या मधोमध रुबाबात ताठ व स्तब्ध उभा होता व मास्तराचें शव खटाऱ्यात ठेवलें जात असलेले पाहात होता. शवाच्या काखोटींत हात घालून तें उचलणारा माणू फारच गिड्डा होती आणि शवाची पायाकडील बाजू उचलून खटाऱ्यात ठेवली जात असताना त्याच वेळीं शवाचें डोकें त्याला आत ठेवतां आले नाहीं. क्षणभर शवाचें डोकें खालींच लोंबत राहिले—जणू काय तें उसळी घेऊन खालीं पडून स्वतःला जमिनींत गाडून घेणार असें वाटत होते. हे मूर्ख व दुष्ट लोक आपल्या शाततेंत व्यत्यय आणतात, म्हणून याच्यापासून दूर निघून जावें असेंच जणू शवाला वाटत होते.

"घेऊन जा रे त्याला !" कॅप्टनकडे बोट करून इन्स्पेक्टरनें हुकुम केला.

कुवाल्डाचा चेहरा रागीट दिसत होता. तो काहीं एक तक्रार न करतां मुकाट्यानें पुढें चालला. मास्तराचें शव ज्या खटाऱ्यात टाकलें होतें, त्याच्या बाजूनें तो पुढें चालला. त्यानें वर न पाहता शवासमोर आपलें मस्तक विनम्र केलें. पाषाणमुखी मार्त्यानोव्ह त्याच्या पाठोपाठ चालला. व्यापारी पेत्यूनिकोवचें अंगण भराभर रिकामें झालें.

" ए, इया इया ! " खटारेवाल्यानें घोड्याचे लगाम खेंचून पुकारा

केला. अंगणाच्या खडबडीत जागेवरून खटारा खडखडत चालला. मास्तराच्या ताठलेल्या शवावर चिंध्याच्या ढिगार्चे पाघरूण घातलेलें होतें, आणि त्याच्या खालून त्याचें पोट हादरत होतें. अखेर एकदांचें आपण हें शयनगृह सोडलें, आता त्यात कधींहि परत यायला नको, कधींहि परत यायला नको, या विचारानें तो जणू काय खूष होऊन हळूच गालातल्या गालात हसत आहे असें त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होतें.

पेत्यूनिकोवनें त्याच्याकडे पाहात पाहात आपल्या छातीवर क्रूसाची आकृति केली, आणि मग आपल्या कपड्याना चिकटलेला केरकचरा तो आपल्या टोपीनें नीट झटकू लागला. त्याच्या ओव्हरकोटावरचा कचरा साफ झाल्यावर त्याच्या चेहऱ्यावर आत्मसंतुष्टतेचें शात स्मित झळकूं लागलें. त्याला अजूनहि कॅप्टनची उच, करड्या रंगाची आकृति दिसत होती. डोक्यावर टोपी, तिला रक्ताच्या पट्ट्यासारखी दिसणारी लाल फीत बाधलेली, हाताच्या मुसक्या बाधलेल्या, अशा थाटात कॅप्टन पोलिस पाहऱ्यातून डोंगराकडे जाणाऱ्या रस्त्यावरून चालला होता.

पेत्यूनिकोवनें विजयी वीराला शोभेसें स्मित केलें, आणि तो परत शयनगृहाकडे आला, पण तिथें तो अचानक थबकला, त्याचे हातपाय लटपटले. शयनगृहाच्या दाराशीं त्याच्याकडे तोंड करून एक म्हातारा माणूस हातात काठी व पाठीवर मोठी थैली घेऊन उभा होता. म्हाताऱ्याच्या हडकुळ्या अगावर लक्तरें होतीं आणि तो फारच भयकर दिसत होता. पाठीवरच्या भारामुळें त्याला पोंक आलेलें होतें आणि त्याची मान त्याच्या छातीकडे झुकलेली होती. त्यामुळें तो जणू काय त्या व्यापाऱ्यावर हल्ला करायच्या तयारींत आहे असे दिसत होतें.

"तुझ इथ काय काम आहे रे ? कोण आहेस तूं ?" पेत्यूनिकोवनें ओरडून विचारलें.

"माणूस..." घोगऱ्या आवाजात उत्तर आलें. या घोगरेपणामुळें पेत्यूनिकोवला जरा धीर आला आणि तो हसला देखील.

"माणूस ! तुझ्यासारखी माणसं असतात कुठ तरी ?" त्यानें बाजूला सरकून म्हाताऱ्याला वाट करून दिली. म्हातारा हळूहळू पुटपुट करीत चालला :

"माणसं निरनिराळ्या प्रकारचीं असतात......ईश्वर करतो तशीं माणस होतात...काहीं माणसं माझ्यापेक्षाहि वाईट असतात...माझ्यापेक्षाहि वाईट...होय, माझ्यापेक्षाहि .."

त्या घाणेरड्या अंगणावर नीरव आकाश झाकाळून आलेलें होतें. नीट नेटका पोशाक केलेला लहानसर व्यापारी पेत्यूनिकोव आपल्या करड्या केसाच्या टोंकदार दाढीनिशीं त्या अंगणातली प्रत्येक गोष्ट आपल्या पावलांनीं मोजत चालला होता तो आपल्या तीक्ष्ण बारीक डोळ्यांनीं तिथली प्रत्येक गोष्ट न्याहाळीत चालला होता.

त्या जुनाट घराच्या छपरावर एक कावळा बसलेला होता. आपली मान उचावून मागेपुढें हेलकावे खात तो गंभीरपणानें काव काव करीत होता. आकाश करड्या रंगाच्या कठोर ढगांनीं पूर्णपणें झाकाळलेलें होतें. त्या ढगामध्यें एक प्रकारची तीव्र निर्घृणता दिसत होती. या दुर्दैवी, दुःखी, शोकाकुल भूतलावरून सारी घाण धुवून टाकावयाचा पक्का निर्धार करून पावसाचा जोराचा मारा करायसाठींच जणू ते सारे ढग जमलेले दिसत होते.

प्रकाशनवर्ष : १८९७



# फेरीकाला आणि गांवगुंड

केन हा चलाख लहानसर ज्यू होता. त्याचें डोके निमुळतें होत होत टोंकदार झालेलें होतें, आणि त्याचा चेहरा हाडाडलेला व पिंवळसर होता. राठ लाल केसाचे झुबके त्याच्या गालाच्या हाडावर व हनुवटीवर वाढलेले होते. त्यामुळें त्याचा चेहरा चुरमटलेल्या मखमलीच्या चौकटींत बसविल्यासारखा दिसत होता, आणि त्याच्या घाणेरड्या टोपीचा कगोरा हा त्या चौकटीचा वरचा भाग झालेला होता.

कगोऱ्याखालून दोन तेजस्वी, बारीकसे, किरमिजी रंगाचे डोळे लुकलुकत होते. त्याना लाल भुवयानीं शोभा आणलेली होती. हे डोळे जणू काय उपटून काढल्यासारखे दिसत होते. हे डोळे एकाच वस्तूवर फार वेळ स्थिर झाले आहेत असा प्रकार क्वचितच घडत असे; याची भिरभिरती चोरटी नजर एकदां इकडे तर एकदा तिकडे फिरत असे, आणि जिकडे तिकडे भेकड, लाचार स्मिताची खैरात करीत असे.

हें हंसू पाहणाराला हटकून अशी जाणीव होत असे कीं अशा प्रकारें स्मित करणाऱ्या या इसमाचा स्थायी भाव प्रत्येक माणसाला व प्रत्येक वस्तूला भियें हाच असला पाहिजे; आणि ही भीतिसुद्धा अशी कीं ही वाढतां वाढतां हिला क्षणार्धांत भयंकर धास्तीचें रूप प्राप्त होणार.

म्हणून जे लोक या परिस्थितीला फक्त व केवळ [illegible] आळशी [illegible],

ते त्याला गुद्दे लगावून व त्याची क्रूर थट्टा करून त्याच्या मनाची तडफड आणखीच वाढवत असत. त्याच्या मज्जाततूपासून ते थेट त्याच्या किरकोळ देहाला झांकणाऱ्या ढिल्या कपड्याच्या प्रत्येक चुणीपर्यंत साऱ्याच गोष्टी या भीतीच्या भावनेनें भारावलेल्या दिसत असत आणि तो एकसारखा नखशिखान्त थरथरत असे.

या ज्यूचें नाव होतें खाइम आरोन पर्वीझ; पण त्याला म्हणत असत केन. खाइम या नावापेक्षा केन हें नाव जास्त सरावातलें होतें आणि त्यात भरीला भर म्हणजे तें भयकर अपमानास्पद होतें. त्याच्या नाजूक व मेकड देहाला तें अगदींच विसंगत दिसत असलें तरी प्रत्येकाला असे वाटे कीं या नावाच्या योगानें त्या ज्यूचें वर्णन ततोतत होत आहे, हें नाव त्याला अंतर्बाह्य बरोबर लागू पडत आहे, आणि त्याचबरोबर याच्या योगानें त्याला कमीपणाहि येत आहे.

हा ज्यू नशिबाच्या फेऱ्यात सापडलेल्या लोकाच्याच सहवासात राहात असे. अशा लोकाना आपल्या शेजाऱ्याची आगळीक करण्यातच एकसारखा आनद होत असे; आणि त्यात पुन्हां गमत अशी कीं ही आगळीक कशी करायची हें या लोकाना हमखास ठाऊक असतें—आपल्या दुर्दैवावर सूड उगविण्याचें हेंच एकमेव साधन याच्या हातीं असतें. आणि केनच्या बाबतींत ही गोष्ट तर अगदींच सोपी झालेली होती; लोकानीं त्याचा उपहास केला कीं तो फक्त स्वतःकडे कमीपणा घेणारे हसू तोंडावर आणी, आणि कधीं कधीं तर त्यानीं चालविलेल्या त्याच्या या थट्टेत तो स्वतःच भागहि घेत असे; जणू काय आपल्याला छळणाऱ्या या लोकाच्या संगतींत राहण्याच्या हक्काबद्दल तो त्याना ही आगाऊ पागडीच देऊं करत होता! त्याचें चरितार्थाचें साधन अर्थात् व्यापार हेंच होतें. तो समोर एक लाकडी पेटी धरून रस्तोंरस्तीं फेरी करीत असे, बारीक रोगिष्ट स्वरात तो असा पुकारा करी: " बूट पालीस! माचीस! पिना! सुया! मणी! आलतू फालतू सामान! "

त्याचें आणखी एक वैशिष्ट्य होतें; त्याचे कान फार मोठे होते; ते त्याच्या मस्तकापासून अलग उठून दिसत असत, आणि एखाद्या चलाख घोड्याच्या कानाप्रमाणें त्याची एकसारखी हालचाल चालू असे.

त्याचा धंदा शिखान या उपनगरात चाले. इथें सगळ्यात जास्त कंगाल व लक्तरे लोक राहात असत; हर प्रकारच्या उडाणटप्पूची वस्ती इथें असे. हें उपनगर म्हणजे एकच अरुंद रस्ता होता, त्याच्या दुतर्फा जुनाट, उंच व ओंगळ दिसणारीं घरें होतीं. यात रात्रींचीं विश्रांतिस्थानें, गुत्ते, रोटीचीं दुकानें, किराणा मालाचीं दुकानें, लोखंडाच्या मोडीचीं व तऱ्हे तऱ्हेच्या भाड्याचीं दुकानें होतीं. इथे राहात होते चोर, चोरीचा माल घेणारे, किरकोळ आडगिऱ्हाइकी मालाचे व्यापारी, आणि फळविक्या बाया. घरे खूप उंच असल्यामुळे रस्त्यात भरपूर सावली असे, आणि खूपसा चिखल, आणि खूपसे दारुडे असत. उन्हाळ्यामध्यें सडका माल व ब्रॅंडी याच्या भयंकर दुर्गंधीने रस्ता भारावलेला असे. इथें सूर्य अगदीं सकाळींच तेवढा डोकावून जाई, आणि तोसुद्धा फारच सावधपणें आणि थोडाच वेळ; इथल्या चिखलाच्या संसर्गाने आपली किरणे बरबटतील अशी त्याला भीति वाटत होती कीं काय कोण जाणे.

हा रस्ता एका टेकडीच्या उतारावरून एका मोठ्या नदीच्या कडेकडेनें गेलेला होता. इथें गोदीकामगार, तात्पुरत्या रजेवर असलेले खलाशी, आणि हमाल यांची सदा गर्दी असे. इथें हे लोक दारू पिऊन झिंगत असत आणि आपापल्या परीनें स्वतःची करमणूक करून घेत असत. इथें खिसेकापूहि सोइस्कर कोनाकोंपऱ्यातून दबा धरून बसलेले असत; दारूच्या नशेनें अंमल बसविला कीं आपल्याला अनुकूल संधि मिळणारच म्हणून ते वाट पाहात राहिलेले असत. रस्त्याकडेच्या फूटपाथावर मांसाचें पॅटीस भरलेले मातीचे घडे असत; इथेंच मिठाईवाल्याचे व कलेजी विकणारांचे हारेहि असत. बंदरातले कामगार इथें गर्दी करून उभे असत आणि इथलें गरमगरम अन्न भराभर फस्त करीत असत; त्यांच्यातले जे दारू पिऊन झिंगलेले असत, ते मोठमोठ्यानें राकट स्वरात गात असत व एकमेकांवर डाफरत असत; माल विकणारे लोक उच्च स्वरात आपल्या मालाची भरमसाट जाहिरात करीत असत; खटारे त्या तसल्या गर्दीतून मोठ्या कष्टानें वाट काढत खडखडत जात असत. इथें गर्दी करून राहिलेले लोक कांहीं तरी विकत घ्यायचेंच अगर विकायचेंच अशा निर्धारानें आलेले असत; कुणी काम मिळायची वाट पाहात असत, अगर कसल्या ना कसल्या तरी

सधीची वाट पाहात असत. इथल्या बहुविध आवाजाचा कल्लोळ त्या नालेवजा अरुद रस्त्यातून भिरमिरत जात असे आणि घराच्या घाणेरड्या भितींवर आदळत असे. या भितींच्या जुन्या झालेल्या गिलाव्याचे जागोजाग बारीक बारीक कळपे निघून त्याना सर्वभर जणू क्षतें पडल्यासारखीं दिसत होतीं.

या घाणीच्या आगरात, कानठळ्या बसविणाऱ्या हल्लकल्लोळात, शिवराळ वातावरणात, लहानमोठीं सर्व वयाचीं मुलें सतत धावपळ करीत असत, हीं सारींच मुलें एकजात धामट, वखवखलेलीं व दुर्व्यसनी असत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तिथे या पोराची वर्दळ असे, दुकानदाराची मेहेरबानी व स्वतःच्या चिमुकल्या हाताची चलाखी या साधनावर त्याचा चरितार्थ अवलंबून असे. रात्रीं जिथें जागा मिळेल तिथें तीं झोंपत असत, कुणाच्या दरवाज्यांत, तर कुणा दुकानदाराच्या पुढें आलेल्या बैठकीच्या फळीखालीं, अगर तळघराच्या खिडकीखालच्या सज्ज्यावर, अशा त्याच्या झोंपायच्या जागा असत. ताबडे फुटायचा अवकाश, कीं मुडदूस, गळवें इत्यादि रोगाच्या तावडींत सापडलेली हीं हाडाडलेलीं मुलें चोरी करण्याच्या उद्योगाला लागत असत. त्यातल्या त्यात निवडक जिनसावर हात मारायचा आणि अत:पर विकण्यायोग्य न राहिलेल्या जिनसाची भीक मागायची, असा त्याचा क्रम चालू होई. ही मुलें कुणाचीं असत? सर्वांचीच. इथें, याच रस्त्यावर, केन आपल्या मालाचा पुकारा करीत, बायाना माल विकत, दिवसामागून दिवस घालवीत होता. या बायाना त्याच्याकडून काहीं तासापुरते वीस कोपेक उसने घेऊन त्याला बावीस कोपेक परत द्यावयाचे असे सौदे करावयाची संवय लागलेली होती आणि हा करार पुरा करण्याच्या कामात त्याच्या हातून कधींहि कसूर होत नसे. या रस्त्यात बरीच मोठी देवघेव करायला केन सहसा चुकत नसे. दारू पिण्यासाठीं गुत्त्यात जमलेल्या लोकाकडून शर्ट, टोप्या, बूट व ततुवाद्ये विकत घ्यायचीं; बायाच्याकडून परकर, पोलकीं व स्वस्त दागिने खरेदी करायचे; आणि मग हा माल इतर मालाच्या बदल्यात तरी द्यायचा, अगर दहा कोपेक नफा घेऊन विकायचा, असा त्याचा शिरस्ता होता. या साऱ्या वेळात लोक त्याची काय चेष्टा करतील व त्याला केव्हा रट्टे देतील याचा काहींच नेम नसे; कधी कधीं

तर लोक त्याचा सारा माल देखील काढून घेत असत; पण त्यानें कधीं तक्रारीचा शब्द म्हणून तोंडातून काढायचा नाहीं, फार फार झालें तर तो स्मित करीत असे--किती शोकपूर्ण व सोज्वळ स्मित असायचें तें.

पुन्हा कधीं कधीं असाहि प्रकार घडत असे : गावातले दोघे तिघे तरुण भुकेने व मद्यपानानें बेफाम होऊन एखाद्या अंधेऱ्या कोंपऱ्यात या ज्यूवर तुटून पडत असत. मग भीतीने म्हणा अगर त्याच्या रट्टयामुळे म्हणा, हा ज्यू आपल्यावर हल्ला करणाराच्या पायाशी लोळण घेई, याच्या अंगाचा थरकाप होत राही आणि हाताला हिसडे देत आपल्या खिशात हात कोंबून अजीजीच्या स्वरात हा त्याना सांगे: "साहेब, भले साहेब, माझे सगळे कोपेक घेऊ नका हो—मग मला माझा धंदा कसा करता येणार हो?"

आणि त्याच्या अखंड स्मितानिशीं त्याचा हडकुळा चेहरा थरथरू लागे.

"ए, रडारड बंद कर! आम्हाला आपले तीस कोपेक दे कसा."

गाईचें दूध जर आणखी काढायचें असेल तर तिची कास तिच्याजवळच राहू दिली पाहिजे हें या सज्जनाना चांगले कळत होतें. कधी कधीं केन उठून याच मारेकऱ्याबरोबर गोडीगुलाबीनें हास्यविनोद करीत रस्त्यातून जात असे, हे तरुणहि त्याच्याशीं बोलण्याइतका व त्याची थट्टा करण्याइतका कमीपणा स्वतःकडे घेत असत; आणि हा सगळा प्रकार शक्य तितक्या सहजपणानें व मनमोकळेपणानें होत असे.

असलें काहीं तरी प्रकरण घडलें म्हणजे केन जरा जास्त हडाडलेला दिसत असे—इतकेच काय तें.

ज्यू जमातीशीं त्याचें सूत बहुधा जमत नसावे. आपल्या धर्मबांधवांपैकीं कुणाच्याहि संगतींत तो क्वचितच हिंडताना दिसे; आणि अशा अपवादात्मक प्रसंगीं त्याचा हा धर्मबांधव त्याच्याशीं चढेल तिरस्कारानें वागत आहे हें पाहणाराच्या लक्षात येई. केनला ज्यू जमातीनें वाळींत टाकला आहे अशीहि एक अफवा पसरलेली होती; आणि फेरीवाल्या बायानीं तर त्याला एका काळीं 'शापित' असें नावच दिलेलें होतें.

केनच्या वागणुकींत पाखंडीपणाचीं लक्षणें स्पष्ट दिसत असलीं तरी त्याला त्याच्या धर्मबांधवांनीं वाळींत टाकले असण्याचा संभव फारसा नव्हता. तसें म्हटलें तर तो रविवारीं काम न करण्याचा नियम पाळत

नसे, ज्यू धर्मशास्त्राच्या नियमात न बसणारें मासहि तो खात असे. त्याला लोक प्रश्न विचारून भडावून सोडत असत. 'तुझ्या धर्मान निषिद्ध ठरविलेल्या जिनसा खायची तुला हिंमत तरी कशी होते?' असा प्रश्न एकदा एक तर एकदा दुसरा त्याला विचारीत असे आणि त्याला उत्तर द्यायचा आग्रह करीत असे. तो अंग चोरून घेई, गालातल्या गालात हसे आणि कसलें तरी विनोदी उत्तर देऊन वेळ मारून नेई; ज्यू लोकांच्या धार्मिक मताविषयीं व चालीरीतींविषयीं कसलीहि माहिती त्याना न देता तो आपली कशीबशी सुटका करून घेत असे.

कंगाल पोरेसुद्धा रस्त्यातून त्याचा पाठलाग करीत असत; आणि मुठी भरभरून चिखल, कलिंगडाचीं डेंखे, अगर अशीच कसली तरी घाण त्याच्या अंगावर अगर त्याच्या पेटींत टाकत असत. तो त्याच्याशीं गोड गोड बोलून त्याना अडविण्याचा प्रयत्न करी, पण बहुतकरून तो त्याना चुकवून रस्त्यातील गर्दीत सामील होत असे. या गर्दीत त्याचा पाठलाग करायची त्या पोराची हिंमत नव्हती, कारण जमावाच्या पायाखाली चेंगरलें जाण्याची त्याना धास्ती असे.

अशा प्रकारें केन दिवसामागून दिवस कठत होता, सारे लोक त्याला ओळखत होते, सारे लोक त्याचा छळ करीत होते. त्याचा व्यापार चालूच होता. भीतीनें त्याचा थरकाप चालूच होता, त्याचें स्मितहास्य चालूच होतें—आणि मग एकाएकीं नशिबानें त्याला हात दिला.

जिथें कुणी ना कुणी तरी अरेराव नाहीं, अशी जागा उभ्या विश्वात कुठेंच सापडायची नाहीं. शिखान गावीं ही अरेरावाची भूमिका देखणा आत्योम करीत असे. हा एक प्रचंड माणूस होता. त्याच्या गोलसर डोक्यावर काळ्याभोर कुरळ्या केसाचें जंगल माजलेलें होतें; या केंसाच्या मऊमऊ चुकार बळ्या त्याच्या कपाळावर त्याच्या सुंदर मखमली भुवयापर्यंत व प्रचंड, काळ्याभोर बदामी डोळ्यापर्यंत रुळत होत्या. त्याच्या डोळ्यामध्यें नाजुक दवाचा पडदा सतत विलसत होता. त्याचें नाक अगदीं सरळ व रेखीव होतें. त्याचे ओंठ लाल व रसरशीत होते व त्यांवर विपुल काळ्याभोर मिशा होत्या. त्याच्या काहींशा काळ्या सावळ्या उभट चेहऱ्यात अजब प्रमाणबद्धता होती. त्याचें सौंदर्य साधे व ठसठशीत होतें. त्याचे धुक्यानें भरल्यासारखे दिसणारे

डोळे त्याच्या चेहऱ्याला फारच शोभून दिसत होते आणि ते जणू काय त्याच्या चेहऱ्याच्या सौदर्याची जाहिरातहि करीत होते व त्या सौंदर्याची पूर्ततादि करीत होते. रुंद छाती, भरपूर उंची, प्रमाणबद्ध अवयव, चेहऱ्यावर अभावित समाधानाचे स्मित सदैव विलसत असलेलें, असा हा इसम शिखान गावच्या पुरुषाचा कर्दनकाळ आणि स्त्रियांच्या गळ्यातला ताईत होता. तो दिवसाचा बहुतेक वेळ कुठे तरी पडून राहून घालवीत असे. त्याला पडावयाला कसलीहि जागा चालत असे, मात्र तिथे भरपूर उन्हें असली म्हणजे झालें. आणि तिथे आपला अजस्र देह आळसटपणे टाकून देऊन तो ताज्या हवेचें व प्रकाशाचें सेवन करीत राही; त्याच्या जोरदार समधात श्वासानें त्याची दणकट छाती खालींवर होत असे.

त्याचें वय पचवीस वर्षांचें होतें. तो तीन वर्षांपूर्वी प्रोम्झिनो*येथून गोदी कामगाराच्या एका टोळीबरोबर इथे आलेला होता. आणि नदींतील माल वाहतुकीचा मोसम संपल्यावर तो हिंवाळ्यात इथेंच राहिला. आपल्या सामर्थ्याच्या व सौंदर्याच्या जोरावर आपल्याला काम न करताच सुखानें कालक्रमणा करता येईल असा हिशेब करूनच त्यानें इथला मुक्काम लांबविलेला होता. आणि अशा रीतीनें तो केवळ शेतकरी व गोदी कामगार न राहता शिखान गावच्या फेरीवाल्या बायाचा, दुकानदारणीचा व इतर स्त्रियाचा लाडका झालेला होता. या घऱ्यात त्याला अन्न, वोडका दारू व तंबाखूचा पुरवठा हवा तेव्हा तितका मिळत असे; आणि त्याला आणखी काहींच नको असे; आणि म्हणून त्याचे दिवस मजेत चाललेले होते.

त्याच्या पायीं बाया एकमेकींना शिव्या देत असत, त्याच्यावरून त्याच्या मारामाऱ्या होत असत, बायकाशीं त्याचे चालू असलेले चाळे त्या आपसातील हेवेदावे उगविण्यासाठीं नवरे लोकाच्या कानावर घालत असत, आणि याच्या परिणामीं त्या बायकाना नवरे निर्दयपणें मारहाण करीत असत. या सगळ्या प्रकाराचें आर्त्योमला काहींच वाटत नसे; तो उन्हाची ऊब घेत राहिलेल्या माजराप्रमाणें हातपाय ऐसपैस पसरून पडलेला असे; त्याच्या भावना उद्दीपित करणाऱ्या चार दोन वासनापैकीं एखाद्या

*प्रोम्झिनो—सिंबीर्स्क प्रांतातील एक खेडें. वोल्गा नदीवरील बंदरांतून काम करणारे सर्वांत जास्त दणगट गोदीकामगार याच खेड्यातले असत.

वासनेकडून आपल्याला चालना केव्हा मिळते याची वाट पाहात तो तसाच पडून राहात असे.

रस्त्याला लागून असलेली टेंकडी हीच त्याची विश्रातीची ठरलेली जागा असे. त्याच्या थेट समोरून नदी वाहात होती. तिच्या पलीकडे क्षितिजापर्यंत पसरलेलीं शेतें त्याला दिसत असत. अधून मधून या शेताच्या हिरव्यागार सलग पट्टयामध्यें करड्या रगाचे ठिगळवजा भाग दिसत असत; हीं त्या भागातलीं खेडीं असत. तिथल्या त्या अफाट हिरवळींतलें वातावरण नेहमींच थड व निर्मळ असे. डावीकडे मान वळविली कीं गावचा समग्र लाबच लाब रस्ता त्याच्या दृष्टिपथात येत असे. हा रस्ता गोंगाटमय जीवनानें दुथडी भरून वाहात असे. या काळ्याभोर अस्थिर जनसंमर्दाकडे त्यानें नीट लक्षपूर्वक पाहिलें तर त्यातून ओळखीच्या आकृति त्याला निवडून काढता येत असत, रस्त्याची बुभुक्षित गर्जना त्याला स्पष्ट ऐकूं येत असे, आणि ती ऐकून त्याच्या मनात एखाद दुसरा विचारहि बहुधा डोकावून जात असे. त्याच्या या विश्रातिस्थानाभोंवतीं दाट उच्च गवत वाढलेलें होतें; चार दोन जीर्णशीर्ण बर्चवृक्षहि तिथें एकलकोंड्या व कगाल अवस्थेंत उभे होते, मुळासकट उपटलेलीं एल्डर वृक्षाचीं काहीं झुडुपेहि तिथें पडलेलीं होतीं. या ठिकाणीं मवाली लोक दारूची नशा उतरेपर्यंत झोंप काढण्यासाठीं येत असत, पत्ते खेळणे, लक्तराना ठिगळें लावणे, कामामुळें व गुत्त्यातील झगड्यामुळें आलेला शीण घालविणें, या गोष्टींसाठींहि त्याची हीच जागा असे.

या मवाली लोकामध्यें आर्त्योमची मुळींच चहा होत नसे. आपल्या अजिंक्य सामर्थ्याच्या खात्रीमुळें तो त्याच्याशी अनेकदा गुर्मीतच वागत असे, आणि त्यांत पुन्हा चरितार्थासाठींहि त्याला त्याच्या मानानें जवळजवळ मुळींच कष्ट पडत नसत. या साऱ्या गोष्टींच्या परिणामीं त्याच्या मनात त्याच्याविषयीं असूयेची भावना जागृत होत असे; आणि त्यात पुन्हा भरीला भर म्हणजे तो आपल्या लुटीमध्यें कुणालाहि वाटा असा क्वचितच देत असे. दोस्तीच्या भावनेची वाढ त्याच्या अंगीं विशेषशी झालेलीच नव्हती, आणि आपल्या बरोबरीच्या लोकाच्या संगतीची त्याला आवड अशी नव्हतीच. कुणी त्याच्याकडे येऊन बोलू लागलाच तर तो त्याच्याशीं बोलायला अगदीं

मनापासून तयार असे, पण तो आपणहून संभाषणाला सुरवात कधींच करायचा नाहीं, त्याच्याजवळ कुणी दारू पिण्यासाठीं पैसे मागितले तर तो देत असे, पण तो आपणहून कुणालाहि आपल्याबरोबर दारू प्यायला कधींच बोलावीत नसे. कोपेकभराचें खाणेंपिणे असलें तरी सगळ्यानीं मिळून करायचें अशी त्याच्या मित्रमंडळींची चाल असली तरी त्याचा खाक्या हा असा वेगळाच असे.

आर्त्योम त्या झाडाझुडुपामध्यें पडलेला असतानाच त्याच्याकडे प्रणयदूत येत असत. हें दूतकर्म शेजापाजारची एखादी घामट लक्तरी मुलगी अगर तितकाच घामट असा मुलगा करीत असे. हीं मुलें साधारणपणें अल्पवयी, म्हणजे सात-आठ वर्षांचीं असत, अगदीं क्वचित फार फार तर दहा वर्षांचीं असत. पण वयाने इतकीं लहान असूनहि या मुलाना आपल्या कामगिरीच्या महत्वाची चांगली जाणीव आहे असेंच नेहमीं आढळून येई. ही मुलें कुजबुजत्या आवाजात बोलत असत आणि याच्या चिमुकल्या कुरूप चेहेऱ्यावर गूढतेचा भाव दिसत असे.

" आर्त्योम मामा, मारीषा मावशीन माझ्याबरोबर तुम्हाला निरोप धाडलाय किनई, तिचा नवरा दूर कुठं तरी गेलाय, अन् तुम्ही एक भाड्याची होडी करून तिला रानात घेऊन जायचंय—आजच ह. "

" अहृा ! " आर्त्योम आळसटपणें हेल काढून म्हणे. आणि त्याच्या सुंदर झोंपाळू डोळ्यामध्यें स्मित झळकू लागे.

" तुम्ही हें नक्की करायचं ह "

" हो हो, नक्कीच येईन ह मी—पण हें बघ, ही मारीया मावशी कशी दिसते हें तर सांगशील ! "

" वा, वा ! ती तर गावातली एक दुकानदारीण आहे ! " प्रणयदूतानें ठपका देण्याच्या स्वरात त्याला सांगावें.

" अस्सं होय ! म्हणजे तिचं दुकान लोखंडाची मोड विकतात त्या जागेला लागून आहे तेंच कीं. "

" नाहीं नाहीं, तें दुकान तर अनिस्सा निकोलायेव्हूना हिचं आहे हो. "

" अस्सं, अस्सं. ठाऊक आहे मला. मी आपली तुझी गंमत करायची

म्हणून विचारल ह बाळ. मी कसचा विसरतों रे! मारीया माझ्या चागलीच ओळखीची आहे "

पण या प्रणयदूताला याबद्दल पक्की खात्री वाटत नाहीं; आणि आपलें काम अगदीं सदसद्विवेकबुद्धीला स्मरून केलें पाहिजे या भावनेनें हा मुलगा आर्त्योमला आणखी तपशील आग्रहपूर्वक सागतो :

" अहो तें मच्छीच दुकान आहे ना, त्याला लागून ती लहानसरशी लाल गालाची बाई बसते, तीच मारीया मावशी. "

" अगदीं बरोबर. मच्छीच्या दुकानालगतचीच ती. काय विचित्र मर्कट आहेस रे तू. मी ओळखण्यात चुकेन असं वाटल होय रे तुला? बर जा, पळ आता, आणि तुझ्या मारीया मावशीला मी येतोंय म्हणून साग. ह, पळ आतां! "

मग हा प्रणयदूत अत्यत मोहक मुद्रा करून सागतो :

" आर्योम मामा, मला एक कोपेक द्या ना. "

" एक कोपेक! अन् माझ्याजवळ तो नसला तर?" असें म्हणत म्हणतच आर्त्योम आपले दोन्ही हात विजारीच्या दोन्ही खिशामध्यें खुपसत असे. कसलें ना कसलें तरी नाणें त्याला हमखास खिशात सापडायचेंच. आनदानें हसत हसत हा प्रणयदूत भरवेगात धावत जाई आणि कलेजी विकणाऱ्या प्रणयिनीला तिचा सदेश पोंचविल्याची बातमी देई आणि आपली बक्षिशी मिळवी. या प्रणयदूताला पैशाचें मोल टाऊक असे, आणि त्याला पैशाची गरजहि असे. भूक हे या गरजेचें एक कारण होतेंच; पण दुसरे कारण म्हणजे हा प्रणयदूत सिगारेट ओढत असे, दारूहि पीत असे, आणि याचीं स्वतःचींहि लहानसहान प्रेमप्रकरणें असत. अशा प्रकारचा प्रसंग घडला म्हणजे त्या दिवशीं आर्त्योमवर बाह्य जगाचा परिणाम नेहमीपेक्षाहि कमी प्रमाणात होत असे आणि त्याच्या असामान्य पाशवी सौंदर्याच्या निर्मळ सामर्थ्याला जास्तच बहर येई.

आणि अशा रीतीनें त्याची मस्त कालक्रमणा रोजच्या रोज चालू होती. तो जवळ जवळ स्वप्नात असल्यासारखा बेभान असे. भोवतालच्या स्त्रीपुरुषाच्या असूयेची व हेवेखोर द्वेषाची त्याला मुळींच क्षिति वाटत नव्हती. त्यानें त्याना आपले शत्रूच करून ठेवलेले होते. त्याच्या मनाची

शांतता संपूर्णपणें अविचल होती. कारण स्वतःच्या जबरदस्त मनगटाचें संरक्षक सामर्थ्य तो जाणून होता.

परंतु असे असूनहि कधी कधीं या देखण्या तरुणाच्या पिंगट डोळ्यामध्यें चिंतेची काळी छटा दिसत असे. त्याच्या मखमली भुवया आकुंचित होत असत. त्याच्या श्यामल कपाळावर एक खोल आठी उमटून राही.

तो आपल्या विश्रांतिस्थानातून उठून रस्त्याकडे जाण्यासाठी निघे. त्या कोलाहलाच्या तो जसाजसा जवळ जाई, तसतशी त्याच्या डोळ्याची बुबुळें जास्त जास्त गोल होऊं लागत, आणि त्याच्या नाजुक नाकपुड्या एकसारख्या थरथरूं लागत एक जाड्याभरड्या विणीचा पिंवळा गजीफ्राक त्याच्या डाव्या खांद्यावर लटकत असे आणि त्याचा उजवा खांदा शर्टाखालीं झाकलेला असे त्याच्या आडून त्याच्या खांद्याच्या जबरदस्तपणाचा प्रत्यय स्पष्टपणें येत असे. त्याला चामड्याचे बूट आवडत नसत. तो नेहमीं गवती बूटच वापरत असे. पायमोज्याऐवजीं पायांना आडवेतिडवे गुंडाळलेले शुभ्र लिननचे पट्टे त्याच्या पायाच्या स्नायूंना उठाव आणीत असत. एखाद्या प्रचंड कोसळू घातलेल्या ढगाप्रमाणें तो मंद गतीनें चालत असे.

त्याच्या संबंधी साऱ्या गांवाला चांगल्या माहीत झालेल्या होत्या. त्याच्या चेहऱ्याकडे पाहताक्षणीं कुणालाहि तो काय करणार याचा अंदाज येत असे. "आर्त्योम आला रे!" अशी इशारेवजा कुजबुज जिकडे तिकडे ऐकू येई.

या देखण्या तरुणाला रस्ता मोकळा करून देण्यासाठीं सर्वांचीच धांदल उडत असे. टोपल्या व विक्रीसाठीं ठेवलेला माल, शेंगड्या, गरम मांस भरलेले मातीचे घडे, या वस्तू भराभर मागें ओढल्या जात, आणि खुशामतखोर स्मिताचा व अभिवादनाचा त्याच्यावर वर्षाव होत राही— सगळी वस्ती त्याला दबकून उभी असे. त्याच्या देखण्या देहाचें कौतुक व त्याच्या सामर्थ्याचें भय या संमिश्र भावनांचा प्रत्यय आणून देणाऱ्या अशा वातावरणांतून तो एखाद्या प्रचंड जंगली जनावराच्या रानटी रुबाबात तिरसट मुद्रेनिशीं मुकाट्यानें चाललेला असे.

ट्राइप मांसे, कलेजी इत्यादि पदार्थ भरलेल्या एका टोपलीला त्याचा

पाय लागून सारा माल रस्त्यावरच्या चिखलांत लडबडे. मालाचा मालक ओरडाआरडा करीत त्याला शिव्या देऊं लागे.

"तू माझ्या वाटेंत कशाला आलास?" आर्त्योमनें शांतपणें पण धमकीच्या स्वरांत विचारावें

"आणि रस्ता काय तुझ्या मालकीचा आहे होय रे ए बेला?" फेरीवाला ओरडे.

"आणि समज मला इथून जायचं असलं तर "

आर्त्योमच्या गालाच्या हाडावरील स्नायू फुगत आणि त्याचे डोळे तापवून लाल केलेल्या खिळ्यांसारखे दिसूं लागत. फेरीवाला हीं लक्षणें पाहून कुरकुरत म्हणे :

"म्हणजे तुला जायला रस्ता पुरेसा रुंद नाहीं म्हणायचा!"

आर्त्योम मंदगतीनें पुढें चालूं लागे. फेरीवाला एका खानावळींत जाऊन गरम पाणी मागून घेई, आपला माल धुवून घेई आणि पांच मिनिटांनीं तो बेंबीच्या देठापासून पुकारा करूं लागे:

"कलेजी! गरम कलेजी! खलाशीदादा! या हो! माल पण माल घ्या! पांच कोपेकला जिभेचा तुकडा! ए मावशे, ही मुडी घेऊन पहा थोडीशी! गरम कलेजी घ्या! कलेजी कुणाला पाहिजे?"

सडका माल, ब्रँडी, घाम, मासे, डांबर, व कांदे यांच्या संमिश्र दुर्गंधीनें भारावलेल्या हवेंत लोकांच्या संमिश्र आरोळ्यांचे अस्पष्ट आवाज वरखालीं होत असत. लोक रस्त्यांतून जात येत असत, वाहनांच्या वाहतुकीला अडथळा करीत असत, आपल्या मालाचा पुकारा करीत असत, खरेदी विक्री करीत असत, हसत खिदळत असत. रस्त्यांतून वर गेलेल्या धुळीचा व काजळीचा एक ढग तयार झालेला असे, आणि त्याच्या आडून आकाशाचा निळा पट्टा अंधुकसा दिसत असे. रस्त्यावरच्या घरांच्या सावल्या देखील दमट व चिखलानें बरबटलेल्या दिसत असत.

"मणी! दोरा! सुया!" ज्यूचा कर्कश पुकारा ऐकूं आला. तो आर्त्योमच्या पाठोपाठ चाललेला होता. आर्त्योमचें भय इतरांना वाटत होतें त्याच्यापेक्षांहि जास्त या ज्यूला वाटत होतें.

" लिमलेट ! हलवा ! खरीदा अन् खा ! " एक लहानसरसा मिठाई-वाला गाण्याच्या सुरात ओरडत होता.

" कांदे, हिरवे कांदे ! " आणखी एक फेरीवाला केकाटला.

" मेरय ! मेरय ! " एक लठ्ठ, गिड्डा, लालतोंड्या म्हातारा आपल्या पिंपाच्या सावलीत बसल्या बसल्या घोगऱ्या आवाजात कोकटला.

आणखी एक इसम शर्ट विकण्यात गढून गेलेला होता. याला 'लक्तऱ्या नवरदेव' असे विलक्षण टोपणनाव मिळालेलें होतें. शर्ट याच्या स्वतःच्या अंगातला होता. तो घाणेरडा असला तरी बिनफाटका होता. शर्ट घेणारें गिऱ्हाइक म्हणजे एक गोदीकामगार असून त्याच्यावर हा खात्रीच्या स्वरात ओरडत होता :

" ए मूर्खा ! वीस कोपेकला असला प्रदर्शनातला माल कुठं मिळणार रे तुला ? अरे, हा अंगात घातलास तर एखाद्या श्रीमंत व्यापाऱ्याच्या विधवेला लग्नाची मागणी घालता येईल तुला ! करोडोंवाली बया असणार ती, ए सैताना ! "

या सर्वव्यापी कोलाहलातच लहान मुलाचा स्पष्ट एकेरी आवाज एकदम घुसतो :

" ख्रिस्ताची आण आहे तुम्हाला, एक कोपेक द्या मला, आईबाप नसलेलं अनाथ लेकरू आहें मी. "

त्या रस्त्यात जमलेल्या लोकांच्या कानांना ख्रिस्ताचें नाव विलक्षण व परकें वाटतें.

" आर्त्यूशा ! इकडे ये रे ! " मांसाचें पॅटीस विकणाऱ्या दारीया ग्रोमोवाचा प्रेमळ स्वर आहे हा. हिचा सैनिक पति हिच्याजवळ नाहीं. ही चांगली भक्कम बया आहे. "कुठं लपला होतास रे ? आम्हाला विसरलास कीं काय ? "

" धंदा चांगला चालतोय ना तुझा ? " आर्त्योम तिला शांतपणें विचारतो, आणि पायानें ठोकरून तिचा सारा माल उपडा करतो. पिवळ्या रंगाचें चकचकीत पॅटीस रस्त्यावरून घरंगळत जातें. त्याच्यातून वाफा निघत असतात. आणि दारीया त्याच्याशीं मारामारी करायच्या पवित्र्यात भयंकर स्वरात किंचाळते:

" उमँट! नीच! खुनी! धरणीला तुझा भार कसा सोसवत असेल रे मेल्या! अस्त्राखानचा उट आहेस तू!"

तिच्या भोंवतालचे लोक हसतात. आर्त्योमला तिच्याकडून माफी मिळवायला कमलीच अडचण पडणार नाहीं हें त्याना ठाऊक असतें. मग तो तसाच पुढे चालू लागतो, सगळ्यांना आपल्या वाटेतून ढकलून बाजूला करत जातो, काहींना उलथून पाडतो, आणखी काहींच्या पायावर पाय देतो.

आणि तो चालला कीं "आर्त्योम आला रे!" ही इशारेवजा कुजबुज एखाद्या सापाप्रमाणे पुढे पुढे सरकत राहते.

हे तीन शब्द अगदीं पहिल्यादा ऐकणाराला सुद्धा त्याच्यातला धोका ठाऊक असतो. आणि या देखण्या तरुणाची दणगट देहयष्टि भीत भीत व आश्चर्यानें निरखून पाहात पाहात तो आर्त्योमला वाट मोकळी करून देतो.

आर्त्योमला त्याच्या ओळखीचा एक मवाली वाटेत भेटतो. दोघे एक-मेकाना अभिवादन करतात, आणि आर्त्योम या दोस्ताचा हात इतक्या जोरात दाबतो की तो कळवळून ओरडतो व आर्त्योमला शिव्या देतो. मग आर्त्योम आपल्या पोलादी पज्यानें त्याचा खादा पकडतो, अगर त्याला दुखवायची आणखी कसली तरी युक्ति शोधून काढतो आणि हें सगळे चालू असताना त्याच्याकडे शातपणें पाहात राहतो. त्या दोस्ताचा जीव अर्धा होतो व तो कळवळून ओरडतो, कण्हतो, आणि गुदमरलेल्या स्वरात ओरडून सागतो:

" ए नीच मागा! सोड मला!"

पण हा मांग न्यायाधीशाइतकाच कठोर आहे.

केन कितीदा तरी या राक्षसाच्या राकट हातात सापडलेला होता. एखादे चौकस मूल एखाद्या कीटकाशीं जसें खेळतें तसा हा राक्षस त्याचा खेळ करीत असे.

या पहिलवानाचें हें विशिष्ट व आनिर्वचनीय वर्तन "आर्त्योमचा हल्ला" या नांवानें शिखान गावीं लोकांना माहीत झालेलें होतें. या वर्तनापायीं त्यानें अनेक लोकाचें वैर संपादन केलें होतें. पण या वैऱ्यानीं कितीहि जगजंग पछाडलें तरी त्याना याचें अतिमानुष सामर्थ्य नष्ट करतां येत नव्हतें.

अशाच एका प्रसंगीं सात दाडगेश्वरानीं शेजारपाजारच्या साऱ्या लोकाच्या संमतीनें आर्त्योमला बराच काळ गप्प बसविण्याजोगा जबरदस्त धडा शिकविण्याचा बेत केला.

या भानगडींत सातापैकी दोघाना सौदा भलताच महाग पडला. बाकीच्याचें थोडक्यावर निभावलें. आणखी एका प्रसगीं काहीं दुकानदारानीं आपल्या बायकाशीं आर्त्योमनें चालविलेल्या दुर्वर्तनावर चिडून एका खाटकाला पैसे देऊन हाताशी धरलें. सर्कशीतल्या पहिलवानाशीं कुस्त्या खेळून या खाटकानें कित्येकदा विजय मिळविलेला होता. अशा या खाटकानें बऱ्याच मोठ्या बक्षिसाच्या मोबदल्यात आर्त्योमला अर्धमेला होईतों मारण्याचें काम पतकरलें. मग या दोघाची जुपली. आर्त्योमला मारामारींत भाग घेण्यात "फारच मौज" वाटत असे. त्यानें त्या खाटकाचा हात निखळला आणि त्याच्या काळजाच्या खालच्या अगाला असा जबरदस्त गुद्दा लगावला की खाटीक बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळला. या पराक्रमाच्या योगानें आर्त्योमच्या इभ्रतींत वाढ होत असली तरी साहजिकच त्याच्या शत्रूच्या संख्येंतहि भर पडत होती.

त्याचे "हल्ले" पूर्ववत चालूच राहिले, आपल्या वाटेत जें जें काय येईल तें तें सारे चिरडून टाकायचा क्रम त्यानें चालूच ठेवला. अशा या वर्तनामध्यें त्याच्या कोणत्या भावना व्यक्त होत होत्या ? हा रानावनातला मूळचा रहिवासी आपल्या नैसर्गिक वातावरणाला पारखा झाल्यामुळें शहरावर व शहरी जीवनावर अशा रीतीनें सूड तर नसेल ना घेत ? सारा गाव आपला आस्ते आस्ते नायनाट करायला टपलेला आहे याची त्याला कदाचित अंधुक जाणीव झालेली असावी. या जाणिवेच्या विषानें त्याचें शरीर व मन भारावलें जात असे, आणि या भावनेनेच तो आपल्याला काबूत आणू पाहणाऱ्या घातकी शक्तींविरुद्ध आपल्या स्वाभाविक प्रेरणेनुसार लढत असे...त्याच्या या "हल्ल्या" पायीं त्याला कधीं कधीं पोलिस चौकींत जावें लागत असे. तिथें शिखानमधील इतर नागरिकाच्यापेक्षा त्याला जास्त चागली वागवणूक मिळत असे; पोलिसाना त्याच्या अचाट सामर्थ्याचें आश्चर्य वाटत असे व त्याच्या योगानें ते आपली करमणूक करून घेत असत. तो चोर नव्हता हें त्याना ठाऊक होतें—चोरी करण्यासाठीं

लागणारी हुशारी त्याच्या अंगी पुरेशा प्रमाणात नव्हती; मात्र अनेकदा असा प्रकार होत असे कीं त्याचा "हल्ला" आटोपल्यावर तो गुत्त्यात शिरत असे आणि तिथे त्याची एखादी प्रियतमा त्याच्यावर आपल्या प्रेमाची पाखर घालत असे. असल्या प्रकारानंतर त्याची झटका आल्याप्रमाणें तंद्री लागत असे. त्याच्या डोळ्यामध्यें एक प्रकारचा पिसाटपणा दिसू लागे आणि त्याची चर्या निश्चल झाल्यामुळें तो वेड्यासारखा दिसे. मग एखादी दुकानदारीण या रानटी पशूला आपल्या ताब्यात घेत असे आणि त्याची सेवाचाकरी करी. या बाईच्या अंगात चर्बी ठासून भरलेली असे, फ्रेंच कादंबरीकार बाल्झॅक यानें अनेक कथातून गौरविलेल्या वयाची ही दणगट बाई असे. त्याचे लाड करता करता तिला मनातल्या मनात त्याचें थोडेसें भयहि वाटत असे.

"आर्त्येशा, तुला आणखी दोन ग्लास बीर मागवू का? का दारू मागवू एखादा ग्लास? अन् तू थोडसं खाणार नाहींस का? आज तुझा जम नीट बसलेला दिसत नाहीं."

"मला त्रास नको देऊस," आर्त्योम तिला जड आवाजात सांगे. काहीं मिनिटें ती त्याला तसाच पडून राहू देई आणि मग पुन्हा त्याला ग्लासा-मागून ग्लास दारू पाजू लागे. कारण तो शुद्धीवर असताना तिचे लाड करण्याच्या बाबतींत हात आखडता घेतो हे ती जाणून असे.

आणि आता दैवाची लहर अशी लागली की केन आणि आर्त्योम या दोघाना एकत्र आणावे. दैवाला अशा खोड्या करण्याची भारी आवड असतेच म्हणा.

. . . . . . .

हा प्रकार असा घडला.

आर्त्योमने आपला नेहमींचा एक "हल्ला" पूर्ण केल्यानंतर यथास्थित भोजन झोडलें आणि मग तो व त्याची सहचरी अशीं दोघे मिळून झुकांड्या खात खात तिच्या घरीं मुक्कामाला गेली. त्याच्या या सहचरीचें घर एका अगदीं एकीकडे असलेल्या उपनगरातील अरुंद गल्लींत होतें. पण तिथें लोक त्याच्यावर हल्ला करण्यासाठीं दबा धरून बसलेले होते. कित्येक लोकानीं त्याच्यावर झडप घातली आणि तत्क्षणीं त्याला खालीं पाडलें. दारू पिण्याने

दुर्बलता आल्यामुळें त्याला स्वतःचें सरक्षण करणे अशक्य झालें, आणि मग या लोकानीं, आपल्यावर आजवर त्याच्याकडून झालेल्या असंख्य अत्याचाराचा सूड जवळजवळ एक तासभर घेतला.

आर्त्योमची सहचरी पळून गेली, रात्र अधारी होती आणि ती जागा ओसाड होती. आर्त्योमचा हिशेब चुकता करण्यासाठीं या मारेकऱ्याना हवी तेवढी भरपूर फुरसत मिळाली, आणि त्यानीं हात आखडता न घेता आपलें काम चालू ठेवलें. शेवटीं खूप थकवा आल्यावर त्यानीं मारहाण बद केली. होन निश्चेष्ट देह तिथे जमिनीवर पडून होते त्यातला एक होता आर्त्योमचा आणि दुसरा होता 'लाल्या गुड' या नावानें परिचित असलेल्या इसमाचा.

या दोघाची विल्हेवाट करायचा सर्वोत्तम मार्ग कोणता याविषयीं सगळ्यानीं मिळून वाटाघाट केल्यावर या लोकानी असे ठरविलें कीं आर्त्योमचा देह एका जुन्या पडावात लपवून ठेवायचा. हा पडाव बर्फा-मुळे नादुरुस्त झालेला होता आणि नदीकाठीं पालथा करून ठेवलेला होता. 'लाल्या गुड' अजून कण्हत होता, म्हणून त्यानी त्याला आपल्याबरोबर नेण्याचें ठरविलें.

नदीकाठाकडे दरदरा ओढून नेला जाताना जे क्लेश झाले त्यामुळे आर्त्योम पुन्हा शुद्धीवर आला, पण मेल्याचें सोंग करणे हाच उत्तम मार्ग आहे असा विचार करून त्यानें विव्हळायची आलेली उमका दाबून टाकली. त्यानीं त्याला हवा तसा ओढला, त्याच्यावर शिव्याशापाचा वर्षाव केला, व आपण किती किती रट्टे लगावले याची प्रत्येकाने इतराना प्रौढी सागितली. आर्त्योमने हें सगळें ऐकलें. मिश्का वाविलोव सागत होता: 'मी त्याच काळीज फोडायसाठीं त्याच्या स्कधास्थीखालीं लाथा मारायचा एकसारखा प्रयत्न चालविला होता.' सुखोप्लुयेव म्हणाला: "मी त्याच्या पोटावर नेम धरून त्याला मारत होतों, कारण आतड्याना जर का एकदा इजा झाली तर कितीहि अन्न खाल्ले तरी माणसाचें पोषणच होत नाहीं आणि तो खचत जातो." लोमाकिन म्हणाला: "मीहि आर्त्योमच्या पोटावर दोनदा उड्या मारल्या." थोडक्यात सागायचें म्हणजे त्याच्यापैकीं प्रत्येकाने सारख्याच प्रमाणात पराक्रम गाजविलेला होता; पडावाजवळ पोंचेपर्यंत त्याचें संभाषण याच विषयावर चाललेलें होतें. शेवटीं त्यानीं

आर्त्योमचा देह पडावाखाली ढकलून दिला. त्याचे हे बोलणें आर्त्योमने अथपासून इतिपर्यंत ऐकलें.

'हा पुन्हा कधीं उठेल ही शंकाच नको' अशी या मारेकऱ्यानीं जाता जाता एकमेकाची खातरजमा केलेलीहि आर्त्योमनें ऐकलेली होती.

आणि आता तो एकटाच अंधारात कचऱ्याच्या ओल्या ढिगावर पडावाखाली पडून होता. हा कचरा नदीच्या पुराबरोबर वाहून आलेला होता. ही मे महिन्यातली शीतल रात्र होती, आणि ताज्या हवेच्या सेवनानें तो अधून मधून शुद्धीवर येत होता. परंतु त्यानें खुरडत खुरडत नदीकडे जाण्याचा प्रयत्न करताच त्याच्या सर्वांगांतून इतक्या भयंकर कळा आल्या की तो पुन्हा बेशुद्ध झाला. या वेदना चालू असतानाच तो पुन्हा शुद्धीवर आला. आता तो तहानेनें व्याकुळ झाला. नदीचें पाणी त्याच्या अगदीं नजीक किनाऱ्यावर धडका देत असलेले त्याला ऐकू येत होतें. त्याला हालचाल करायची ताकद नव्हती म्हणून नदी जणू काय त्याला वेडावीत होती. तो अशाच स्थितींत तिथे रात्रभर पडून राहिला. त्याला कण्हायची अगर थोडीशीसुद्धा हालचाल करायची भीतीच वाटत होती.

शेवटीं, तो पुन्हा शुद्धीवर आला तेव्हा आपल्याला बरें वाटण्यासाठीं कुणी तरी काहीं तरी केले असावे याची त्याला जाणीव आली. मोठ्या जिकिरीनें त्याला एक डोळा उघडता आला आणि आपले चिराळलेले व सुजमटलेले ओठ जरा हलवता आले. सूर्याचीं किरणे पडावाच्या फटींतून आत आलीं होतीं व त्यानीं त्याच्या सभोंवतीं संधिप्रकाशासारखा मंद उजेड पाडलेला होता. यावरून ही दिवसाची वेळ असली पाहिजे असा विचार त्याच्या मनात आला. त्यानें आपला हात कसाबसा उचलून तोंडापर्यंत नेला. आपला चेहरा ओल्या चिंध्यानीं झाकून टाकलेला आहे हें त्याला स्पर्शावरून जाणवलें. त्याच्या छातीवर व पोटावरहि ओले कपडे होते. त्याच्या अंगातले सगळे कपडे काढलेले होते आणि थंड हवेमुळें त्याला वेदनांचा त्रास कमी वाटत होता.

"मला पेय पाहिजे," कुणी तरी आपल्याजवळ असणार अशा मोघम जाणिवेनें तो उद्गारला. एक थरथरता हात त्याच्या मस्तकावरून पुढें आला आणि एका बाटलीचें तोंड त्याच्या ओठांना लागलें. बाटली धरणारा

हात इतका थरथरत होता कीं त्यामुळें आत्योंमच्या दातांवर बाटली आपटत होती. पेय पिऊन झाल्यावर आपल्याजवळ कोण आहे याविषयी आत्योंमला कुतूहल वाटू लागलें. पण मान वळविण्याच्या श्रमामुळें त्याला इतके क्लेश झाले कीं त्याला स्वस्थ पडून राहणें भाग पडलें. मग घोगऱ्या आवाजात त्याला चार दोन तुटक उद्गार काढता आले.

"ब्रँडी—मला एक ग्लासभर ब्रँडी प्यायला हवी—माझ्या अगाला ब्रँडी चोळायला हवी—मग मला बहुधा उठता येईल."

"उठता येईल? तुम्हाला उठता यायच नाहीं. बुडून मेलेल्या माणसासारख तुमच सगळ अंग काळनिळ झालय व सुजलय. ब्रँडी म्हणत असाल तर मिळेल ती—थोडीशी आहे—माझ्याजवळ एक सबध बाटली आहे."

हे शब्द घाईघाईनें, हळू आवाजात व भीतभीत उच्चारलेले आत्योंमला ऐकू आले. त्यानें आवाज ओळखला पण तो कोणत्या स्त्रीचा आहे हे त्याला आठवेना.

"मला दे थोडीशी," तो म्हणाला.

पुन्हा कुणी तरी त्याच्या डोक्यावरून हात लाब करून त्याच्या हातीं बाटली दिली. आपल्याला आत्योंमनें पाहू नये अशी या व्यक्तीची इच्छा असावीसें दिसत होते. जरा जिकिरीनेंच ब्रँडीचे घोट घेता घेता आत्योंमनें सभोंवार नजर टाकून पडावाचें काळें ओलसर बूड न्याहाळून पाहिलें. त्यावर शेवाळ वाढलेलें होते.

जवळजवळ पाव बाटली पिऊन झाल्यावर त्याला जरा बरें वाटलें; त्यानें एक खोल सुस्कारा सोडला. मग मद क्षीण स्वरांत, छातींत खड्खड् आवाज होत असतानाच, तो म्हणाला:

"या खेपेला त्यानीं मला छानच बक्षिस दिल ह—पण थाबा म्हणावं—मी यातून बरा होतों—आणि मग—दाखवतों एकेकाला!"

त्याला जबाब कसलाच मिळाला नाहीं. पण कुणी तरी आपल्यापासून अंग चोरून दूर जात असल्यासारखी किंचितशी हालचाल त्याला जाणवली आणि मग सगळें काहीं शात झालें. फक्त लाटा किनाऱ्यावर आदळल्याचा आवाज तेवढा ऐकू येत होता, आणि दूर अंतरावर कुणी तरी विव्हळण्याच्या

तालावर "दुब्रिनुष्का" हें गाणें म्हणत होता. कसलें तरी जड ओझें ओढून नेण्याचें काम चालू असावेसें दिसत होतें. मग आगबोटीची कर्कश शिटी जणू हवेची चीरफाड करीत ऐकू आली. आणि आणखी कांहीं सेकंदानीं बोटीच्या भोंग्याचा उदास आवाज त्याला ऐकू आला बोट जणू काय भूमीचा कायमचा निरोप घेत होती असें या आवाजावरून वाटत होतें.

आपल्या उद्गाराना उत्तर मिळेल म्हणून आर्त्योम बराच वेळ वाट पाहात पडून राहिला. परंतु पडावाखालच्या स्तब्धतेचा भग झालाच नाहीं. त्या पडावाचें प्रचंड, सडलेले, व शेवाळानें हिरवें झालेलें धूड आपल्या डोक्यावर खालीवर हेलावत आहे व तें जणू काय कोणत्याहि क्षणीं खाली कोसळून आपला निर्दयपणें चेंदामेंदा करून आपल्याला ठार मारणार आहे असें त्याला वाटत होते.

आर्त्योमला स्वतःबद्दल वाईट वाटलें. आपण एखाद्या लहान मुलासारखे अवळ जवळ असहाय झालों आहोंत याची त्याला एकदम जाणीव आली आणि त्याच वेळीं त्याला स्वतःच्या स्थितीचें दुःखहि वाटलें. आपण येवढे दणगट, आपण येवढे देखणे, आणि या लोकानीं आपल्याला अशा रीतीनें लुळेंपागळें व विद्रूप करावें अं! त्यानें आपले दुर्बल हात उचलले आणि आपल्या छातीवरचे व चेहऱ्यावरचे ओरखडे व सूज तो चाचपू लागला, आणि मग तो चिडून शिव्या देऊ लागला व रडू लागला.

त्यानें हुदके दिले, तो मुसमुसला, मद स्वरात शिव्या देत राहिला. त्याला आपल्या डोळ्याच्या पापण्याची हालचाल करण्याचीहि मुष्किल झालेली होती. डोळ्यात भरलेले अश्रू त्यानें पापण्या दाबून कसेबसे बाहेर काढले: हे टपोरे उष्ण अश्रू त्याच्या गालावरून ओघळले आणि त्याच्या कानात घरंगळले, आणि या अश्रूंच्या योगानें आपलें अंतरंग स्वच्छ होत आहे असे त्याला वाटू लागलें.

"अच्छा—दम धर!" तो हुदके देता देता कुजबुजला.

मग अचानक त्याला आपल्या अगदीं जवळच कुणाचे तरी हुदके व दबलेल्या स्वरातली कुजबुज ऐकू आली; कुणी तरी जणू काय त्याची नक्कलच करीत होतें.

"कोण आहे रे ?" त्यानें धमकीच्या स्वरांत ओरडून विचारलें. त्याचबरोबर, का कुणास ठाऊक, त्याला भीतीहि वाटली.

त्याच्या प्रश्नाला उत्तर कसलेंच आलें नाहीं.

मग आपली सगळी शक्ति एकवटून आर्त्योम कुशीवर वळला, वेदनामुळें तो जनावरासारखा ओरडला, त्यानें कोंपराचा आधार घेऊन मान उच केली, आणि मग त्याला अंधारात पडावाच्या कडेला एक लहानसर आकृति चेंडूसारखी मुटकळून बसलेली दिसली. ही व्यक्ति पुरुष होती; यानें आपल्या गुडघ्याना आपल्या हडकुळ्या हाताची घट्ट मिठी घातलेली होती, आपलें मस्तक गुडघ्यावर टेकलेलें होतें, आणि याचे खांदे भयकर थरथरत होते. आर्त्योमला तर तो विशीच्या आतला पोऱ्या असावासें वाटलें.

"इकडे ये," आर्त्योम म्हणाला.

पण तो जागचा हलेचना; तो ताप आल्यासारखा थरथर कापतच राहिला.

या आकृतीला पाहून आर्त्योमच्या डोळ्यात दु:खाची व भीतीची भावना दिसू लागली आणि तो ओरडून म्हणाला:

"ये इकडे !"

पण त्या व्यक्तीनें येण्याऐवजीं थरथर कापतच भराभर बोलायला सुरवात केली.

"मी तुमच काय नुकसान केलय ? तुम्ही माझ्यावर का ओरडता ? मीच तुमच्या जखमा धुवून तुम्हाला पेय नाहीं का दिल ? मी तुम्हाला ब्रँडी नाहीं का दिली ? तुम्ही रडलात तेव्हा मी नाहीं का रडलों ? तुम्ही कण्हत होता तेव्हा मला दु.ख नाहीं का झाल ? अरे देवा रे ! मी कुणाच चांगलं केलं तरीसुद्धां त्याच्या बदल्यात दु:खच माझ्या वाट्याला येत. तुमच्या शरीराला अगर आत्म्याला मी अस काय पाप दिलय हो ! माझ्या हातून तुमचं कोणत्याहि रीतीन वाईट कस होणार ?"

बोलतां बोलतां हुदके येऊन त्यानें बोलणे एकदम बद केलें आणि तो अधिक काहीं बोलला नाहीं.

त्यानें जमिनीवर बसल्याबसल्या आपलें मस्तक दोन्ही हातांनीं धरलें आणि तो डोलू लागला.

" म्हणजे तू केन आहेस तर, होय ना ? '

" म्हणून काय झाल ? केनच आहे मी. "

" तूच ? म्हणजे तूच हें सारं केलस ? अच्छा, अच्छा ! मग इकडे ये कीं रे. ए विचित्र प्राण्या, इकडे ये असा ! "

आर्त्योमला आश्चर्याचा मोठाच धक्का बसला आणि त्याच वेळीं त्याच्या मनात जवळ जवळ आनंदासारखीच भावना जागृत झाली. हा ज्यू भीतभीत आपल्याकडे रागत येत आहे, आपल्या पूर्ण परिचयातली याची विचित्र चर्या, याचे बारीक डोळे अस्वस्थपणें भिरभिरत असलेले,—हे दृश्य पाहून आर्त्योमला हसूहि येऊं लागलें.

" भिऊं नकोस ! तुझ्या अंगाला धक्का लावणार नाहीं अशी मी शपथ घेतों ! " या ज्यूची खातरजमा करणें आवश्यक आहे हें त्याला दिसलेंच.

केन रागत रागत पुढें आला; मग थांबला, वर मान करून त्यानें लाचार भेकड स्मित केलें. भीतीनें आकसलेलें आपलें चिमुकलें शरीर हा आता पायांखालीं तुडवणार असाच जणू त्यानें अंदाज केला असावा.

" म्हणजे तो तूच आहेस तर ! तू हें सगळ माझ्यासाठीं केलस ! अन् कुणी धाडल तुला ?..... आन्फिसान ? " आर्त्योमनें विचारलें. त्याला जीभ हालवायची मुष्किल झालेली होती.

" मी आपणहून आलों. "

" आपणहून आलास ? खोट बोलतोस तू ! "

" मी खोट नाहीं सांगत ! खरच सागतोंय मी ! " केन भराभर कुजबुजत उत्तरला. " मी आपणहूनच आलों. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा तुम्ही ! हा प्रकार कसा घडला तें सार सागतों मी तुम्हाला. हें प्रकरण ग्राबिलोवस्का हॉटेलात माझ्या कानीं आल. मी चहा पीत होतों आणि लोकांच्या तोंडचे हे उद्गार मी ऐकले : ' काल रात्रीं त्यानीं आर्त्योमचा निकाल लावला. ' माझा यावर विश्वास बसला नाहीं. तुमचा निकाल लावण शक्य तरी आहे का ? मी माझ्या मनाशींच हंसलों. मी मनात म्हटल : ' काय मूर्ख आहात बेटयानो ! हा माणूस म्हणजे सॅम्सन आहे, याचा निकाल लावायची तुमच्यापैकीं कुणाची ताकत आहे ? ' पण प्रथम एक, नतर दुसरा, असे एकामागून एक आत येऊन तीच तीच गोष्ट सागू

लागले. ' त्याचा निकाल लागला आतां ! ' ' त्याचा निकाल लागला आता ! ' त्यांनीं तुम्हाला शिव्याशाप दिले, आणि ते हंसले—प्रत्येक जण खुषींत आला —आणि शेवटीं मला हें खरं मानणं भाग पडलं. मग मला कळलं कीं तुम्ही इथं आहात. त्यांच्यातले कांहीं जण अगोदरच इथं येऊन तुम्हाला पाहून गेलेले होते, आणि तुम्ही मेलात म्हणून ते सांगत आले. मग मी स्वतः आलों, अन् तुम्हांला पाहिलं... ..मी तुमच्याजवळ उभा राहिलों तेव्हा तुम्ही कण्हत होतां. मी तुमच्याकडे पाहतां पाहता मनाशीं म्हणालों : ' अन् त्या लोकांनीं याचा निकाल लावला अं !—जगातला सगळ्यात जास्त ताकतवान माणूस हा !—काय ताकत, काय ताकत ! ' मला तुमची दया आली—माफ करा हं मी असं म्हणतों याबद्दल ! मी विचार केला, तुमच्या जखमा धुतल्या पाहिजेत—आणि तसं केलं मी—आणि पाण्याच्या स्पर्शानं तुम्ही परत शुद्धीवर आलात. हें पाहून मला किती आनंद झाला म्हणून सांगू ! तुम्हाला माझं म्हणणं खरं वाटत नाहीं हे ठाऊक आहे मला. का ? कारण मी ज्यू आहे. असंच ना ? पण असं नका करू माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवाच तुम्ही. मला इतका आनंद का झाला तें सांगतों मी तुम्हाला. त्या वेळीं माझ्या मनात काय काय विचार आले ते सारे सांगतों मी—मी तुम्हाला खर तेंच सांगेन—तुम्ही माझ्यावर रागावणार नाहीं ना ? "

" हें बघ, मी ही क्रुसाची आकृति करतों ! तुझं बोलणं खर मानलं नाहीं तर स्वर्गींचं वज्र मला ठार करो ! " आर्त्योमनें चीत होऊन उत्साहानें शपथ वाहिली.

केननें जरा त्याच्या जवळ सरकून आपला आवाज आणखीच बारीक केला :

' मी किती छान जिणं जगतों ते ठाऊक आहेच तुम्हाला—तुम्हांला आहेच ठाऊक; होय ना ? माफ करा हं मला—तुमच्या हातचे रट्टे मी सोसले आहेत ना ? या घामट ज्यूकडे पाहून तुम्ही कितीदा तरी हंसला आहांत ना ? काय ? खरं आहे ना हें ? मी खर सांगितलं तर मला क्षमा करालच तुम्ही, तशी तुम्ही शपथच घेतली आहे. रागावू नका हं—माझं म्हणणं येवढंच कीं इतरांप्रमाणंच तुम्हीहि या ज्यूला छळलंत. अन् कां ? हा ज्यू तुमच्या देवाचा पुत्र नव्हे का ? ज्या देवानं तुम्हांला तुमचा आत्मा दिला,

त्याच देवानं मला माझा आत्मा दिलेला आहे ना ?" केन भराभर बोलत होता. उत्तराची वाट न पाहता तो प्रश्नामागून प्रश्न विचारत होता. त्याला शब्द भराभर सुचत होते. आतांपर्यंत झालेले सारे अपमान, सारे अत्याचार, याच्या आठवणीनें त्याचें अंतःकरण एकदम भरून आलें आणि त्यातून जळजळीत शब्दाचा लोंढा वाहू लागला.

आर्त्योमला अस्वस्थता वाटू लागली.

'ऐक रे, ए केन," त्यानें सांगितलें. "तें सगळ राहू दे! मी जर कधीं तुला नुसत बोट लावल तरी मला शाप दे तू—आणि जर दुसऱ्या कुणी तुला धक्का लावला तर मी त्याला उभा चिरून त्याचे तुकडे तुकडे करीन! समजल का तुला ?"

"अहहा!" केन विजयभरात उद्गारला आणि त्यानें जिभेची मचमच सुद्धा केली. "बघितलत! तुम्ही माझ्यासमोर गुन्हेगार ठरलात—माफ करा ह! तुम्ही माझ्यासमोर गुन्हेगार ठरलात हें तुम्हाला कळल म्हणून तुम्ही माझ्यावर रागावू नका ह! पण इतरापेक्षा तुमचा अपराध कमी आहे हें मात्र मी जाणून आहे ह, याबद्दल माझी खात्रीच आहे मुळीं! मला समजत हें! इतर लोक माझ्यावर आपला घाणेरडा पिंक थुंकण्या-खेरीज दुसर कांहीं करतच नाहींत. तुम्ही सुद्धा माझ्यावर थुकतांच, पण तुम्ही त्याच्यावरहि थुकता. तुम्ही माझ्याशीं वागता त्यापेक्षाहि त्याच्याशींच जास्त क्रूरपणान वागता अन् मग मी माझ्या मनाशीं असा विचार करतों: 'हा राक्षस माझा अपमान करतो, मला मारहाण करतो, तो मी ज्यू आहें म्हणून नव्हे; तर मी इतराच्या सारखाच आहे, मी इतराच्यापेक्षा जास्त चांगला नाहीं, अन् मी त्याच्याच संगतींत राहतों म्हणून हा मला मारहाण करतो.' अन्..मला तुमच्याविषयीं सतत आपलेपणा वाटत राहिलेला आहे; पण माझ्या या आपलेपणात भीतीच मिश्रण असे. मी तुमच्याकडे पाहिल कीं मला वाटत असे: 'या माणसाला सिंहाचा जबडा फाडतां येईल अन् हा फिलिस्टाइन लोकाना यमसदनाला पाठवायला समर्थ आहे! तुम्ही इतराना कशी मारहाण करीत होता तें मी पाहिलय अन् तुमच्या त्या वेळच्या उत्साहाच मी कौतुक केलय; अन् मला सुद्धा ताकतवान व्हावसं वाटत असे, पण मी म्हणजे नुसत चुगुरट आहे."

आर्त्योम घोगऱ्या स्वरांत हंसला.

" खर आहे—तू आहेस खरा धुंगुरट्यासारखा."

केनचें सगळें बोलणें त्यानें ऐकलेंच नाहीं, पण या ज्यूची चिमुकली आकृति आपल्याजवळ आलेली पाहून त्याला मौज वाटत होती. आणि केन जेव्हा उत्साहाच्या भरांत कुजबुजता कुजबुजतां भरकटत चालला तेव्हा आर्त्योमच्या मनात अनेक विचार हळूहळू येऊन गेले.

" किती वाजले असतील कोण जाणे—दुपारचा सुमार असावा बहुधा. अन् या बायांपैकीं एकदेखील आपल्या प्रियकराला भेटायला आलेली नाहीं. पण हा ज्यू—हा मात्र आला—अन् यान मला मदत केली, अन् माझ्याविषयीं स्वतःला आपलेपणा वाटतो अस हा सांगतो—अन् मी याला कितीदा तरी मारहाण केलीय, याचा अपमान केलाय, तरी देखील हा असं सांगतो ! अन् हा माझ्या ताकतीचा गौरव करतो ! ही ताकत माझ्या अंगात परत येईल का ? देवा रे, ही ताकत परत माझ्या अंगात आली तर काय बहार होईल म्हणून सांगू ! "

आर्त्योमनें एक खोल सुस्कारा सोडला. या वेळीं त्याच्या अंगाला सूज येऊन तो पडलेला होता, तरी देखील तो आपण आपल्या शत्रूंना चोप दिल्यावर त्याची अवस्था कशी झाली असेल याची कल्पनाचित्रे रंगवू लागला. आणि तेहि कुठें तरी असहाय स्थितींत पडलेले असणार; पण त्याची काळजी घ्यायला हा ज्यू नसून त्याचे स्वतःचे दोस्तच आले असणार.

आर्त्योमनें केनकडे पाहिलें. आणि आपल्या मनातल्या विचारानीं आपल्या तोंडात व घशात एक प्रकारचा कडवटपणा आणला असें त्याला वाटू लागलें.

तो थुंकला आणि त्यानें एक जड निःश्वास सोडला.

आणि केन उत्साहाच्या भरात तोंड वेडेंवाकडें करीत एकसारखा बोलत राहिला; बोलताना त्याचें सर्वांग थरथरत होतें :

" अन् तुम्ही रडलात......तेव्हा मीहि रडलों......तुमच्या गेलेल्या ताकतीबद्दल दया येऊन रडलों मी."

"अन् मी समजलों कुणी तरी माझी नक्कल करतय," आर्त्योम उदासपणें स्मित करीत म्हणाला.

" मला तुमच्या ताकतीबद्दल नेहमींच आपलेपणा वाटत असे. आणि मी देवाची प्रार्थना केली: 'हे देवा! स्वर्गातील व पृथ्वीवरील अमर परमेश्वरा! या ताकतवान् माणसाला माझी गरज लागेल असा बनाव घडवून आण! माझ्या हातून याची सेवा घडू दे आणि याच्या सामर्थ्याच मला संरक्षण मिळू दे! मी जो सतत छळ सोसतोंय त्याच निराकरण याच्या सामर्थ्यान होऊ दे, आणि याच्या सामर्थ्याच्या योगान माझ्या शत्रूचा नाश होऊ दे!' अशी माझी प्रार्थना असे, आणि ती मी सतत करीत राहिलों. माझ्या सगळ्यात मोठ्या शत्रूला माझा रक्षणकर्ता कर अस मी परमेश्वराजवळ मागणं मागत राहिलों. परमेश्वरान अनेक राष्ट्राचा विजेता राजा हा जसा मोर्डेकायला रक्षणकर्ता म्हणून मिळवून दिला तसं त्यान तुम्हाला माझा रक्षणकर्ता कराव अशी मी प्रार्थना करीत राहिलों. आणि तेवढ्यात तुम्ही रडू लागलात, आणि मीहि रडलों; पण तुम्ही एकाएकीं माझ्यावर ओरडलात, आणि माझी सारी प्रार्थना कुठच्याकुठ गडप झाली."

" अरे, काय विचित्र प्राणी आहेस रे तू? मला हें कळायला काहीं मार्ग होता का?" आर्त्योम म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावरचें स्मित अपराधीपणा दर्शवीत होतें.

पण केननें त्याचे उद्गार ऐकले असतील का नाहीं कोण जाणे. तो मागेंपुढें झोंके खात, हातवारे करीत, एकसारखा कुजबुजत राहिला. त्याची ही पडत्या स्वरातली कुजबूज चालूच राहिली, तिच्यात भावनेची तीव्रता, आनद व आशा, या पगू झालेल्या माणसाच्या सामर्थ्याचा गौरव, भीति व दुःख, अशा अनेक छटाचें अस्तित्व जाणवत होतें.

" अखेर शेवटीं माझ्या भाग्याचा दिवस आला—आणि इथ माझी व तुमची गाठ पडली....त्या साऱ्यानीं तुम्हाला सोडून दिलय—पण मी—मी आलों...आर्त्योम, तुम्ही बरे व्हाल ना? तुम्हाला गभीर स्वरूपाची इजा मुळींच झालेली नाहीं, होय ना? अन् तुमची ताकत पूर्ववत होईल ना?"

" भिऊ नकोस, मी पुन्हा पहिल्यासारखा नक्कीच होईन ह!...अन् तुझ्या या चांगुलपणाची फेड म्हणून मी तुझी एखाद्या लहान मुलासारखी काळजी घेईन."

आर्त्योमला आस्ते आस्ते बरें वाटूं लागलें; त्याच्या डोक्यातल्या वेदनांची तीव्रता कमी झाली, आणि त्याचें मन जास्त स्वच्छ झालें. तो मनाशीं म्हणाला: " मला केनचा कैवार घेतलाच पाहिजे. का घेऊ नये मी ? तो किती प्रेमळ अन् प्राजळ आहे, त्याच बोलण किती सरळ अन् मनमोकळ आहे. " हा विचार मनात आला तेव्हा त्याला अचानक हसूच आलें. आपल्याला काहीं तरी हवे आहे अशी मोघम जाणीव त्याला बराच वेळ होत होती, आणि तें काय आहे हें आता त्याला कळलें.

" मला भूक लागलीय ! केन, मला काहीं तरी खायला आणून देता येईल तुला ? " केननें इतक्या तडकाफडकीं उडी मारली कीं पडावाच्या लाकडावर त्याचे डोके जवळ जवळ आपटलेंच. त्याच्या चर्येत एकदम परिवर्तन झालें. तिच्यावर उत्साह विलसू लागला, त्याचबरोबर एक प्रकारची बालिश व पोरकट भावना त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागली. आर्त्योम म्हणजे प्रख्यात पहिलवान, आणि यानें आपल्याजवळ—केन-जवळ काहीं तरी खायला मागावे अ !

" मी तुमच्यासाठीं सार काहीं करीन. तुम्हाला काहीं एक कमी पडू देणार नाहीं. सगळ या इथल्या कोपऱ्यात तयार आहे. मीच करून ठेवलय तें. मला ठाऊक आहे हें......माणसं आजारी असली म्हणजे त्यानीं काहीं तरी खायला पाहिजे—ठाऊक आहे मला हें—अन् म्हणून मी येता येता एक सबध रूबल खर्चून हे खायचे जिन्नस आणले. "

" आपण आपला हिशेब मागाहून करू ह. मी तुला एकाच्या बदल्यात दहा रूबल देईन. मला शक्य आहे तें—पैसे माझे नसले तरी मी नुसते ' दे ! ' असं म्हणायचा अवकाश, कीं मला हवे तेवढे पैसे मिळतील."

तो खुशींत येऊन हसला आणि त्याचें हें बोलणे ऐकून केनला खूपच आनंद झाला व तोहि खुषींत आला.

" तें सार मला ठाऊक आहे ! आता तुम्हाला हवय काय तें सागा मला. मी तमच्यासाठीं काय वाटेल तें करीन--अगदीं काय वाटेल तें ! "

" अच्छा ! मग कर सुरवात. प्रथम माझ्या अंगाला वोडका चोळ. मला काहीं एक खायला देऊ नकोस. प्रथम अंग चोळ माझ. तुला जमेल का तें ? "

" का नाहीं जमणार ? तुम्ही बघालच कीं आतां. मी हें काम एखाद्या उत्कृष्ट डॉक्टरासारख करून दाखवीन. "

" मग कर सुरवात ! माझं अंग चोळ म्हणजे मग मी उठून बसेन. "

" उठून बसायच म्हणता ! छे छे ! तुम्हाला तें जमलेसं मला नाहीं वाटत. "

" तुला नाहीं वाटत ? ठीक, बघच आता तू मी रात्री इथच राहणार आहे असं वाटतय तुला ? काय विचित्र जिवाणू आहेस रे तू ! आधीं माझं अंग चोळ, अन् मग, उपनगरात बेकरीवाली मोकेवूना आहे ना, तिच्याकडे जा, अन् तिला साग कीं मी तिच्या झोंपडींत राहायला येणार आहे तिला झोंपडीत थोडा पेढा पसरून ठेवायला साग तिथ मी बरा होणार आहे. तुझ्या कष्टाबद्दल तुला भरपूर मोबदला मिळेल ह, तू मुळींच धास्ती बाळगू नकोस. "

" तुमच्या शब्दावर विश्वास आहे माझा, " आत्यॊमच्या छातीवर वोडका ओततां ओतता केन म्हणाला. "माझ्या स्वतःपेक्षाहि माझा तुमच्या-वरच जास्त विश्वास आहे. अहो, मला तुमचा स्वभाव ठाऊक आहे ! "

" अयाई ! अयाई ! चोळ, चोळ ! मला दुखल तरी हरकत नाहीं. चोळत रहा. अयाई ! अयाई ! इथ ! इथ ! . . . तिथ ! . . . . . ह अयाई ! अयाई ! " आत्यॊम ओरडत राहिला.

" तुम्हांला खूष करायसाठीं मी पाण्यांत उडीसुद्धा घेईन "—केननें आपली आत्मसमर्थनपर बडबड चालूच ठेवली.

" बरोबर आहे ! आता खाद्यावर ! आणखी जोरात ! नीच सैतान लेकाचे ! मला धडा शिकवला साल्यानीं ! अन् हें सार एका बाईच्या पायीं घडलं. बाई जर नसती तर मी शुद्धीवर राहिलों असतों, अन् मी शुद्धीवर असलों म्हणजे माझ्या अंगाला एकदा हात लावून बघाच म्हणाव. "

" बाया ! " केन उत्तरला. त्यानें आता आत्यॊमच्या सेवेकऱ्याची भूमिका अगदीं पक्कीच पतकरली म्हणायची. " या बाया म्हणजे जगांतल पापच. आम्हा ज्यू लोकांची एक रोजची प्रार्थना असते ती अशीः ' धन्य तुझी हे अमर परमेश्वरा ! हे विश्वचालका ! तूं मला स्त्रीच्या जन्माला घातल नाहींस याबद्दल तुला धन्यवाद असोत ! ' "

"खरं आहे हें?" आर्त्योम हंसत उद्गारला. "असल्या प्रकारची प्रार्थना खरोखरीच तुम्ही लोक म्हणता? काय विलक्षण लोक आहात रे तुम्ही! तसं म्हटल तर स्त्री म्हणजे कोण? मूर्ख तर असतेच ती, तसं समजण चुकीच नव्हेच, अन् तरीसुद्धा तिच्याशिवाय आपल्याला जगण शक्यच नसत—पण असली प्रार्थना करायची? हा भलताच अतिरेक झाला ह, हा स्त्रीजातीचा अपमान आहे. बायकाना भावनाच नसतात असं वाटत कीं काय तुला?"

आर्त्योम—प्रचड, असहाय आर्त्योम—अगावर सूज आल्यामुळें आणखी भलताच प्रचड दिसू लागलेला आर्त्योम—जमिनीवर हातपाय ताणून पडलेला होता, आणि केन—नाजूक व बारीक, श्रमानें दम लागलेला केन—त्याच्या बगला, त्याची छाती, व त्याचें पोट चोळत होता, चोळता चोळता वोडका दारूच्या दर्पामुळें तो एकसारखा खोकत होता. नदीजवळून लोकाची रहदारी एकसारखी चाललेली त्याना ऐकू येत होती, लोकाचें तुटक तुटक बोलणें त्याना अधून मधून ऐकू येत होतें. हा पडाव सात फुटाहून अधिक खोल अशा एका रेताड नाल्याच्या तळाशीं पडलेला होता. नाल्याच्या काठावर येऊन पाहिलें तरच तो वरून दिसत होता. नदीचें पाणी व हा पडाव याच्या दरम्यान एक वाळूचा अरुद पट्टा होता, त्यावर लाकडाची फळकुटे व कचरा विखुरलेला होता. ही जागा येरव्हीं ओसाडच असे, पण आज हा पडाव म्हणजे वाटसरूच्या विशेष कुतूहलाचा विषय झालेला दिसला. लोक एकामागून एक या पडावापर्यंत येत असत, त्याच्या पालथ्या नाळेवर बसून त्याच्या बुडावर लाथा मारत असत. केन आणि आर्त्योम हा प्रकार पाहात राहिले. केन यामुळें जरा अस्वस्थ झाला; त्यानें बोलणें बद केलें आणि मुकाट्यानें आर्त्योमपर्यंत रागत जाऊन तो तोंडावर घाबरट, केंविलवाणें स्मित आणून म्हणाला:

"ऐकलत का तें?"

"ऐकतोंय मी," पहिलवान खुषींत येऊन हसत म्हणाला. "त्याचा बेत काय आहे तो ठाऊक आहे मला. मी पुन्हा पहिल्यासारखा लवकर हिंडू फिरू लागेन का नाहीं याचा त्यांना तपास लावायचाय. अन् त्यांना ही माहिती कशासाठीं हवीय? आपल्या बरगड्या माझ्या हातचा मार

खायसाठीं तयार ठेवायला. हा: ! हा: ! सैतान लेकाचे ! मी चचलों नाहीं म्हणून त्यांना वाईट वाटत असाव ! त्याची ही कारागिरी फुकटच गेली म्हणायची."

"मी सागतों तुम्हाला यांतली भानगड—" चेहऱ्यावर भय व इशाऱ्याचा भाव दर्शविण्यासाठीं चेहरा वेडावाकडा करून केन त्याच्या कानांत कुजबुजला—"मी सागतों यातली भानगड. समजा मी तुम्हाला सोडून गेलों. अन् तुम्ही एकटेच राहिलांत...मग ते तुमच्याकडे येतील अन्...अन्..."

आर्त्योमनें आपल्या प्रचंड घोगऱ्या हास्याला वाव देण्यासाठीं तोंडाचा मोटा आ वासला.

"अरे काय रे ए, चिमुकल्या मर्कटा ! त्याना तुझी भीति वाटते अशी तुझी कल्पना आहे कीं काय ? तुझी भीति ?"

"अहहा ! पण मी साक्षीदार म्हणून कामीं येऊ शकतों कीं !"

"ते तुझ्या डोक्यावर ठेवून देतील एक टप्पू हा: ! हा: ! हा: ! मग तूं जा साक्ष द्यायला—परलोकांत."

त्याच्या हास्यानें केनची भीति घालविली. त्याचें आंकसलेलें व उदासलेलें हृदय सुरक्षिततेच्या भावनेनें आनंदलें.

यापुढें त्याच्या जीवनाला अगदीं वेगळें स्वरूप येणार. कारण आतांपर्यंत त्याच्यावर जे प्रहार व अन्याय बिनहरकत लादले जात असत, त्यांचें निवारण करणारी एक मजबूत शक्ति यापुढें त्याच्या पाठीशीं उभी असणार.

. . . . . . .

जवळजवळ एक महिना लोटला.

एके दिवशीं दुपारचा सुमार. शिखान गांवांतली ही वेळ खूपच खळबळीची असते. या वेळीं लोकांच्या सर्व प्रकारच्या गडबड घाईचा अगदीं कळस होतो. बंदरातून व धक्क्यावरून भुकेनें वखवखलेले सारे लोक रिकाम्या पोटानिशीं या वेळीं एकदम गर्दी करून येतात आणि खाद्य-पदार्थ विकणाऱ्या फेरीवाल्यांना गराडा घालतात. शिजवलेल्या व खराब झालेल्या मांसाचा गरम वास सगळा रस्ताभर दरवळलेला असतो. अशा वेळीं कुणी तरी पडत्या सुरांत "आर्त्योम आला रे !" असा पुकारा केला.

कांहीं भिकारी आपल्या लक्तरानिशीं आळसटपणानें रस्त्यांत घुटमळत

होते; कसल्या तरी प्रकारचा लहानसा फायदेशीर धंदा करायची कसलीहि संधि मिळाली तर ती घ्यावी असा त्याचा बेत होता; पण ते हा पुकारा ऐकताच एकाएकीं कुठे गडप झाले तें कुणालाच कळलें नाहीं. शिखान गावातील दाही दिशांचे रहिवासी कुतूहल व अस्वस्थपणा असे संमिश्र भाव चेहऱ्यावर दर्शवीत या इशाऱ्याच्या दिशेकडे नजरा वळवीत असलेले दिसत होते

अगोदरच्या काहीं दिवसापासूनच आ-र्योम केव्हा उगवणार याबद्दल लोकामध्यें तीव्र कुतूहल जागृत झालेलें होतें, आणि तो पहिल्या प्रथम कसा दिसेल याबद्दल कडाक्याच्या चर्चा झालेल्या होत्या.

पूर्वीप्रमाणेंच आर्त्योमनें रस्त्याच्या मध्यभागाचा ताबा घेतला. त्याच्या ठराविक मंद गतीनें तो चाललेला होता. यथास्थित खाऊन झाल्यावर शतपावली करणाऱ्या माणसाची ही चाल होती. त्याच्या चर्येत नवीन असे काहींच नव्हतें. नेहमीप्रमाणेच त्याचा पिंवळा गजीफ्राक त्याच्या खांद्यावरून लोंबत होता. त्याची टोपी त्याच्या डोक्यावर एका बाजूला कलती बसलेली होती. आणि त्याचे काळे कुरळे केस त्याच्या कपाळावर रुळत होते. त्याच्या उजव्या हाताचा आंगठा त्याच्या पट्टयात अडकावलेला होता. आणि त्याचा डावा हात त्याच्या विजारीच्या खिशात खोल खुपसलेला होता. आणि आपली पहिलवानी छाती पुढें काढून तो चालत होता.

फक्त एक फरक मात्र दिसत होता. तो म्हणजे असा कीं त्याच्या देखण्या चेहऱ्यावर, आजारातून उठल्यानंतर नेहमींच दिसतो तसा, वाढत्या हुशारीचा भाव दिसत होता. लोकांच्या अभिवादनाचा व अभिनंदनाचा बेफिकिरीनें मान हालवून स्वीकार करीत तो डुलत डुलत चालला होता.

रस्त्यातील साऱ्या लोकांचे डोळे त्याच्याकडे लागलेले होते. इतक्या सगळ्या मारहाणीवर इतक्या उत्तम प्रकारें मात करणाऱ्या त्याच्या अजिंक्य सामर्थ्याबद्दल आश्चर्य व कौतुक करणारे उद्गार लोक मंद स्वरात कुजबुजत होते. आर्त्योम बरा झाला याबद्दल या वस्तींतल्या अनेक लोकांनीं खेद प्रदर्शित केला; आणि ज्या मारेकऱ्यानी त्याच्या फुफ्फुसाना दुखापत करण्यांत व त्याच्या बरगड्या मोडण्यात कसूर केली त्याच्यावर त्यांनीं शिव्यांची लाखोली वाहिली. 'ज्याचा निकाल लावणं अशक्य आहे असा जिवन

माणूस असणारच नाहीं !' असे उद्गार त्यानीं काढले. आणखी काहीं लोक असे होते कीं आर्त्योम आता 'लाल्या गुड' व त्याची टोळी याच्यावर सूड कसा घेतो याचें कल्पनाचित्र रंगविण्यातच त्याना आनंद वाटत होता. पण जितकी ताकत अधिक, तितके तिचे आकर्षणाचें सामर्थ्य अधिक; आणि म्हणून या वस्तीतल्या बहुसंख्य लोकाना आर्त्योमच्या ताकतीनें मोहिनी घातली.

दरम्यान ग्राविलोव्का या गुत्त्यात आर्त्योम शिरला. हा गुत्ता म्हणजे शिखान गावचा क्लबच होता.

ही उंच राक्षसी व्यक्ति उंबरा ओलांडून आत गेली तेव्हां तिथें फारच थोडे लोक होते त्याला पाहताक्षणी एकदोघाच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाले. घाईघाईनें पायाचा खसफसाट करून कुणी तरी एक जण धडपडत दूर कोंपऱ्यात जाऊन बसला. ही बैठकीची जागा लांबट व बसकी होती व तिच्यात विटाच्या कमानी होत्या. या जागेत बसलें म्हणजे तळघरात बसल्यासारखे वाटे. हलकी तंबाखू, घाण व कुबट हवा याच्या दुर्गंधीनें ही जागा भारावलेली असे.

आर्त्योमनें कुणाहि विशिष्ट माणसाकडे लक्ष नसल्यासारखे दाखवून एकदा साऱ्या खोलीभर सावकाश नजर फिरविली, आणि हॉटेलाचा मालक सावूका ख्लेब्निकोव याच्या विनम्र अभिवादनाला उत्तर म्हणून त्यानें विचारलें:

"केन आला होता का इथ ?"

"लवकरच येईल तो. साधारण मानानं याच सुमारास येतो तो इथ."

आर्त्योमनें लोखंडी गजाच्या एका खिडकीलगत बैठक मारली आणि चहा मागविला. आणि आपले प्रचंड हात टेबलावर ठेवून तो तिथें मंडळी कोण कोण जमलेली आहेत हें बेपर्वा वृत्तीनें पाहू लागला.

खोलीत सुमारें दहा इसम होते—सगळे एकजात मवाली. ते दोन टेबलाभोंवती बसलेले होते आणि तिथून आर्त्योमकडे पाहात होते. त्याची व त्याची दृष्टादृष्ट झाली, तेव्हा त्या सर्वांनीं आपल्या चेहऱ्यावर ओढून ताणून स्मित आणलें, त्याची कृपा संपादन करण्याची काळजी त्याना लागलेली असावी असेंच जणू त्याच्या चेहऱ्यावरून वाटत होतें. ते आर्त्योमशीं गप्पा

सुरू करण्यासाठींच उत्सुक झालेले होते ही गोष्ट उघडच दिसत होती. पण आर्त्योमनें त्याच्या अभिवादनाला उत्तरादाखल त्याच्याकडे एकच तिरसट कटाक्ष फेंकला. म्हणून ते सारे जण गप्पच बसले. त्याच्याशीं पहिल्या प्रथम कुणी बोलावें हें त्याचें त्याना ठरविता येईना. खरेब्निकोव कठड्याजवळ काम करता करता आपल्या मिशांमधून काहीं तरी गुणगुणत होता; त्याचे कोल्ह्यासारखे डोळे चोरट्या नजरेनें सभोंवार पाहात होते.

रस्त्यातला कानठळ्या बसविणारा गोंगाट खिडकींतून आत ऐकू येत होता, शिवराळ भाषा, शिव्यागाळी, आणि फेरीवाल्याचे पुकार ऐकू येत होते, त्यात भरीला भर म्हणून बाटल्या दगडावर पडून ठिकऱ्या ठिकऱ्या होत असल्याचे आवाज जास्त जवळून येत होते. या घाणेरड्या व कोंदट जागेत बसायचा आर्त्योमला कटाळा येऊ लागला.

" ए मर्दांनो, " तो अचानक मुद्दाम मोठ्या स्वरात उद्गारला, " ए लाडग्यानो, तुम्ही असे एकदम निरुपद्रवी कसे झालात रे ?...नुसते डोळे वटारून बघायच अन् गप्प बसायच, याच्यापेक्षा जास्त चागल काहीं तुम्हाला करता येतच नाहीं का ? "

" अहो बडे राक्षस, आम्ही तुमच्याशीं मोठ्या आनदान बोलू कीं ! " लक्तऱ्या नवरदेव आपल्या जागेवरून उठून आर्त्योमकडे जाता जाता उत्तरला.

हा इसम किडकिडीत होता, त्याला टक्कल होतें, त्याची दाढी टोंकदार व डोळे बारीक, लालसर होते. हे डोळे दुष्टाव्यानें मिचमिचे करायची त्याला लँकबच होती. त्याच्या अंगात कॅन्व्हासचा कुडता व सैनिकी थाटाची विजार होती.

" तुम्ही आजारी होता अस ऐकल मी, " आर्त्योमच्या पुढ्यात बसता बसता तो म्हणाला.

" अन् असलों म्हणून ? "

" काहीं नाहीं... पण तुम्ही आम्हाला बरेच दिवसात दिसला नाहींत. ..अन् जेव्हा जेव्हा आम्ही तुमची चौकशी करावी तेव्हा तेव्हा आम्हाला लोक सागत : ' आर्त्योमला आजारी पडायची लहर आलीय. ' "

" अस्सं ! बरं मग ? "

" मग काय ? तुम्हाला झाल होत तरी काय ? "

" तुला ठाऊक नाहीं ? "

" मी काय तुमचा डॉक्टर होतों ? "

" ए कुऱ्या, तू सर्रास खोट बोलतोयस," आर्त्योम हसत म्हणाला. "अन् तूं खोट का रे बोलतोस ? काय प्रकार झाला तो सगळा ठाऊक आहे तुला."

" होय, ठाऊक आहे मला, " नवरदेवहि हसत हसत उत्तरला.

" असं जर आहे, तर मग तू खोट का बोलतोस ? "

" कारण त्यात जास्त हुशारी असते. "

" जास्त हुशारी ! ए मेणबत्तीच्या जळक्या तुकड्या, तुला अस वाटत अ ! "

" होय. मी जर खर बोललो असतों तर तुम्ही बहुधा रागावले असता ! "

" मी थुकतों तुझ्यावर. "

" धन्यवाद ! अन् तुम्ही बरे झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ तुम्ही आम्हाला थोडी थोडी वोडका दारू नाही का देणार ? "

" तुला काय आवडेल ते मागव ना. "

लक्तऱ्या नवरदेवानें अर्धी बाटली वोडका दारू मागवली, आणि त्याची कळी खुलू लागली.

" आर्त्योम, तुमची मजा चाललीय हो. तुम्हाला पैशाची टचाई कधीच नसते. "

" बर मग ? आणखी काय म्हणायचय ? "

" कांहीं नाहीं. अन् बायाच तुम्हाला संकटातन सोडवतात—सैतान त्याचा नायनाट करो."

" अन् त्या तुझ्याकडे ढुकून सुद्धा बघत नाहींत, असंच ना ? "

" आमच्या हातन काय होणार ! तुमच्या चालीन चालायला आम्हाला तुमच्यासारखे पाय नाहींत. " नवरदेवानें सुस्कारा सोडला.

" तसं नव्हे. याच कारण असं आहे कीं स्त्रीला आरोग्यसंपन्न पुरुष आवडतो. अन् तू कसा आहेस रे ? मी अगदीं पाक पुरुष आहे—हें इंगित आहे त्यातल. "

आर्त्योम मवाल्याबरोबर बोलताना हाच सूर लावीत असे. त्याची सावकाशीनें, शांतपणें व बेपर्वाईनें बोलण्याची ढब त्याच्या उद्गारांमध्यें

एक विशिष्ट प्रकारचा जोरदारपणा आणीत असे. आणि त्यामुळें त्याचे उद्गार हमखास उद्धट व बोचक ठरत असत. त्याला बहुधा असें वाटत असावें की आपल्या वर्गातले लोक अनेक बाबतींत आपल्यापेक्षाहि वाईट आहेत पण त्याची बुद्धि सगळ्याच गोष्टींत आपल्यापेक्षा सरांस जास्त तल्लख आहे.

आता केन आला. फेरीच्या सामानाची पेटी छातीवर वागवीत, डाव्या हातावर पिवळया रंगाचे सुती कपडे लोंबते घेऊन तो आत आला नेहमींच्या सरावानली भीतीची भावना दूर सारता न आल्यामुळे तो क्षणभर उंबरठ्यावरच थबकला, त्यानें मान लांब केली, अस्वस्थपणा दर्शविणारे स्मित करीत त्यानें खोलीत डोकावून पाहिलें, आणि आर्त्योम दिसताक्षणीं मात्र त्याचा चेहरा आनंदानें प्रफुल्लित झाला. आर्त्योमनें त्याच्याकडे पाहून ऐसपैस स्मित केलें.

" इकडे ये अन् माझ्याजवळ बैस, " त्यानें केनला हाक मारली, आणि मग नवरदेवाकडे वळून तो हुकुमी स्वराची बतावणी करून म्हणाला:

" अन् ए, ऊठ इथून. माणसाला जागा करून दे. "

नवरदेवाचा कुरूप व लाल केसाचे खुंट वाढलेला चेहरा क्षणभर आश्चर्यानें व तिरस्कारानें स्तंभितच झाला. तो सावकाश उठला. त्यानें आपल्या दोस्तांकडे पाहिलें. तेहि त्याच्याइतकेच थक्क झालेले होते. मग त्यानें केनकडे पाहिलें. केन आवाज न करता सावधपणें टेबलाकडे येत होता. मग नवरदेव अचानक जमिनीवर थुंकला आणि रागारागानें उद्गारला, " थुत् ! "

तो सावकाश व मुकाट्यानें परत आपल्या टेबलाकडे गेला आणि लगेच तिथें दबलेल्या आवाजात कुजबुज सुरू झाली. तींत संताप व उपरोध दर्शविणारे स्वर स्पष्टपणें ऐकू येत होते.

केन आनंदानें गोंधळून गालातल्या गालात हसत राहिला. पण त्याच वेळीं तो नवरदेव व त्याचे जोडीदार बसले होते त्या जागेकडे चिंतातुर नजरेनें पाहात होताच.

मग आर्त्योम खुषींत येऊन त्याला म्हणाला :

" ए व्यापाऱ्या, आपण चहा घेऊ या. थोडसं पॅटीसहि मागवू या;

तूं खाशील ना थोडंसं ? तिकडे कशाला बघतोस रे ? थुक त्याच्यावर; भिऊ नकोस. जरा थांब ह. मी त्याना एक धडा शिकवून येतों."

तो उठला, खाद्याला हिसडा देऊन त्यानें गजीफ्राक जमिनीवर टाकला आणि ते मवाली बसले होते त्या टेबलाकडे तो गेला. उंच आणि जबरदस्त होता तो. छाती पुढें काढून, खादे फुगवून, आपल्या सामर्थ्याचा सारा दिमाख दर्शवीत, ओंठावर थट्टेखोर स्मित आणून, तो मारामारीच्या पवित्र्यात त्याच्या समोर उभा राहिला. आणि ते सावधपणीं त्याच्यावर लक्ष ठेवून बसले. तोंडातून एक ब्रहि काढायची त्याची छाती नव्हती. त्याच्या समोरून पळ काढायची तयारी त्यानीं ठेवली.

"हॅं," आर्त्योम म्हणाला, "तुमची कुरकुर कसली चालली आहे रे ?"

काहीं तरी कडक बोलावें असा त्याचा बेत होता, पण त्याला शब्दच सुचेनात, आणि तो स्तब्ध झाला.

"म्हणा काय म्हणायचय तें," लक्तऱ्या नवरदेव हातवारे करीत वांकडें तोंड करून म्हणाला, "नाहीं तर आम्हाला सोडून द्या अन् तुम्ही जा आपल्या वाटेन--ईश्वराची गदा आहात तुम्ही, कुठ का जानात तुम्ही !"

"चूप !" आर्त्योमनें कपाळावर आठ्या आणून हुकूम केला. "मी या ज्यूचा दोस्त आहें, अन् तुम्हाला मी हुसकून लावल, म्हणून तुम्ही रागावलात अन् चिडलात, पण मी तुम्हा सगळ्याना सागून ठेवतों, हा ज्यूच तुमच्यापैकीं कुणापेक्षाहि माणुसकीच्या बाबतींत जास्त सरस आहे. याच्या अंगीं आपल्या बाधवाविषयीं जी ममतेची भावना आहे, ती तुमच्या अगीं नाहीं. सुरवातीपासूनच त्यान छळ सोसलाय, आणि आता मी त्याला अभय दिलय, अन् तुमच्यापैकीं कुणीहि जर त्याला इजा करायच धाडस केल तर त्यान याद राखून असाव. तुम्हाला सरळच सागतोय मी, मी अशा इसमाला झोडपून काढीन, त्याचे हालहाल करीन मी..." त्याच्या डोळ्यात क्रूरतेची चमक दिसू लागली, त्याच्या गळ्याच्या शिरा तटाटल्या, आणि त्याच्या नाकपुड्या थरथरल्या.

"मी झिंगलेलों असताना त्याच्यातल्या काहीं जणानीं माझ्यावर मात केली--केली असेल, मला त्याची मुळींच पर्वा नाहीं. त्याना माझी ताकत

काहीं खच्ची करता आलेली नाहीं, उलट या गोष्टीमुळं माझं काळीज मात्र पहिल्यापेक्षाहि जास्त कठोर झालय. पण लक्षात ठेवा, मी केनचा कैवार घेणार आहे, अन् जर का कुणी त्याला एका शब्दानहि दुखवलं, तर अशा इसमाला मी इतका बेदम मार देईन कीं त्यान पुन्हा उठून उभा राहायलाच नको. सगळ्याना सांगा तुम्ही हें."

जणू काय एखादे जड ओझें स्वतःच्या अंगावरून दूर केल्याप्रमाणें त्यानें एक खोल सुस्कारा सोडला, आणि त्याच्याकडे पाठ फिरवून तो आपल्या जागेकडे परतला.

"छान बोललात !" लग्नाच्या नवरदेव मंद स्वरात उद्गारला; आणि आर्त्योम केनसमोर आपल्या जागीं बसलेला पाहता पाहता त्यानें रडवें तोंड केलें.

केनचा चेहरा मनाच्या खळबळीमुळे पांढरा फटक झालेला होता. तो टेबलाशीं तसाच बसलेला होता. त्याचे डोळे आर्त्योमवर एकसारखे खिळलेले होते. टक लावून पाहता पाहता ते जास्तच मोठे दिसू लागले आणि त्याच्यामध्यें एक अवर्णनीय भाव व्यक्त होत राहिला.

"ऐकलस का माझं म्हणण ?' आर्त्योमनें कठोर स्वरात त्याला विचारलें. "लक्षात ठेव मग. तुझ्या अंगाला जर कुणी हात लावला तर तू माझ्याकडे धावत येऊन मला नुसत सांगायचस. कीं मग त्या माणसाचीं मी हाडं मोडलीच म्हणून समज"

तो ज्यू काहीं तरी पुटपुटला—तो एक तर परमेश्वराची प्रार्थना तरी करीत असावा, किंवा आर्त्योमला धन्यवाद तरी देत असावा लग्नाच्या नवरदेव व त्याच्या टोळींतले लोक आपसात कुजबुज लागले, आणि मग ते एकामागून एक निघून गेले. नवरदेव आर्त्योमच्या टेबलासमोरून जाता जाता एक गाणें गुणगुणत होताः

डोक्यामधिं माझ्या अक्कल जितकी,
तितके पैसे जर असते,
मजेंत बसलों असतों पीत मी,
पिणे कधीं सोडलें नसतें.

आणि मग आर्त्योमकडे रोखून पाहात त्यानें आंबट तोंड करून व

पायानें ठेका धरून एकदम पदरच्या पुढील ओळी घालून हें गाणें पूर्ण केलें:

जगात जितके मिळतिल तितके
मूर्ख खरेदी करीन मी
अन् सगळ्याना घेउन जाइन
काळ्या समुद्रीं बुडविन मी

आणि झटदिशीं दरवाज्याकडे वळून तो तिथून सटकला.

आर्त्योमनें शिवी हासडली आणि खोलीत सभोंवार नजर टाकली—त्या अधुक धुरकट दुर्गंधियुक्त जागेत आता फक्त तीन लोक उरले होते—तो स्वतः, केन, आणि कटड्याजवळ उभा असलेला सावूका

सावकानें आपली कोल्ह्यासारखी नजर आर्त्योमच्या उदास नजरेला भिडवली, आणि त्याच्या आबट चेहऱ्यावर सोंवळा भाव दिसू लागला.

"आर्त्योम मिखाइलोविच, तुम्ही एक उत्कृष्ट अन् उदात्त गोष्ट केलीत!" तो आपली दाढी कुरवाळत म्हणाला. "तुम्ही अगदीं धर्माज्ञेनुसार वागलात. केनच्या अंगावर क्षत पडलेली होतीं—अन् तुम्ही त्याला सोडून दिल नाहीं."

या उद्गाराकडे आर्त्योमनें मुळींच लक्ष दिलें नाहीं, पण या शब्दाचा प्रतिध्वनि त्याला ऐकू आला, आणि हा प्रतिध्वनि या खोलीच्या कमानदार छतांतून उमटून इथल्या घाणेरड्या हवेतून तरगत तरगत त्याच्या कानात शिरला. आर्त्योम गप्पच बसलेला होता, आणि जणू काय हा आवाज आपल्यापासून दूर सारण्यासाठीं तो हळूच मानेला झटके देत राहिला. तरी पण हे उद्गार हवेंत तसेच रेंगाळत राहिले, त्याच्या कानात शिरले, आणि त्याची त्याला चीड आली. तो भयकर उदासला आणि त्याचें हृदय कसल्या तरी विलक्षण दडपणाखालीं चिरडलें जाऊ लागलें.

त्यानें केनकडे रोंखून पाहिलें. केनला चहा फार गरम लागला म्हणून तो बशींत ओतून त्याच्यावर फुकर मारत होता. हा ज्यू टेबलावर वाकून वरच्या हातानीं बशी धरून मोठ्या चवीनें चहा पीत होता. केन आपल्याकडे अधून मधून चोरट्या नजरेनें पाहात आहे हें आर्त्योमच्या लक्षात आलें आणि आपल्याकडे या ज्यूची नजर लागलेली आहे या

जाणिवेने या पहिलवानाला जास्तच उदासवाणें वाटू लागलें. कां कुणास ठाऊक, पण त्याच्या मनात असंतोषाची उदास भावना जास्त जास्त जोरावत चालली; त्याच्या डोळ्यात हा उदासलेपणा जास्त ठळकपणें दिसू लागला आणि तो भ्रमिष्टपणे आजूबाजूला नजर टाकू लागला. चक्कीच्या दगडाप्रमाणें त्याच्या डोक्यात अबोल विचार गरगरा फिरत राहिले. पूर्वी त्याला त्याच्या विचारानी असा कधीच त्रास दिलेला नव्हता, पण तो आजारी असताना त्याच्या मनात हे विचार आले होते आणि त्याला ते आपल्या मनातून काढून टाकता येईनात.

गुत्त्याच्या खिडक्याना लोखंडी गज असल्यामुळें या खिडक्या तुरुगातल्या खिडक्यासारख्या दिसत होत्या. आणि त्यातून रस्त्यांतला कानठळ्या बसविणारा गोंगाट आत येत होता. वरच्या अंगाला कमानींचे जाडजूड ओलसर दगड होते. खालची विटाची जमीन चिखलानें निसरडी झालेली होती व तिच्यावर केरकचरा विखुरलेला होता; आणि या वातावरणात केनची भेदरट लक्तरी मूर्ति त्याच्या समोर बसलेली होती; केन तसाच बसलेला होता, तो थर थर कापत होता, आणि काहींच बोलत नव्हता...आणि बाहेर शिवारांत गवतकापणीचा हगाम लवकरच सुरू होणार होता. एव्हाच नदीच्या पैलतीरावर गावासमोरच्या शेतातून गवत कमरेइतकें वाढलेलें होतें आणि त्याच्यावरून वाऱ्याची झुळुक तरगत गेली कीं तिच्याबरोबर किती आकर्षक सुवास दरवळत होता... ...

"ए केन, तू कधीच कसा बोलत नाहींस रे? आत्योमनें त्रासिक मुद्रा करून विचारलें. तुला अजूनहि माझं भय वाटत का! असला कसला माणूस आहेस रे तू!"

केननें मान वर केली आणि तो विक्षिप्तपणें माना वेळू लागला. त्याची चर्या हताश व केविलवाणी दिसूं लागली.

"अन् मी काय सागणार हो? मला कोणत्या जिभेन तुमच्याशीं बोलतां येणार हो?......या जिभेन?" आणि या ज्यूनें आपल्या जिभेचें टोंक बाहेर काढलें आणि त्याच्याकडे बोट दाखविलें .."या ज्या जिभेचा वापर मी इतर सगळ्याशीं बोलताना करतों, त्याच जिभेन मी बोलायच का तुमच्याशीं? याच जिभेन तुमच्याशीं बोलायची मला शरम वाटायला

नको का ? इथ तुम्हांला माझ्याजवळ बसल्याबद्दल शरम वाटते हें मला समजत नाहीं असं का तुम्हाला वाटत ? मी कोण, अन् तुम्ही कोण ? अहो महात्मा आर्त्योम, या साऱ्या गोष्टींचा विचार करा तुम्ही—तुम्ही म्हणजे मॅकाबियसच्या बरोबरीचे ! परमेश्वरान तुम्हाला ज्या हेतूनें निर्माण केल तो हेतू जर तुम्हाला कळला तर तुम्ही काय कराल ? अह्हा, परमेश्वराचीं महान् रहस्य कुणालाच ठाऊक नसतात, अन् आपल्या वाट्याला जीवन का दिलय याची कल्पना कुणालाच करता येत नाहीं. तुम्हाला कल्पनासुद्धा करता येणार नाहीं इतके माझ्या आयुष्यातले अनेक दिवस व रात्री मी माझ्या मनाला एकसारखे हे प्रश्न विचारले आहेत : 'या जीवनाचा मला फायदा काय ? माझा आत्मा व माझं मन याचा उपयोग काय ? इतर माणसाच्या लेखीं माझी किंमत काय ? त्याच्या विषारी थुंकीसाठीं माझा केवळ पिकदाणी म्हणून उपयोग आहे ! माझ्या लेखीं इतर लोकाची किंमत काय ?......इतर सारे लोक म्हणजे माझ्या शरीराला व आत्म्याला शक्य तितक्या सर्व मार्गांनीं दुखापती करणारे कीटक आहेत......मी या भूतलावर आलोंच कशाला आधीं ? आणि दुःखाखेरीज दुसर काहींच कसं मला ठाऊक नसावं ? आणि माझ्यासाठीं प्रकाशाचा एकसुद्धा किरण का उपलब्ध नसावा ?"

तो कळकळीनें व अर्धवट कुजबुजत्या स्वरात बोलत होता. आणि क्लेशाची परमावधी झालेलें त्याचें मन भडकलें म्हणजे त्याचा सबंध चेहरा थरथरू लागायचा, हा नेहमींचाच प्रकार आताहि चालू होता.

तो काय बोलत होता हें आर्त्योमला कळलेंच नाहीं, पण केनची कशाबद्दल तरी तक्रार आहे येवढें त्याला तें बोलणें ऐकून व त्याचा चेहरा पाहून समजलें. याचा परिणाम असा झाला कीं आर्त्योमला जास्तच उदास वाटू लागलें, त्याला जास्त थकवा वाटू लागला.

"आता हें बघ ! तुझ पुन्हा रडगाण सुरू झालच !" आणि त्रासिक-पणानें त्यानें मानेला हिसडा दिला. "मी तुला सागितलय ना ? मी तुझ रक्षण करीन असं सागितलय ना मी तुला ?"

केन शातपणें व कडवटपणें हसला.

" माझ्या देवासमोर तुम्ही माझ्यासाठीं मध्यस्थी कशी करणार हो ! देवच छळतोय मला. "

" अर्थात्, मला देवाला विरोध नाहीं करता येणार, " आर्त्योमनें बालिश वृत्तीनें त्याच्या म्हणण्याला मान्यता दिली. आणि मग दयार्द्र स्वरात त्यानें या ज्यूला उपदेश केला: " जरा धीर धर. देवाला विरोध करायचा मार्गच कुणाला सापडायचा नाहीं. "

केननें आपल्या रक्षणकर्त्याकडे पाहिलें आणि स्मित केलें—आता तो त्याची कींव करू लागला. प्रथम शक्तिमतानें बुद्धिमताची कींव केली आणि आता बुद्धिमतानें शक्तिमताची कींव केली, आणि या दोघाना आपण एकमेकाच्या जरा अधिक निकट आलों असें कशामुळे तरी वाटू लागलें.

" तुझ लग्न झालय का ? " आर्त्योमनें विचारलें.

" होय तर. माझा संसार मोठा आहे, माझ्या दुबळ्या जिवाच्या आवाक्याबाहेरचा आहे संसार माझा. " केननें एक जड निःश्वास सोडला.

" खरच ! " पहिलवान उद्गारला. या ज्यूवर प्रेम करू शकणारी स्त्री कशीं असेल याचें चित्र त्याला आपल्या मनश्चक्षूपुढें उभे करण्याची फारच मुष्किल झाली; आणि या रोगट, खुजट, घामट व भेकड माणसाकडे तो वाढत्या कुतूहलानें पाहू लागला.

" मला पाच मुल झालीं. पण त्यातलीं चारच राहिली आहेत—माझी छोटी खाया एकसारखी खोकत असे—अन् मग ती मेली. देवा रे देवा !...अन् माझी बायकोहि आजारीच असते—ती एकसारखी खोकत असते. "

" मोठी कठीणच आहे परिस्थिती तुझी, " आर्त्योम म्हणाला, आणि तो विचारात गुग झाला.

केनहि खालीं मान घालून विचारात गढून गेला. जुने कपडे विकणारे लोक आता गुत्त्यात येऊ लागलेले होते. ते कठड्यापर्यंत जायचे, तिथें त्यानीं कुजबुजत्या आवाजात सावूकाबरोबर बोलणें सुरू करायचें. सावूका त्यांना काहीं तरी रहस्यमय गोष्ट सागायचा, बोलताना अर्थपूर्ण नजरेनें केन व आर्त्योम यांच्या दिशेकडे पाहात असायचा, त्यामुळें त्या लोकांनींहि

रोखल्या नजरानीं या दोघाकडे पाहायचें; त्यांच्या नजरामध्यें आश्चर्य व उपहास हे मिश्र भाव असायचे. केननें चटदिशीं या नजराचा अर्थ लक्षांत घेतला आणि तो सावध राहिला. पण आर्त्योम पुन्हा नदीपलीकडील दूरच्या शिवाराकडे नजर लावून बसला होता. त्याला विळ्याचा सर्सर् आवाज ऐकू येत होता, आणि कापलेलें गवत पडताना होत असलेली नाजुक सळ्सळ् त्याला ऐकू येत होती.

" आर्त्योम, तुम्ही इथून जाल तर बरं होईल, अन् तुम्हाला जर इथं बसायला हवच असल, तर मी जातों. काहीं लोक आलेत इथ." केन कुजबुजला, " अन् माझ्या पायीं ते तुमच्याकडे पाहून हसताहेत."

" कोण हसतय ?" आर्त्योम तद्रींतून जागा होऊन गरजला. तो उग्र नजरेनें सभोंवार पाहूं लागला.

पण तिथें हजर असलेले एकूण एक लोक अगदीं पूर्णपणें गभीर असून आपापल्या कामात गढून गेलेले दिसले. आर्त्योमला एकाचीहि नजर आपल्याकडे वळलेली दिसली नाहीं. त्यानें कठोरपणें कपाळाला आठ्या घातल्या आणि तो त्या ज्यूला म्हणाला :

" थापा मारतोस तू. . . . तक्रार करण्याजोग इथ काहींच नाहीं... पण साभाळ ह. हें न्यायाला धरून नाहीं. आधीं कुणी तरी तुझ्याशीं दुर्वर्तन करू दे अन् मग माझ्याकडे तक्रार कर. का तुला माझी परीक्षा घ्यायची होती ? तू मुद्दामच सागितलस हें ?"

केननें क्षीण स्मित केलें; पण तो कांहींच बोलला नाहीं. काहीं मिनिटें दोघेहि काहींच बोलेले नाहींत. मग केन उठला, त्यानें आपली पेटी गळ्यात अडकावली, आणि तो जायला निघाला. आर्त्योमनें आपला हात त्याच्या पुढें केला.

" चाललास तू ? ठीक, जा अन् धदा कर जोरात. मी इथच थांबतों."

केननें आपल्या दोन्ही चिमुकल्या हातानीं आपल्या रक्षणकर्त्याचा प्रचड पंजा हलविला आणि तो घाईघाईनें निघून गेला.

रस्त्यात आल्यानतर त्यानें आपल्याला जिथून भोंवताली काय चाललें आहे हें दिसेल असा एक कोंपरा निवडून काढला आणि तिथें तो उभा

राहिला. इथून गुत्त्याचा दरवाजा स्पष्ट दिसत होता. त्याला फार वेळ खोळंबावें लागलें नाहीं. कारण तेवढ्यात आर्त्योम गुत्त्याच्या उंबऱ्याशीं आला. त्याच्या भुवयावर आठ्या आलेल्या होत्या, आणि जें आपल्याला टाळायला हवें असेल तेंच पाहायला मिळेल कीं काय ही धास्ती त्याच्या मुद्रेवर दिसत होती.

कांहीं वेळ तो गटागटानीं उभे असलेले लोक व जाणारे येणारे वाटसरू निरखून पाहात राहिला, मग त्याच्या चेहऱ्यावर नेहमींची ऐदी बेपर्वाईची वृत्ति दिसू लागली आणि त्यानें जमावातून वाट काढत टेकडीलगतच्या रस्त्याचें टोंक गाठलें; तो आपल्या आवडत्या विश्रांतिस्थानाकडे चालला होतासे दिसत होतें.

केन त्याच्याकडे शोकाकुल नजरेनें पाहात राहिला आणि मग, दोन्ही हातानीं आपला चेहरा झाकून घेऊन त्यानें जवळच्या दुकानाच्या लोखंडी दरवाज्यावर आपलें कपाळ टेंकलें.

. . . . . . . .

आर्त्योमची जबरदस्त धमकी परिणामकारक ठरली, लोक भ्याले, आणि त्यानीं ज्यूचा छळ बंद केला.

आता आपल्या दुःखमय संसाराच्या मार्गावरील काटे कमी झाले आहेत हें केनला कळून आलें. लोक त्याचें अस्तित्व जणू काय लक्षातच घेईनात. पूर्वीप्रमाणेंच तो आपल्या मालाचा पुकारा करीत जमावांतून जाऊ लागला, पण आता कुणीहि त्याच्या बारीक बगलावर ठोसे देईना, अगर कुणीहि त्याच्या पेटींत थुंकेना. पण पूर्वीच्या उलट एक गोष्ट आता झाली ती अशी कीं आता सारे लोक त्याच्याकडे कठोर व वैरभाव दर्शविणाऱ्या नजरानीं पाहू लागले. लोकाच्या नजरामध्यें पूर्वी असा भाव नसे.

स्वतःशीं संबंध येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा बारकाईनें विचार करणाऱ्या केनला लोकाच्या या बदललेल्या वृत्तीची जाणीव झाली. आणि या वृत्तीचा अर्थ काय, हिच्यांतून पुढें काय निष्पन्न होणार आहे, असा प्रश्न तो आपल्या मनाला विचारू लागला. या गोष्टीचा त्यानें पुष्कळ विचार केला, पण आपल्याशीं लोक असे का वागतात हें त्याला

कांहीं केल्या उमगेना. आणि पुन्हा त्याला पूर्वी लोक आपल्याशीं कसे वागत याची आठवण झाली---अगदीं क्वचित प्रसंगीं का होईना, पण पूर्वी लोक त्याच्याशीं मित्रभावानें दोन शब्द बोलत असत, त्याचें कसें काय चाललें आहे याची विचारपूस करत असत, आणि कधीं कधीं तर कसलाहि दुष्ट हेतु मनात न धरता त्याची थट्टामस्करी देखील करत असत. ..केन फार खोल विचार करू लागला. कारण मनुष्यस्वभावाचा असा नियमच आहे कीं जुन्या काळात आपल्याला मिळालेल्या सुखाच्या अगदीं लहानशा कणाची आठवण देखील माणसाना फार गोड वाटते, मग तें सुख प्रत्यक्ष अनुभवलें त्या वेळीं तें त्याच्या मुळींच लक्षातसुद्धा आलेले का नसेना.

आणि म्हणून तो फारच चिंतामग्न झाला. तो प्रत्येक गोष्ट बारकाईनें ऐकू लागला व सावध नजरेनें साऱ्या गोष्टींवर लक्ष ठेवू लागला. एके दिवशीं त्याच्या कानावर अशी बातमी आली कीं लक्तऱ्या नवरदेवानें एक नवे गाणें रचलें आहे. हा इसम गाण्याबजावण्यावर पोट भरत असे. सूप खाण्याचे आठ लाकडी चमचे हें याचें वाद्य असे हे चमचे बोटामध्यें धरून तो ते वाजवीत असे अगर छातीवर वा फुगवलेल्या गालावर या चमच्याचा ताल धरत असे. स्वतः रचलेल्या कवनासाठीं येवढी साथ त्याला भरपूर होत असे. हा संगीताचा कार्यक्रम कानाला मुळींच गोड लागत नसला तर तो करणाऱ्याला जादुगाराचें कौशल्य कामीं आणावे लागत असे, आणि या उपनगरात कसल्याहि प्रकारच्या कौशल्याचा लोक फार गौरव करीत असत.

एका प्रसंगीं नवरदेवाभोंवतीं लोकाचा एक गट जमलेला केनला दिसला.

नवरदेव आपले चमचे सरसावून जमावापुढें रसभरित भाषेत व्याख्यान देत होता :

" सद्गृहस्थ हो ! माझ्या कलेच्या दासानो ! मी माझं हें एक नव गाणं तुम्हाला सादर करतों; भाड्यातून ताजं गरमागरम गाणं काढून देतोंय मी तुम्हाला; त्याच्यातून अजून वाफ येतेय बघा ! दर डोईगणीक एक कोपेक घेईन मी; ज्याना मेंदू आहेत त्यानीं मला एकाऐवजीं दोन दोन कोपेक द्यावेत ! आता करतों मी सुरवात:

सूर्य खिडकीशीं आलेला बघून
लोक खुषींत येतात.
परि खिडकींतन मी जर आत आलों...

" ए, तें जुन गाण ठाऊक आहे आम्हा सगळयाना!" जमावातला एक इसम ओरडला.

" तुम्ही तें पूर्वी ऐकलय यात शकाच नाहीं; पण रोटीच्या अगोदर खायचा जिन्नस मी फुकट नाहीं देत." नवरदेव उत्तरला; त्यानें चमचे एकमेकावर आपटून खडखडावले आणि गाणें पुढें चालू केलें:

जिणें दुःखाचे माझे, नशीब माझे फुटके,
बाबा-दादानीं धरलें अक्षी माझे टाळके,
फास घालून माझा परान घ्याया गेले,
मान अफूट माझी, त्याचेंच दावे तुटलें.

" अरेरे, किती वाईट झाल!" लोकानीं मत दिलें.

तरी पण लोकानीं आपापले कोपेक नवरदेवाकडे फेकलेच. कारण तो फारच प्रामाणिक माणूस म्हणून तें त्याला ओळखत होते, त्यानें जर नवें गाणें म्हणून दाखवायचें कबूल केले तर तो तें रचल्याखेरीज राहणार नाहीं हें त्याना ठाऊक होतें.

" हें ऐका नवीन गाण," तो म्हणाला, आणि चमच्याच्या संगीताला एकदम उठाव आला.

एका बैलानें केली कोळयाशीं एका दोस्ती,
एका मूर्खाशीं एका ज्यूनें केली दोस्ती.
बैल कोळयाला मिरवी शेपटीवरी अपुल्या,
ज्यू बाजार माडतो पोरींपुढें मूर्खाचा.
अशा कशा ग बायानो तुम्ही!

" अहो मिष्टर केन, थाबा हो! आमचे सलाम घ्या! तुम्हाला अनेकदां मार मिळो. काय हो मिष्टर व्यापारी, तुम्ही माझ गाण ऐकायच धाडस केलंत? तुम्ही ऐकायसाठीं मी रचलेल नाहीं तें...जा बर तुम्ही इथून!"

केननें या कवीकडे पाहून स्मित केलें आणि तो एक सुस्कारा सोडून पुढें चालू लागला. पुढें येणाऱ्या संकटाच्या सूचनेनें त्याचें हृदय जड झालें.

हे दिवस त्याला मोलाचे वाटत होते. ते सरतील कीं काय अशी त्याला धास्ती वाटत होती. रोज सकाळीं तो रस्त्यात आला म्हणजे आपले कोपेक कुणीहि चोरणार नाहीं याबद्दल त्याची खात्री असे. त्याचे डोळे आता जरा जास्त सतेज दिसू लागलेले होते, त्याच्यातला अस्वस्थपणा जरा कमी झालेला होता. आर्त्योम त्याला रोज दिसत असे, पण त्या पहिलवानानें त्याला बोलावल्याखेरीज तो त्याच्या जवळ जात नसे.

आर्त्योमचे अनेकदा त्याच्याकडे लक्षच जात नसे. त्याच्याकडे त्यानें लक्ष दिलें कीं तो त्याचा धदा कसा काय चाललाय याची हमखास चौकशी करीत असे.

"वा : ! हें काय विचारण ! माझा धदा छानच चाललाय. ही सारी तुमचीच कृपा !" केन जबाब देई. अशा वेळीं त्याचे डोळे हर्षभरानें प्रफुल्लित झालेले असत.

"लोक तुझ्या अंगाला हात नाहीं ना लावत ?"

"त्याची काय हिंमत आहे ! तुम्ही माझे रक्षणकर्ते आहात हें ठाऊक आहे त्याना !" ज्यू उद्गारे.

"ठीक आहे ! पण लक्षात ठेव. जर कांहीं कमजास्त झाल तर मला साग."

"जरूर सागेन."

"ठीक !"

आणि मग आर्त्योम तिरसट मुद्रेनें या ज्यूची लहानसर आकृती पाहून घेई आणि त्याला निरोप देई.

"आता जा हं—अन् तुझा धदा नीट लक्ष लावून कर."

आणि केन झटदिशीं चालू लागे. जातां जाता बघे लोकाच्या उपरोधिक व खोडसाळ नजरा त्याच्या नजरेंतून सुटत नसत. त्या पाहून त्याला सतत धास्ती वाटत राही.

अशा प्रकारें आणखी एक महिना लोटला. आणि मग एके दिवशीं संध्याकाळीं केन घरीं जायच्या तयारींत असतांना आर्त्योम त्याला भेटला. या देखण्या राक्षसानें त्याला मानेनें अभिवादन केलें आणि बोटानें खूण करून त्याला आपल्याकडे बोलावून घेतलें. केन धावतच त्याच्याकडे गेला;

आर्त्योम दुर्मुखलेला व उदास मनःस्थितींत आहे, तो एखाद्या पावसाळी [illegible] दिसत आहे, हें केनच्या लक्षात आलें.

"तुझ दिवसाच कामधाम आटोपल ?" त्यानें केनला विचारलें.

"होय. मी हा आत्ताच घराकडे चाललों होतों"

"थांब. जरा माझ्या बरोबर चाल. मला तुला काहीं सांगायचंय," आर्त्योम गुदमरलेल्या स्वरात म्हणाला.

त्याचें तें अवाढव्य जड धूड पुढे चालूं लागलें आणि केन त्याच्या पाठोपाठ निघाला.

त्यानीं रस्ता सोडला आणि नदीकडे जायची पाऊलवाट धरली. लवकरच पाण्याच्या लगत नाल्याच्या तळाशीं आर्त्योमला एक सोइस्कर जागा सापडली.

"खाली बैस," तो केनला म्हणाला. ज्यू खाली बसला. आपल्या रक्षणकर्त्याकडे तो तिरप्या, भेकड नजरेनें पाहूं लागला. आर्त्योमनें आपलें धूड जमिनीवर बसतें केलें आणि मग सावकाश सिगारेटसाठीं एका कागदाची सुरळी करायला सुरवात केली. केन प्रथम आकाशाकडे, मग नदीच्या पैलतीरावरील डोलकाठ्याच्या गर्दीकडे आणि नतर नदीच्या प्रशात लाटाकडे पाहूं लागला. संध्याकाळच्या नीरवतेंत या लाटा जशा काहीं दगडासारख्या निश्चल झालेल्या होत्या. आणि आर्त्योमला आपल्याला काय सांगायचें असेल याची अटकळ हा सारा वेळ तो आपल्या मनाशीं बांधत होता.

"अच्छा," आर्त्योम म्हणाला, "तुझ बर चाललय ?"

"होय तर. सार काहीं ठीक चाललय, आता मला कशाचीच भीति वाटत नाहीं."

"हें अगदीं जसं असायला पाहिजे तसं होतय."

"त्याबद्दल मी तुम्हाला धन्यवाद दिले पाहिजेत."

"थांब !" आर्त्योम म्हणाला.

पण बराच वेळ तो पुढचें बोललाच नाही. तो सिगारेटचे झुरके घेत बसला. जोरजोरानें श्वास घेऊ लागला. आणि तो ज्यू, पुढें काय भलतेंच ऐकायला मिळणार या काळजींत त्याच्या बोलण्याची वाट पाहात बसला.

"म्हणजे लोकानीं तुला मारहाण करायच व तुझा अपमान करायच बद केलय म्हणतोस ?"

" होय. तें तुम्हाला भितात. हे लोक म्हणजे कुत्रे आहेत नुसते— अन् तुम्ही आहात सिंहासारखे. अन् मी, आता— "

" थांब ! "

" काय आहे ही भानगड ? तुम्ही मला काय सांगणार आहात ?" केननें घाबरून विचारलें.

' मला काय सांगायच आहे बर तुला ! तें तितक सोप नाहीं. "

" मग आहे तरी काय तें ? "

" त्याच असं आहे, आपण खुल्या दिलान बोलून टाकू या—जें काय सांगायच तें सार सांगून टाकू या—अन् यातून सुटू या. "

" कशातून सुटायच ? "

" मला तुला हे सांगायच आहे कीं मला अतःपर—"

" अतःपर तुम्हाला कशाबद्दल काय करायचय ? "

" मला हें जमायच नाहीं. मला याचा वीट आलाय. माझ्यासारख्याला ही योग्य गोष्ट नव्हे. " आर्त्योम सुस्कारा सोडून म्हणाला.

" पण मला काहीं समजतच नाहीं. कोणती गोष्ट ही ? "

" अरे ही सगळीच भानगड—तू, अन् सार काहीं. मला अतःपर तुझ्याशीं मैत्री ठेवायची नाहीं—तें मला परवडत नाहीं. "

जणू कुणीतरी थप्पड लगावल्याप्रमाणें केन अंग चोरून मागे हटला.

" अन् तुला जर कुणी त्रास दिला, तर तू माझ्याकडे तक्रार घेऊन येऊ नकोस. अतःपर मला तुला मदत करता येत नाहीं. यापुढ तू मला आपला रक्षणकर्ता मानता कामा नये. समजल का तुला ? मला जमायच नाहीं तें. "

केन मेल्यासारखा स्तब्ध बसला.

येवढें बोलून झाल्यावर आर्त्योमनें एक सुटकेचा निःश्वास सोडला; मग तो जास्त स्पष्टपणानें व सुसंगतपणें बोलू लागला :

" त्या वेळीं तुला माझी दया आली; याबद्दल मी तुला पैसे देतों. किती पाहिजेत तुला ? सांग मला, अन् ती रक्कम मिळेल तुला. पण मला तुझ्याबद्दल वाईट वाटून घेता यायच नाहीं. तें माझ्या अंगातच नाहीं. तुझ्यावर मी दया करतों अशी माझ्या मनाची समजूत घालायचा मी सतत

प्रयत्न केला, पण तें केवळ ढोंग होत. मी मनाशीं म्हणालों: 'मला त्याच्याबद्दल वाईट वाटत,' पण तें खोट होत. माझ्या अंगात दयेची भावनाच नाहीं."

"याच कारण मी ज्यू आहे हें आहे का?" केननें त्याला हळूच विचारलें. आर्त्योमनें त्याच्याकडे तिरप्या नजरेनें पाहिलें, आणि थेट अंतःकरणातून निघालेल्या शब्दानीं त्याला साधे उत्तर दिलें:

"ज्यू म्हणजे कोण? अरे, परमेश्वराच्या दृष्टीन आपण सगळेच ज्यू आहोंत."

"मग असं का?" केननें शातपणें विचारलें.

"कारण मला तें जमत नाहीं. समजलास? माझ्या मनात तुझ्याविषयीं दयाबुद्धि नाहीं — किंवा कुणाविषयींच नाहीं म्हणेनास. तू हें समजून घ्यायचा प्रयत्न कर. मी दुसऱ्या कुणाजवळ हें बोललों नसतो. मी सरळ त्याच्या नाकावर ठोसा लगावून मोकळा झालों असतों पण मी तुझ्याजवळ म्हणून बोलतोंय हें. ."

"दुष्टापासून माझ रक्षण करायला कोण पुढ सरसावेल? माझ्या वैऱ्यापासून मला कोण सोडवील?" खिस्ती स्तोत्राच्या शब्दात ज्यूनें उदास, मद स्वरात विचारले.

"मला...मला नाहीं ते जमायच," आर्त्योम मान हालवीत उत्तरला. "लोक हसतात म्हणून मी अस म्हणतोंय अस नको समजूस. मला त्याची काडीइतकीहि पर्वा नाहीं. खुशाल हसू देत ते...पण मला तुझ्याबद्दल वाईट वाटतच नाहीं...पण माझ्यावर जो उपकार केलास त्याचा मोबदला म्हणून मी तुला थोडे पैसे द्यावेत म्हणतों."

आणि केन दुःखावेगानें भुईला नाक लावून प्रार्थनेच्या स्वरात ओरडून म्हणाला:

"हे सर्वशक्तिमान परमेश्वरा! हे अमर देवा! हे सूड देवते! ऊठ! आणि तुझ्या मार्गदर्शनाचा प्रकाश पडू दे. हे मृत्यूलोकींच्या न्यायाधीशा देवा!"

ती उन्हाळ्यातली संध्याकाळ होती; जिकडे तिकडे ऊब व नीरवता होती. मावळत्या सूर्याचे नाजुक उदास किरण नदींत प्रतिबिंबित झालेले होते. नाल्याची सावली आर्त्योम व केन याच्यावर पडलेली होती.

" जरा विचार कर तू, " आर्त्योमनें पुन्हा उदास व समजावणीच्या स्वरात बोलणें सुरू केलें, " माझ्यापुढ केवढ तरी काम पडलय. हें तुझ्या लक्षात नाहीं येत! पण मला—मला सूड हा घेतलाच पाहिजे. त्या लोकानीं मला निर्दयपणान मार मार मारल—आठवत ना तुला? "

तो अस्वस्थ झाला, त्यानें दात करकरा खाल्ले, मग तो वाळूवर उताणा पडून राहिला, त्यानें पाण्याच्या दिशेला पाय लांब केले आणि हाताची खोवरमिठी मानेखालीं घेतली.

" मी त्या सगळ्याचीं नाव मिळविलीं आहेत. "

" सगळ्याचीं? " केननें उद्विग्न स्वरात विचारलें.

" सगळ्याची. आता मी त्याचा हिशेब चुकता करायला सुरवात करणार आहे. अन् अशा वेळीं तू माझ्या आड येतोयस. "

" मी कसा तुमच्या आड येणार हो? " ज्यू उद्गारला.

" अरे तू माझ्या आड येतोयस अशातला प्रकार नाहीं हा. पण .. त्याच असं आहे. मी सगळ्याचच कडव वैर धरलय. ते वाईट आहेत अन् त्याच्यापेक्षा मी काय जास्त वाईट आहे? म्हणजे त्याच हें असं आहे... अच्छा, मग, मला आता तुझी गरज नाहीं. समजल का तुला?"

" नाहीं, " केन नम्रपणें, मान हालवीत उत्तरला.

"तुला नाहीं समजत? तू खरोखरीच भलताच विलक्षण प्राणी आहेस. लोकानीं तुझ्याबद्दल वाईट वाटून घ्यायलाच हव नाहीं का? अच्छा, आता मला कुणाबद्दलच वाईट वाटून घेता येत नाहीं. कुणाबद्दलहि यत्किंचितहि दया म्हणून माझ्याजवळ मुळीं नाहींच " आणि त्या ज्यूच्या बरगड्या ढोसून तो आणखी म्हणालाः " अजिबात नाहीं बघ! समजल का तुला? "

बराच वेळ दोघेहि स्तब्ध राहिले. खळखळत्या पाण्याची कुरकुर उबदार व सुगंधी हवेतून या दोघाकडे तरंगत आली, काळ्याभोर निद्रावश नदीचे सुस्कारे व विव्हळणेंच जणू दुरून ऐकू येत आहे असें वाटलें.

" आता माझ काय होणार? " शेवटीं केननें विचारलें; पण त्याला जबाबच मिळाला नाहीं; कारण आर्त्योमला पेंग आलेला होता, किंवा कदाचित तो विचारात गढून गेलेला असावा.

" तुमच्याशिवाय मी जगणार कसा हो ? " ज्यूनें मोठ्या स्वरांत आपलें बोलणें चालू केलें. आत्योंम आकाशाकडे टक लावून पाहता पाहतां उत्तरला:

" तू काय करणार तें ठरवण तुझ काम आहे. "

" अरे देवा रे, देवा ! "

" जगायच कसं हें सहजासहजीं इतराना कुणीच सांगू शकत नाहीं, " आत्योंम आळसटपणें म्हणाला.

जें काय सांगायचें तें सगळें सांगितल्यावर तो एकदम प्रसन्न आणि शांत झाला.

" याच पर्यवसान असं होणार हें मी जाणूनच होतों. तुम्ही मरणाच्या दारीं पडलेले असताना मी जेव्हा पहिल्या प्रथम तुम्हाला मदत करायला गेलों तेव्हाच मी हें जाणून होतों. तुम्ही माझे रक्षणकर्ते म्हणून केव्हाहि राहू शकणारच नाहीं हें मी जाणूनच होतों. "

त्यानें आत्योंमकडे कारुण्यमय नजरेनें पाहिलें, पण आत्योंम डोळे मिटून पडलेला होता.

" माझ्या पायीं लोक तुम्हाला हंसतात म्हणूनच बहुधा तुम्ही ही गोष्ट करता आहात काय ? " केननें हा प्रश्न अगदीं सावधपणें, जवळ जवळ कुजबुजत्या स्वरात विचारला.

" लोक ? मला काय रे पर्वा त्याची ? " आत्योंम डोळे उघडून गालातल्या गालात हसला. " माझी जर तसं करायची इच्छा असती, तर मी तुला माझ्या खांद्यावर बसवून रस्त्यातून मिरवत नेल असत. हसू देत ते खुशाल... पण यातून काहींच निष्पन्न होत नसत. आपण आपल्या खऱ्या भावनांना अनुसरून वागल पाहिजे, आपल्या स्वतःच्या आत्म्याचा आदेश आपण मानला पाहिजे. जें तिथ नाहीं, तें नसतच मुळीं. अन् ए भाई, मी मनापासून सांगतों ह—तू हा असा आहेस म्हणून मला शिसारी येते बघ. अन् एकदर खरा प्रकार तर हाच आहे ! "

" अह्हा ! खरं आहे तें ! आता मी काय करायच ? जाऊ का मी ? "

" होय. अजून दिवसाचा उजेड आहे तवरच जा तूं—सध्यां तर तुझ्या अंगाला कुणीच हात लावणार नाहीं. आपल संभाषण कुणीहि चोरून ऐकलेल नाहीं. "

" नाहीं ना! अन् तुम्हीं त्याबद्दल कुणाजवळहि काहीं एक बोलणार नाहीं ना?" केननें विचारलें.

" अर्थात नाहीं! पण माझ्याजवळ फार वेळा यायच नाहीं हे लक्षात ठेव."

" ठीक आहे!" ज्यूनें शांतपणे व शोकाकुल वृत्तीनें मान्यता दिली, आणि तो उठून उभा राहिला.

"तुला जर माझा सल्ला ऐकायचा असेल तर तू इथून अजिबात निघूनच जा, अन् इतरत्र कुठ तरी तुझा धदा कर," आर्त्योम बेपर्वाईच्या स्वरात म्हणाला. " इथ जीवन फार कठीण आहे, अन् प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या तरी मार्गान आपल्या शेजाऱ्याची हानि करायची खटपट करतोय."

" पण मी जाणार कुठ?"

" त्याचा तपास तू करायचास."

" बराय, आर्त्योम, येतों मी."

" बराय, भाई, ये ह.

आणि जाग्यावरून न उठताच, आर्त्योमनें आपला प्रचड हात लाब केला आणि त्यात त्यानें ज्यूचीं किडकिडीत बोटे दाबली.

" बराय, ये ह, मनाला लावून नको घेऊस."

" नाहीं घेणार," ज्यूनें उदासपणें सुस्कारा सोडला.

" अच्छा, मग! हेंच जास्त चागल होईल. तुला विचार करायला वेळ मिळाला, म्हणजे माझच म्हणण बरोबर आहे अस तुझ तुलाच दिसेल. तू माझ्या बरोबरीचा नव्हेस, आणि तू काहीं माझा जोडीदार होऊ शकत नाहींस. अन् मी काय केवळ तुझ्यासाठींच जगागच? तें नाहीं जमायच!"

" बराय, येतों मी."

" ये ह."

केन निघून गेला. खादे वाकवून खाली मान घालून तो नदीजवळून चालत गेला.

आर्त्योमनें तो जात असता त्याच्याकडे काहीं सेकदे नजर लावली, आणि मग, आपली पूर्वींची वृत्ति धारण करून तो उताणा पडून राहिला. रात्र पडू लागल्यामुळें वरचें आकाश काळे होऊ लागलेलें होतें.

निवात वातावरणातून विलक्षण आवाज येत जात होते. किनाऱ्यावर आपटणाऱ्या नदीच्या लाटाचा नियमित आवाज तर येत होताच.

केन परत फिरला आणि वाळूवर पसरलेल्या अवाढव्य आर्त्योमकडे पुन्हा आला, आणि त्याच्या जवळ उभा राहून मद, आदरभावयुक्त स्वरात म्हणाला :

" तुमच मन कदाचित बदलल तर नसेल ना ? "

पण आर्त्योम स्तब्धच राहिला.

" आर्त्योम, ' केननें पुन्हा हाक मारली आणि उत्तरासाठीं शातपणें वाट पाहिली.

" आर्त्योम, तुम्ही हें सार गमत म्हणून तर मला नसेल ना सागितल ? " केन पुन्हा थरथरत्या स्वरात म्हणाला. " आर्त्योम, त्या रात्रीची आठवण ठेवा—मी आलों अन् तुमची शुश्रूषा केली. दुसर कुणी आल नाहीं. फक्त मी आलों. " मद घोरणें हा एकच जबाब या प्रश्नाला मिळाला.

केन बराच वेळ त्या पहिलवानाजवळ उभा राहिला. झोंपेनें मार्दव आलेल्या त्याच्या देखण्या चेहऱ्याकडे तो टक लावून पाहात होता. त्याची जबरदस्त छाती नियमितपणें खालीवर होत होती. आणि त्याच्या काळ्या मिशा श्वासामुळे वेगवेगळ्या होऊन त्याच्या आड लपलेले मजबूत चकचकीत दात दृग्गोचर होते होते. तो स्मित करीत असलेला दिसला.

खोल सुस्कारा सोडून आणि मान आणखी खालीं घालून ज्यू पुन्हा परतला आणि नदीच्या कडेकडेनें चालू लागला. तो सावधपणें चाललेला होता. आता त्याला जीवनाची भयकर धास्ती वाटू लागलेली होती आणि त्याचा थरकाप होत होता, वाटेत चादणें लागलें कीं तो जरा सावकाश चाले, अधार असला कीं तो भराभर चालू लागे.

त्याची अवस्था एखाद्या उदरासारखी होती, तो लहानसर भेकड प्राणी सर्व बाजूनीं त्याला भेडसावणाऱ्या अनेक धोक्यातून आपल्या बिळाकडे जसा परततो, तसा हा परत चाललेला होता. रात्र आधींच झालेली होती, आणि नदीकिनाऱ्यावर शुकशुकाट होता.

प्रकाशनवर्ष : १८९८

# नव्या धर्तीचें संग्राह्य ललित वाङ्मय

महाराष्ट्रातील शेतकरी क्रांतीच्या पार्श्वभूमीवर आधारलेली
स्वतंत्र वास्तववादी कादंबरी

**पृष्ठें २४० ] दास्य [ किं. ३॥ रु.**

लेखक : वि. म. भुस्कुटे

गौतम बुद्ध व महावीर जैन याच्या समकालीन भारतीय जीवनाचा
परिचय करून देणारी ऐतिहासिक कादंबरी

**पृष्ठें २५३ ] सिंह सेनापति [ किं. ३। रु.**

लेखक : राहुल सांकृत्यायन

महाराष्ट्रातील बालगोपालासाठीं क्रांतिकारक बालवाङ्मयाचें
७१ चित्रांनीं सजविलेलें अपूर्व पुस्तक

## मुलांचा लेनिन

मोठा टाईप, मजबूत बांधणी, मोठ्या आकाराचीं
( ९"×११" चीं ) ६४ पृष्ठें : कि. २ रु.

अस्पृश्यतेच्या प्रश्नाची पुरोगामी दृष्टिकोनातून छाननी
करणारी हृदयगम कादंबरी

**पृष्ठें १६८ ] अस्पृश्य [ किं. ३ रु.**

लेखक : मुल्कराज आनंद; अनुवादक : स. ह. मोडक

हीं व या पुस्तकासोबत दिलेल्या यादींतील सर्व पुस्तकें मुंबई,
पुणें व नागपूर येथील सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्याकडे मिळतात.

माहितीसाठीं लिहा :

**लोक-साहित्य, ८७ शिवाजी पार्क, मुंबई २८**

# नव्या धर्तीचें संग्राह्य ललित वाङ्मय

*

**गोर्की व गोर्की-साहित्य :** (१) मॅक्सिम गोर्की : चरित्र आणि वाङ्मय [किं. १॥ रु.]; (२) मॅक्सिम गोर्कीच्या लघुकथा [किं. २ रु.]; (३) "एका काळीं माणसें असलेले प्राणी" (कादंबरी) [किं. २ रु.]; (४) मालक (आत्मचरित्रपर कादंबरी) [किं. २ रु.]; (५) फोमा (कादंबरी) [किं. ६ रु.]

**राहुल-साहित्य :** (१) वोल्गा ते गंगा (ऐतिहासिक कथा-संग्रह) [दुसरी आवृत्ति : किं. ४॥ रु.]; (२) सिंह सेनापति (बौद्धकालीन ऐतिहासिक कादंबरी [किं. ३। रु.]; (३) बाविसावें शतक (दोनशें वर्षांनंतरच्या भारताचें कल्पनारम्य दर्शन घडविणारी कादंबरी) [किं. १॥ रु.]; (४) सरदार पृथ्वीसिंह (एका क्रांतिकारकाचें चरित्र) [किं. ३ रु.]; (५) जय यौधेय (चंद्रगुप्त विक्रमादित्यकालीन ऐतिहासिक कादंबरी) [किं. ४॥ रु.]

**कादंबऱ्या व गोष्टी :** (१) दासू (महाराष्ट्रांतील शेतकरी क्रांतीच्या पार्श्वभूमीवर आधारलेली स्वतंत्र कादंबरी (ले० वि. म. भुस्कुटे) [किं. ३॥ रु.]; (२) अस्पृश्य (कादंबरी—ले० मुल्कराज आनंद) [किं. ३ रु.]; (३) हिंवाळयातलें इंद्रधनुष्य (कादंबरी) [किं. ४ रु.]; (४) नागपुरी गोष्टी (ले० दि. बा. फडणवीस) [किं. २ रु.].

**निबंध :** (१) देशभक्तीची कसोटी (ले० शं. बा. देशपांडे) [किं. २ रु.]; (२) माझी मराठी (ले० श्री. अ. डांगे) [किं. ४ आ.].

**बाल-साहित्य :** (१) मुलांचा लेनिन (७१ चित्रांसह) [किं. २ रु.]; (२) टॉल्स्टॉयच्या बाल-कथा (मूळ रशियनवरून अनुवादित) [किं. १२ आ.]

टपाल खर्च वेगळा

पुण्या मुंबईतील प्रमुख पुस्तक विक्रेत्याकडे मिळतें.

**लोक-साहित्य, ८७ शिवाजी पार्क, मुंबई २८**